# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
## ( जिल्हा वाचनालय )

मासिकाचे नांव — [illegible]

संपादक — [illegible]

मासिक क्रमांक —            सन —

अंक —

(महिने)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

जुनी मासिके (संदर्भ)

सं-भा-33/29

KÂVYASANGRAHA. 21.

# THE POEMS

OF

# DEVANÂTHA MAHÂRÂJA.

( A GREAT RENOWNED SAGE OF SURJI. )

*EDITED WITH*

CRITICAL AND EXPLANATORY NOTES

BY

VÂMANA DÂJÎ OKA,

HEAD MASTER, HIGH SCHOOL, RAIPORE.

PRINTED AND PUBLISHED

BY

TUKÂRÂM JÂVAJÎ,

PROPRIETOR OF JÂVAJÎ DÂDÂJÎ'S "NIRNAYA-SÂGARA" PRESS.

Bombay.

1896.

*Price 1 Rupee.*

*(Registered under Act XXV of 1867.)*

---

[ All rights reserved by the publisher. ]

काव्यसंग्रह. २१.

वैदर्भदेशस्थ प्रसिद्ध साधुवर्य

देवनाथमहाराजकृत

# कवितासंग्रह.

हा

वामन दाजी ओक,

हेडमास्तर, हायस्कूल, रायपुर;

यांनीं अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन

जुनाट हस्तलिखित प्रतीच्या आधारें

तयार केला.

तो

मुंबईत जावजी दादाजी यांच्या 'निर्णयसागर' छापखान्याचे मालक

तुकाराम जावजी यांनीं छापून प्रसिद्ध केला.

१८९६.

किंमत १ रुपया.

हा ग्रंथ

माझे परमपूज्य आणि सन्माननीय गुरुवर्य

**डाक्टर रामकृष्ण गोपाळ भांडारकर**

एम्. ए. पी. एच्. डी. माजी व्हाइस चान्सलर-

मुंबई युनिव्हर्सिटी, मेंबर आफ् दी

रायल एशिआटिक सोसायटी

इत्यादि इत्यादि

यांच्या ठायीं

देवनाथमहाराजांप्रमाणें असलेली भगवद्भक्ति

पाहून

यांच्या आज्ञेनें नम्रतापूर्वक

**अर्पण केला असे.**

'काव्यसंग्रह'कार.

सं-भा- ३३१७

# अनुक्रमणिका.



| अनुक्रमांक. | प्रकरणनाम. | ग्रंथसंख्या. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|
| १ | श्रावणाख्यान .... .... .... .... | ४६ | १–४ |
| २ | कृष्णजन्म .... .... .... .... | ८१ | ५–१३ |
| ३ | कटिबंधसंग्रह .... .... .... .... | ५ | १३–१७ |
| ४ | पदसंग्रह—भक्तिपर पदें .... .... .... | ५७ | १७–६८ |
| | ,, —उपदेशपर पदें .... .... .... | १६ | ६८–८४ |
| | ,, —प्रासंगिक पदें .... .... .... | २२ | ८४–१०६ |
| | ,, —वेदांतपर कविता .... .... | ९ | १०६–११२ |
| | ,, —आणखी मिळालेलीं पदें .... .... | ११ | ११३–११८ |
| | ,, —हिंदुस्थानी पदें .... .... .... | ४६ | ११८–१४० |
| | ,, —नवीन मिळालेलीं पदें .... .... | ४७ | १४०–१६५ |
| ५ | विधिनिंदा .... .... .... .... | ११ | १६५–१६७ |
| ६ | कृष्णस्तोत्र .... .... .... .... | ९ | १६७– |
| ७ | गुरुस्तुति .... .... .... .... .... | २ | १६८– |
| ८ | अभंग .... .... .... .... .... | २ | १६८– |
| ९ | स्फुट दोहरे .... .... .... .... | ५ | १६८ |
| १० | आणखी उपलब्ध झालेलीं पदें .... .... | [illegible] | १६९–१७३ |
| ११ | कटिबंध .... .... .... .... .... | २ | १७२–१७५ |
| १२ | आरती .... .... .... .... | १ | १७६ |

एकंदर ग्रंथसंख्या— ३७६

# सूचना.

'देवनाथ महाराजांची कविता पुष्कळ आहे, आपण प्रयत्न केल्यास आपणास मिळेल व ती छापून प्रसिद्ध केल्यास आम्हां वैदर्भदेशस्थ जनांवर मोठे उपकार होतील'—असें आमच्या कांहीं वैदर्भदेशस्थ मित्रांनीं सांगितलें. तेव्हां आम्हांसही ती गोष्ट योग्य वाटून आम्ही त्या प्रयत्नास लागलों. देवनाथाची कविता छापण्यास आरंभ केल्यास जवळ जवळ चार वर्षें झालीं. इतक्या अवकाशांत उपलब्ध झालेली व होण्यासारखी असलेली कविता आज छापून पुरी होत आहे.

या पुस्तकांत छापलेलीं पदें रा० रा० श्रीनिवास नीलकंठ सरमोकादम (वणी), पर्शराम बाळाजी कावतकर (उमरावती), व्यंकटेश यशवंत शिंगवाळ (गोंवें) व चिंतो गोविंद वैशंपायन (पालशेत) यांच्याकडून आम्हास मिळालीं, यास्तव आम्ही या सज्जनांचे फार फार आभारी आहों.

हें काम इतक्या चांगल्या रीतीनें तडीस जाण्यास आमचे मित्र रा० कावतकर हे कारण आहेत. छापलेल्या पदांपैकीं बरींच पदें रा० कावतकर यांनीं सुर्जी येथील मठांतील अस्सल प्रतींवरून शुद्ध करून पाठविलीं. रा० कावतकर यांस अस्सल प्रती मठांतून पाहण्यास मिळत असत, परंतु त्यांस आणखी पदें मिळालीं नाहींत. याचें कारण असें आहे:—एकदां आम्हांस मिळालेलीं कांहीं पदें त्यांस पाहण्यास पाठविलीं होतीं तीं त्यांनीं श्री० देशपांडे यांच्या मार्फत मठाधिकाऱ्यांस दाखविलीं, तीं पदें फार अशुद्ध आहेत असें मठाधिकाऱ्यांस दिसून आलें, तेव्हां तीं पदें शुद्ध करून देण्याची विनंति अत्यंत नम्रतेनें रा० कावतकर यांनीं केली, ती त्यांनीं मान्य केली. बाहेरून मिळतील तेवढीं पदें मठांतून शुद्ध करून देण्याची मठाधिपतींनीं कृपा केली हे त्यांचे सर्व महाराष्ट्रीयांवर उपकार आहेत. देवनाथ महाराजांची आज्ञा नसल्यामुळें आणखी पदें देण्याचें मठाधिकाऱ्यांनीं नाकबूल केलें, ही निरुपायाची गोष्ट समजली पाहिजे.

देवनाथ महाराजांनीं **'अहिमहिआख्यान'** रचिलें आहे. असें समजतें तरी तें देवनाथभक्त व इतर **'काव्यसंग्रह'**हितेच्छु जनांनीं मिळवून देण्याची खटपट करावी अशी प्रार्थना आहे.

तसेंच देवनाथ महाराजांच्या गुरुशिष्यपरंपरेपैकीं रंगनाथ, गोपाळनाथ आणि दयाळनाथ यांची बरीच कविता आमच्या संग्रहीं आहे. या पुस्तकास लोकाश्रय मिळाल्यास सदहू साधुत्रयीच्या प्रासादिक कवितेचा जीर्णोद्धार करण्याचा मानस आहे.

**'काव्यसंग्रह'कार.**

# देवनाथ महाराजांचें चरित्र

पदार्थविज्ञानशास्त्र्यांस मूर्तसृष्टीमध्यें, नवनवे चमत्कार आढळून त्यांच्या आधारानें नवनवे शोध करायास सांपडतात, त्याप्रमाणें, अमूर्तसृष्टीमध्यें, नवनवे चमत्कार दृष्टीस पडून, आत्मानात्मपरायणांस नवनवे चमत्कार व्यक्त करण्यास सांपडतात, आणि या सगळयांच्या योगानें, जगाची व्यावहारिक आणि मानसिक उन्नति होत जात आहे. ह्यांत आत्मानात्मपरायणांच्या शोधाची योग्यता कांहीं वेगळी आहे. कां कीं, त्यांचा संबंध आत्म्याशीं म्हणजे मनुष्याच्या जीवाच्या उद्धाराशीं असतो. त्या मंडळींत कवि आणि साधु हे मुख्य होत. आणखी कवित्व आणि साधुत्व हीं ज्या व्यक्तींत एकवटतात, त्या व्यक्तींची योग्यता खरोखर अवर्णनीय होते, हें उघड आहे. असे जे कोणी वंद्य पुरुष अर्वाचीनकाळीं आमच्या राष्ट्रांत होऊन गेले, त्यांत **देवनाथ महाराज** हे एक होते. ह्यांच्या कविता म्हटल्या म्हणजे मुख्यत्वेंकरून कटाव आणि पदें आहेत. त्यांस लोकोद्धाराची इतकी घाई झालेली दिसते कीं, मात्रा, गण, यति, यमक, छंद इत्यादिकांच्या व्यर्थ खटाटोपींकडे लक्ष देण्यास फुरसद झाली नाहीं, ते आपला भक्तिभाव लोकांच्या अंतःकरणांत, जणुं काय मोठ्या घाईनें ओतीत गेले आहेत. कां कीं, त्यांस त्याविषयीं त्यांच्या गुरूची तशीच आज्ञा झाली होती. ह्या पुरुषाची वृत्ति अशी कशी झाली, हा एक मोठा चमत्कार आहे. आणि त्यांत पुष्कळ दैवी साक्षात्कार दिसून येतो. त्यांच्या चरित्राचें कथन आम्हीं येथें करितों.

वऱ्हाडांत इलिचपूर जिल्ह्यांत दर्यापूर तालुक्यांत **सुर्जी** म्हणून गांव आहे. हें गांव **शाहणूर** नदीचे कांठीं आहे. **शाहणूर** ही नदी **सुर्जी** व **अंजनगांव** ह्या दोन गांवांमधून वाहते. ह्या दोन गांवांपैकीं **सुर्जी** हें लहान आहे व **अंजनगांव** हें मोठें आहे. यांस **सुर्जी अंजनगांव** असें म्हणतात. आपल्या चरित्रनायकाचा जन्म ह्या **सुर्जी** गांवांतच झाला. हे **वासिष्ठगोत्री** असून **ऋग्वेदी** होते. यांचा जन्मकाल बरोबर रीतीनें अद्यापि कोठें सांपडत नाहीं. तथापि यांच्या जन्मकालाचा निश्चय ठरविण्यास दुसरें एक साधन आहे; तें हें कीं, **सुर्जी**मध्यें **श्री० रा० रा०** रघुपतराव हणमंतराव **देशपांडे**, स्पेशल माजिस्ट्रेट आहेत. त्यांचे आजे **खुशालरावबाबा** म्हणून होते. हे **खुशालरावबाबा** **देवनाथांचे** अगदीं लंगोटमित्र होते. त्यांच्या आणि **देवनाथांच्या** वयांत फक्त

सहा महिन्यांचें अंतर होतें, परंतु त्यांत वडील कोण हें मात्र खात्रीलायक समजत नाहीं. कदाचित् देवनाथ सहा महिन्यांनीं वडील असतील किंवा खुशालरावबाबा हे सहा महिन्यांनीं वडील असतील. तथापि यावरून खुशालरावबाबांचा जन्म ज्या सालीं झाला त्याच सालीं देवनाथांचाही जन्म झाला असें मानण्यास हरकत नाहीं. खुशालरावबाबा हे फसली[1] सन ११६६ ह्या वर्षीं जन्मले. तेव्हां देवनाथ यांचाही जन्म ह्याच सालीं झाला हें उघड आहे. ह्याप्रमाणें ह्यांच्या जन्मकालची माहिती मिळते.

देवनाथांचा जन्मकाल ठरविण्यास आणखी एक आधार आहे तो असा:—मल्हारनाथ म्हणून जो त्यांचा प्रसिद्ध शिष्य होता त्यानें देवनाथांवर एक आरती केली आहे. तींत वर्णन केल्याप्रमाणें सर्व गोष्टी साधार व विश्वसनीय मानण्यास कोणतीही हरकत दिसत नाहीं. ती आरती अशी:——

## आरती.

आरती देवनाथा गुरुवरा मोक्षप्राता ।। ध्रुवपद. ।।
पवित्र ग्राम सूर्जी येथें अवतार धरिला ।
शके सोळाशें [2]शाहत्तरीं नवमासीं प्रगट झाला ।
[3]सत्रांत [4]रुद्रकृपें देहभावा विसरला ।
तेथून [5]तीनें अब्दीं गोविंदनाथा शरण गेला. ।। आरती० ।। १ ।।
महारुद्रप्रेरणेनें [6]नाथजीनें [7]नाथ केला ।
शुद्ध जें ब्रह्म तेंचि स्वयंब्रह्म तूंचि झाला ।
तें सुख वर्णवेना कोटितेजाचे तेजाला ।
औट पीठ त्यागोनीयां निजरूपीं मग्न झाला. ।। आरती० ।। २ ।।

---

१. फसली साल:—ह्या शकाचा आरंभ इसवी सन ५९० आणि शालिवाहन शक ५१२ ह्या वर्षीं झाला. दक्षिणहिंदुस्थानांतील फसली साल आणि उत्तरहिंदुस्थानांतील फसली साल यांमध्यें २ वर्षांचें अंतर आहे. ह्यावरून देवनाथांच्या जन्ममृत्यूचे शक सन निघतात ते:—
देवनाथांचा जन्मकाल—इ० स० १७५४; फसली सन ११६६; शालिवाहन शक १६७६.
देवनाथांचा निर्याणकाल—इ० स० १८२१; फसली सन १२३३; शालिवाहन शक १७४३.
२. देवनाथ हे शके १६७६ त मार्गशीर्ष मासीं जन्मले. ३. 'सत्रांत' हा शब्द 'सत्राशें' ह्या अर्थीं योजिला आहे. ४. मारुतीच्या कृपेनें. ५. 'तेथून' (म्हणजे शके १७०० पासून) तीन वर्षें म्हणजे शके १७०३ मध्यें गोविंदनाथांचा अनुग्रह घेतला. ६. गोविंदनाथांनीं. ७. 'नाथ केला' म्हणजे पूर्वीं 'देवराव' असें नांव होतें तें ह्या वेळीं 'देवनाथ' असें ठेविलें.

जडं हे [illegible]यासी देशोदेशीं वास केला ।
शीघ्र कविता रचोनी भक्तिरस चाखवीला ।
शके सत्राशें व्रीसांत दास धन्य हा[1] केला ।
ब्रह्मरस पाजोनीयां जीताचि मुक्त केला. ॥ आरती० ॥ ३ ॥
[2]त्रेचाळीशीं मधूमासीं शीत पक्षीं नवमीला ।
मध्याह्नीं भानु येतां त्या ग्वाल्हेर ग्रामाला ।
कीर्तनीं रमोनीयां अग्नितेजें तेज आला ।
मल्हारगुरुवरदा देह पृथ्वींत आटला. ॥ आरती० ॥ ४ ॥

वरील आरतींत थोडक्यांत मार्मिकतेनें देवनाथांचें चरित्रच वर्णन केलें आहे. ही आरती त्यांचे परंपरागत संप्रदायांत प्रामुख्यानें प्रमाण मानिली जात आहे. यास्तव यापेक्षां अन्यसाधनाची अपेक्षा करण्याचें कारण नाहीं. निदान ह्यापेक्षां सबळ साधार व विश्वसनीय गोष्टी कोणी पुढें आणिल्यावांचून ह्या गोष्टी खोट्या मानितां येत नाहींत. असो. यांचें निर्याण होऊन सुमारें ७९ वर्षें झालीं.

देवनाथांची शिष्यशाखा मोठी आहे, व खुद्द सुर्जीत यांचा मठ आहे. इतक्या शिष्यांतून व मठांतूनही यांची म्हणजे बरोबर माहिती कोणास नसेल असें म्हणवत नाहीं. परंतु आपल्या देशांतील पूर्वापार समजुती चमत्कारिक असल्यामुळें सदर माहिती देण्यांत त्यांस गुह्यतम गोष्टींचा भेद केलासें वाटतें. ह्या समजुती कधीं आपल्या लोकांच्या मनांतून जातील तो सुदिन. असो. देवनाथांच्या वडिलांचें नांव **राजोपंत** होतें. हे कमावीसदार असत. त्यांस तीन मुलगे होते. त्यांतील वडील मुलाचें नांव **व्यंकटराव,** हे इलिचपूरचे रिसाल्यांत पांचशें स्वारांचे अधिकारी होते. दुसरें **देवराव** व तिसरे **सुंदरपंत. सुं**दरपंत हे पांडेपणाचें काम करीत असत. देवनाथांच्या लग्नाविषयीं मतभेद आहे. कित्येकांच्या मतें यांचें लग्न मुळींच झालें नव्हतें. व कित्येकांच्या मतें यांस एक कन्याही होती. किती आश्चर्याची व दुःखाची गोष्ट कीं, आज ज्या गोष्टीस ७९ वर्षें झालीं तिची सुद्धां आपणांस विश्वसनीय माहिती मिळत नाहीं!!!

देवनाथ यांचें आईबापांनीं ठेवलेलें नांव **देवराव** असें होतें. अनुग्रह प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या गुरूंनीं त्यांचें नांव **देवनाथ** असें ठेविलें. ह्याविषयींची हकीकत पुढें येईल. हे लहान असतांना नेहमीं उनाड मुलांत खेळत असत. त्यांची ही लहानपणची हूड वृत्ति पुढेंही मधून मधून दृष्टीस पडे. तालिमबाजांस

---

१. मल्हारनाथ. २. देवनाथ हे शके १७४२ त चैत्र शुद्ध नवमीचे दिवशीं दग्ध झाले.

विद्यार्जन मनापासून नको असतेंच. खेरीज त्याकाळीं हल्लींप्रमाणें शिक्षणाचीं साधनेंही सुकर नसल्यामुळें त्यांस विद्येचा संस्कार विशेष घडला नाहीं. त्यांस लिहितां वाचतां येत असावें असें वाटतें. परंतु कित्येकांचे सांगण्यांत असें येतें कीं, त्यांस मुळींच लिहितां वाचतां येत नव्हतें.

हा लहानपणचा प्रकार चालत असतां त्यांनीं लवकरच **सु**र्जीत तालमीचा [१]आखाडा काढला. आणि तालमीच्या नादीं गांवांतील मुलें लाविलीं. ते स्वभावानें हूड व स्वैरवृत्ति असल्यामुळें घरांतील वडील माणसांचे बोलण्याची कांहींच पर्वा करीतना. तालमीचा नाद लागल्यावर तालिमबाजीचे सर्व गुणदोष **दे**वनाथ यांनीं संपादन केले. शरीर पीळदार असणें, गर्दनमुंडे, दंड, पिंडऱ्या वगैरे शरीरावयव कांहीं विशिष्ट प्रकारचे बनविणें, जानव्याची उपवीति ठेवणें, चालण्याची ढब ऐटीची असणें वगैरे प्रकार **दे**वनाथांनीं पूर्ण संपादिले. त्याप्रमाणेंच दांडूपणा, तामसवृत्ति, बेपर्वाई इत्यादि दोषही त्यांजमध्यें दिसूं लागले. सारांश, **सु**र्जींतील मल्लविद्याप्रिय मंडळीचे ते वस्ताद बनले. परंतु लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, जरी हे सर्वकाळ बाह्यतः क्रीडापरायण होते, तरी अंतःकरणापासून ईश्वराविषयीं प्रेम, अस्तित्वबुद्धि हीं त्यांचे ठिकाणीं पूर्ण असत.

पूर्वपुण्यसंचय उदयास येणें असतोच. त्या अनुरोधानें **दे**वनाथांस पुराणश्रवण, ईश्वरनामस्मरण वगैरे पारमार्थिक गोष्टींचाही मनापासून छंद असे. तालिमबाज लोकांचें आराध्यदैवत म्हटलें म्हणजे **बलभीम** असावयाचें. त्याप्रमाणें **दे**वनाथांसही **मा**रुतीची उपासना प्रिय असे.

ज्याप्रमाणें **दे**वनाथांनीं मल्लविद्येंत शारीरिक सार्थकता संपादिली, त्याप्रमाणेंच पारमार्थिक साधनें करून त्यांनीं देवतेची प्रसन्नता संपादण्यासही सुरवात केली. जरी देव जवळ आहे तरी मनुष्यास दूर जाऊन ईश्वर भेटेल असें नेहमीं वाटत असतें. वृत्तीची बहिर्मुखता हा मानवी स्वभावच आहे. देव जवळच भेटल्यास देव भेटला किंवा दुसरें कांहीं पिशाच भेटलें याबद्दल संशय येतो.

देहीं देव प्रत्यक्ष जाण असतां कोणी न जाणे तया,
त्याला सांडुनि हिंडतीं त्रिभुवनीं पाषाण पूजावया. ।
ग्रंथीचें धन नेणती सकलही भिक्षा बळें मागती,
यालागीं तुज काय सांगुं मनुजा! होणार दैवा गती. ॥

---

१. हा तालमीचा आखाडा सुर्जीमध्यें हल्लीं ज्या जागीं मठ आहे त्याच जागीं होता. पुढें तो आखाडा मोडून त्या ठिकाणीं खुद्द देवनाथांनीं मठ बांधला.

सं-भा-३३१५



ह्या पूर्वप्रकारास अनुसरून देवनाथ यांस तालमींत मारुती ठेवून त्याची भक्ति करणें अथवा गांवांतील मारुतीचें दर्शन घेणें इतकेंच पुरेसें न वाटून, ते वारीच्या हनुमंतासही जात असत. ह्याप्रमाणें क्रम चालला असतां त्यांस एके दिवशीं असा दृष्टांत झाला कीं, 'मी सुर्जीतही असल्याकारणानें तुला इतक्या दूर येण्याचें कांहीं कारण नाहीं.' यामुळें यापुढें ते वारीचे हनुमंतास न जातां सुर्जीतील मारुतीची भक्ति करीत असत. तथापि थोडें खेळाकडे लक्ष्य असल्यामुळें कांहीं दिवसपर्यंत ह्या मारुतीचा त्यांस दृष्टांत वगैरे कांहीं झाला नाहीं.

अशा प्रकारें कांहीं दिवस गेल्यानंतर देवरावांचे वडील बंधूस ह्या हूड वृत्तीचें व सदासर्वदां खेळांत मन असल्याचें वाईट वाटलें. त्यावरून ते एके दिवशीं मातोश्रीजवळ म्हणाले, 'आई, आपला हा देवराव नेहमीं उनाड मुलांत खेळतो, तालमींत असतो यास काय करावें? याचें पुढें कसें होईल? आज माझ्याकडे पाहून तरी त्यानें कांहीं लाज धरावी कीं, आपल्या वडील भावाचा मान केवढा, अधिकार केवढा, पालखी, घोडे, नोकर, सरंजाम केवढा, परंतु तें कांहीं नाहीं. तूं तरी त्यास चार गोष्टी सांगून पहा, नाहीं तर त्याचें नशीब!' हें ऐकून मातोश्रीसही वाईट वाटलें. परंतु करणार काय? शेवटीं तिनें एके दिवशीं देवराव एकटेच भोजनास बसले असतां, वडील बंधूचे वरील उद्गार त्यांस कळविले. ते ऐकतांच पूर्वपुण्याच्या भाग्योदयानें म्हणा अथवा ईश्वरी संकेतच तसा होता म्हणून म्हणा; मातोश्रीचे तोंडून ते बंधूचे उद्गार कानीं पडतांच एकदम वैराग्य उत्पन्न झालें. त्यासरसें वाढलेलें ताट पुढें सारून उभे राहिले व मातोश्रीस म्हणाले, 'ठीक आहे. ज्या दिवशीं पालखींत बसून येईन त्याच दिवशीं आपलें दर्शन घेईन.' असें बोलून घराचे बाहेर पडले.

वर सांगितल्याप्रमाणें देवराव घरांतून बाहेर पडल्यावर गांवांत फिरावें, मारुतीचे दर्शनास जावें, वाटल्यास जेवावें अशी त्यांची पिशाचवृत्ति झाली. एके

---

१. सुर्जीपासून सुमारें २० कोसांवर जळगांव तालुक्यांत (वऱ्हाडांत) वारी म्हणून एक खेडें आहे. येथें एक हनुमंताचें मोठें जागृत स्थान आहे. ह्यावरून ह्या गांवास **'हनुमंताची वारी'** असें नांव पडलें. २. सुर्जी येथें एक मारुतीचें जागृत स्थान आहे. ह्या मारुतीची स्थापना सुर्जींतील श्री० रा० रा० रघुपतराव हणमंतराव देशपांडे ह्यांचे मूळपुरुष कै० विठोजी नारायण देशपांडे यांचे हस्तें हिजरी सन १०८७ (म्हणजे इ० स० १७०९) मध्यें झाली; असें लेखी पुराव्यावरून समजतें. हें स्थान फार कडक आहे. हा मारुती उघड्या चवथऱ्यावर बसविलेला आहे व यानें वेळोवेळीं दृष्टांत देऊन माझें देवालय बांधूं नका असें कळविलें असल्याचें समजतें. यामुळें ह्या मारुतीस अद्यापि देवालय नसून तो उन्हापावसांत असतो.

दिवशीं मध्यरात्रीं ते सदरहू देशपांडे यांचे गढीचे भिंतीचे बाजूस बसले होते. पूर्वकर्मधर्मसंयोगानें म्हणा अगर ईश्वरास पुढील संकेत सिद्धीस नेणें होता म्हणून म्हणा, गबाभट[1] कुंडले त्याच मार्गानें मारुतीचे दर्शनास जात होते. त्यांनीं देवरावांस पाहिलें व ते त्यांस म्हणाले, 'कोण, देवराव, येथें कां?' देवराव म्हणाले, 'उगीच.' त्यावर गबाभट यांनीं त्यांची ती वृत्ति पाहून मनांत ओळखिलें कीं, ह्या स्वारीस महाराजांचा झपाटा झाला आहे. मग ते देवरावांस उघडपणें म्हणाले कीं, 'देवराव, चल तुला महाराजांस भेटवितों.' त्यावर देवराव 'बरें आहे' असें म्हणून गबाभट यांजबरोबर मारुतीचे दर्शनास गेले. तेथें नित्याप्रमाणें गबाभट यांनीं मंत्र म्हणतांच मारुतीनें वानररूपानें उभयतांस दर्शन दिलें. त्यावेळीं गबाभट म्हणतात, 'महाराज! आपली असामी अशी कां? ज्यास 'आपला' म्हणून म्हटलें त्याची अशी स्थिति नसावी.' त्यावर मारुतीनें उत्तर दिलें, 'याचे हातून थोडी चूक[2] झाल्यामुळें असें झालें. आतां लवकरच काम होईल. कांहीं हरकत नाहीं.' हा सर्व संवाद देवरावांनीं मुकाट्यानें ऐकिला. नंतर मारुती अंतर्धान पावले. असा प्रकार झाल्यावर मग तर देवरावांचें वैराग्य जास्तच जोरावलें. आजपर्यंत नुसते मानसिक विचार चालून सर्व गोष्टी होत होत्या. आतां तर प्रत्यक्ष दर्शनाचा लाभ झाला, मग त्या देवरावांच्या आनंदास काय पारावार!! त्यांनीं एकसारखें मारुतीनजीक धरणें घेतलें. वाटल्यास मारुतीला नैवेद्य येईल तो खावा. नैवेद्य नसल्यास तसेंच असावें. लोकांसही ह्या वैराग्यवृत्तीचें फार आश्चर्य वाटलें. घरच्या मंडळीस फार वाईट वाटलें कीं, देवरावांची स्थिति चांगली नाहीं. दिवसेंदिवस त्यांची वृत्ति पिशाचवत् झाली. पूर्ण वैराग्य उत्पन्न झाल्यावर ईश्वर गुरुरूपानें भेटण्यास वेळ लावीत नाहीं. सच्छिष्य तयार झाल्यावर सद्गुरु धांवून येतो. 'आचार्यश्चैत्य वपुषा स्वगतिं व्यनक्ति' असें एक वाक्य आहे.

---

१. गबाभट कुंडले म्हणून सुर्जींत एक मोठा कर्मशील व मांत्रिक ब्राह्मण असे. त्यास सुर्जीतील मारुती प्रसन्न असे. व तो दररोज मध्यरात्रीं ह्या मारुतीचे दर्शनास जात असे. तेथें त्यानें मंत्र म्हटला कीं, मारुती वानररूप धारण करून त्यास दर्शन देई. नंतर उभयतांचें संभाषण होत असे. २. कोणी म्हणतात कीं, एका मंत्र्यानें देवनाथांस मंत्राराधन करण्यास सांगितलें व त्यांत कांहीं चूक झाल्यामुळें त्यांचे बुद्धीस भ्रंश झाला. पुढें त्याच मांत्रिकानें तें अनुष्ठान सांग करण्यास लाविलें. मग साक्षात्कार झाला. त्यावेळीं देवरावांनीं देवतेपाशीं रामनामाचा जिव्हेस व मनास कधींही विसर न पडावा असा वर मागितला. तेव्हां देवतेनें देवरावांचे जिव्हेवर स्वतः 'श्रीराम' हीं अक्षरें काढिलीं व तीं त्यांचे जिव्हेवर असल्याचें कित्येकांनीं पाहिलें असल्याचें कळतें.

इकडे **गोविंदनाथ** म्हणून परम सत्पुरुष **नाथ**पंथी **भा**गवतसंप्रदायी भगवद्भक्त प्रवास करीत होते. हे **कों**कणस्थ ब्राह्मण होते. **आ**कोला (वऱ्हाडांत) तालुक्यांत **घुसर** म्हणून गांव आहे, तेथचे हे राहणारे. ह्या ठिकाणीं **गो**विंदनाथ महाराजांचें अद्यापि घर आहे असें म्हणतात. त्यांस दृष्टांत झाला कीं, **सु**र्जी गांवीं कोणी **दे**वराव म्हणून आहे त्याची वैराग्यवृत्ति होऊन चित्तशुद्धि चांगल्या प्रकारची झालेली आहे. याकरितां तिकडे जाऊन त्यास अनुग्रह द्यावा. असा दृष्टांत होतांच **गो**विंदनाथ फिरत फिरत **सु**र्जीस आले. तेव्हां **दे**वरावांची स्वारी **मा**रुतीचे चवथऱ्यावर असलेल्या दीपमाळेजवळ आसन घालून बसली होती. त्यावेळची **दे**वरावांची पारमार्थिक योग्यता किती म्हणून वर्णन करावी !! वैराग्यवृत्तीमुळें मुखावर आलेला तो टवटवीतपणा, निस्पृहतेची ती झांक, उपास्य मानलेले देवतेचे ध्यानाकरितां केलेली ती अर्धोन्मीलित दृष्टि, मधून मधून साक्षात्कारामुळें उत्पन्न होणारे अष्टसात्विक भाव व तदंगभूत अंतःकरणांत उदय पावलेली ती संतोषवृत्ति व तीमुळें उपोषणापासून शरीरावर होणारे विकार न होतां उलट आलेली तुष्टिपुष्टि, प्रत्यक्ष दर्शन होऊन आतां खास आपलें काम झालें हें पाहून होणारा आनंद, हीं सर्व त्या **दे**वरावांचे मुखावर स्पष्टपणें दिसत होतीं. अशी ती मुद्रा पाहतांच **गो**विंदनाथांनीं पक्कें ओळखलें कीं, भगवंतांनीं दृष्टांत देऊन अनुग्राह्य म्हणून जें पात्र सांगितलें तें हेंच. असें जाणून गाडींतूनच हांक मारिली, '**दे**वराव ! इकडे ये.' ही हांक ऐकतांच **दे**वरावांस किंचित् आश्चर्य वाटलें कीं, 'माझे ओळखीचे गृहस्थ नसतां एकाएकीं माझें नांव घेऊन हांक मारितात हें काय ? परंतु असेल कोणी तरी,' असें समजून कांहीं बोलले नाहींत. परंतु, **गो**विंदनाथांनीं पुनः स्पष्ट सांगितलें कीं, 'तुजवर अनुग्रह करण्यास आज्ञा झाली आहे. तर मजबरोबर चल.' तें ऐकून **दे**वरावांनीं **मा**रुतीकडे बोट दाखवून सांगितलें कीं, 'हा गुरु येथें बसला आहे. याहून दुसरा गुरु नाहीं, तो करील तें प्रमाण, दुसरे कोणाची आम्हांस जरूर नाहीं, आम्ही येत नाहीं.' असें उत्तर मिळतांच **गो**विंदनाथ यांनीं आपली गाडी मागें जेथें तालमीचा आखाडा होता म्हणून लिहिलें आहे तेथें नदीतीरीं असलेल्या पिंपळाचे झाडाखालीं नेली; व तेथें ते गाडी सोडून बिऱ्हाडास उतरले. त्यांचा नित्य नियम असा असे कीं, दिवसा झोंप घ्यावयाची व रात्र झाली म्हणजे मग शौचमुखमार्जन व स्नानपूजा वगैरे सर्व विधि करून रात्रभर भजनपुराण वगैरे संप्रदाय चालवावयाचा, व उजाडण्याचे वेळीं पुनः निजावयाचें असा होता. जसें भगवंतांनीं गीतेंत [गीता—अ० २ श्लो० ६९] म्हटलें आहे कीं,

**या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।**
**यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः. ॥**

ह्या भगवदुक्तीप्रमाणेंच व्यवहार होता. असो, इकडे **देवराव गोविंदनाथांस** मागें सांगितल्याप्रमाणें उत्तर देऊन पुनः तेथेंच बसले. रात्र झाल्यावर **मारुतीनें देवरावांस** सांगितलें कीं, 'तूं **गोविंदनाथ** म्हणून येथें आले आहेत त्यांजकडे जा. ते तुजवर अनुग्रह करतील.' त्यावर **देवरावांनीं** रागानें उत्तर दिलें, 'महाराज, आपण मला आपला म्हटलें आणि आतां दुसरीकडे बोट दाखवितां हें काय? मी कोठेंही दुसरीकडे जाणार नाहीं.' त्यावर **मारुतीनें** सांगितलें कीं, 'तुला तिकडेच सर्व प्राप्त होईल, ह्याकरितां तूं तिकडे जा.' त्यावर **देवरावांनीं** निरुपाय होऊन 'मला गेलेंच पाहिजेना?' असें त्रिवार उच्चारून विचारून 'जावें' अशी आज्ञा होतांच मध्यरात्रीं तसेच निघून जेथें नदीतीरीं **गोविंदनाथ** उतरले होते तेथें गेले. व त्यांस साष्टांगनमस्कार घालून सर्व वृत्तांत निवेदन केला. **गोविंदनाथांनीं** विनोदानें म्हटलें, 'कां येत नव्हतां, मग आतां कसे आलां?' हें ऐकून **देवराव** म्हणतात, 'ज्यानें आम्हांस आश्रय देऊन 'आपला' म्हटलें त्यानेंच जाण्यास सांगितल्यावर मग काय उपाय?' नंतर **गोविंदनाथ** म्हणाले, 'त्याच्याच आज्ञेवरून आम्हीं येतांना आपल्यास हांक मारिली. परंतु, त्या वेळचा आपला खडखडीत जबाब ऐकतांच आमचा निरुपाय झाला.' त्यावर **देवराव** म्हणाले, 'झालें तें झालें, आतां शरणागताचें रक्षण करून कृपा करावी.' मग **गोविंदनाथांनीं देवरावांस** सहा महिने आपल्या बरोबर वागविलें. व त्यांस नित्य समागमें घेऊन **सुर्जीच्या** आसपास रानांत व गांवोगांवीं फिरावें असा क्रम चालविला. एके दिवशीं **अकोट** तालुक्यांत (जिल्हा आकोला, प्रांत वऱ्हाड) **वाई** म्हणून गांव आहे तेथें मुक्काम झाला. व मध्यरात्रीं **गोविंदनाथ** त्यांस बरोबर घेऊन त्याच गांवच्या रानांत गेले. आणि तेथें बसून कांहीं पारमार्थिक गोष्टी चालल्या असतां **गोविंदनाथ देवरावांस** एकाएकीं म्हणाले, '**देवराव**! या वेळेस क्षुधा लागली आहे व पुरणाची पोळी पाहिजे.' **देवराव** म्हणाले, 'ठीक आहे. आतां सर्व सामग्री आणून सिद्ध करतों.' असें म्हणून **वाई** गांवांत जाऊन तेथील **शिवाजी** पाटलाचे घरून सर्व सामान आणून स्वतः स्वयंपाक सिद्ध केला व पुरणाची पोळी करून पात्र वाढलें. आणि सद्गुरूस भोजनास उठण्यास सांगितलें. तेव्हां **गोविंदनाथांस** आश्चर्य वाटून ते म्हणाले, '**देवराव**! एवढ्या रात्रीं सामान मिळवून स्वयंपाक सिद्ध केलास काय?' त्यावर 'होय' असें उत्तर देतांच 'ठीक आहे' असें म्हणून भोजनास

बसले. देवरावांस समोर बसवून एक ग्रास आपण खावा व एक ग्रास देवरावांचे तोंडांत घालावा; अशा रीतीनें भोजन चाललें असतां देवरावांचे मस्तकीं हस्त ठेवून त्यांस अनुग्रह दिला. याच वेळीं **देवरावाचें देवनाथ** असें नांव ठेविलें. आणि सांगितलें कीं, 'आतां लोकानुग्रह करून जगदुद्धार करावा.' ही अनुग्रहाची हकीगत दुसऱ्या कोणासही माहीत नव्हती. फक्त मागें जे **खुशालरावबाबा** देशपांडे म्हणून त्यांचे समवयस्क खेळगडी होते असें लिहिलें आहे, त्यांजपाशीं तेवढी देवनाथांनीं स्वतः सांगितली व तीच पुढें कर्णपरंपरया सर्वश्रुत झाली. असो, पुढें लवकरच **गो**विंदनाथ आपल्या प्रदेशीं **ना**गपुराकडे चालते झाले. इकडे देवनाथ यांस सद्गुरूचा अनुग्रह झाल्यामुळें अत्यानंद होऊन कृतार्थता वाटूं लागली. गुरुवाक्य, शास्त्र, आत्मप्रतीति यांची एकवाक्यता होऊन समाधानवृत्ति अंगावर चमकूं लागली.

अनुग्रह प्राप्त झाल्यावर देवनाथ सुर्जीचे आसपास गांवोगांवीं फिरून असत; परंतु **मा**रुतीचे दर्शनास जाण्याचा नियम पाळीत असत. त्यांचा स्वभाव पहिल्यापासूनच चंगीभंगी असल्यामुळें ते तोंडानें कांहीं तरी कवित्व बडबडत असत. पुढें तर अनुग्रह प्राप्त झाल्यावर कवित्व करावें अशी पूर्ण इच्छा झाली व त्याप्रमाणें बोलण्यांतही कांहीं कवित्व झळकूं लागलें. एके दिवशीं मागें सांगितलेले **ग**बाभट कुंडले यांची व देवनाथांची गांठ पडली. त्यावेळीं ते देवनाथांस म्हणाले कीं, '**मा**रुतिराय मला एके दिवशीं म्हणाले कीं, देवरावानें अलीकडे आमचें दर्शन घेणें अगदीं टाकलें हें काय? तो आतां देवरावाचा **देवनाथ** झाला आहे म्हणून त्यानें आम्हांवर इतका रोष केला कीं काय? याविषयीं त्यास विचारून एकवार त्यास आमचे दर्शनास आणावें. याकरितां आपण दर्शनास चला.' हें ऐकून देवराव 'एके दिवशीं दर्शनास येऊं' असें म्हणाले. व दुसरे दिवशीं दर्शनास गेले व त्यावेळीं **मा**रुतीपुढें उत्तरादाखल

## पद.

प्यारे! उलट कमलमो पलट देखले मौजा !
सब घटमो नाथ बिराजा ॥ ध्रुवपद. ॥
नर लाल हुवा बेहाल, पडा भ्रमजाला ।
क्यंव फिरता भटका भूला ॥
तैं, डार सुधारस घटकु, बिखय बिख प्याला ।
पीकर हुवा मतवाला ॥

चढ आवे तुजपर काल फौजसों आला ।
को होय तेरा रखवाला ॥
इस मायामो एक तरन गुरु महाराजा । सब० ॥ १ ॥
मैं हूं बे कहांका कोन कहांसो आया ।
ये सार बिचार न पाया ॥
मा बाप बहेन और भाइ कबीला माया ।
मैं मेरा कह डुबवाया ॥
संसार नरकका मूल, नाहक लपटाया ।
कर याद गुरू वस्ताद, पकर ले पाया ॥
सुन, छमा ढाल ले हात ग्यानका नेजा । सब० ॥ २ ॥
कर हुकुम, फौजमें बाजे कालका डंका ।
तुझे काम नही, ले नाम पीर मुर्षदका ॥
हो सवार साबुत तो बे घोडा मनका ।
चढ सवार सले बडा सुरतगड बाका ॥
तुम सुनोजी, मनसिंग किलेदार है व्हांका ।
गुरु ग्यान चढा नीशान, पकड ले पटका ॥
भव जाल तोड जंजाल, कर ले हाजा । सब० ॥ ३ ॥
हो निर्मल, आपने हितकु तवज्जु करना ।
गुरुग्यान सुनावे कान, बतावे नैना ॥
प्यारे, देख, कमल बिच मगन आप हो रहेना ।
नहि कमाल ये धन माल रैनका सपना ॥
साचकर मान सिपाही दिल जान नहिरे! तन अपना ।
जम छोड पटेकू तोड नजरमो रखना ॥
प्यारे! अजब फौजमें बाजे अनुहत बाजा । सब० ॥ ४ ॥
सुन मेहरबान हनुमान धनी है आला ।
तनपाक किया है पाक, कमल उजियाला ॥
अब दिया नाथके हात पिलाया प्याला ।
दस्तान चढा मस्तान हुवा मतवाला ॥
गैबतका बाजे तास घनन घडियाला ।
गुरुग्यान समज कर बुझे लाखमो बिरला ॥
कहे देवनाथ सुन बात खुदा नहि दूजा । सब० ॥ ५ ॥

म.ग्रं. ३७१५

हें पद त्यांनीं म्हटलें. ह्या पदांत दर्शनास न येण्याचा आपला हेतु आणि मारुतीनें नाथांचे हवालीं केल्यावर स्वतःस आलेला अनुभव दर्शित केला. तें श्रवण करून व मारुतीनें प्रसन्न होऊन वर दिला कीं, 'जा, आजपासून तूं जें बोलशील तें कवित्वच.' व त्याप्रमाणेंच होऊं लागलें. कीर्तनसमयीं जी कविता, पदें, लावण्या म्हणण्याची स्फूर्ति होईल त्या म्हणाव्या. त्यांनीं कधीं बसून मुद्दाम अशी कविता रचली नाहीं. जसजसा प्रसंग येईल त्या त्या प्रसंगावरून त्यांस कवित्वस्फूर्ति होऊन त्यांची कविता झालेली आहे. म्हणजे त्यांची एकंदर कविता प्रासंगिकच आहे. असें सांगतात कीं, हें पद हीच त्यांच्या कवित्वसुमनांपैकीं प्रथम कलिका होय. या पदाच्या शेवटल्या कडव्यांत दर्शनास न येण्याचें कारण दर्शविलें आहे. यांनीं जी कविता एकदां म्हटली ती पुनः बहुतकरून त्यांच्या म्हणण्यांत येत नसे असें सांगतात. यावरून त्यांची कविता प्रासादिकच आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत वाटत नाहीं. देवनाथांचे वेळीं जर लघुलेखनपद्धति जाणणारे लोक असते, तर आज त्यांची जी कविता उपलब्ध आहे तीपेक्षां पुष्कळच असती. परंतु गतगोष्टीचा खेद करणें व्यर्थ होय.

नंतर गुरूचे आज्ञेप्रमाणें जगदुद्धार करण्याचें मनांत येऊन प्रवास करण्याचा देवनाथांनीं निश्चय केला. हे सर्व हिंदुस्थानभर हिंडले असें म्हटलें तरी चालेल. पुणें, सातारा, नागपूर, बडोदें, ग्वाल्हेर, काशी, रामेश्वर, द्वारका वगैरे ठिकाणीं ते गेल्याचें कळतें.

देवनाथांचा लहानपणापासूनच शिपाईगिरीचा बाणा असे. ते नेहमीं हत्यारबंद असत. त्यांजपाशीं सतत एक तलवार असे. रानावनांतून एकटें फिरण्यास त्यांस लहानपणापासूनच भीति वाटत नसे. आतां तर सर्व प्रकारचें भय जाऊन निर्भय असें जें अद्वैत परब्रह्म तेंच आपण असें निर्भ्रम ज्ञान झाल्यावर त्यांस कशाचीच फिकीर वाटेनाशी झाली. सुर्जीचे आसपास जाऊन येऊन असे कांहीं दिवस त्यांनीं काढल्यानंतर ते प्रवासास निघाले. प्रथम बडोद्यास गेले, तेथें एक चमत्कार घडून आला तो असाः—

देवनाथ बडोद्यास एका गणपतीचे देवालयांत राहिले. ते लिंब खाऊन असत. असें असतां कोणी चार ब्राह्मण प्रवास करीत करीत त्या ठिकाणीं आले. त्यांनीं हे कोणी तपस्वी महासाधु आहेत, असें पाहून देवनाथांस म्हटलें, 'आम्हांसही येथें आपल्या सन्निध असावें असें वाटतें, तरी आम्हांस आज्ञा करावी.' त्यावर त्यांस देवनाथांनीं सांगितलें, 'बाप' हो, मी लिंब खाऊन असतों

तसें तुम्हांस रहावें लागेल. भोजनावांचून राहण्याची तुम्हांस सवय असल्यास खुशाल रहावें.' ब्राह्मण मागचा पुढचा विचार न करितां एकदम 'होय' म्हणाले; आणि तेथें राहिले. त्यांनीं चार दिवस लिंब खाऊन काढले. परंतु 'तेथें जातिवंताचेंच काम, येरा गबाळाच्यानें काय होणार.' बिचारे चार दिवस झाल्यावर घाबरले व उपास पडून पांचवे दिवशीं इतके अशक्त झाले कीं, त्यांच्यानें बोलवेना. नंतर **दे**वनाथांनीं त्यांची ती हास्यास्पद व शोचनीय स्थिति पाहून विचार केला कीं, 'आतां ब्राह्मण मरतात.' मग **दे**वनाथांनीं ब्राह्मणांस विचारिलें कीं, 'आतां कसें?' परंतु ब्राह्मण कांहीं बोलेनात. मग ब्राह्मणांचेच आंगावरील धोतर घेऊन त्याची झोळी केली व गांवांत भिक्षेस निघाले. प्रथमच ज्या घरांत प्रवेश केला तें घर एका पुराणिकाचें होतें. पुराणिकबोवा पुराण सांगण्यास गेले होते. घरांत त्यांची बायको एकटीच होती. ती महातामसी असे. **ना**थांनीं आंगण्यांत उभें राहून प्रथम एक श्लोक म्हणून भिक्षा मागितली. ती हांक बाईनें ऐकतांच मोठ्या फणकाऱ्यानें बाहेर येऊन चरफडण्यास सुरवात केली. 'कोण आहे मेला गोंसावडा, कसा दांडगा माजला आहे, कोठें कामकाज करून मोलमजुरी मिळविण्यास काय झालें?' असें ती म्हणाली. हीं मुक्ताफळें **ना**थांचे आंगावर पडतांच **ना**थांस समाधान वाटलें व बाईच्या तमोगुणाचा व भीक मागणाऱ्याच्या स्थितीचा खेद वाटला. त्यावेळीं **दे**वनाथांनीं एक पद म्हटलें तें—जळो[1] मागत्याचें जिणें। धिक् धिक् हें लाजिरवाणें॥ इ०. असें पद म्हणून बाईस भिक्षा आणण्यास सांगितलें. मग तर आगींत तेल घातल्याप्रमाणें बाईचा क्रोधाग्नि अधिकच भडकला. बाईनें सारखी पुष्पवृष्टि सुरू केली. बाईनें गालिप्रदान केलें कीं, **ना**थांनीं श्लोक म्हणून 'भिक्षा घाला' असें म्हणावें. पुनः बाईनें आपली दुर्वाक्पुष्पांजलि **ना**थांपुढें करावी. **ना**थांनीं तिचा स्वीकार करून पुनः श्लोक म्हणून अधिकाची मागणी करावी. अशा प्रकारें उभयतांचा विनिमय चालला आहे इतक्यांत पुराणिकबोवा घरीं आले. त्यांनीं **ना**थांस पाहतांच साष्टांग नमस्कार घातला. बायकोवर रागावून म्हणाले, 'अशा सत्पुरुषाचा अपमान करण्यास तुला लाज कशी वाटत नाहीं?' मग त्यानें स्वतः घरांत जाऊन बरीचशी भिक्षा आणिली. ती पाहून **ना**थ म्हणाले, 'शास्त्रीबोवा, इतकी भिक्षा नको, रीतीप्रमाणें एक मुष्टीभर भिक्षा बाईकडून घालवावी.' मग बाईस पश्चात्ताप होऊन तिनें भिक्षा घातली; आणि तीस आशीर्वाद देऊन **दे**वनाथ पुढें भिक्षेस निघाले. परंतु प्रथ-

---

१. हें पद पूर्ण मिळत नाहीं!!

मच हा शकुन, मग तर पुढें भिक्षाच मिळाली नाहीं असें म्हणतात. शेवटीं कंटाळून परत देवळांत आले. गणपतीपुढें आसन घालून गणपतीचें ध्यान केलें, व गणपतीस जागृत करून पुष्कळ विनंति केली. परंतु कांहीं उपयोग होत नाहीं असें पाहून त्वेषानें जवळ असलेली तलवार उपसून गणपतीचे आंगावर धांवले. त्यासरसा गणपतीस धाक पडून तो मूळठिकाणापासून दोन हात मागें सरला, असें म्हणतात. इतक्यांत कोणी गृहस्थ गणपतीचे दर्शनास येऊन व गणपतीपुढें बरेंच द्रव्य ठेवून दर्शन घेऊन गेला. देवनाथांनीं तेंच द्रव्य ब्राह्मणांस देऊन त्यांस यथेच्छ भोजन करण्यास सांगितलें. नंतर त्यांपैकीं एका जणानें मोठ्या कष्टानें बाहेर जाऊन शिधा आणून सर्वांस भोजन घातलें. भोजन झाल्यावर ब्राह्मण हुशार होऊन देवनाथांस म्हणाले, 'महाराज! आतां आपले पाय सोडून आम्ही जाणार नाहीं.' देवनाथांनीं त्यांस सांगितलें, 'थोडक्यांत तुम्हांला चांगला अनुभव आला आहे. ह्याकरितां आतां जास्त भानगडींत न पडावें हें बरें.' ब्राह्मणांनीं निश्चयपूर्वक सांगितलें कीं, 'आम्ही आपणांस सोडून जाणार नाहीं.' ब्राह्मणांचा असा निश्चय पाहून देवनाथांनीं त्यांस ठेवून घेतलें. हावेळपर्यंत देवनाथांच्या बरोबर कोणी नव्हतें. कीर्तन करण्याचा मानस फार असल्यामुळें ह्या मंडळीचा त्या कामीं चांगला उपयोग करून घेतां येईल असें देवनाथांस वाटलें. त्याप्रमाणें देवनाथांनीं ब्राह्मणांस आपला उद्देश कळविला; तो त्यांस पसंत पडला. नंतर त्या चौघांपैकीं एक जण गावयास शिकला व एकानें वादनपटुत्व संपादिलें. अशा प्रकारें कीर्तनाचा थाट जमला. बाकीचे दोघेजण कीर्तनसमयीं दौतलेखणी घेऊन बसत; व देवनाथांनीं म्हटलेल्या कविता लिहून घेत. नंतर फुरसतीचे वेळीं उभयतांचीं टिपणें ताडून पाहून शुद्ध करून घेत. अशा रीतीनें देवनाथांच्या कवितेचा संग्रह झाला आहे.

याप्रमाणें भजनकीर्तन करीत करीत पुण्यास आले. पुण्यास आल्यावर देवनाथांचीं कीर्तनें सुरू झालीं. लोकांत त्यांची चांगली ख्याति झाली. कीर्तनाचा नित्य नवा थाट, रोज नवी कविता, वाणी रसाळ व प्रासादिक आवाज मधुर इत्याद्यनेक आकर्षक कारणांनीं लोकांत त्यांची प्रसिद्धि होऊन कीर्तनास मंडळी फार येऊं लागली. त्यावेळीं सवाई माधवराव पेशवे राज्य करीत होते. जातां जातां श्रीमंतांच्या मातोश्री गंगाबाई यांचे कानावर ही गोष्ट गेली. तेव्हां त्यांचेंही मनांत अशा सत्पुरुषाचें दर्शन घेण्याचें आलें व त्याप्रमाणें आपले लोक पाठवून देवनाथांस निमंत्रण केलें. परंतु देवनाथांनीं 'आम्ही गरीब व आम्हांस उपाधि

होतो; श्रीमंतांचें दर्शन घेण्याचें आम्हांस कारण नाहीं' असा जबाब दिला. त्यावर श्रीमंतांच्या मातोश्री गंगाबाई यांनीं फारच आग्रह केला व म्हणाल्या कीं, 'आम्हांस अनुग्रह घेणें आहे तरी त्यांस मुद्दाम कसेंही करून वाड्यांत आणवावें.' म्हणून पुनः मोठमोठी मंडळी भेटीस जाऊन त्यांनीं देवनाथांस फारच आग्रह केला, तेव्हां निरुपाय होऊन त्यांस जाणें भाग पडलें. त्यांस चार दिवस श्रीमंतांनीं ठेवून घेतलें व बाईसाहेबांनीं अनुग्रह घेतला. तेथें कीर्तनाचा मोठा थाट होऊं लागला. अशा प्रकारें त्यांस देवनाथांचे समागमाचा लाभ झाला. नंतर देवनाथांनीं, 'आम्हांस स्वदेशीं परत जाणें आहे, इकडे येऊन बरेच दिवस झाले, तरी परवानगी द्यावी' असें म्हटलें. त्यावर श्रीमंतांनींही विशेष आग्रह न करितां बरोबर घोडेस्वार देऊन पालखींत बसवून त्यांस स्वदेशीं त्यांचे घरीं पोंचतें केलें. यावेळीं देवनाथ सुर्जीस आले ते सर्व सरंजामासह आले व त्यांनीं आपल्या मातोश्रीची भेट घेतली. वास्तविक पाहतां अशा सत्पुरुषास ह्या सरंजामाचें कांहीं कारण नव्हतें. प्रथमच त्यांनीं 'आम्हांस उपाधि होतो' म्हणून सांगितलें असून ह्या सर्वांचा स्वीकार कसा केला अशी शंका सहज उत्पन्न होते. परंतु त्याचें कारण इतकेंच कीं, 'जेव्हां मी पालखींत बसून येईन तेव्हांच मी आपलें दर्शन घेईन,' असें पूर्वीं ते आपल्या मातोश्रीस वैराग्याच्या झपाट्यांत बोलले होते. त्या बोलण्याची सत्यता करून मातोश्रीचें समाधान व्हावें ह्या करितां एवढें केलें, असो. ह्या योगें देवनाथांचे कुटुंबांतील मनुष्यांस जी धन्यता वाटली तिचें किती म्हणून वर्णन करावें!! त्यांत मातोश्रीच्या आनंदाला तर अवर्णनीय भरतें आलें! त्याची कल्पना वाचकांनींच करावी.

अशा प्रकारें मातोश्रीचें दर्शन घेतल्यावर पेशव्यांकडील सर्व सरंजाम परत लावून दिला, व सुर्जींत कांहीं दिवस मुक्काम केला. आसपास गांवोगांवीं जगदुद्धार करावा असा क्रम चालविला. सुर्जींत ज्या ठिकाणीं नदीचे पिंपळाचें झाडाखालीं पूर्वीं तालिमबाजांचे आखाडे होते त्याच ठिकाणीं त्यांनीं आपला मठ स्थापिला; तो तेथें अद्यापिहि आहे. ज्या ठिकाणीं पूर्वीं पूर्वाश्रमांतील देवरावांनीं मल्ल तयार करवून कुस्त्या करवाव्या त्याच ठिकाणीं देवरावाचे देवनाथ होऊन ह्या भवारण्यांत भटकणाऱ्या असंख्य जीवांस परमार्थाची तालीम देऊन सर्व जगास जर्जर करून सोडणाऱ्या कामक्रोधादि मल्लांशीं लढून त्यांचा पराजय करण्याचें सामर्थ्य देऊन ते ह्या भवसागरांतून मुक्त होतील असा पूर्वापार संतांनीं चालविलेला संप्रदाय पुढें सुरू केला.

अशा प्रकारें प्रवास करून पुनः सुर्जीस आले. तेथें ते बरेच दिवस होते,

पुढें एकदां ते **आकोटा**स गेले असतां तेथें एक चमत्कार घडला तो असाः— **दे**वनाथांचा संप्रदाय असा असे कीं, दर शनिवारीं भजन करीत भिक्षेस निघावें. (हा संप्रदाय अद्यापिही चालू आहे.) ह्या संप्रदायाप्रमाणें एके दिवशीं ते **आ**कोटास भिक्षेस निघाले असतां, तेथें कोणी **दिवाकरभाऊ** म्हणून **न**र-[१]साळ्याचे किल्लेदार रहात असत. भिक्षेस फिरत असतां **दे**वनाथांची दिंडी त्यांचे आळींत आली. त्यावेळीं होत असलेल्या भजनाचा व टाळांचा गजर **दिवाकरभाऊं**नीं ऐकिला. ते त्यावेळीं कांहीं सरकारी काम करीत होते. ह्याकरितां ते आपल्या येथें भिक्षा मागावयास आले असतां आपणांस त्रास होईल म्हणून आपला दरवाजा बंद करून घेण्यास त्यांनीं चाकरास सांगितलें. चाकर दरवाजा लावीत आहे, इतक्यांत भजन करीत करीत **दे**वनाथांची स्वारी तेथें येऊन पोहोंचली. आंत आपण न शिरावें म्हणून दरवाजा लाविला असें जेव्हां **दे**वनाथांस समजलें तेव्हां 'दार बंद केलें काय? ठीक आहे, असेंच बंद राहील' असे **दे**वनाथांनीं आपल्या तोंडावाटे उद्गार काढिले. हे उद्गार दार लावणारानें ऐकून यजमानास कळविले. परंतु **दिवाकरभाऊ** थोडे मानी असल्यामुळें त्यांस त्यांच्या म्हणण्याचें कांहींच वाटलें नाहीं. तथापि त्यांचे जवळ बसलेल्या मंडळीनें त्यांस सांगितलें कीं, 'सत्पुरुषाचें भाषण खरें होतें. याकरितां आपण त्यांस आणून शरण जावें.' त्यावर **दिवाकरभाऊं**नीं परभारें त्याच मंडळीस त्यांच्याकडे जाऊन त्यांस घेऊन येण्यास सांगितलें. नंतर ती मंडळी **दे**वनाथांकडे धांवत जाऊन त्यांस विनंति करूं लागली कीं, 'महाराज, आपल्यास **दिवाकरभाऊ** भेटीस बोलावीत आहेत.' त्यावर **दे**वनाथांनीं सांगितलें कीं, 'आतां आम्ही माघारे येणार नाहीं; पुढें गेल्यावर मागें फिरत नसतों.' तथापि मंडळीनें तें न ऐकतां त्यांस फारच आग्रह केला. तेव्हां ते म्हणाले कीं, '**दिवाकरभाऊं**ची व आमची पुढील शनिवारीं वाटेंतच गांठ पडेल.' परंतु ह्या बोलण्याचें मर्म त्यावेळीं कोणाचे लक्षांत आलें नाहीं. होणार गोष्ट त्यास इलाज नाहीं. चमत्कार असा झाला कीं, पुढील शनिवारीं **नाथ** त्या आळींत भिक्षेस गेले तों समोरून **दिवाकरभाऊं**चें प्रेत येत होतें! ह्याप्रमाणें त्यांची गांठ पडली!

इकडे **देवनाथ आकोटा**स जातेवेळीं मागें **सुर्जी**चा मठ संभाळण्यास त्यांनीं आपले दोन शूद्र शिष्य **जगू** व **गणू** म्हणून होते त्यांस ठेविलें होतें. **दे**वनाथ गेल्यावर सुमारें आठ पंधरा दिवसांनीं एके दिवशीं रात्रौ कांहीं चोर

---

१. हा डोंगरी किल्ला वऱ्हाडांत जळगांव तालुक्यांत आहे.

मठांत येऊन चोरी करूं लागले. त्यावेळीं ह्या उभयतां शिष्यांनीं स्वामिभक्तीस स्मरून त्या चोरांस शासन करण्याचें सुरू केलें. परंतु चोरांची संख्या जास्त असल्यामुळें ह्यांचें कांहीं न चालून आसपासची मंडळी जमण्यापूर्वींच त्या चोरांनीं ह्या उभयतांस जखमी करून जमिनीवर पाडलें. मंडळी जमतांच चोर पळाले. साधूच्या येथें संपत्ति कोठून मिळणार? परंतु कांहीं थोडें होतें तें त्यांनीं नेलें. पुढें त्यांची यथायोग्य व्यवस्था झाली. परंतु हे दोघे शिष्य मात्र अगदीं मरणोन्मुख झाले. ही गोष्ट घडली त्याचवेळीं तिकडे **देवनाथांस** स्वप्न पडून उभय शिष्य मरणोन्मुख झाल्याचें त्यांस समजलें. त्याबरोबर लागलीच ते तेथून निघून **सुर्जीस** आले. या उभयतांनीं गुरुदर्शनार्थ आपले प्राण कंठीं ठेविले होते. **देवनाथ** महाराज येतांच, त्यांनीं अश्रू ढाळले. आणि 'गुरुदर्शनलाभ झाला, आतां येतों,' असें म्हणाले. **देवनाथांनीं** लागलीच कृपादृष्टीनें त्यांजकडे पाहून 'तुम्ही उत्तम गतीस जाल' असें सांगून 'कांहीं मागणें आहे काय?' म्हणून विचारिलें. त्यावेळीं त्यांनीं सांगितलें कीं, 'आम्ही स्वामिकार्यार्थ देह त्यागून कृतार्थ झालों. परंतु आमचें नांव मागें राहील अशी कांहीं तजवीज आपण करावी.' त्यानंतर **देवनाथांनीं** 'हो' म्हणतांच उभयतांनीं प्राण सोडिले. पुढें **देवनाथांनीं** गुरुपुण्यतिथीचे दिवशीं या दोघांचे नांवचे दोन शूद्र बोलावून त्यांची पूजाअर्चा करून त्यांस भोजनास घालण्याचा क्रम लावून दिला. त्याप्रमाणें हा क्रम अद्यापि अबाधित चालू आहे.

**देवनाथ आकोटाहून सुर्जीस** परत आल्यावर, **सुर्जीपासून** सुमारें एक मैलावर **अजीजपूर** म्हणून एक अगदीं लहान खेडें आहे, तेथील रानांत जाण्याकरितां निघाले. त्यावेळीं **देवनाथांचा** शिष्य **सखाराम गुरव** म्हणून होता तोही त्यांच्या मागोमाग, परंतु त्यांस न कळत, ते कोणीकडे जातात व काय करतात हें पाहण्याकरितां गेला होता. ह्या **अजीजपूरचे** जंगलांत **देवजीबोवा** म्हणून साधु असत. ते जातीचे साळी होते व **अंजनगांवचे** राहणारे असत. ते लहानपणापासून वैराग्य धारण करून योगादि साधनांत निमग्न असत. हे **देवजीबोवा** कोणाचे शिष्य होते वगैरे त्यांची कांहीं एक माहिती मिळत नाहीं. त्यावेळीं ह्या **अजीजपूरचे** रानांत दाट झाडी होती. ह्या झाडींत **देवनाथ** शिरले. ज्या ठिकाणीं **देवजीबोवा** समाधि लावून बसले होते त्या ठिकाणीं जाऊन आसन घालून आपणही समाधि लाविली. कांहीं वेळानें उभयतांही एकदम देहावर आले, व परस्परांकडे पाहूं लागले. त्यावेळीं उभयतांचा संवाद झाला तो:—

**नाथ**–किती लांब गेलां होतां?

**देवजीबोवा**–दरवाज्यापर्यंत.

**नाथ**–दरवाज्यापाशीं काय आहे?

**देवजी०**–वृक्ष आहे.

**नाथ**–त्यास फळें आहेत कीं नाहींत?

**देवजी०**–आहेत.

**नाथ**–त्यांतील एक फळ आणाना?

**देवजी०**–होय. (यानंतर उभयतांनीं पुनः समाधि लाविली व फिरून देहावर येऊन)

**नाथ**–फळ आणिलें काय?

**देवजी०**–होय, आणिलें. हें घ्या. (असें म्हणून तें फळ त्यांनीं **ना**थांच्या हातीं दिलें.)

**नाथ**–तेथें आणखी एक फळ आहे तें आणा पाहूं. (त्यावर **दे**वजीबोवा आणखी समाधि लावून फळ आणण्यास गेले; परंतु ह्यावेळीं झाडाची फांदी आंत गेल्यामुळें दुसरें फळ त्यांच्यानें आणवलें नाहीं. व 'फांदी आंत गेली आहे आणि आंत माझा प्रवेश होत नाहीं,' असें **दे**वजीबोवांनीं **ना**थांस कळविलें–ही फांदी मागील समाधीचे शेवटीं **दे**वनाथांनींच आंत घातली होती–मग)

**नाथ**–कांहीं हरकत नाहीं, मी तुमचा आंतही प्रवेश करून देईन.

नंतर उभयतांहि **सु**र्जीत आले. ह्या **अ**जीजपुरांतच खुद्द **दे**वजीबोवांनीं आपला मठ स्थापिला आहे. असो, हे उभयतां **सु**र्जीत येत असतां **स**खाराम **गु**रवही त्यांचे मागोमाग येऊं लागला. तेव्हां **दे**वनाथांनीं त्यास पाहून विचारिलें कीं, 'तूं येथें कां आलास व येथें येऊन तूं कांहीं पाहिलेंस कीं काय?' त्यावर **स**खारामानें झालेलें सर्व वृत्त त्यांस निवेदन केलें. नंतर **दे**वनाथांनीं त्यास सांगितलें कीं, 'ही हकीगत तूं कोणासही कळवूं नको म्हणजे झालें.' त्यानेंही ती बरेच दिवस कोणास कळविली नव्हती. परंतु जेव्हां तोही वृद्धदशेस आला, तेव्हां त्यानें ही हकीगत **रामकृष्णनाथ महाराज** यांच्याजवळ स्वतः सांगितली. त्यावेळीं तेथें **श्री० रा० रा० रघुपतराव हणमंतराव देशपांडे** हे होते. असो, **दे**वजीबोवांनीं जें फळ आणून दिलें म्हणून वर लिहिलें आहे तें फळ मठांत बरेच दिवस होतें असें म्हणतात.

**मों**गलाईंत **जा**ल्हने म्हणून गांव आहे, तेथें **आनंदीनाथ** या नांवाचे कोणी सत्पुरुष रहात असत. **दे**वनाथांचे गुरु **गो**विंदनाथ हे एकेवेळीं **आ**-

नंदीनाथास भेटण्यास गेले होते. ज्यांचा जो व्यवसाय असतो त्याबद्दल परस्परांचे विचार परस्परांस कळविणें हें साहजिकच आहे. त्याप्रमाणें आनंदीनाथांनीं गोविंदनाथांस विचारिलें कीं, 'अहो! जगदुद्धार करण्याचें काम तुम्ही तर करीतच आहां; परंतु मागें तो क्रम चालविण्यास कोणी योग्य शिष्य मिळाला काय?' त्यावर गोविंदनाथांनीं फार आनंदानें कळविलें कीं, 'ब्रह्मविद्या वंध्या नाहीं, तिला मजपासून देवनाथ ह्या नांवाचा सुपुत्र झालेला आहे.' हें ऐकून आनंदीनाथांस फार समाधान झालें. नंतर आनंदीनाथांनीं गोविंदनाथांस कांहीं दिवस आपल्या येथें ठेवून घेतलें. रोज उभयतांचें संभाषण होऊन जगदुद्धार करण्याचे कामीं किती त्रास पडतो व सच्छिष्य मिळण्यास किती कठिण जातें वगैरेबद्दल विचार चालत असत. इकडे देवनाथही प्रवास करीत होते व गुरुदर्शन घ्यावें असें मनांत आणून त्या शोधांतच होते. त्यांस गुरुमहाराज येथें असल्याचा सुगावा लागतांच ताबडतोब येऊन गुरुदर्शन घेतलें. पुढें गोविंदनाथांनीं आनंदीनाथांस देवनाथांची हकीगत कळविल्यावर आनंदीनाथांनीं देवनाथांस कांहीं अनुभवाच्या गोष्टी विचारल्या, त्यांचीं योग्य उत्तरें देवनाथांकडून मिळाल्यानें त्यांस समाधान झालें. त्यावेळीं त्या समयास योग्य असें देवनाथांनीं कांहीं कवन रचिलें. तें असें:—

**पद १ लें.**

अरुपानंदीं अद्वय श्रीगुरुदत्तचि अवतरला ।
गुरूची अद्भुत गुणलीला ॥ ध्रुवपद. ॥

(इ० पृष्ठ ११० पद १०२ पहा.)

**पद २ रें.**[१]

सच्चिद्घन आनंद दत्तात्रयमूर्ती ।
कलियुगीं धरि अवतार, कीर्ति हे व्यापक त्रैजगतीं ॥ ध्रुवपद. ॥

(इ० पृष्ठ १४२ पद १६६ पहा.)

हें कवन केलें त्यावेळीं गोविंदनाथ व आनंदीनाथ झोंपाळ्यावर बसले होते व त्यांस देवनाथ हे झोंके देत होते. अशाप्रकारें त्रिवर्ग आनंदांत कांहीं दिवस वास करून स्वस्थानास जाते झाले.

---

१. ह्या समयीं देवनाथांनीं आणखी एक पद रचिलें असल्याचें कळतें तें:—आनंदि जाल्हनापुरीं धरी अवतार । जगि वृत्ति दावितो दृष्टि करीं आधार ॥ ध्रुवपद. ॥ (इ० पद १६७ पृष्ठ १४४ पहा.)

पुढें, देवनाथ एकदां फिरत फिरत **आकोल्यास** (**वऱ्हाड** प्रांतांत **आकोला** जिल्ह्याचें मुख्य ठिकाण) गेले. तेथें कीर्तनें होऊन त्यांची फार ख्याति झाली. कीर्तनांतील निरूपणसरणी, कडीबंद बोलणें, प्रतिपादनाची अपूर्व शैली, श्रोत्यांचे मनावर ठसा उमटविण्याची अप्रतिम हतोटी, शीघ्र कवित्व, प्रासादिक वाणी, श्रुतिस्मृतिशास्त्रसंमत विषयविवेचन ह्या सर्व गोष्टी पाहून तेथील शास्त्रीलोकांस मोठा विषाद वाटला. परंतु त्यांचे समोर बसून पूर्वपक्ष करण्याची कोणाचीही छाती होईना. त्यांचा निरुपाय झाला, परंतु करतात काय? सूर्यापुढें काजव्याचें तेज काय पडणार? पिकापुढें काकाचें काय चालणार? अखेर शास्त्रीलोकांनीं एक युक्ति काढली. ती अशी कीं, **आकोला** येथेंच **बाळापूर**चे (**बाळापूर** हें **आकोला** जिल्ह्यांत **बाळापूर** तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे.) रहिवासी **नाना गावली** म्हणून कोणी विद्वद्वर्य गृहस्थ असत. यांच्याविषयीं असें सांगतात कीं, त्यांस **भागवता**ची पोथी **श्रीव्यासां**नीं दिली होती. **काशीं**तील मोठमोठे विद्वान् त्यांच्या अलौकिक विद्वत्तेवरून त्यांस **व्यासजी** असें म्हणत असत. त्यांस पोटशूळाची व्यथा असे. वाद करतेवेळीं हा पोटशूळ असला म्हणजे त्यांस चांगला वाद करितां येत असे. ह्या **नानां**स **देवनाथां**चे कीर्तनास नेऊन त्यांजकडून **देवनाथां**चा तेजोभंग करवावा असा विचार करून सर्व शास्त्री मिळून **नानां**कडे गेले. त्यांना ही सर्व हकीगत कळविली. **नानां**नीं त्यांचें बोलणें एका अटीवर कबूल केलें. ती अट ही कीं, जर त्यावेळीं माझा पोटशूळ असेल तर मी कीर्तनांत भाषण करीन, व नसेल तर करणार नाहीं. शास्त्रीलोकांनींही ही अट कबूल केली. मग त्याच रात्रीं **नाना** व सर्व शास्त्री कीर्तनास गेले. कीर्तनास सुरवात होतांच पोटशूळ कोणीकडे गेला कोण जाणे! सर्व कीर्तन होई तोंपर्यंत शूळ उत्पन्नच झाला नाहीं. वर वर्णन केल्याप्रमाणें **देवनाथां**चें कीर्तन ऐकून **नानां**स परम संतोष झाला. मग कीर्तन समाप्त झाल्यावर **नानां**नीं उभें राहून सर्व शास्त्र्यांस सांगितलें कीं, 'बाबांनो, तुम्ही सर्व अज्ञान आहां. हा कोणी अवतारी पुरुष आहे; याची धन्यता व योग्यता तुम्ही न समजतां व्यर्थ यांचा पराजय करूं पाहतां. आतां तुम्हीं सर्व जणांनीं आपला अभिमान सोडून यांस शरण जावें हेंच योग्य.' **नानां**चें हें बोलणें सर्व शास्त्रीलोकांनीं ऐकून व मान्य करून ते सर्व **देवनाथां**स शरण गेले. नंतर **देवनाथ** सर्व शास्त्रीलोकांची उत्तम प्रकारें समजूत करून परत **सुर्जीस** येण्यास निघाले.

**आकोल्या**हून परत येत असतां **मूर्तिजापूर** ( हें **वऱ्हाडां**त **उमरावती**

जिल्ह्यांत मूर्तिजापूर तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे) येथें आले. तेथें एक यजुःशाखी ब्राह्मण होता. ह्या ब्राह्मणाची संतति जगत नसे. यासाठीं तो नवससायास करून अगदीं दमला होता. अर्थातच त्यास वैराग्य उत्पन्न झालें. व त्यावेळीं असलेला आपला मुलगा देवास अर्पण करण्यास तयार झाला होता. अशा त्याच्या योग्य वैराग्याचे वेळीं साधु पुरुष देवनाथ तेथें असल्याची वार्ता त्यास समजतांच, त्यानें सत्वर त्यांजपाशीं जाऊन आपला श्रीहरि नांवाचा मुलगा त्यांचे चरणांवर ठेवून नम्रभावानें प्रार्थना केली कीं, 'आजपर्यंतची संतति नाहींशी झाली, आतां हा पुत्र आपल्यास अर्पिला आहे. याजवर कृपा करावी.' देवनाथांनीं त्या मुलास आपल्यापाशीं ठेवून घेतलें. नंतर उपनयनकालीं बापाकडून त्या मुलाची मौंज करविली व पुढें आपल्या समागमें त्यास हिंडवून योग्य कालीं अनुग्रह देऊन मार्गास लाविलें. हाच मुलगा पुढें **दयाळनाथ** ह्या नांवानें प्रसिद्धीस आला असें म्हणतात. उभयतां बरेच दिवस बरोबर प्रवास करीत फिरले.

दयाळनाथ हे देवनाथांचे पट्टशिष्य होते. हेही कथाकीर्तनें करीत. यांची कविता उत्तम आहे. त्यांचा लौकिक चांगला होता. एके समयीं उभयतांही फिरत फिरत नागपुरास आले. तेथें दयाळनाथांचीं पुष्कळ कीर्तनें झालीं. तीं ऐकून लोक देवनाथांपाशीं म्हणूं लागले कीं, 'दयाळनाथ लाख रुपयांचें कीर्तन करतात.' हें देवनाथांनीं ऐकिल्यावर त्यांस किती तरी समाधान वाटलें असेल!! तथापि हा आनंद लोकांस न दाखवितां ते त्यांस विनोदानें म्हणाले कीं, 'आम्ही त्याहूनही जास्त किमतीचें कीर्तन करून दाखवूं.' असें म्हणून त्याच रात्रीं कीर्तन करण्याचें ठरविलें. देवनाथ कीर्तन करणार ही बातमी शहरभर पसरली, व कीर्तनास मोठा समाज जमला. कीर्तनाची वेळ होऊन गेली, तरी देवनाथ दयाळनाथांशीं आपले विन्हाडीं बोलत बसले होते. लोक एकसारखी आपली वाट पहात बसले आहेत असें जेव्हां त्यांस समजलें, तेव्हां पुढें जाऊन कीर्तनास सुरवात करावी असें त्यांनीं दयाळनाथांस सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं जाऊन सुरवात केली. इकडे देवनाथ थोडा वेळ थांबून मग कीर्तनास जाण्यास निघाले. जातां जातां, ज्या घरीं ते उतरले होते त्या घरांतील दोन वर्षांचें मूल तेथें खेळत होतें तेंच बरोबर घेऊन निघाले. कीर्तनाचे जागीं देवनाथ गेल्यावर दयाळनाथ बसले. व देवनाथांनीं कीर्तनास सुरवात केली. बरोबर आणिलेलें मूल आपल्या समोर ठेवून त्याची जी देवनाथांनीं समाधि लावून दिली ती सर्व कीर्तन संपेपर्यंत होती. त्या मुलाची दृष्टि एकसारखी देवनाथां-

कडे लागलेली होती. हा चमत्कार पाहून लोकांस महदाश्चर्य वाटलें. एकंदर कीर्तनाची वाहवा झाली. आजच्या देवनाथांच्या कीर्तनांतील निरूपण व त्यांनीं दाखविलेला चमत्कार यांस मोलच नाहीं असे लोकांच्या मुखांवाटे उद्गार निघूं लागले. याप्रमाणें कीर्तन आटोपून उभयतां घरीं आले व तें मूल ज्याचें होतें त्याच्या स्वाधीन केलें.

नागपूर सोडल्यावर देवनाथ उत्तरहिंदुस्थानांत प्रवास करीत होते. कांहीं दिवस प्रवास झाल्यावर देवनाथांचे मनांत काशीक्षेत्रीं वास करण्याचें आलें. त्याप्रमाणें ते आपली प्रवासदिशा काशीक्षेत्राकडे वळवून लवकरच काशीस आले. तेथें भजनकीर्तन यांचा थाट सुरू होऊन आनंदांत कालक्षेप होऊं लागला. तेव्हां एके प्रसंगीं नित्य संप्रदायाप्रमाणें कीर्तन करीत असतां मध्यंतरीं कोणा एका बाईचें मूल पंचत्व पावलें. बाईनें दुःखाच्या तडाक्यांत तें मूल देवनाथांच्या पुढें आणून ठेविलें. आणि ती त्यांस म्हणाली कीं, 'आपणांसारख्या साधु पुरुषाचे मुखांतून भगवन्नामामृतस्राव होत असतां मूल मरण पावणें हें आपल्या साधुत्वास अनुचित होय; मुलाचा प्राण परत आणणें आपणांकडे आहे.' हें श्रवण करतांच देवनाथ यांनीं विचार करून बाईस सांगितलें कीं, 'बाई, तुमचें म्हणणें खरें आहे. ज्याच्या नामावर आपण एवढी भिस्त ठेवितां त्याजकडेच ही फिर्याद नेतों,' असें म्हणून देवनाथांनीं ईश्वरस्तव करण्यास सुरवात केली. ह्या प्रसंगीं जें पद म्हटलें त्याचीं ८२ कडवीं होतीं असें म्हणतात. त्याचें ध्रुवपद तेवढें आम्हांस मिळालें आहे, तें असें:—

**पद.**

तूं धांव धांव श्रीहरी! विश्वेश्वर! विश्वंभरणा! ।
ओढवलें संकट अति राखी ब्रीद जात रमारमणा! ॥ ध्रुवपद.॥

* * * * * *

अशा प्रकारें ८२ कडव्यांचें पद संपतांच त्या मृत मुलास चेतना येऊन मूल खडबडून उठलें. त्यावेळीं सर्वांस मोठा चमत्कार वाटला. ह्या प्रसंगीं ईश्वरास मोठें संकट घालावें लागल्यामुळें देवनाथांनीं यापुढें कीर्तन न करण्याचा निश्चय केला. व त्याप्रमाणें बरेच दिवस त्यांनीं कीर्तन केलें नाहीं असें म्हणतात.

ह्याप्रमाणें कांहीं दिवस काशीवास करून देवनाथ सुर्जीस आले. सत्पुरुषास परमात्मस्वरूपाचा अनुभव आल्यानें त्यास संसारी जनांहून भिन्नत्वानें

वागणें हेंच इष्ट वाटतें, व तसें वाटणें साहजिकच आहे. वरचे भूमिकेवर गेलेल्यास पुनः परत मागें येणें कसें बरें वाटेल? परंतु, सत्पुरुष हे इतर जनांचें तारण करण्यासच अवतीर्ण झाले असल्यामुळें त्यांस प्रापंचिक जनांस त्यांचाच व्यवहार बरा, असें दाखवून हळूच व्यवहारांतून काढतात; ही त्यांची हतोटीच होय. देवनाथ सुर्जीस असतां जरी साधु झाले होते, तरी लोकप्रिय असून लोकांत पूर्णपणें मिसळून वागत असत असें म्हणतात. एके वेळीं फाल्गुन मासीं सर्व मंडळींनीं धुळवडीचे दिवशीं त्यांस खेळण्यास बोलाविलें असतां ते गेले. त्यावेळीं त्या कालानुरूप सर्व जण एकमेकांस उखाणे घालून चेष्टा करीत चालले. तेव्हां देवनाथांनींही तेथीलच भागीरथी नांवाच्या गायगवळिणीची उखाणा घालून चेष्टा केली. त्यामुळें लागलीच क्रोधाविष्ट होऊन तिनें आपल्या मस्तकावरील दह्यादुधांचे घट देवनाथांच्या मस्तकावर रिचविले. देवनाथांस पयःस्नान झाल्यावर फार समाधान वाटलें. आणि त्या गवळणीस तूं इहलोकीं सुख भोगून अंतीं चांगल्या पदास जाशील असा देवनाथांनीं आशीर्वाद दिला; व आपण पुढें चालते झाले. नंतर धुळवडीचा सर्व समारंभ आटोपल्यावर सर्व आपापल्या घरीं गेले. इकडे ही गवळण मोठ्या रागानें आपल्या घरीं चालती झाली. परंतु, सत्पुरुषाचा आशीर्वाद कधीं व्यर्थ होईल काय? ती घरीं गेल्यावर तिचा किंचित् डोळा लागला व लागलीच खडबडून जागी झाली. त्यासरशी तिची सर्व वृत्ति पालटली, व ती फार सुविचारी आणि ज्ञानी होऊन आपला सर्व व्यवहार पूर्वीप्रमाणें करूं लागली. तिच्या वृत्तींत पडलेला फरक पाहून सर्वांस फार आश्चर्य वाटलें. पुढें, ती नेहमीं देवनाथांचे दर्शनास येत असे. कांहीं दिवसांनीं देवनाथांनीं तिजवर अनुग्रह करून तिला ह्या भवसागरांतून मुक्त केलें.

पुढें देवनाथांचे मनांत पुनः प्रवासास जाण्याचें येऊन ते सुर्जीहून निघाले. ह्या खेपेस ते जे गेले ते पुनः सुर्जीस कधीं परत आले नाहींत व परत येण्याचा त्यांचा मानसहि नव्हता असें पुढील पदावरून दिसतें.

## पद.

रमते नाथ फकीर। कुइ दिन याद करोगे ॥ ध्रुवपद. ॥
कुइ दिन ओढे शाल दुशाला। कुइ दिन भगवें चीर ॥ कुइ दिन० ॥ १ ॥
कुइ दिन खावे मेवा मिठाई। कुइ दिन पीवे नीर ॥ कुइ दिन० ॥ २ ॥
कुइ दिन हाथी कुइ दिन घोडा। कुइ दिन पाव जंजीर ॥ कुइ दिन० ॥ ३ ॥
कुइ दिन बस्ती कुइ दिन जंगल। कुइ दिन भयसुशीर ॥ कुइ दिन० ॥ ४ ॥

कुइ दिन महलोम्याने सोते । कुइ दिन गंगातीर ॥ कुइ दिन० ॥ ५ ॥
तुम अहो खुशाला रहो खुष हाला । फिर न मिले ये शरीर ॥ कुइ दिन० ॥६॥
**दे**वनाथ प्रभुनाथ **गो**विंदा । तूं है सच्चा पीर ॥ कुइ दिन० ॥ ७ ॥

हें पद[1] ज्यावेळीं **दे**वनाथ **सु**र्जीहून बाहेर जाण्यास निघाले त्यावेळीं त्यांनीं **खु**शालरावबाबा **दे**शपांडे यांस म्हणून दाखविलें व त्यांचा निरोप घेतला. परंतु त्यांतील उद्देश—आतां आम्ही रमत रमत जाणार, आमची आठवण असूं द्या, तुम्हीं खुशाल असावें, हें शरीर पुनः मिळणार नाहीं इ०—त्यांस बरोबर समजला नाहीं. जेव्हां पुढें **दे**वनाथांचे निर्याणाची हकीगत त्यांस समजली, तेव्हां ह्या पदाची आठवण होऊन आपण अशा सत्पुरुषापासून पारमार्थिक लाभ करून घेतला नाहीं याबद्दल त्यांस फार वाईट वाटलें.

**दे**वनाथ फिरत फिरत **ग्वा**ल्हेरीस गेले. त्यांच्या कीर्तनाविषयीं तर पूर्वींच ख्याति झाली होती. ते दिवस **रा**मनवमीच्या उत्सवाचे होते. त्यावेळीं राजवाड्यासमोर उत्सवासाटीं मोठा प्रशस्त मंडप दिला होता. **दे**वनाथ तेथें आलेले ऐकून सर्वांस अशी इच्छा झाली कीं, आजचें कीर्तन **दे**वनाथांकडून करवावें. त्याप्रमाणें सर्वजणांनीं जाऊन त्यांस विनंति केली. त्यावेळीं **ना**थांनीं सांगितलें कीं, 'मजकडून कीर्तन करण्यास हरकत नाहीं. परंतु मीं कीर्तन न करण्याविषयीं प्रतिज्ञा केलेली आहे. व त्याविरुद्ध करावें लागणार असल्यामुळें त्यापासून कांहीं ईश्वरी कोप अगर क्षोभ झाल्यास त्याबद्दल आपण मला दोष देऊं नये.' परंतु यांतील मर्म लोकांस न समजून त्यांनीं, विशेष आग्रहानें, त्यांस कीर्तन करण्यास लाविलें. असो. त्या दिवशीं सदरहू मंडपांत कीर्तन झालें. कीर्तनांत 'नैनं छिंदंति शस्त्राणि' इ० [गीता—अ० २ श्लो० २३.] ह्या भगवद्वचनाचें निरूपण झालें. परमात्मा शस्त्रानें तुटत नाहीं, पाण्यानें भिजत नाहीं, अग्नि त्यास जाळूं शकत नाहीं, वाऱ्याच्यानें उडवला जात नाहीं, अशा प्रकारचें तें निरूपण होतें. **रा**मजन्म झाला. भगवंताचे मनांत आल्यावर तेथें कोणाचें चालत नाहीं. कर्मधर्मसंयोगानें आरतीचे वेळीं गुलाल व कापूर यांचा एकच डोंबाळा होऊन मंडपास आग लागली.

---

१. हें पद देवनाथांनीं श्लेषार्थी योजिलें असावें असें वाटतें. 'फिर न मिले ये शरीर' म्हणजे 'देवनाथ' असें ज्या शरीरास म्हणतां तें दृष्टीस पडणार नाहीं, किंवा हा नरदेह पुनः मिळणार नाहीं. यांपैकीं प्रथमच्याच अर्थानें देवनाथांनीं हें योजिलें असावें. परंतु दुसऱ्या अर्थाचा भास होणें हें साहजिक आहे. व त्याप्रमाणेंच खुशालरावबाबा चकले. अर्थात् त्यांस त्या वेळीं मुख्यार्थ समजला नाहीं.

आग लागतांच मंडप भडकला. त्यावेळीं श्रोतेजनांची एकच धांदल उडून गेली. तथापि देवनाथ आरती पुरी करून त्यांच्या संप्रदायाचें कीर्तनसमाप्तीचें अखेरचें पद—

देवराया! देवा! तुझे पायीं । तुझ्या कृपें लागलों निजसोयी ॥
नाथ साहेबा हें चित्त तुझे पायीं । गडिपणा तूं सोडुं नको भाई ॥
मुगुटमणि सद्गुरु चूडामणी । केलें घटित प्रगट जनां वनीं ॥
भेटि होतां हें ऐक्य झालें ठायीं । बरं वाइट तूं मानुं नको कांहीं ॥
गडी केला रंगनाथ मिठी पायीं । तुटी नव्हे आणिक दुजें कांहीं ॥

म्हणत तसेच उभे राहिले होते. इतक्यांत एक कुत्सित श्रोता कथेंतील झालेलें निरूपण लक्षांत ठेवून देवनाथांस म्हणाला, 'महाराज, आतांच आपण सांगितलें कीं, परमात्मा अग्नीनें जाळला जात नाहीं. मग याचा उपयोग बोलण्यापुरताच किंवा कांहीं अनुभव आहे.' हें ऐकतांच देवनाथ त्याचा हात धरून म्हणाले, 'आपण श्रोते व मी वक्ता. उभयतांही याची सत्यता पाहूं.' असें बोलून तो पळून जाण्याचा प्रयत्न करीत असतां त्यास शेजारीं घेऊन बसले. त्यावेळीं देवनाथांनीं

## पद.

तुज काय म्हणावें आम्हीं[1] ।
दयाळू नाथ जगाचा तूं स्वामी ॥ ध्रुवपद. ॥

(इ० पृष्ठ ४२ पद २९ पहा.)

हें पद म्हणून समाधि लाविली. कांहीं वेळानें सर्व मंडप दग्ध होऊन कांहीं मनुष्येंही मेलीं. त्यांत देवनाथांचा आणि त्या श्रोत्याचाही देह दग्ध झाला. दुसरे दिवशीं दग्ध झालेल्या लोकांच्या घरचीं मनुष्यें येऊन त्यांस जीं प्रेतें सांपडलीं तीं नेऊन त्यांनीं त्यांचें और्ध्वदेहिक केलें. देवनाथांचें मात्र प्रेत त्यांस मुळींच सांपडलें नाहीं. देवनाथांचे शिष्यांपैकीं **मल्हारनाथ** म्हणून एक शिष्य होता. तो दुसरे दिवशीं **ग्वाल्हेरीस** आला. त्यास हा वृत्तांत ऐकून किती वाईट वाटलें असेल हें सांगणें नकोच. असो, त्यानें असा निर्धार केला कीं,

१. पूर्वीं जे ब्राह्मण बडोदें मुक्कामीं गणपतीचे देवळांत आले होते व ज्यांचा पुढें कीर्तनास उपयोग झाला म्हणून मागें लिहिलें आहे त्यांपैकीं दोघेजण ह्या प्रसंगींही कीर्तनास मागें उभे होते. त्यांनीं हें पद उतरून घेतलें व ज्यावेळीं जळकीं लांकडें आंगावर पडूं लागलीं त्यावेळीं खुद्द देवनाथांनीं ह्या दोघां ब्राह्मणांस बाहेर जाण्यास आज्ञा दिली व त्यामुळें ते बचावले.

'देवनाथांचें प्रेत सांपडल्याशिवाय अन्नग्रहण करावयाचें नाहीं.' नंतर दुसरे दिवशीं त्यास दृष्टांत झाला कीं, 'मी कीर्तनास ज्या ठिकाणीं उभा होतों त्याच ठिकाणीं उखरावें, म्हणजे तेथें मी आहें.' मग मल्हारनाथांनीं त्या जागीं उखरलें. १तेव्हां तेथें मारुतीची एक तांब्याची मूर्ति सांपडली. ती मूर्ति आसनावर होती. हें आसन अद्यापि सुर्जीतील मठांत आहे. मग मल्हारनाथांनीं ग्वाल्हेरीस देवनाथांची समाधि बांधून त्या ठिकाणीं वरील मूर्तीची स्थापना केली. त्या मूर्तींत व देवनाथाचे चेहऱ्यांत बरेंच सादृश्य आहे असें म्हणतात. देवनाथांस लहानसें पुच्छ होतें व तो मारुतीचा अवतार होता असेंही म्हणतात. याच वेळीं त्यांचे आंगावरील वस्त्रेंही सांपडल्याचें सांगतात. व तीं कांहीं दिवसपर्यंत त्यांचे शिष्य **रामराव काळी** यांजपाशीं असल्याचें कळतें. सदरहू मूर्ति अद्यापि ग्वाल्हेरीस आहे. कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, हा मंडप कोणीं मुद्दाम पेटविला असावा. अशा प्रकारें देवनाथांचें निर्याण झालें.

आतां देवनाथ यांचे संप्रदायाची थोडी माहिती देऊन हें चरित्र संपवितों.

## देवनाथांची गुरुपरंपरा.

(१) आदिनारायण.
|
(२) विधि (ब्रह्मदेव).
|
(३) अत्रिनाथ.
|
(४) दत्तात्रेय.
|
(५) जनार्दन.
|
(६) एकनाथ.
|
(७) नित्यानंद.
|
(८) कृष्णनाथ.
|
(९) विसोबानंद.
|
(१०) मुन्हारनाथ.
|

१. ही मूर्ति सुमारें तीन चार वर्षांपूर्वी गुप्त झाल्याचें ऐकतों.

(११) रंगनाथ.
|
(१२) गोपाळनाथ.
|
(१३) गोविंदनाथ.
|
(१४) देवनाथ. (यांची समाधि ग्वाल्हेरीस आहे.)
|
(१५) दयाळनाथ. (यांची समाधि हैदराबाद–निजाम येथें आहे.)
|
(१६) जयकृष्णनाथ. (यांची समाधि सुर्जीत मठापुढें आहे.)
|
(१७) रामकृष्णनाथ. (हे ता० १ मे १८९१ इ० रोजीं स्वर्गवासी झाले. यांची समाधि सुर्जीत मठापुढें आहे.)
|

रामकृष्णनाथ हा सत्रावा पुरुष होऊन हल्लीं १८ वी पिढी चालू आहे.

ज्यांचा जो संप्रदाय असेल त्याप्रमाणें त्यांनीं आपआपल्या संप्रदायाची गुरुपरंपरा नित्य म्हणावी असा नियम आहे. त्याप्रमाणें करण्यास नुसतीं नांवें म्हणण्यापेक्षां तीं एकाद्या वृत्तांत अथवा कांहींतरी विशिष्ट प्रकारानें म्हणणें हें सहजच ज्यास्त बरें वाटतें. ह्यामुळें कोणीं कोणीं तीं नांवें श्लोकांत, पदांत किंवा आरतींत गोवून मग त्यांचा पाठ करतात. त्याप्रमाणें ह्या परंपरेचा समावेश देवनाथांचे शिष्यांनीं आरतींत वगैरे केलेला आहे. त्यांपैकीं जीं पद्यें मिळालीं तीं पुढें दिलीं आहेत.

देवनाथांचे एक **सखेगोपाळ** म्हणून शिष्य होते. त्यांचा मठ हल्लीं पंढरपुरास आहे. त्यांचा शिष्य **माधव** म्हणून होता. त्यानें ह्या परंपरेची एक आरती केली आहे. ती पुढें लिहिल्याप्रमाणें:—

## आरती.

जयदेव जयदेव सच्चित्सुखसिंधो। पंचप्राणें आरति श्रीगुरु दिनबंधो ॥ ध्रुवपद. ॥
[१]नारायण [२]विधि [३]अत्री [४]दत्तात्रय नामा। नामरुपातित होसी अनंत गुणधामा।
मायाग्रस्त जिवांतें निरखुनि पदमहिमा। दावित मानवलोकीं नतजनहितउगमा॥ १॥
[५]जनार्दनाचा [६]एका [७]नित्यानंद सखा। [८]कृष्णनाथ ये नामीं [९]विश्वेश्वर भजका।
[१०]नाथ मुऱ्हारी योगी [११]रंगांच्या जनका। [१२]गोपाळा [१३]गोविंदा दावी निजलोकां॥ २॥
[१४]देवनाथ हृत्कमळीं गोपालसखा झाला। चौदा रत्नें झालीं एक जशी माला।

शोभे विठ्ठलकंठीं व्यापुनि पदकमला । आरति करतां माधव नित्य सुखी झाला ॥३॥

हींत ह्या परंपरेपैकीं पहिलीं चौदा नांवें अनुक्रमानेंच आहेत. बाकीचीं नांवें नसण्याचें कारण **माधव, स**खेगोपाळांचा शिष्य हें होय. अर्थात् पुढील नांवें ह्या आरतींत येवयाचीं नाहींत.

पुढें **जय**कृष्णनाथांचा एक शिष्य **रावजी सराफ** या नांवाचा **बाभळी** (वऱ्हाडांत इलिचपूर जिल्ह्यांत दर्यापूर तालुक्यांत हें गांव आहे) येथील राहणारा होता. यास **कृष्णनाथ** असें म्हणत असत. त्यानें वरील आरतीस एक कडवें जोडिलें आहे. त्यांत पुढील आणखी दोन नांवें त्यानें आणिलीं आहेत. तें कडवें पुढें लिहिल्याप्रमाणें:—

विठ्ठलकंठींच्या माळेला कोंदण कनकाचें । [१५]दयाळनाथ नामाचें जडियेलें साचें ।
[१६]जयकृष्णनाथ नामी पदक मोत्याचें । कृष्णनाथ पद गाउनि ध्याउनियां नाचे ॥४॥

आणखी—

### श्लोक.

[१]नारायणापासुनि बोध झाला, तेणें सुखें तो [२]विधि पूर्ण झाला ।
त्या पूर्णबोधास लिहून पत्रीं, केला सुखी तो निजपुत्र [३]अत्री. ॥ १
महाराज [४]दत्तात्रयाचे, कृपेनें पुढें चंद्रबोधासि ऐक्यत्व बाणें ।
कृपें बोधराजा [५]जनार्दन प्रबोधी, जनार्दनकृपें [६]एकनाथी समाधी. ॥ २
अनेकीं असे विश्व व्यापूनि एका, कृपें [७]नित्यआनंद भोगी स्वसूखा ।
स्वयें [८]कृष्णआनंद कैवल्यरासी, [९]विसोबाप्रती खूण ते पूर्णतेसी. ॥ ३
विसोबा महाराज विज्ञानदानी, स्वयें नाथ [१०]मूऱ्हारि चैतन्यखाणी ।
दयाळू महा [११]रंगनाथ स्वरंगीं, परब्रह्म श्रीनाथ [१२]गोपाळयोगी. ॥ ४
करुणानिधी नाथ गोपाल ओजा, समाधीवरी नाथ [१३]गोविंदराजा ।
सखा सद्गुरूनाथ कैवल्यदाता, कृपें तारिलें बालका [१४]देवनाथा. ॥ ५
असा व्याप्त सर्वांतरीं देवनाथ, तयाचे पदीं होउनीयां अनाथ ।
अशा पूर्व पुण्यें तारिलें त्वां [१५]दयाळा, दयाळूपणें तूंचि तूं कीं दयाळा. ॥ ६
दयाळू महाराज कृपांबुधी जो, शरणागताला नुपेक्षी कधीं जो ।
भजे त्यासि दे पूर्ण आनंदराशी, दयाळूपणें तारिलें बालकासी. ॥ ७
अनन्य शरणागत त्यासि झाला, [१६]जयकृष्णनाथ पदिं जो स्मरणें मुराला ।
महाज्ञानि महाराज जयकृष्णनाथ, असे याहि गोकुळीचे कृष्णनाथ. ॥ ८

जया वर्णितां चारिही स्तब्ध झालीं, रामकृष्णमति तच्चरणीं मुराली ।

हे श्लोक रामकृष्णनाथ यांनीं केले असल्याचें कळतें. अर्थात् त्यांचे नांवापुढें दुसऱ्याचें नांव आलें नाहीं.

कोणी एका भक्तानें **'देवनाथार्याष्टक'** रचिलें आहे तेंही येथें लिहिण्यासारखें आहे. तें असें:—

**आर्या.**

श्रीदेवनाथ गुरुजी, दास मि नमितों सहस्रधा तुजला, ।
विठ्ठलचरणीं प्रेमा, अखंड राहो असें वदा मजला. ॥ १
श्रीदेवनाथ नामें, वदतां वाणी पवित्र जाणावी, ।
ध्यानीं रूप तयाचें, ध्यातां मुक्ती घरींच आणावी. ॥ २
श्रीदेवनाथपूजा, नित्य करी जो हरीस आवडतो, ।
देतो निजपद त्यातें, आपण सेवा समग्र सांवडतो. ॥ ३
श्रीदेवनाथकीर्तिश्रवणें पठणें शिवास मानवतो, ।
शमदमशांति सुबोधें, गुरुभजनीं सर्व वंद्य मानव तो. ॥ ४
श्रीदेवनाथरुद्रें, कीर्तनरंगीं रमोनि जनता हे, ।
भगवद्भजनीं लावुनि, हरिगुण गावे असेंच म्हणताहे. ॥ ५
श्रीदेवनाथमूर्ति, ब्रह्मरसाचीच मूस ओतविली, ।
नवविधभजनसुखाची, भक्ति जशी पंढरींत पोतविली. ॥ ६
श्रीदेवनाथरूपें, श्रीदत्तात्रय कलींत अवतरला, ।
तत्संगें हरि रंगे, भोळा भाविक बहूत जन तरला. ॥ ७
श्रीदेवनाथ कवि तो, काव्यसुधाकर चकोर रसिकांशी ।
नवरस पूर्णपदें जो, पावन झाला जनांत जशि काशी. ॥ ८
श्रीदेवनाथआर्याष्टक हें पढतां विरागविषयी हो, ।
अष्टांगयोगभक्ति, ज्ञानाभिरुचीस पात्र विषयी हो. ॥ ९

दयाळनाथ यांनींही एक आरती केलेली आहे. ती:—

**आरती.**

आरती देवनाथा । निरंजना समर्था ।
त्रिभुवनीं कीर्ति थोर । जगद्गुरु जगन्नाथा ॥ ध्रुवपद. ॥
मधुमास शुक्लपक्ष श्रीरामनवमीं ।
कीर्तनीं ठेविला हो देह निजसुखधामीं ॥ आरती० ॥ १ ॥

पंचप्राण पंचवार्ती ध्यानीं लाविल्या ज्योती ।
भावार्थ कापुरानें स्वयंप्रकाश दीप्ती ॥ आरती० ॥ २ ॥
दयाळू देवनाथ महाकैवल्यातें दाता ।
आरती ओंवाळूनी चरणीं ठेविला माथा ॥ आरती० ॥ ३ ॥

देवनाथांच्या कवितेबद्दल उल्लेख केल्यावांचून हें चरित्र संपविणें इष्ट नाहीं. ह्याकरितां त्याबद्दल चार शब्द लिहितों. देवनाथांची कविता रसाळ, प्रासादिक, स्वानुभवद्योतक, व निस्पृहतादर्शक असून मुमुक्षूंस तरणोपाय आहे. याच्या कवितेविषयीं 'ज्ञानसंग्रह'कारांचा अभिप्राय सर्वांस मान्य होण्यासारखा आहे म्हणून तोच येथें देतों:—"देवनाथाचे देवस्तुतिपर सर्व कटिबंधांत कृष्ण, राम, मारुती, गणपती, पंढरीचा पांडुरंग, गुरुदेवता वगैरे सर्व देवांची स्तुति केलेली आहे. परंतु त्या सर्वांत रामाच्या व कृष्णाच्या वर्णनांचीं पदें फारच मनोहर असून शब्दसौंदर्य, अर्थमाधुर्य, वचनकोमलता, अनुप्रास, अर्थलालित्य वगैरे असंख्य गुणांनीं परिपूर्ण आहेत; तीं इतकीं कीं, त्यांतील सरस कोणतें याचा निवाडा मुळींच येत नाहीं. प्रत्येक कटिबंधांतील भाषालाघव व शब्दरचना मोठी मनोहर व चित्रविचित्र भासूं लागते. देवनाथ कवीनें जितकीं भक्तिपर व देवस्तुतिपर पदें केलीं आहेत तितकीं इतर थोड्याच कवींनीं केलेलीं आढळतात. यावरून देवनाथास आख्यानकवीपेक्षां साधुकवि ही पदवी ज्यास्त शोभते. रामजोशाच्या बोधपर लावण्यांप्रमाणें देवनाथ कवीचे कांहीं उपदेशपर व वेदांतपर कटिबंध आहेत. त्यांपैकीं 'अमोल काया जाइल वांया' हें देवनाथाचें बोधपर पद्य आबालवृद्धांच्या तोंडीं असून तें इतकें सुरस व वैराग्यपर आहे कीं ऐकणाऱ्यास तात्कालिक स्फूर्ति उत्पन्न होते. देवनाथाच्या काव्यसौंदर्याचा, शब्दसौष्ठत्वाचा व अर्थलालित्याचा मासला पाहणें असल्यास त्यांचे देवस्तुतिपर, वेदांतपर व बोधपर वेंचे **'काव्यसंग्रहां'**त दिले आहेत ते वाचून पहावे. एकंदरींत देवनाथ कवीच्या काव्याचें सर्वांगांनीं अवलोकन केलें असतां याची कविता अमृतरायाच्या कवितेशीं बरोबर साम्य पावते. याच्या काव्यांत छंदोभंग व वृत्तवैचित्र्याभाव हे खेरीज करून दुसरे कोणतेही दोष आढळून येत नाहींत. याच्या भाषेंत ग्राम्यता कोठेंही नसून भाषा प्रौढ व अलंकारयुक्त आहे. एकंदरींत या कवीला अमृतराय, आनंदतनय, वामन, मुक्तेश्वर वगैरे कवींच्या मालिकेंत गोंवण्यास आम्हांस कोणतीही शंका वाटत नाहीं." [ज्ञानसंग्रह—पुस्तक ९ अंक १ जानेवारी १८९९ पृ० २३.]

पदांच्या चाली कोणी नवीन प्रकारांनीं हल्लीं म्हणूं लागल्यास त्यांतील बराच रसभंग होतो असें अनुभवास आलें आहे. देवनाथांच्या कवितेस 'पदें' म्हणण्यापेक्षां 'लावण्या' म्हणणें ज्यास्त प्रचारांत आहे. आणि त्या म्हणण्याच्या चाली ज्या परंपरया चालत आल्या आहेत त्याच चालीनें त्या म्हटल्यास फार समाधान होतें. ह्यांच्या प्रासंगिक कवितेवरून ह्यांचें प्रसंगावधान, शीघ्रकवित्व आणि निस्पृहता हीं किती स्पष्ट रेखल्यासारखीं दिसतात! परमार्थविषय हा प्रापंचिकास रुक्ष तर खराच, परंतु देवनाथासारख्या साधु पुरुषाकडून त्याची लावणी झाल्यास व त्या लावणीवर योग्य वेळीं मननरूप जलसिंचन झाल्यास शेवटीं रसाळ फळांचा लाभ कां बरें होणार नाहीं? अवश्य झालाच पाहिजे. 'योजकस्तत्र दुर्लभः.' यांच्या कवितेंत वृत्तभंग, क्वचित् अपशब्द प्रयोग, विचारांची पुनरावृत्ति वगैरे दोष आहेत परंतु प्रासादिक वाणीस कोणी रोध करूं शकणार नाहीं व त्या रोधाचा ती पर्वाहि करित नाहीं. ह्यांच्या कवितेंत थोडा चित्रकाव्याचाहि मासला आहे, (१०१,१०३,१०७ हीं पदें पहावीं.) यांच्या कवितेचा संग्रह फार मोठा आहे व तो असलाच पाहिजे. परंतु, तो प्रसिद्ध करण्यासाठीं मिळण्यास फारच पंचाईत पडते हें पाहून विशेष वाईट वाटतें. इलाज नाहीं.

चरित्राची सामग्री मिळवून देण्याचे कामीं पूर्ण मदत देणारे सुर्जी अंजनगांव येथील **श्री० रा० रा० रघुपतराव हणमंतराव** ऊर्फ **दाजीसाहेब देशपांडे** यांचे हा चरित्रलेखक[1] फार फार आभार मानतो.

परम पवित्र संतचरित वर्णन करून मोक्षाचा लाभ करून घेण्याचें काम तडीस नेल्यावद्दल सर्वव्यापी जगदेकनाथास सर्व जीवांस स्वस्वरूप ओळखून घेण्याची इच्छा होण्याविषयीं परम नम्रभावानें प्रार्थना करून ही अल्प सेवा संपवितों.

---

१. हा चरित्रलेख आमचे परम मित्र रा० रा० **परशराम बाळाजी कावतकर, हेडमास्तर** शाळा सुर्जी अंजनगांव (सध्या उमरावती) यांनीं खरी माहिती मिळवून मोठ्या मेहनतीनें तयार करून पाठविला हे आम्हावर मोठे उपकार आहेत.

**'काव्यसंग्रह'कार.**

# देवनाथकृत काव्यें, कटिबंध, पदें, वगैरे.

## श्रावणाख्यान.[1]

(दिंड्या.)

सूर्यवंशीं अजराजपुत्र[2] पाहीं, धीर औदार्यें सदा सर्वदा ही, ।
पुरीं साकेतीं[3] पुण्यग्रामवासी, त्याचि संपत्ती सदा अवीनाशी.[4] ॥ १
पोटिं नाहीं संतान तया योगें, दिवारजनी दुःखीत हृदयरोगें, ।
तपाचरणीं त्यापुढें काळ गेला, परी नोहे संतान[5] श्रमी झाला. ॥ २
पुढें परिसा, वृत्तांत कसा जाला, रात्रिमाजी तो राव सुप्त[6] जाला, ।
तये समयीं त्या स्वप्न काय जालें, तिघां जीवांचे प्राणनाश केले. ॥ ३
घाबरोनी तो उठे, मनीं शंके, वसिष्ठासी प्रार्थुनी पुसे धाकें, ।
'स्वामि! याशीं वीधान[7] काय कीजे? दुःख निरसाया अभयदान दीजे.'॥४
मुनी बोले, 'तूं वनामाजि जाईं, श्वापदांस तिघां मारुनियां येईं, ।
हवन करितां अरिष्टनाश पाहीं.' ऐकुनीयां तो जाय लवलाहीं. ॥ ५
तटासीं तो लक्षोनि पाहि कैसें, गुणीं[8] योजोनी दूर बैसलासे, ।
उदकपानालागुनी व्याघ्र हरणी शशक सूकर[9] येतील ह्याचि ध्यानीं. ॥ ६
तये समयीं वृत्तांत काय झाले, तया बोलाया चित्त उदित जालें, ।
पुण्यराशी श्रावण भक्तराणा, नरकत्राता तो पुत्र[10] सत्य जाणा. ॥ ७
मातृपितृसेवेंत रत सदाही, तदा वृद्धें बोलती त्यास पाहीं, ।
'सख्या! सत्पुत्रा! जरी योग्य होशी, आम्हां नेत्रीं दाखवीं क्षेत्र काशी.'॥८

---

१. ही कथा वाल्मीकिरामायण–अयोध्याकांड–सर्ग ६३-६४ यांत आहे, पण तेथें श्रावण या नांवाचा उल्लेख नाहीं. मुनिपुत्र श्रावण यास गज अशा भ्रांतीनें दशरथानें रात्रीं मारिलें, ही कथा या काव्यांत वर्णिली आहे म्हणून यास 'श्रावणाख्यान' असें नांव दिलें आहे. २. अजराजाचा पुत्र दशरथ. ३. अयोध्या. ४. अक्षय. येथें वृत्तसुखार्थ 'अविनाशी' शब्दांतील 'वि' वर्ण दीर्घ केला आहे. ५. पुत्र. ६. निद्रित. ७. विघ्नसंहारक संस्कार, उपाय. येथें वृत्तसुखार्थ 'वि' दीर्घ केला आहे. अशीं उदाहरणें देवनाथाच्या काव्यांत अनेक आढळतात. ८. धनुष्याची दोरी. ९. डुकर. १०. पुत्र=पुत्+त्र=पुन्नामक नरकापासून पित्याचें रक्षण (त्राण) करणारा असा 'पुत्र'शब्दाचा अवयवार्थ आहे.

वचन ऐकोनी तदा सिद्ध जाला, स्कंधिं वाहोनी शीघ्र तो निघाला, ।
पूर्वजन्माची कथा जाण कैशी, सरित[1]जीवनिं ते मत्स्ययोनि ऐशी. ॥ ९
उष्णकालीं तें उदक शुष्क जालें, मीन अवघे ते पूर्ण सेलिलिं गेले, ।
तेथ किंचित जीवनीं[2] मत्स्यबाल, राहतां ही लोटला कांहिं काळ. ॥ १०
एक दिवशीं मध्यान्हि बिंब आलें, तदा किरणीं तें उदक उष्ण झालें, ।
होय कासाविस बाल तयेवेळीं, कोण त्राता त्याजला तये काळीं ? ॥ ११
कपोत[3]पक्षी पक्षिणी तया स्थानीं, तृषाहरणार्थ[4] येति उदकपानीं, ।
पान करितां तेधवां जीवनासीं[2], बाळ बोले तें उभय पक्षियांसीं. ॥ १२
'उष्ण उदकें मम प्राण पहा जाती, विकळ होतों, मज कष्ट बहू होती, ।
मला नेऊनी खोल सलिलिं सोडा, यया कृत्यानें सुकृत[5]भाग्य जोडा.' ॥ १३
संतोषोनी उचलिलें तयें बाळा, तदा धांवे लगबगां अंतराळा, ।
दैवयोगें तैं विघ्न आड आलें, वणव्यानें आरण्य ग्रासियेलें. ॥ १४
शिखा[6] अग्नीच्या धांवति अंबरातें[7], थोर घाबरली पक्षिणी तदा ते, ।
धूम्र नेत्रीं लागतां विकळ[8] झाली, बाळ पडलें अग्नींत तये वेळीं. ॥ १५
म्हणे, 'हर ! हर ! धातया[9] ! काय केलें ! बाळ मुखिचें अग्नींत भस्म झालें.'
तया विरहानें भ्रांति फार झाली, अग्निमाजी ते त्वरित आंग घाली. ॥ १६
लागवेगें तो पक्षि तेथ आला, अग्निमाजी त्यां बघुनि श्रमी झाला, ।
'उभय विरहानें वांचुन काय हो ! मी,' सिद्ध झाला तात्काल कायहोमीं[10]. १७
हाहाकारें अग्नींत उडी घाली, पिता पक्षी पक्षिणी माय जाली, ।
मत्स्य बाळ श्रावण पोटिं आला, पूर्वजन्माचा असा योग झाला. ॥ १८
उष्णतेनें श्रमताति मायबापें, रजनिमाजी चालोनि दिवा थोपे, ।
मृदू वचनें बोलोनि मायबापां, तोषवूनी त्यां दूर करी तापा. ॥ १९
तदा वृद्धें बोलती, 'सुकुमारा ! अरे वत्सा ! राजसा ! बा उदारा ! ।
तृषा लागे बा ! जीव होय कष्टी, उदक पाजूनी मना करीं तुष्टी.' ॥ २०
वचन ऐकोनी वृक्षि कावडीला, जाय उदकासीं धरी आवडीला, ।
वनामाजी धुंडितां होय कष्टी, अकस्मात कासार[11] पडे दृष्टी. ॥ २१
निकट येवोनी झारि शुद्ध केली, उदक भरिल्या संतोषवृत्ति झाली, ।

---

१. सरित (सरित्)=नदी. संस्कृत व्यंजनान्त शब्द मराठींत स्वरान्त होतात, याचें हें एक उदाहरण आहे. २. पाणी. ३. कवडा. ४. तान भागविण्यासाठीं. ५. पुण्य. ६. ज्वाळा. ७. आकाश. ८. व्याकुळ. ९. ब्रह्मदेवा. १०. देह हवन करण्यास. ११. सरोवर, तळें.

तदा झारीचा शब्द पडे कानीं, दशरथाचें¹ संधान तये स्थानीं. ॥ २२
मृगी पानास्तव तटाकासि आली, असें जाणे, संधानिं बाण घाली. ।
चापमुष्टींतुनि बाण तो निघाला, उदक भरित्या घातला पूर्ण घाला. ॥ २३
हृदयंवर्मीं खोंचला तीव्र भालीं, विकळ होई, भूमीस आंग घाली, ।
'हाय! मेलों!' हा शब्द पडे कानीं, राव दचकोनी परम खेद मानी. ॥२४
अहा! हत्या घडियली कीं नराची, विप्र किंवा सिद्धांतसाधकाची, ।
खेद चित्तीं मानुनी जवळ येई, पुसे त्यातें, 'सांग तूं कोण काई? ॥ २५
ऋषी किंवा सिद्धांतपुरुष सांगें, घात केला नेणोनि लागवेगें. ।
महादोषी मी पूर्णपणें पाहीं, तया योगें संतान होत नाहीं.' ॥ २६
येरु बोले, 'मी ऋषी नव्हे साचा, वैश्यवंशीं² जन्मलों सत्य वाचा, ।
असो. जन्माची गती घोर साची, परी चित्ता चिंताचि फार जाची. ॥२७
वृद्ध मातापितरांसि वृक्षिं ठेवीं, सलिल न्याया त्यां चरण पुढें ठेवीं, ।
इथें येतां प्रारब्ध आड आलें, असो, होणारें तेंचि सिद्ध झालें. ॥ २८
हृदयिं सलतो शर, काढ लागवेगें, जाय घेऊनी सलिल तूं सवेगें, ।
मुकाख्यानें तूं उदक त्यांसि पाजीं, मृत्युवार्ता तूं कथन करीं माजी. ॥ २९
प्रथम सांगसि तूं जरिहि वर्तमान, श्राप देतिल ते नव्हे उदकपान,' ।
असें ऐकुनि हृद्रोग तया जाला, उदकहस्तीं तो वृद्धनिकट आला. ॥ ३०
³साद येतां बोलती, 'पुत्रराया! सख्या! आलासी वंश उद्धराया.' ।
गौरवूनी बहु रिती बोलती ते, परी नेदी उत्तरा राव त्यांतें. ॥ ३१
'अरे वत्सा! तुज कष्ट फार जाले, मुखीं मौन्या कां तुवां साधियेलें? ।
जरी बोलसि तूं आमुशीं सुवाचा, तरी प्राशूं जीवना, मान साचा. ॥ ३२
हाचि निर्धार जाण सत्य साचा, ⁶आण वाहूं संकल्प हा जिवाचा.' ।
निश्चयातें ऐकूनी राव बोले, 'होय दशरथ मी, उदक आणियेलें.' ॥ ३३
वृद्ध म्हणती, 'पुत्र तो कुठें गेला?' राव बोले मम हस्तकीं निमाला.' ।
पुत्रमृत्यूचा शब्द पडे कानीं, पडति धरणीसी हाय शब्दवाणी. ॥ ३४
आंग टाकुनि लोळती दीनवाणी, गुणां स्मरुनी ते वदति दीन वाणी, ।
'धन्य पुत्रा! बा! स्ववंशानुसारा, वनीं मोकलुनी जासि कीं उदारा. ॥ ३५

---

१. बाणसंधान. २. वैश्यपित्यापासून शूद्रस्त्रीच्या ठायीं उत्पन्न झालेला. (सर्ग ६३ श्लोक ५०-५१.) ३. हाक, आरोळी. ४. सर्ग ६४ श्लोक ७-१०. ५. उदका. ६. शपथ. ७. मेला. ८. सदृश. ९. टाकून.

कसें रायासी जीवदान केलें, आम्हां गहनीं[1] त्यजुनियां भुकेलें, ।
अडामाजी अर्धेचि वोढियेलें, दोर कापुनियां आंत सोडियेलें. ॥ ३६
रात्रिमाजी उदकासि धाडियेलें, म्हणुनि रागें त्वां दूर गमन केलें?' ।
'पुत्र पुत्रा!' बाहोनी[2] शब्द करिती, 'तुला कष्टविलें आम्हीं दिवसराती'.॥३७
अरे बाळा! म्हणऊनि रूसलासी, कसा एकट तूं विष्णुपदा जासी? ।
आम्हां अंधांची यष्टि घोरं[3] रानीं, कुणीं चांडाळें घेतली हरोनी.' ॥ ३८
मुखीं घालिति ते तदा धूळ साचे, फार कळवळलें चित्त तें नृपाचें, ।
वदे दशरथ त्यां, 'उदकपान कीजे, उभयवर्गीं मग शाप अहो! दीजे.'॥३९
'आम्हि जैसें पुत्रासि आठवोनी, प्राण त्यजितों हृदिं प्राण सांठवोनी ।
तूंहि तैसा पुत्रासि आठवीशीं, वियोगानें तात्काल प्राण देशी.' ॥ ४०
चिता रचुनींयां देह अर्थि लावीं, वदूं ·······················वी, ।
मनीं चिंतुनि प्रभुपाय सदा साचे, देह सार्थका लाविले तयांचे. ॥ ४१
क्रियाकर्मा तेधवां आचरोनी, शापवचना आठवी मनीं मानी, ।
म्हणे, 'मजला संतती नव्हे साची, शकुन[5]गांठी बांधिली आनंदाची. ॥ ४२
शाप नोहे हा अनुग्रह[6]चि साचा, धन्य मानितसें दिवस आनंदाचा, ।
फिरे मागें तो वसिष्ठासि सांगे, हवन[7] मांडी तो नृपहि सानुरागें[8]. ॥ ४३
तपीयाचें हें वचन खरें कीजे, राजयातें सायुज्यपदा[9] दीजे, ।
अंतकाळीं मग स्मरे जो सुवाचा, मुक्तरूपीं देह कीं जाण साचा. ॥ ४४
अशा योगें त्यागिला देह जाणा, तया परमा ती गती प्राप्त जाणा, ।
यया अर्थीं प्रभुराज वंशिं आला, भक्तवचनातें पाळणें जयाला. ॥ ४५
देवनाथाचा प्रभू दीनबंधू, पूर्ण व्यापक आनंद सांद्रसिंधू, ।
कीर्ति आपुली आपण वर्णिताहे, तया प्रभुचें यश जगीं गाजताहे. ॥ ४६

---

१. वनांत. २. बोलावून. ३. भयंकर. ४. सर्ग ६४ श्लोक ५३-५६. ५. कालांतरीं होणाऱ्या गोष्टीचें स्मरण, ती गोष्ट प्रत्यक्ष होईपर्यंत, राहावें म्हणून तत्सूचक जी पदरास गांठ बांधितात ती. ६. प्रसाद, कृपा. अनिष्टापासून इष्ट उत्पन्न व्हावें–अशी जगाच्या व्यवहारांत परमेश्वरी योजना दि[illegible]े, असें म्हणतात, त्याचें हें पुराणेतिहासांतील एक उदाहरण आहे. ७. पुत्रकामेष्टि नामक यज्ञ. ८. आवडीनें, प्रेमानें. ९. मोक्षस्थान.

## कृष्णजन्म.

(श्लोक.)

भूभार फारचि विकाररहीत त्याला, घे अमृताशनिं समागमिं त्या पित्याला, ।
गेला शरण विधि तो अविधीविनाशा, जो दीनवत्सल प्रभू पुरवी मनाशा. ॥ १
नीवेदिलें सकळ वृत्तहि देवराया, प्रार्थीयलें अजास दुष्टकुळा हराया, ।
तों ऐकती ध्वनि अकल्पित सूर कानीं, जो बोलिजे विभु जगत्रयपालकांनीं. ॥ २
'मी अवतरेन यदुच्या कुळीं तसा रे! सारे तुम्ही सुर हि यादव व्हा पसारे, ।
मारूनि दुष्ट करूं पालन सज्जनांचें', हें ऐकतां सुरसमुच्चय सज्ज नाचे. ॥ ३

विदर्भाचे वंशीं जगजननि लावण्यभरणी
अजन्मा ये जन्मा यदुकुळिंच भूभारहरणी, ।
जया गाती वेद श्रुति कवि हि व्यासादि सुरसा .
हरीची ते लीला श्रवणिं स्थिर होवोनि परिसा. ॥ ४

उग्रसेनतनया अजि देवकी, नेमिला वर तिये वसुदेव कीं, ।
ओहेरें मिरविती रथयानीं, कंस सारथि वैरातप्रयाणीं. ॥ ५

(दिंड्या.)

महोत्साहें मिरवितां वधुवरां या, थोर पोटीं स्वानंद कंसराया, ।
रथीं आपण सारथी जाहलासे, करी कौतूकालागिं मन उल्हासे. ॥ ६
शैलशिखरीं आदळे वज्र जैसें, तये समयीं जाहलें तया तैसें, ।
'देवकीचा सुत आठवाचि कंसा! तुझ्या प्राणातें हरिल जाण ऐसा.' ॥ ७
वदे ऐशी अंबरीं देववाणी, ऐकतांची दचकला कंस कानीं, ।
म्हणे, 'कैंची भगिनि हे मृत्युखाणी, रथाखालीं पाडिली धरुनि वेणी. ॥ ८
वधूं ईतें म्हणउनी हेत स्वमनीं, उभा ठाके खळ, शस्त्र धरुनि पाणी, ।
घाबरी ते सुंदरी अश्रु नयनीं, वदे भावा तेधवां दीन वचनीं. ॥ ९
'काय कारण बा! तूज वध कराया? काय केला अन्याय बंधुराया!? ।
बहुत होती मजवरी तुझी माया, कशी निष्ठुरता आजि आलि हृदया? ॥ १०

---

१. हें प्रकरण श्रीमद्भागवत–दशमस्कंध–अध्याय २-४ यांच्या आधारें लिहिलें आहे. यांत कृष्णाची जन्मकथा वर्णिली आहे म्हणून यास 'कृष्णजन्म' असें नांव दिलें आहे. २. या काव्यांत छंदोभंगाकडे बरेंच दुर्लक्ष केल्याचें दिसतें. तसेंच शब्द ओढून ताणून ऱ्हस्व दीर्घ केले आहेत. अशीं स्थळेंही अनक आहेत. ३. देवांचा समुदाय. ४. वधुवरें. ५. वहन. ६. विवाह झाल्यावर वधूसह वरानें परत घरीं मिरवत जाण्याच्या समारंभांत. ७. आकाश.

माय मारी बाळासि जरी हातें, कोण त्यातें मग वांचवूं पहातें ? ।
कोण त्राता तुजवीण सांग मातें ? बंधुराया ! दे प्राणदान मातें. ॥ ११

(श्लोक.)

बहु प्रार्थिजे ते हरीलागिं माया, परी हिंसकालागिं[1] नयेचि माया, ।
करीं खड्ग[2] घे नागवें मारण्यातें, म्हणे, 'मृत्युच्या ह्या वधूं कारणातें.' ॥ १२
वसूदेव बोले धरोनी करा या, 'स्त्रिहत्या कशी आदरीली कराया ? ।
सुजाणा ! तुझा सांग हेतू कसाहे, महापाप तूं जाणसी ना कसा हें ? ॥ १३
वदे यास तो स्वामि दैत्यादिकांचा, 'इयेपासुनी मृत्यु अस्मादिकांचा; ।
इचा आठवा पुत्र जो सत्य वाचा, करी घात तो आमुचीया जिवाचा.' ॥ १४

(दिंड्या.)

ऐकुनीयां वसुदेव तया बोले, 'तुला अर्पिन होतील इला बाळें, ।
नव्हे वाणी असत्य कदां काळें, सोडि देईं[3] जीवदान वेल्हाळे.' ॥ १५
उभयतां त्या मग ठेवि बंदिशाळे, रक्षणातें बैसवी दैत्यपाळे[4], ।
प्रथम झाला तिस पुत्र तये वेळे, दिला कंसा नेऊनि शीघ्र काळें. ॥ १६

(ओव्या.)

रायें बाळ पाहोनि नयनीं । दया उपजली अंतःकरणीं, ।
म्हणे, 'मृत्यु यापासोनी । आम्हांलागोनी नसेची. ॥ १७
निःकारण कां वधावा ?' । ऐसें विचारूनी तेधवां ।
कंस म्हणे, 'बा वसुदेवा ! । बाळ न्यावा निज ठायां. ॥ १८
वसुदेवें उचलोनी बाळा तया । आश्चर्य मानितसे हृदया, ।
म्हणे, 'आजी वाटपाडिया[5] । कैशी दया उपजली ?' ॥ १९
बाळ घेवोनी देवकीरमण[6] । बंदिशाळे आला न लगतां क्षण. ।
इकडे कंससभेलागुन । ब्रह्मनंदन[7] पातला. ॥ २०
कंसरायें देवऋषी । बैसविला सन्मानेशीं, ।
करोनि पाद्याद्यर्चाचमनासी[8] । षोडशोपचारेंशीं[9] पूजिला. ॥ २१

---

१. घातकाला. २. तरवार. ३. सुंदर स्त्रीला. ४. दैत्यांचे समुदाय. ५. वाटपाड्या, वाटपाडू= मार्गातील रहदारी बंद पडावी अशा हेतूनें मार्गस्थांस मारण्याचें किंवा लुटण्याचें दुष्ट काम करणारा. ६. वसुदेव. ७. नारद. हा परमभागवत आणि कलहप्रिय अशी ख्याति आहे. ८. पाद्य+आदि+अर्चा+आचमन. ९. पूजा करण्याचे षोडश (सोळा) उपचार आहेत त्यांचीं नांवें:—'आसनं स्वागतं पाद्यमर्घ्यमाचमनीयकम् । मधुपर्काचमस्नानं वसनाभरणानि च । गंधपुष्पे धूपदीपौ नैवेद्यं वंदनं तथा ॥.' या नांवांत क्वचित् फरक आढळतो:—आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमन, स्नान, वस्त्र, यज्ञोपवीत, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, दक्षिणा, प्रदक्षिणा आणि मंत्रपुष्प.

(श्लोक.)

ऋषिवर मग बोले, 'सत्य हे चूक राया !
वसुंत[1] अरि[2] प्रवर्ते कोण घाता कराया ? ।
न कळुनि सुत त्याचा त्यासि दीला कसा रे !'
विधिसुत[3] वदताहे, 'मारिं हे तोकें[4] सारे.' ॥ २२
गेला असें वदुनि तो हितशत्रु[5] साचा, मानूनि कंस करि घात तसाच सांचा, ।
जों सातवा धरित भूधर[6] गर्भ ठाणें, तों देवकीस वरिती चिरश्री[7]उठाणे. ॥ २३

(छंद.)

गर्भा आये फणीपाळ[8], भयी देवकी खुशियाल, ।
वडी आंखियां[9] भई लाल, मगनमस्त[10] हालमों[11]. ॥ २४
भरी खाशी ललकार, मुसल नांगर हतियार, ।
लावूं दैत्यनको मार, करूं ठार पलखमों[12]. ॥ २५
बीरबानी बजे चंग, वसुदेव भया दंग, ।
कहे कोन भया रंग, थरक अंग कांपता. ॥ २६
कभूं जाने रक्षपाल, अभी[13] होवेंगा जंजाल, ।
लाज राखो भूपाल, भुवनपाल नाथजी ! ॥ २७

(ओव्या.)

असो सात मास झालिया । जे हरीची निज योगमाया[14], ।
निज सत्ते सांगे तया । काढोनि नेइजे गर्भासी. ॥ २८
गर्भ नेवोनी ते अवसरीं । घातला रोहिणीचे[15] उदरीं, ।
सप्तमासिका गर्भांतरीं । देखोनि घाबरी झाली ते, ॥ २९
भ्रतार नसतां संनिधानीं । नवल परी गर्भाधानीं, ।
तंव वदली आकाशवाणी । 'चिंता रोहिणि ! करूं नको. ॥ ३०
हा वसुदेवाचा गर्भ देख । पुत्र होईल दैत्यांतक,' ।
ऐसें ऐकतां सम्यक[16] । जाहला हरिख[17] रोहिणीतें. ॥ ३१

---

१. आठांत. वसुनामक देव आठ आहेत म्हणून वसु म्हणजे आठ—असा अर्थ. २. शत्रु. ३. नारद. ४. बालक. ५. बाह्यत: हित (हितकर्ता) असें दाखवून अहित करणारा, दुसऱ्याच्या हिताचा शत्रु. ६. शेष. ७. चिन्हें, सूचक लक्षणें. ८. शेष. ९. [illegible]ळे. १०. मदोन्मत्त. ११. सांप्रत. १२. क्षणांत, पळांत. १३. आतां. १४. ईश्वराची मायारूप जी शक्ति ती. १५. वसुदेवाची दुसरी बायको. १६. चांगलें. १७. हर्ष (आनंद).

सिंहावलोकनें तत्वतां । श्रोतीं परिसिजे मागील कथा, ।
सातव्या गर्भाची अवस्था । झाली तत्वतां ऐशा परी. ॥ ३२
गर्भ गळतांची वार्ता । दूतीं निवेदिली मथुरानाथा, ।
कंस म्हणे, 'सर्वार्थता । जपा आतां आठव्यातें. ॥ ३३
आठवा हा मोक्षदायक । म्हणोनि कंसासी बैसला धाक, ।
अट्टहास्यें करोनि हाक । दूतांसि देख सांगतसे. ॥ ३४

(दिंड्या.)

'आठव्याचा आठव बरा ठेवा, पूर्ण लक्षा तो, आळसा न ठेवा, ।
मला गमला माझाच मोक्षठेवा, रुचत नाहीं उपभोग दुजा ठेवा.' ॥ ३५
आठव्यानें व्यापिल्या दिशा दाही, दिसे त्यातें सबाह्य अंतरीं ही, ।
कोण त्याचा तो योग असा पाही, वर्णिती त्या भाग्यासि पार नाहीं. ॥ ३६
असो. ऐसा लागला छंद कंसा, पुढें झाला वृत्तांत कसा परिसा. ।
दीनबंधू त्या पयोनिधीवासा, दया आली योजिला योग कैसा ? ॥ ३७
परित्राणाय साधुच्या उभारा, धरी निर्वटाया सर्व भूमिभारा, ।
बंदिशाळे त्या तया दिनोद्धारा, घडे येणें त्रिभुवन सुकूमारा. ॥ ३८

(श्लोक.)

अज अजित अजन्मा जन्म घेऊं पहातो,
प्रगट तिज पुढारीं अष्टवर्षी पहा ! तो, ।
चतुर्भुज करिं चारी आयुधें शोभती तें
निरखुनि मनिं देवा देवकी तोषली ते. ॥ ३९
उभा जो प्रभू त्या जगत्कारणातें, रमावल्लभू दुःखसंहारणातें, ।
नमूनी सती पादपद्मा वरीते, वदे देवदेवा तया सुंदरी ते. ॥ ४०
'कृपाळा ! प्रभू ! हे घनश्यामवर्णी, तनू चित्प्रभा भा अशी कोण वर्णी ? ।
फणी शीणला, वेद मौनावलेती, महद्भाग्य मीं देखिलीं पावलें तीं. ॥ ४१
कृपाळा ! स्मरे नेम पूर्वील साचा, नसावा कदां योग हा आळसाचा, ।
किती भोगिजे ही अशी बंदिशाळा, त्वरें बाळ हो ! तोडिं काळा विशाळा.'

---

१. मागें अवलोकन केल्यानें. २. जीवाची आस्था किंवा पर्वा न धरतां प्रयत्न करून. ३. 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्' (भगवद्गीता–अध्याय ४ श्लोक ८). सज्जनांचें रक्षण करण्यासाठीं, दुष्टांचा संहार करण्याकरितां आणि धर्माची स्थापना करण्याकरितां मी आपल्या मायायोगानें प्रत्येक युगांत उत्पन्न होतों–असें भगवंताचें वचन आहे. ४. नाशावया. ५. येथें छंदोभंग झाला आहे. ६. पदकमल. ७. शेष.

वदे श्रीहरी, 'बाळ होतों कुळातें, त्वरें नेउनी घालिजे गोकुळातें, ।
दिसां थोडक्या बंदिशाळा तुटावी, अशी नेमिली चित्ति चिंता नुठावी.' ४३
वदोनी असें सांडिली ती अहंता, त्वरें बाळ होतो प्रभू कंसहंता, ।
इला वाटलें मद्हृदीं पूर्ण जन्मा, प्रभू जाहला बाळ कीं हा अजन्मा. ॥ ४४

रघुविर जनकानें मारिला तोच मास ।
परि दिन अजि पूर्णा वृद्धि जे ये तमास ।
तिथि तरि वसु[1] जाणा काळ वर्षाऋतू कां
यदुकुळकुळदीपा जाहला जन्म तोका. ॥ ४५

ते मध्य शार्वरिच[2] वासर सौम्य[3] जाणा, संयुक्त रोहिणि शिशुत्व[4] घडे किं जाणा,।
होतां किशोर[5] सुर तोष करी तनाना, त्या दुंदुभी सहित वाजति वाद्य नाना.॥

(दिंड्या.)

विमानांची जाहली नभीं दाटी, सुरानंदें वर्षती सुमनवृष्टी,[6] ।
विधीआदी अमरेंद्र धूर्जटी, बंदिशाळे पातले देव कोटी. ॥ ४७
मित्रपुत्रादी आपणास तीतें, प्रदक्षणूनी आदरी स्तुतीतें, ।
असें देखोनी हास्य किजे नाथें, नमुनि गेले ते आलिया सुपंथें. ॥ ४८
दिशा व्यापीत तनूदीप्ति[7] ज्याची, अशी पाहोनी मूर्ति श्रीअजाची, ।
हर्षवृत्ति सुर शेषतनू ज्याची, परी चित्तीं चिंता हि बहू ज्याची. ॥ ४९
बहू सुंदर जाहलीं सहा बाळें, वधीयेलीं या दुष्ट कंसकाळें, ।
कोटि भानूंचें[8] तेज नखीं लोळे, असें लाभे निववील कसे डोळे ? ॥ ५०

(श्लोक.)

वदे देवकी आपुल्या वल्लभातें, 'त्वरें गोकुळा न्या रमावल्लभातें,' ।
म्हणे तो तितें, 'जागिजे द्वारपाळीं, कपाटें[9] दृढें दुष्ट मोठे कपाळी. ॥ ५१
असो लाज हे त्या जगत्पाळकास,' वदोनी असें घे त्वरें बाळकास, ।
हृदीं लाविला तो शिशूं[10] चक्रपाणी,[11] तयीं लोटिलें लोचनालागिं[12] पाणी.॥५२

(पद.)

'भाग्यहीन मी' देवकि वदली विनवी वसुदेवा, ।
'निर्दय हृदयीं उचलुनी नेतां कसें देवदेवा ?' ॥ ध्रुवपद. ॥
'सजल सघन घन गगनीं वळला वर्षत सुकाळीं, ।

---

१. अष्टमी. २. रात्र. ३. बुधवार. ४. बाळपण. ५. बालक. ६. फुलांची वृष्टी. ७.अंगकांति. ८. सूर्यांचें. ९. द्वारें. १०. बालक. ११. श्रीकृष्ण. १२. डोळे.

घोर शार्वरी[1] आज भासते काळासम[2] काळी[3], ।
सदय मृदू अति हृदय कठिण कां मातें दुःखाळीं ।
लोटुनि नेतां चिद्रव····जो शिशु हा ये काळीं? ॥ निर्दय० ॥ १ ॥
सहा मारिलीं बाळें कंसें, सातवें गळालें, ।
आठवा हा तुम्ही नेतसां मन कां हो ! चळलें? ।
घाबरला जिव निघूं पाहतो, कर पद हे गळले, ।
जन्मांतरिंचें कोण पाप तें नकळे हें फळलें? ॥ निर्दय० ॥ २ ॥
स्नेहभरें मीं स्नेहें[4] नाहीं जाउळ माखियलें, ।
पायांवरि घेउनी कुमारा नाहीं न्हाणियलें, ।
नाहीं दिधली घुंटी[5] स्वहस्तें, नाहीं पाजियलें, ।
कुळिंचें दैवत त्यातें नाहीं सटवीशीं पुजिलें. ॥ निर्दय० ॥ ३ ॥
कठीण केलें मन वसुदेवें गमली सीमा या, ।
मुक्त कपाटें झालीं घेउनि निघतां अमाया, ।
देवनाथप्रभुची हे ऐशी अतिदुर्धर माया, ।
स्रवति लोचनीं जीवनबिंदु[6] ती खेद करी माया. ॥ निर्दय० ॥४॥ १३

(श्लोक.)

तुटे शृंखळा मुक्त झालीं कपाटें, तया द्वारपाळाचिया नेत्र पाटें, ।
सुखें [शार्वरी]माजि निद्रा कडाडा, पिता पुत्र घेवोनि जातो धडाडा. १४

(सवाई)

अजि मेहुं[7] गडाड गडाड बराखत[8] बूंदें[9] बडी गेंहरी टपके,
अजि रात अंधारि परी नहिं सूजत जात चलो पगके टपके, ।
फणिराज करे फणछाय तनू, प्रभु छाति लगाय रह्यो चुपके, ।
चल ठाड रह्यो तटपे जमुनाजल जात चल्यो लेंहेंरी[10][11] लबके. ॥ १५

(श्लोक.)

शिरीं घे वसूदेव त्रैलोक्यराया, यमूना चढे पादरेणू[12] वराया, ।
पदें स्पर्शतां मार्ग तो वेगळाला, त्वरें देव घेवोनि ये गोकुळाला. ॥ १६
यशोदेसि ते जाहली योगमाया, तिनें लाविले लोक निद्रे रमाया, ।
पहा ते कशी नंदपत्नी सुदैवा, सुता घेत ठेवी वसूदेव देवा. ॥ १७

---

१. रात्री. २. यमासारखी. ३. कृष्णवर्ण, भयंकर. ४. तेल. ५. बाळकडू. ६. पाण्याचे थेंब. ७. मेघ, ढग. ८. वर्षत. ९. थेंब. १०. खोल. ११. लाटा. १२. धूळ.

वसूदेव घे ते त्वरें मायराणी, पुन्हां पातला तो तया दुःखखाणी, ।
कपाटें तशीं जागती द्वारपाळी, पदीं शृंखळा दैव ठोकी कपाळीं. ॥ ५८

(ओव्या.)

आनकदुंदुभीस[1] ते क्षणीं । कैसें वाटलें अंतःकरणीं, ।
कीं अमृतकुंभ ओलांडोनी । कांजी वदनीं घातली. ॥ ५९
सुधापालटें[2] घेतली कांजी, । कल्पवृक्ष देवोनि घेतली भाजी, ।
वसुदेव तैसा झाला राजी, । समयो पाजी म्हणोनियां. ॥ ६०

(श्लोक.)

करीं देवकीच्या त्वरें दे तिला हो! अटाहास्य ते घेतसे शोकलाहो, ।
दुतीं जाणवीलें तया कंसराया, उठे तो उतावीळ घाता कराया. ॥ ६१
तिला 'दे' म्हणे, 'बाळ' जैं त्रीदशारी[3], वदे ते, 'नव्हे पुत्र तो, हे कुमारी; ।
दयाळा! तुझा क्रोध चित्तीं निवारीं, करीं कन्यकेचें च घे दानवारी[4]. ॥ ६२
न मानीच तो लोटुनियां सुशीळे, पदीं गीवूसुनी आपटावीच शीळे, ।
तदां निष्ठुनी जाय ते अंबरीं[5] हो! खळालागिं बोलावया आदरी हो!॥ ६३
वदे ती तया, 'श्रीहरी जो अकर्ता, वसे भूवरी तो तुझा घातकर्ता.' ।
स्वयें गुप्त ते बोल ऐके, उगा हा, अधोमूख तो पातला नीज गेहा. ॥ ६४

(ओव्या.)

इकडे गोकुळीं नंदसदनीं । यशोदा जागत जयीं ते क्षणीं, ।
पुढें सुकुमार कैवल्यदानी[6] । पुत्र नेटका देखिला. ॥ ६५
जवळी आल्या परिचारिका[7], । तिहीं देखिलें बाळका, ।
हर्षयुक्त गेल्या सुमुखा । नंदासि देखा सांगावया. ॥ ६६
नंदें उत्साहभरित मनें । उभविलीं गुढिया तोरणें, ।
गोभूहिरण्यरत्नदानें । द्विजां अपार दीधलीं. ॥ ६७

(छंद.)

अंगनांचे[8] थवे दाट, । आले ब्राह्मणांचे थाट, ।
वाद्यें वाजती संघाट, । नादें काष्ठा[9] घूमती. ॥ ६८

---

१. वसुदेव. (वसुदेवाच्या जन्मप्रसंगीं देवांनीं आनक नांवाचे दुंदुभि वाजविले म्हणून त्यास 'आनकदुंदुभि' असें नांव पडलें वसुदेवाचा पिता आनकदुंदुभ म्हणून होता, त्यावरून त्याचा पुत्र तो आनकदुंदुभि अशी व्युत्पत्ति कोणी कोणी करतात ती निर्मूल होय.) २. अमृताचा मोबदला. ३. देवांचा शत्रु. (कंस.) ४. कन्यादानोदक. ५. आकाशांत. ६. मोक्ष. ७. दासी. ८. स्त्रियांचे. ९. दिशा.

बाजे सनई घनघोर, । नगारनकी लगे झोर, ।
बाजे कर्ना बंभोर, । दिसा नाद घूमती. ॥ ६९
ढोल जंतर दूताल । बाजे मिरदंग अरु ताल, ।
बिना चपला करताल, । अजब ख्याल सुनाये. ॥ ७०
झनक झांज झनत्कार, । गुनी गावे ललकार, ।
सारमंडल सीतार, । सारंगी भी बाजती. ॥ ७१
नफेरी अरु मोरचंग, । घडियाल बाजे चंग, ।
घटा खूब मचा रंग, । नंदद्वार सबवडी. ॥ ७२
छुटे तोफा गरनाल, । कडकवान शुतरनाल, ।
सभा सबहि भई लाल । गुलाललकि मार है. ॥ ७३
थरक पात्रा थतकार । भये थाडे चोपदार, ।
खूब भरते ललकार, । अजब भाग नंदका. ॥ ७४
देवनाथप्रभु लाल । भयो नंदजिको बाल, ।
दुष्ट दैत्यनको काल ।, इच्छपाल दासको. ॥ ७५

(श्लोक.)

असो ये रिती पूर्ण उत्साह होतो, तदा नंदराणीपुढें श्रीहरी तो, ।
कशी लेइली सर्व अंगांस न्हाणी, मधें शोभली वेष्टितां अंगनांनीं. ॥ ७६
करें घे बरें बाळ पायांवरी ते, तदां त्यास न्हाणावया आदरीते. ।
भरी भक्तिगंगाळि ते प्रेमपाणी, स्नेहें माखिला तो शिशू चक्रपाणी. ॥ ७७

(पद.)

न्हाणी हरीतें सप्रेम नंदराणी । खाणी तिच्या भाग्याचि कोण वानीं?॥ ध्रुवपद.॥
ज्याच्या स्नेहें देहभावा केले परते, । ज्याच्या स्नेहें जाळीलीं सर्व दुरितें, ।
ज्याच्या स्नेहें सायुज्यसौख्य भरितें,। स्नेहें त्याचें जाऊळमाखी करिं ते.॥ न्हाणी० १
गंगा जन्मे ज्याचिया चरणकमळीं, । त्यावरी पाणी वालीती हस्तकमळीं, ।
ब्रह्मादिक वंदिती पदरजधूळी,। पदींची ती घेवोनि लावी भाळीं.॥न्हाणी०॥२॥
देवनाथप्रभु अंबर या विश्वा कीं, । अंग त्याचें पुसोनि वस्त्रें झांकी, ।
सर्वात्मा जो व्यापक अणुरेणु कीं । मुखअॅनिळें तयाचे कर्ण फुंकी.॥न्हा०॥३॥७८

(घनाक्षरी.)

अंत:करणाचे डोल्हारीं । आत्मा निजविला श्रीहरी, ।
मनोमय लाउनी दोरी । ते सुंदरी हालवी. ॥ ७९

---

१. दिशा. २. दैव. ३. पायें. ४. वारा.

जन्मा आला येणे रीती, । लीलाअवतारी श्रीपती, ।
पुढें बाळलीला प्रीती । सादर श्रोतीं परिसीजे. ॥ ८०
देवनाथप्रभूची लीळा, । अजन्मजन्माचा सोहळा, ।
वर्णितां तों सिद्धि नेला । श्रीगुरुनाथ दयाळें. ॥ ८१

---

# कटिबंधसंग्रह.

## कटिबंध १ ला.

रघुवीर राजा राम भजावा हो ! ॥ ध्रुवपद. ॥

जो पटाधिकारी मोटा, स्वरुप घनघटा, अमोल शिरिं फेंटा, पांघरि दूपटा, जरीचा बुटा, वरी पितकटासि दशरथबेटा, शोभति पायिं वाकीं तोडर नाजु लुटा, वाजत चुटचुटा, चालत लुटलुटा, वरिष्ट सूभटा, शरयुच्यां तटा, वसत हृद्वटा, स्मरुनि भवसिंधु तरावा हो ! ॥ रघुवीर० ॥ १

कोटिरविसम प्रभा, प्रभा शाम नाभा, परी रंग अभा, भानुकुळिं उभा, रणीं जो सुभा, त्रैलोक्याचा गाभा, स्वानंदपद लाभा, घेउनि निजनभा, प्रगटरुप स्तंभांतरिं जो चिरि उभा, त्या दुष्टपतिसभासि प्रिय स्मरभावें चिरिल काळ जिभा, उपडि भवकुंभा, नमुनि सप्रेम गावा हो ! ॥ रघुवीर० ॥ २

चिमणि कमान, ज्याचा चिमणासा बाण, ठाण वज्रापरिस अतिमहान्, सानतनु कोमल स्वरुप, रुपमनु, अविट चिद्घनु, प्रभा ज्याचि वाणु, कितिक जिवभानु, कौसल्यानंदनु, कमळलोचनु, राघववचनु, अविट ज्याचि सगट, सिरीं मोरमुगुट, विराजितप्रभाघनु, रामधनि अनुहात जोडुनि तुतें देवनाथ प्रार्थि मनु, सानु ऐसे वय तनुसि ये मने म्हणुनि निकट निष्कपट होउनि राम हृदयिं स्मरावा हो ! ॥ रघुवीर० ॥ ३

## कटिबंध २ रा.

ये बा ! ये दीनबंधु गोविंदा गोपीरमणा ! ॥ ध्रुवपद. ॥

मी तो पतीत आहे परी, पावन ब्रीद तुझें कंसारी!, दावी सत्य करूनी हरी!, मुरलीवादना जनार्दना ! ये, मदनारिप्रिय ! असुरमर्दना ! नंदनंदना ! भुवनत्रयपालका ! दयाळा ! नवनीरदतनु परम कृपाळा! कोण कळवळा, तुजवांचुन करि?

---

१. यावरून 'बाळलीला' हें आख्यानही देवनाथाचें केलें असावें, असें वाटतें. २. सूर्यवंशीं. ३. लहान देह. ४. लहान. ५. मेघ.

४ दे० का०

ये घननीळा! पूर्ण स्नेहाळा! वेळा त्वां अतिदुर्धर जाणुनि, जननी बाळापरि तुज पाहे पाळि लळा जी, श्रीगोपाळा, करी धांवणें, त्रिलया ने [1]भवदुष्कृततरु, तार तूं मजलागिं अनाथा श्रवण करी मम करुणा. ॥ ये बा० ॥ १

सर्वोत्तमा! स्वसंवेद्या! पूर्णपरात्पर! अनादिआद्या! वैकुंठाधिप! वेदवंद्या! भीमातटिं कर कटीं त्रिटेवरि, नीट उभा राहसी, सांग तयाचें काय पाहसी? आइकुनिया तरि कां जि! न येसी, वेळा ऐशा, हे जगदीशा! दिशा शून्य तुज पिशा ह्या वृत्तिदशा हे अतिदुर्दशा, निशा अविद्या, वशात मन भवपाशामध्यें गुंतुनि पडलों, अशांत ये,वें पशास या भ्रमनाशास्तव प्रार्थियले परि, कशालागिं तूं गुंतलासि हरि! त्वरित धांव बहु भारी संकट वारी, उद्धरि दीन असामी [2]खगारिशयना! कमललोचना! कर्ममोचना! नुपेक्षी या मम वचना. ॥ ये बा० ॥ २

हाकारित [3]भगिनीच्या काजा, धांवसि निजविरुदाच्या लाजा, गोमतितटवासा! महाराजा! योगीमनविश्रामधाम, निजभक्तकामकल्पद्रुम तो हरि, ऐशापरि श्रुति वर्णिताति विधितातमात हे विविधप्रकारी, परी अंतरीं आश्चर्य वाटतें, या अवसरीं, कां कंसारी! मन कठीण केलें, विश्वालय, अजि कालियमर्दन! दीनजनप्रतिपालक कृष्णा! शांतविसी तूं निजजनतृष्णा, तुजवांचुनिया सांग वितृष्णा कोण हरिल [4]तापत्रयउष्णा? [5]जिष्णुसारथ्या! विष्णुसख्या! गणगोत तूंचि मम, इष्टमानसीं स्पष्ट समजलें, बुद्धिभ्रष्ट या नष्ट संगती, कष्ट पावलों, मी माझें म्हणवोनी भुललों, नश्वरमद पीउनी मातलों, अलंकार अहंममतेचे ल्यालों, द्रव्यास्तव धनिका अनुसरलों, देशविदेशांतरही फिरलों, तेणें विशेषचि दोष आचरलों, निजसुखस्वहितालागिं विसरलों, धालों स्वप्नांतरगत नुमजुन, कन्यापुत्रस्नुषादिक माजी, ममता[6]कर्दमिं जाउनि पडलों, नुठवीं आतां बहु अवघडलों, हरहर! काळकरीं सांपडलों, याचक मी तव द्वारीं अडलों, झडकरि घालीं प्रेमभीक, मी अनाथ, तूं गुरुनाथ दयाळू, परमकृपाळू, विनंति ऐके सुखसदना! ॥ ये बा० ॥ ३

परमउदारा! [7]पशुपतिमित्रा! कमललोचना! कमनियगात्रा! विश्वचराचरव्यापकसूत्रा! हीन अती मतिमंद दीन मी, शरण दावि सुकुमार चरण ते, जननमरणभवदुःख हरण करिं, दयानिधी हरि! तारिं मला, अतिदुस्तर हा [8]अघसागर भरला,

---

१. संसारपापरूप वृक्ष. २. शेषशायी. (खगारि=साप.) ३. द्रौपदीच्या. ४. आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक असे तीन प्रकारचे ताप. ५. अर्जुनाच्या सारथ्या. ६. चिखलांत. ७. शिवमित्रा. ८. पापसमुद्र.

भ्यालों जीव बहू घाबरला, फार पतितजन त्वां उद्धरिला, पावन घोष हृदीं संचरला, म्हणउनि दास पदीं अनुसरला, भक्तवत्सला! साच करीं ब्रिद विलंब न लवीं, ये तारिन म्हणवोनि पालवीं, कृपाघना! येउनी पल्लवी, षड्रिपु हे बाहेर घालवीं, दाह करित भवदीप मालवी, तव गुणगुण यश वाणि बोलवी, प्रेमयुक्त भजनास चालवी, हेंचि दान दे, मान वचन, संधान कठिण मी, सान बाळ, तूं जननि म्हणुनि तुजलागीं बाहें, देवनाथप्रभु ये लवलाहे, धांव भेट बा! कवळुनि बाहे, साह्य होइं मज मायबाप गणगोत आप्त निज इष्ट सोयरा, प्राणसखा हरि! तूंच एक तुजवीण नसे, ये बैस हृदयिं, तव रूप दाविं निजनयना. ॥ ये बा० ॥ ४

## कटिबंध ३ रा.

मन हें मुरालें, मन हें मुरालें, स्वरूपीं विरालें हो! गर्क झालों मी. ॥ ध्रुवपद. ॥

फुटला कल्पनेचा माठ, केला षड्वैऱ्यावर काट, लंघिले त्रिकुट हट गोल्हाट, पाहतां मोठा अवघड घाट, परंतु झाली पायवाट, सहस्रदळकमळीं अफाट, फांकली प्रभा ही लखलखाट, देखिली मूर्ति महानिऱ्हाट, सदा वाद्याचा घनघनाट, वाजति अनुहतध्वनी थाट, तयापरतेही स्वरुप घनदाट, सिणल्या श्रुति करिती बोभाट, अशा स्वरुपाची पडली गांट, जैसा लवण जळीचा पाट, मिळालें मन तैसें सरपाट, गुरूची सत्ताही अचाट, आतां काळानें नऱ्हे एक इयांट, जिवपण गेलें, जिवपण गेलें, स्वरूपीं विरालें हो! ॥ गर्क० ॥ १

झाला अहंपणाचा नाश, जाळिलि दुरित कल्पनाभास, गळाला मायामय आभास, गाळिले भेदअभेदास, आत्मा ब्रह्म स्वयं अविनाश, नाहीं नामचि अनामास, नाहीं रूप तया अरुपास, पाहतां आतुडले हस्तास, पाहतेपणास करुनि ग्रास, नैनांविण कैसे नैनास, प्रकाशातीत झाला प्रकाश, नाहीं निमित्त ज्या तेजास, पावले कोटी रवि लोपास, वर्णितां ठक पडले वेदास, ते हे उघड दिठी ऊदास, देवनाथाच्या निजहृदयास, गुरुनें अखंड केला वास, मनोरथ पुरले, मनोरथ पुरले, स्वरूपीं विरालें हो! ॥ गर्क० ॥ २

## कटिबंध ४ था.

मनमोहन नंदकन्हय्या । ब्रिजबासी अजबबिलासी. ॥ ध्रुवपद. ॥

कर धर मुरली अधर लगावे, अजब तऱ्हेकी बैन बजावे, सुन सुन गोवा दौरी

---

१.पातकी लोक. २.खरें. ३.काम, लोभ, मद, मत्सर इत्यादि सहा शत्रु.४.चोरी, चहाडी आणि शिंदळकी या तीन गुणांचा समुदाय. ५. पाप. ६. सांपडलें, प्राप्त झालें. ७.नयन, डोळे. ८.दृष्टीस

आवे, रंगरंगकी अजवतऱ्हेकी, गौवावाकी धुन मुरलीकी, नीकी सुनकी, नइ नइ बछिया, लइ लइ अछिया, चितरी कबरी, सुफेद प्यारी, शामरंग गुलजार हजारी, काली पीली लाल जर्द, वेहरि कपिला रंग करारी, सोरिदौरके, जमुनाके तट, राहाण करकर, नजर देख, ब्रिजपालबालको, उठाय सिरको, चरनछुई तब दौरकान चुचकार लई जो, तीन लोकके नाथ कहावे, दयाल कर गोअंग फिरावे, कर अंग संग, भवभंग मिटावे, सब घटमों भरपूर भरा हट, आप अकेला, नंद लाल गोपाल आपही, गोकुलपत अविनाशी. ॥ मनमोहन० ॥ १

पूरनब्रह्म परमात्मा सुभावे, ज्याको भेद बिधीहि न पावे, ज्याको सुरमुनि अखंड गावे, सो गवलनके पीछे दौरे, मिलाय सारे, गोपबाल जमुनाके तटनट, परगट होकर, देत हटे बलि मारेमारे, निजभक्तनके काज सुधारे, फनी कालया जलमो घेरे, नाथ फनीको वीख निकारे, मुये ग्वालसो जिवाय सारे, अघासूर धर पगसो चीरे, मारे सारे कंसासुरकी, नामी नामी अग बग केसी, तृणासूर असुरसंहारे, गोबछियनको अहंकारधर बिधी चुरावे, ग्वालबालये तमाम सारे, ऐसि ज्यानके आप बने सब, ग्वालबालये गऊबछिरिया, नइ नइ अछिया, तऱ्हातऱ्हाको, जैसा ज्याको रंग तैसो ऐनबैनको स्वरूप धरके, काठि कमरिया, हातमो सूदे, आप अपसमो कुंदे फांदे, देख बिधी अभिमान डारके, नीके मनसो सुभाव धरिके, चरणकमल सुकमलनाभ शरणागत आयो, सत्यलोकको बासी. ॥ मनमोहन० ॥ २

च्यारो भुजसू आयुध डारे, कटतटपीत पितांबर पेहरे, निजभक्तनको काज सुधारे, भगत काज, जदुराज लाजतज, पंडुराजसुत अर्जुनजीके रथके गाडीवान बिराजे, तुरंग ले पानीमे ज्यावे, पूछ पाछके धोय धाय, ज्योपजाप रथ खूब उडावे, परदलमो सैराट भिडावे, अतिरथी पग तुरंग उडावे, करबागदोर चुचकारत मूसो, बानी उच्चारत होरे होरे, पुंडरीकके भाव भगतसो, बिट पेयारे, नंद दुलारे, तीनलोकमो व्यापक सारे, तऱ्हातऱ्हाके खूब पसारे, अजब रंग श्रीरंग विराजे, भीमाके निर तीर दिगंबर, बजे टाल मिरदंग झलरिया, गावे निजजन, प्रेम मगन हो डुलेसदावो अजब नैनसो, देवनाथकी चरणकमलसू ऐनरूपसो, लगी लगन मस्तान हमेशा, आप रूपमो भयो मिरासी. ॥ मनमोहन० ॥ ३

१७

## कटिबंध ९ वा.

त्रिभुवनको पालनवाला । भज साहेब नाथ गोपाला ।। ध्रुवपद. ।।

जो है नामरूपसो न्यारा, अलख अगम अगोचर प्यारा, सो गुरु आप रूप बिस्तारा, गहरा खूब भरा दर्यावलहरा, ज्याकी बाकी सो हरहीरा, बसेजि देहदेहरे विचखनही, काला पीला हरा लाल कछु रंग तऱ्हाको, निजरंगसो, अभंगजू, प्रभु या जगमाहे, घटघट व्यापो लगट लगाये, गुरुपुत्र श्रीगुरुकृपासो बिकट घाटको, पलटकमलमो, उलट चले, जब निकट धीटमन, पलट रह्यो तद, अयन रूप, निजनयन प्रगट लखलखाट भयो उजियाला.।। त्रिभुवनको०।।१

नयनन हरमो छुटत फुकारे, चांदसुरजबिन झलकत तारे, कोट मदनवारुपपेवारे, छाय रह्यो हर अरूप रूप, अमुप जगतमो, सरगमिरत पातालभूआप, तेज अकास, समीर पंचतत्व सब आप आप बनेहै, चारो वानी, चारो खाना, चारो तन आकार अजब ये, निराकारको रूप बिराजे, तऱ्हातऱ्हाको रूपरंग बिस्तार, सारकर बिचार देखत, पार न पावे बिधि बेद अनंत अपार तीनलोकमो, व्यापकसोहर, विश्वंभर गुरुसाहेब आप अकेला.।। त्रिभुवनको०।।२

पाई गुरुकिरपाकी छाप, भाग्यो माया भरमकलाप, जित देखो तित आपहि आप, आप एक अनेक एक कछु कही न ज्यावे, अचल अमलघट, कमल कमलमो, व्याप रह्यो है, जलमो थलमो, जमालसाई, कमाल देखा, अलखखलकमो, भऱ्यो खूब भरपूर चलकसो, रसिकरूप अरूपरूपमो, भये दंग तद गुंग अनूहत, चंग बजत रह्यो नाद घुमाय, घुंघुंघुंघुं घुंम रछाई, जोग जुगुतकी रहनी पाई, आपअपसमो रंग लपट रहे, निसंग अटल श्रीगुरुनाथ गोबिंदबिंदसिर आप बिराजे, देवनाथके नैन बागमो छाय रह्यो गुल्लाला. ।। त्रिभुवनको० ।। ३

---

# पदसंग्रह.

## भक्तिपर पदें.

### पद १ लें.

वक्रतुंड गजकर्ण विनायक हिमनगजापुत्रा ! ।

चतुर्भुज फरशांकुशमाला वरदविश्वसूत्रा ! ।। ध्रुवपद. ।।

गणाध्यक्ष गणनाथ गजानन जय विश्वाभरणा ! ।
भालचंद्र लंबोदर देवा ! जय मूषकवहना ! ॥
चाल ॥ हे अग्रपूजका अग्रकार्यस्मरणा ! ।
हे अग्रजवरदा अग्रहारदमना ! ।
हे अग्रदेवसुत अग्रबुद्धिधरणा ! ॥
टीप ॥ सिंधुरांतका जृंभनदमना गिरिजोदरभरणा ! ।
धूम्रकेतुविद्यालयप्रभुजी धीप्रदस्वातंत्रा ! ॥ वक्रतुंड० ॥ १ ॥
दुडुदुडुदुडुदुडु येइं त्वरें बा ऋद्धिबुद्धिकांता ! ।
रंगमूर्ति करि दंग सभा हे त्रिविधक्षुद्रशांता ! ॥
चाल ॥ हे भक्तदयालो रिपुपंचकशमना ! ।
अवतार युगायुगीं धृतविग्रह नाना ।
दाविशी लिला बहु भयकृत भयहरणा ! ॥
टीप ॥ चार वेद अठराहि पुराणें नेती गुण आतां ।
चौदा विद्या चतुःषष्टि दे कला भक्ततंत्रा ॥ वक्रतुंड० ॥ २ ॥
ऐकुनि करुणा धांवत आला वरदरंगदाता ।
शुंडादंडीं मोदक विलसे सायुधरिपुहंता ॥
चाल ॥ हा पीत पितांबर अहिभूषण त्याला ।
कर्णांत कुंडलें किरिटा रवि भ्याला ।
नाचवी सूत्र हातिं धरूनि विश्वाला ॥
टीप ॥ देवनाथ तूं आद्य अंतकृत दासदुरितहरिता ।
दृश्यवासना भक्तरूप तूं आप्तगोतमित्रा ॥ वक्रतुंड० ॥ ३ ॥

## पद २ रें.

जगदंब अक्षरें चारी जपतां वांछीलें पुरवी ।
स्वकृपामृत जीवनीं वर्षे भवभय ती नुरवी. ॥ ध्रुवपद. ॥
जगत्रयव्यापक जे अणुरेणु गाति श्रुति पैज ।
जगडंबर अतिढिसाळ दुर्धर घडि मोडी सहज
जननी त्रैलोक्याची दावी निजासि निजगुज ।
जन्मजरामरणादिक वारित स्पर्शुनि पादरज. ॥ जगदंब० ॥ १ ॥

गति नेणति श्रुति, शेष वर्णितां जिव्हा द्वीभाग ।
सारिगमपधनि सरागे गाती सुरकिन्नर सांग ।
गजास्यतातागाश्रित तच्च (?) जाति अव्यंग ।
गर्जति जे उदोक्कारें निज त्या दे पद अभंग. ॥ जगदंब० ॥ २ ॥
दंभं दर्पाभिमानहरणं दमनासुरवृंदं ।
दंष्ट्रातीक्ष्णमट्टाहासं कंपितविश्वमिदंम्
द्वंद्वातीत नंदनुजविभेदु (?) अर्पितस्वात्मपदं ।
दंडन खलजनखंडन भवभयअक्षयअभेदं ॥ जगदंब० ॥ ३ ॥
बहु सप्रेमें भजतां गाळुनि आभास प्रतिबिंब ।
बळिया आत्मा अनुभवि प्रगटवि निजात्मनिजबिंब ।
बहु जग भासा नुरवी व्यापक दावी गुरु सांब ।
बहिरंतर्गत देवनाथ हा स्मरतो जगदंब ॥ जगदंब० ॥ ४ ॥

## पद ३ रें.

जय जय आदिभवानी अंबे मातापुरवासिनी वो! ।
चित्कळामालिनी निजजनपालय सुखदायिनी वो! ॥ ध्रुवपद. ॥
सिंहाद्रीपर्वतीं नांदसी निजसत्ते रेणुके वो! ।
पूर्णब्रह्मयोगिने योगीजनमानसमोहके वो! ॥
टीप ॥ भवभयसंहारके देवी मूळपीठनायकी वो! ॥ जय जय० ॥ १ ॥
महिषासुरमर्दिनी विश्वाधारे त्रिभुवनजननी वो! ।
पशुपति ब्रह्मा विष्णु अखंड तुजला ध्याती ध्यानीं वो! ॥
टीप ॥ सुरवरवरदायिनी नारद तुंबर गाती गाणीं वो! ॥ जय जय०॥ २ ॥
श्रीविष्णे वाराही भद्रकाळी श्रीभगवतीवो! ।
भक्तवत्सले सदये! महिमा नकळे वेदश्रुती वो! ॥
टीप ॥ शरणागततारके अंबे! अंतःकरण तुझी गती वो! ॥ जय जय० ॥३॥
शुंभनिशुंभांतके माते दुरितक्षयकारके वो! ।
जय दीनोद्धारके निजजनमानसकल्पलतिके वो! ॥
टीप ॥ देवनाथ निजरसने सेवी नामामृतकौतुके वो! ॥ जय जय० ॥ ४ ॥

## पद ४ थें.

अरे हो रामा! । कमलापतकामलनामा! ॥
करुणाघनमेघश्यामा । सुखधामा आत्मारामा ॥
जय शरयूतीरनिवासा । योगीजनमनविश्रामा. ॥ ध्रुवपद. ॥

त्रिभुवनपति परम उदारा । भरताग्रज दशरथकुमरा ॥
ताटिकांतक रघुनाथा ! । मखपालन अहिल्योद्धारा ॥
चाल ॥ जय कार्मुकधर रघुवीरा ! ।
षड्रिपुवर करि बा ! मारा ।
मज दीना दे पदिं थारा ॥
टीप ॥ जय गुणातीता गुणगहना । हे पावन पतितोद्धारा ॥ अरे० ॥ १ ॥
शरणागत वत्सल देवा । जगव्यापक हे जगदीशा ! ॥
अति सत्वर येइं सुखसदया । परमात्मा पूर्ण परेशा ! ॥
चाल ॥ हे भवगजमत्तविनाशा ! ।
हे मायातीत अविनाशा ! ।
सीतापति ! हरि भवक्लेशा ॥
टीप ॥ नामामृत रस सेविन मी । लागलि हे मम जिविं आशा ॥ अरे०॥ २ ॥
श्रुति वर्णिति गुणगण गातां । म्हणविशि तूं करुणासिंधु ॥
तरि कां बा ! माझी करुणा । तुज येइना दीनबंधु ! ॥
चाल ॥ किती कल्पनीक मन रोधूं ।
तव पदरज मजला वेधू ।
करि श्रवणा निज उद्बोधू ॥
टीप ॥ संसार दुस्तर तरवी । तोडी हा दुःखसंबंधू ॥ अरे० ॥ ३ ॥
जय जय श्रीगुरु गोविंदा । गोपाळा मायबापा ॥
सांगडिया सत्वर येइं बा ! । भवनदिमधिं बुडतो तापा ॥
चाल ॥ विश्रांति त्रिभुवनभूपा ।
दासासि तव पद खोपा ।
दाखवि निज नयनीं स्वरूपा ॥
टीप ॥ देवनाथ विनवी भावें । गुरुनाथा हरि भवतापा ॥ अरे० ॥ ४ ॥

## पद ५ वें.

मज कां उपेक्षिसी रामा ! । गुणग्रामा मंगळधामा ! ॥ ध्रुवपद. ॥
जाणुनियां मी अपराधी । घेतलें मज त्वां पदरीं ॥
अंगिकार केला आतां । लोटावें काय दूरी ? ॥
तुजवांचुनि कोण मातें । सांग बा ! भवनिधि तारी ॥
येई सीतारमणा । सोयऱ्या दशवदनारी ! ॥ मज० ॥ १ ॥

पावन हें श्रीद खरें बा ! । वेदश्रुति वदनीं गाती ॥
तारिलेसि पतित मागें । ऐकुनियां ऐसी कीर्ति ॥
याचक मी आलों द्वारीं । दे दान सीतापति ! ॥
भुवनत्रयपालक रामा । मुनिवृंदें तुजला ध्याती. ॥ मज० ॥ २ ॥
कौशिकमखसंरक्षणीं । वधिले खर त्रिशिरा दुषणा ॥
लागतांचि पदपांसू हे । उद्धरली गौतमललना ॥
सुकुमारा राजिवनयना । भक्तवत्सल भवभयहरणा ॥
कोदंडभंजना रामा । विश्वेशा सीताजीवना ! ॥ मज० ॥ ३ ॥
पूर्णत्वें सत्य त्रिवाचा । अपराधी होतों पहिले ॥
घेतलेंस जेव्हां पदरीं । तेव्हां कोणातें कळलें ॥
उपेक्षा करणें आतां । अनुचित हें प्रभुला वहिलें ॥
दिनबंधु दिनानाथा । पाहिजे अपंगीले. ॥ मज० ॥ ४ ॥
मदनारिमित्रा रामा । जगजेठी निजजनपाळा ॥
अपराध घालीं पोटीं । देवाजी दीनदयाळा ॥
येऊंदे करुणा हृदयीं । मजलागीं परम कृपाळा ॥
मज दीना नुपेक्षावें । दाखवी निजपदकमळा. ॥ मज० ॥ ५ ॥
घाबरला जिव हा भारी । सोसवेना दुःख हें आतां ॥
धांव घे सत्वर सखया । अयोध्यापति रघुनाथा ! ॥
बुडतों मी भवनदिमाजी । कर देउनि काढीं नाथा ॥
गणगोत सकळही माझे । तूंचि कीं मातापीता. ॥ मज० ॥ ६ ॥
श्रीगुरु गोविंदा रामा । जय जय जी कार्मुकपाणी ॥
पाऊल दाखवीं आतां । करुणारव ऐकें श्रवणीं ॥
करि क्षमा अपराधाची । निष्ठुरता न धरीं स्वमनीं ॥
देवनाथ विनवी भावें । ठाव दे अक्षय चरणीं ॥ मज० ॥ ७ ॥

## पद ६ वें.

श्रीरामा ! रावणारी । अघभयसंकट वारी ।
श्रीरघुनंदन अरिकंदन जय शरयूतीरविहारी ॥ ध्रुवपद. ॥
कामदुघा तूं निजजनवत्सा पाळिसि अतिसुखकारी ।
सत्स्वरुपामृत चाखविसी रस निवटुनि सर्वविकारी ॥ श्रीरामा० ॥१॥
जपत नाम त्या मृगजळवत जग भासत सर्वप्रकारीं ।

सतत वसति हृद्यांत जि ज्याच्या वदत श्रुति अविकारी ॥श्रीरामा०॥२॥
मुनिजनहंसा····हिंसा ध्यात तुतें त्रिपुरारी ।
शमन करुनि विषभूषण कंठीं शोभवि अंगविखारी ॥ श्रीरामा० ॥३॥
श्रीगुरु गोविंदा श्रीरामा ! शरणागतकी द्वारीं ।.
देवनाथ प्रभु उदार दात्या याचक मीच भिकारी ॥ श्रीरामा० ॥ ४॥

## पद ७ वें.

तूं जपरे जपरे जपरे श्रीरामनाममंत्र ।
गोष्पदवत भव मग सहजे तारक पूर्ण पवित्र. ॥ ध्रुवपद. ॥
पातकि हा दुर्धर मोठा तारिला नाम घेतां ।
वाल्याचा वाल्मिक केला गुरुतर हे प्रभुची सत्ता ।
शतकोटी रामायण हें वदवीला अद्भुत गाथा ।
शरयूतिरवासी ज्याचा ध्यास हा पार्वतिकांता ॥ तूं जपरे० ॥ १ ॥
उत्तानपाद ध्रुवबाळ स्मरतां दे अढळपदातें ।
क्षीरसिंधू दे उपमन्या निज सत्य हरि आपदा ते ।
बाहताति भगिनी भावें चिर पुरउनि दे अभयातें ।
साहाकारी निजदासाचा भक्तवत्सल हरी भयातें ॥ तूं जपरे० ॥ २ ॥
नारायणपुत्रमिषें तो पातकी द्विज उद्धरिला ।
पढवितां पुंसा बोले तारिली गणिका कुशिला ।
शीला हे पादरजें कीं सुंदरी केली दुशीला ।
पशुपति घे नाम वाचे गरदाह समुळ शमविला, ॥ तूं जपरे०॥ ३ ॥
गोविंद श्रीगुरुदाता स्मरतां दे निजपद हातीं ।
शुक वामदेव ऋषि नारद सनकादिक ज्याला बाहाती ।
जगदात्मा व्यापक ज्याच्या हृदिं असतां नयनीं पाहाती ।
देवनाथ तन्मय ध्यानीं समरस ह्या वृत्ति राहाती ॥ तूं जपरे० ॥ ४ ॥

## पद ८ वें.

वायुतनय महाराज दयानिधि ! वायुतनय महाराज ! ॥ ध्रुवपद. ॥
रजनीचरसंहारका निजजनसुखकरणा ।
पिंगलनयना परमउदारा मायामदहरणा. ॥ वायु० ॥ १ ॥
रुद्ररूपा भीमप्रतापा जय वानरवेषा ।
शरणागत मी दीन तुझा हरि वारी भवक्लेशा. ॥ वायु० ॥ २ ॥

वारी हे अघ दुर्घट देउनि कृपा अभयवरदा ।
पतित मी तूं पावन देवा ! राखावें बिरुदा ॥ वायु० ॥ ३ ॥
बुडतां या भवपुरीं उतारी येई कर्णधारा ।
त्रिभुवनिं मातें आणिक नाहीं तुजविण आधारा ॥ वायु० ॥ ४ ॥
अन्यायी अपराधी परि मी दास म्हणतों तुझा ।
तुजविण राखी कोण दयाळा ! साभिमान माझा ॥ वायु० ॥ ५ ॥
तूंचि सकळ गणगोत सोयरा आप्त बहिण भ्राता ।
येई त्वरें ब्रिद राखी आपुलें तूंचि मातापिता ॥ वायु० ॥ ६ ॥
करुणारव परिसुनि धांव लौकरि विनवणी हे मान ।
लव पल क्षण हा विलंब न लावी स्वामि सख्या हनुमान ! ॥ वायु० ॥ ७ ॥
हाक दिधली महाद्वारीं हे नयन मार्ग पाहती ।
देवनाथ हे काष्ठपूतळी सूत्र तुझ्या हातीं ॥ वायु० ॥ ८ ॥

### पद ९ वें.

जय जय बलभीमा हो बलभीमा ! । अद्भुत तव बलगरिमा. ॥ ध्रुवपद. ॥
जय जय मारुतिराया । निजजनसुखदायक प्रभुवर्या ॥ जय जय० ॥ १ ॥
रामदूत सुखसारा । पिंगलनयना परमउदारा ॥ जय जय० ॥ २ ॥
रजनीचरसंहारा । तारा भवभय सर्व निवारा ॥ जय जय० ॥ ३ ॥
सीताशोकविनाशा । मत्प्रियप्राणा वानरवेषा ॥ जय जय० ॥ ४ ॥
दुर्धर या भवजीवनीं । तारुं तूंचि मज द्रुमपाणी ॥ जय जय० ॥ ५ ॥
आणुनिया गिरिद्रोणा । दिधलें लक्ष्मणा जिवदाना ॥ जय जय० ॥ ६ ॥
षड्रिपुवरि करि मारा । अंजनितनया अतिसुकुमारा ॥ जय जय० ॥ ७ ॥
मम हृदयीं बैसोनि । दावी ब्रह्मरूप जग नयनी ॥ जय जय० ॥ ८ ॥
बुडतां या भवकर्दमीं । काढी ठेवी तव पदपद्मीं ॥ जय जय० ॥ ९ ॥
रुद्ररूपीया ताता । अनाथनाथा श्रीहनुमंता ॥ जय जय० ॥ १० ॥
देवनाथ प्रभु दाता । न लवी लव पल क्षण ये आतां ॥ जय जय० ॥ ११ ॥

### पद १० वें.

अंजनीतनय रामदूता । वानरेश्वरा सौख्यदाता हो ! ।
साह्य होई निज पायीं ठेवीं मज येई कृपावंता ! ॥ ध्रुवपद. ॥
अद्वयानंदा कपिवीरा । रुद्ररूपिया समरधीरा हो ।
चरणकमल अतिविमल दावि भ्रम शमल निर्विकारा ॥
भवाब्धी बहु दुस्तर सैरा । उठती कठिण तीव्र लहरा हो ।

नाहीं मिति न सोसति अंत किति पाहसि कर्णधारा ॥
ग्रासी दुर्जन मत्सर कुतरा । लोभमोहादि करिति मारा हो ।
रतिपति करि मति भृंग त्वरितगति ये दीनोद्धारा ॥
चाल ॥ षड्रिपुदमन भयशमन नमन तुज ये वानरवेशा ।
अतिशय कुपथि करि गमन गणित हे श्रम न परमपुरुषा ॥
हे विषयवमन सम स्वमन नमन करि भ्रमण त्वरित क्लेशा ॥
टीप ॥ भोगि निशिदिनी विषयगर्ता । वश्य अज्ञान दृश्य दुरिता हो ।
जितेंद्रिया आवरी मनोजय करि वारी चिंता ॥ अंजनी० ॥ १ ॥
पवनात्मजा प्रतापार्का । पतितपावना पुण्यश्लोका हो ।
पाव त्वरें घे धांव चरणिं दे ठाव मला रंका ॥
राघवप्रिय केसरितोका । अजि रजनीचर संहारका हो ॥
त्रिभुवन गुणसुंदरा उदारा अभयवरद दे का ॥
भवार्णवि तारक पैं जे कां । निजाप्रति देसि नामनौका हो ।
गुरुतीर परपार करित जानकीशोकहरका ॥
चाल ॥ हे दयानिधे सुखघना उदधिलंघना बलाध्यक्षा ।
लक्ष्मणप्राणरक्षणा पर्णभक्षणा पिंगलाक्षा ।
तूं परमसदय परि अदय काजि हो प्रगट हृदयदक्षा ॥
टीप ॥ अजी अव्यया अपरिमीता । अरूप अक्षया अनंता हो ।
तुजविण तरि मज कोण जाण या भवीं भयत्राता ॥ अंजनी० ॥ २ ॥
पर्वतोत्पाटनद्रुमपाणी । कलुषांतका मोक्षदानी हो ।
अद्भुत तव बल प्रबल देसि सुख अचल निजास्मरणी ॥
तप्त हाटक तनु तद्वर्णी । अघटित पुच्छाची करणी हो ।
अशोकवन त्राटिलें असुर आटिले लंकादहनीं ॥
तोषविलि ते सीता जननी । भुभुःकारें कंपित अवनी हो ।
भडभड रिचविति भगणें विमानें पळविति सुर गगनीं ॥
चाल ॥ बहु शैल हुडे बहु खचले बैसले ते दिग्गज टाळे ।
हे थरथरथर कांपती पडों पाहती तिनी ताळे ।
सरसा विमान फणितळीं सप्त हडबडलीं पाताळें ॥
टीप ॥ दशा हे उड्डाना करितां । शुद्धि घेउनियां हनुमंता हो ।
समुद्र नेले तिरा येसि भेटसि श्रीरघुनाथा ! ॥ अंजनी० ॥ ३ ॥

अजि दशवदनदर्पहरणा । दयाळा निजजनसुखकरणा हो ! ।
अहिमहिअसुरांतका हे भवतारका विघ्नहरणा ॥
विश्वव्यापका जगदुद्धरणा । कृपाळा तव अंतःकरणा हो ! ।
पतित दीनमति हीन तुझा तुजला यावी करुणा, ॥
विमलरूपा विश्वाभरणा । काय पाहसी मदाचरणा हो ! ।
क्षमा करी भवपुरीं तारि अघ हरी दावि चरणा ॥
चाल ॥ अजि सांग होय तरि अन्य साह्य मज कोण कठिण काळी ।
हा त्रिविध[१] ताप करि भग्न वपु[२] विरहाग्नि तुझा जाळी ।
घाबरा जीव तुजवीण दिसति ह्या शून्य दिशा सकळी ॥
टीप ॥ ग्रासि सुसरी हे मोहममता । बा धांव त्वरें आतां हो ! ।
देवनाथनुत विनितमात तूं तात गुरुनाथा ॥ अंजनी० ॥ ४ ॥

## पद ११ वें.

करि कपिराज सखा । मना तूं, करिं कपिराज सखा. ॥ ध्रुवपद. ॥
पदांबुजीं रमवुनियां मानस । त्यागीं अन्यसुखा. ॥ मना तूं० ॥ १ ॥
नामामृतरस सेवुनि सादर । अन्यरसा त्यजखा. ॥ मना तूं० ॥ २ ॥
क्षणिक हें नश्वर[३] इंद्रिय जड सुख । मानीं साम्य विखा. ॥ मना तूं० ॥ ३ ॥
देवनाथप्रभु चिंतुनि अंतरिं । आकळिं ज्ञानशिखा[४]. ॥ मना तूं० ॥ ४ ॥

## पद १२ वें.

तें रूप देखियलें नयनीं. ॥ ध्रुवपद. ॥
जें सुखसागर वानररूप उदार मनोहर वसत वानरसयनीं[५]. ॥ तें० ॥ १ ॥
जो कपिवीर महाधिर गंभिर जोडुनियां कर तत्पर राघवचरणीं. ॥ तें० ॥ २ ॥
विध्वंसुनि वन मारित नंदन दचकत आपण रावण अंतःकरणीं. ॥ तें० ॥ ३ ॥
देवनाथप्रभु दीनदयाघन अंजनिनंदन अद्भुत ज्याची करणी. ॥ तें० ॥ ४ ॥

## पद १३ वें.

भज मनुजा हनुमान् । कृपाळू, भज मनुजा हनुमान्. ॥ ध्रुवपद. ॥
भावें स्मरतां पदकमळातें । राबतसे घरिं ज्ञान. ॥ कृपाळू० ॥ १ ॥

---

१. ताप तीन प्रकारचे आहेत. त्यांचीं नांवें:—आधिदैविक, आध्यात्मिक आणि आधिभौतिक. आधिदैविक (देवतांच्या क्षोभापासून होणारा–जसा वीज पडणें), आध्यात्मिक (मनाच्या क्षोभापासून अथवा शरीराच्या रोगापासून होणारा–जसा खरुज, ताप), आधिभौतिक (पृथ्वी, आप्, तेज, वायु आणि आकाश या पंचमहाभूतांच्या क्षोभानें होणारा–जसा भूकंप, अतिवृष्टि, समुद्रमर्यादोल्लंघन). २. शरीर. ३. नाशवंत. ४. ज्ञानरूप ज्योति. ५. सयन=सैन्य.

पूजनीं अर्चनीं प्रेमें कीर्तनीं । सांडुनियां अभिमान. ॥ कृपाळू० ॥ २ ॥
निश्चय हा पदिं दृढतर झालिया । कांहीं नसे तुज वाण. ॥ कृपाळू० ॥ ३ ॥
सद्गुणि कीर्तनि तन्मयमानस । दे पद मग निर्वाण.[1] ॥ कृपाळू० ॥ ४ ॥
आत्मत्वें जग ब्रह्म चराचर । दे दिठि सहज समान. ॥ कृपाळू० ॥ ५ ॥
देवनाथप्रभु ईक्षणि सहजे । लाधत अनुभव खाण. ॥ कृपाळू० ॥ ६ ॥

**पद १४ वें.**

माझी तुला काळजी । सांवळ्या[2] ! येई तूं गोपाळजी ! ॥ ध्रुवपद. ॥
बहुत त्रासलों मी संसारीं । म्हणउनि तुझिये द्वारीं ॥
शरण आलों रे बा ! कंसारी । भवपुरिं मजला तारी ॥
माझें मन तुझिये पदिं राजीं. ॥ माझी० ॥ १ ॥
मी तव अपराधाचे खरि रासी । परि क्षमावंत तूं होसी ॥
बा रे क्षमा करी अन्यायासी । धरी मला हृदयासी ॥
ठेवी अखंडित पदसरोजीं[3] ॥ माझी० ॥ २ ॥
आहे अपराधी मी परि तूझा । अभिमान तुज माझा ॥
गर्जे पावन पाई ब्रिदवोजा । गडिया केशवराजा ॥
वेगीं येई, न लावी लव पळ जी ॥ माझी० ॥ ३ ॥
आतां आटोपी दुस्तर माया । विनवी पंढरीराया ॥
धांवे वेगीं करुणा ऐकुनियां । दिसोदिस हे काया ॥
झिजते, न्यावयास काळ टपला जी ॥ माझी० ॥ ४ ॥
नेणो भक्ति कांहीं ज्ञानकळा । अज्ञानाचा पुतळा ॥
परि मज भाग्य आलें जी हेंच फळा । दास तुझा गोपाळा ॥
जन्मुनियां जगीं म्हणविलों जी ॥ माझी० ॥ ५ ॥
धनांधाचे द्वारीं वहु आतां । वृत्ति उबगली[4] फिरतां ॥
धांवे ये तनु[5] हे व्याधिग्रस्ता । लवकरी करि बा ! चिंता ॥
स्मरसिल काय तनू हे काळजी ॥ माझी० ॥ ६ ॥
भीमातटवासा गुरुगोविंदा । देवनाथपदवरदा ॥
आतां किमपी न करी वायदा । सत्वर परमानंदा ॥
धांवे ये भेटे चव बाहे जी ॥ माझी० ॥ ७ ॥

---

१. अत्यंत सुखाचें स्थान. २. श्यामला. ३. सरोज=कमळ. ४. त्रासली, कंटाळली. ५. शरीर

## पद १५ वें.

तें ब्रह्म गोजिरें हो ! । खेळे यमुनातीरीं ।
ध्याताति योगि ध्यानीं । व्यापक जें चराचरीं ॥ ध्रुवपद. ॥
नानालीला खेळ करी । गोपगडी मिळऊनि ॥
वर्णितां गुणगणगाथा । शिणली शेषाची वाणी ॥ तें ब्रह्म० ॥ १ ॥
दधि पय नवनीत । भक्षितां हे चोरूनी ॥
बांधिती हृदयस्तंभीं । निजभावें गौळणी ॥ तें ब्रह्म० ॥ २ ॥
यशोमती माय ज्याची । पीता जयाचा नंद ॥
अवतार भक्तकार्या । पूर्ण सच्चिदानंद ॥ तें ब्रह्म० ॥ ३ ॥
धन्य भाग्य गौळीयांचें । ज्यांचे घरीं ब्रह्म नाचे ॥
वर्णितां वेदशास्त्रा । पडे गाढ मौन वाचे. ॥ तें ब्रह्म० ॥ ४ ॥
कांबळी खांदा काळी । हातीं काळीच काठी ॥
'हो रे ! हो रे' शब्द करी । धांवे वत्साचिया पाठीं ॥ तें ब्रह्म० ॥५॥
वज्रांकुशध्वजचिन्हें । शोभताति पादाब्जीं ॥
कोटीरवीतेज लोपे । ज्याच्या पदनखतेजीं ॥ तें ब्रह्म० ॥ ६ ॥
पीतांबर कास कासे । गळां शोभे वैजयंती ॥
चतुर्भुज शंखचक्र । गदा पद्म हे हातीं ॥ तें ब्रह्म० ॥ ७ ॥
विप्रपदचिन्ह धरी । जो कां आपुले हृदयीं ॥
त्रैलोक्यनाथ गोकुळीं । नांदे स्वयें शेषशायी. ॥ तें ब्रह्म० ॥ ८ ॥
मयूरमुगुट शिरीं । मकराकृति कुंडलें ॥
आकर्ण शोभताती । भव्य तेज फांकलें ॥ तें ब्रह्म० ॥ ९ ॥
सुंदर दीसताहे । सरळ नासिक शोभा ॥
कमलनयन देवराव । केवळ गगनाचा गाभा ॥ तें ब्रह्म० ॥ १० ॥
कुंदरदेन मंदहास्य । दिनानाथा गोपाळा ॥
अनंत ब्रह्मांडें ही । पोटीं सांठवीली कळा ॥ तें ब्रह्म० ॥ ११ ॥
देवनाथप्रभु ज्यासी । शिणल्या वर्णितां श्रुति ॥
तेथें मज पामराची । काय चालेल मती ॥ तें ब्रह्म० ॥ १२ ॥

---

१. चार वेद आणि सहा शास्त्रें. २. बांधी, कशी. ३. विष्णूच्या गळ्यांतील माळा. ४. श्रीवत्स नामक चिन्ह. हें भृगूच्या लत्ताप्रहाराचें चिन्ह होय अशी कथा आहे. ५. रदन=दांत.

### पद १६ वें.

गा रे श्रीरंगाला उमगा रे । ना तरी सिमगा रे ! गा रे० ॥ध्रुवपद.॥
नंद आनंद श्रीगोविंदा । सच्चित्सुखकंदा ॥
वादाप्रतिवादा त्यागुनि भेदा । निजधामीं नांदा ॥
टीप ॥ सदय धवल[1] अतिविमल स्वरुप हृत्कमळीं भोगा गा रे! ॥ गा रे०॥१॥
कामा हराया भंगुनि रामा । सीता अभिरामा ॥
नामा अनामा निजसुखधामा । भज भज विश्रामा ॥
टीप ॥ श्रमरहित श्रीरामा पतिगुणनिगमादी नेणाति गा गा रे! ॥ गा रे०॥२॥
नाना कल्पना हृदयीं नाना । स्थिर ठेउनि स्वमना ॥
मानावमाना समदृश्य उगाणा । भावें विभुगाना ॥
टीप ॥ देवनाथ वदे नाथ वदा मग नाश सहज भवरोगा गा रे! ॥ गा रे०॥३॥

### पद १७ वें.

गोविंदा रामा हो । गोपाळा रामा जी ! ॥ ध्रुवपद. ॥
जय भीमातीरवासा । भवभयहारका जी ॥
गोकुळगोपवेषा । रुक्मिणीनायका जी ॥
दिनबंधु दिनानाथा । भवतापहारका जी ॥
टीप ॥ पावना विश्वपाळा । चित्सौख्यदायका जी ॥ गोविंदा० ॥ १ ॥
अज्ञाननाशना रे । पंढरीराज देवा ॥
ये धांव त्वरें येई । येउंदे तुला कणवा[2] ॥
वर्णितां श्रुति शिणल्या । पामरा काय कैंवा[3] ॥
टीप ॥ दीन मी शरण आलों । राखी लाज वासुदेवा ॥ गोविंदा० ॥ २ ॥
चालतां मोहपंकीं । अतिशय रुतलों बा ॥
तुजवीण कोण काढी । भवजाळीं गुंतलों बा ॥
सोसेना दुःख भारी । फार मी कष्टलों बा ॥
टीप ॥ तळमळी जीव म्हणुनी । अजी शरण पातलों बा ॥ गोविंदा० ॥ ३ ॥
बहु आळवितां येइना । करुणा काय रे बा ॥
किति अंत पाहतोसी । दाखवी पाय रे बा ॥
लावितां उशिर आतां । प्राण हा जाय रे बा ॥
टीप ॥ तुजवीण कोण माझी । बाप आणि माय रे बा ॥ गोविंदा० ॥ ४ ॥

---

१. निर्मल, शुभ्र. २. दया. ३. पाड.

द्विज अजामीळ गणिका । पातकी तारिले बा ॥
स्मरतांचि नाम वाणी । पशुगजा रक्षिले बा ॥
अंबरीष राजियाचे । गर्भवास सोसिले बा ॥
टीप ॥ ऐकुनी कीर्ति ऐसी । पदिं चित्त वेधलें बा ॥ गोविंदा० ॥ ५ ॥
द्रौपदी आळवीतां । तूं करिसी धांवणें बा ॥
भोजनीं तृप्त केले । ते ऋषी पाहुणे बा ॥
संकट वारियेलें । भगिनीचें ते क्षणीं बा ॥
टीप ॥ तुज पतितपावनारे । किती करुणा भाकणें बा ॥ गोविंदा० ॥ ६ ॥
अतिविंनत देवनाथें । विनविले पाय रे बा ॥
खगवहन फणीवहना । बैसूनि येईं रे बा ॥
कवळूनि चहूंभूजीं । मज क्षेमें देईं रे बा ॥
टीप ॥ तूं माय तानुले मी । वोसंगा घेईं रे बा ॥ गोविंदा० ॥ ७ ॥

## पद १८ वें.

नंदाच्या नंदना । नवनीरदतनु कोमलगात्रा दानवकुलकंदना ॥ ध्रुवपद. ॥
नदिपतिजाप्रियतमा । नंदिवहन हर त्रिपुरगौर मन प्रियकर पुरुषोत्तमा ॥
मायाशार्वरितमा । हरिसि धरिसि करि भरिसि स्वसुख अतिनिज तूं तात मा ॥
चाल ॥ गुणातिता षड्गुणा ।
श्रुति वर्णिति त्वद्गुणा ।
नाकळसी गुणगणा ॥
टीप ॥ भ्रमुनि श्रमुनि मग वरिती मौन्या करिती पदवंदना ॥ नंदाच्या० ॥१॥

---

१. हा एका विद्वान् अग्निहोत्री ब्राह्मणाचा मुलगा होता. तो एकदां वनांत दर्भ आणण्याकरितां गेला होता. तेथें तो एका सुस्वरूप शूद्रस्त्रीस भुलून भ्रष्ट झाला. याला दहा मुलें झालीं. त्यांत कनिष्ठ नारायण नामक मुलगा याचा परम आवडता होता. मरणसमयीं पुत्राच्या मिषानें 'नारायण' असें ईश्वराचें नाम याच्या मुखीं आलें, तेव्हां विष्णुदूतांनीं यास वैकुंठास नेऊन याचा उद्धार केला, अशी कथा आहे. २. गणिका=वेश्या (पिंगळा). पिंगळेला स्वकर्माचा पश्चात्ताप झाला तेव्हां ती विरक्त झाली. ती परमेश्वर हाच उत्तम परपुरुष असें समजून त्याला शरण गेली, तेव्हां तिला उत्तम गति प्राप्त झाली, अशी कथा आहे. ३. इंद्रद्युम्न नामक राजा शापानें गज झाला, त्याला विष्णूनें शापमुक्त केलें, अशी कथा आहे, ४. आलिंगन. ५. तान्हें मूल. ६. रात्रीच्या काळोखाला. ७. समग्र ऐश्वर्य, समग्र धर्म, समग्र यश, समग्र श्री, समग्र ज्ञान, आणि समग्र वैराग्य या सहा गुणांनीं परिपूर्ण.

जय जय जी जगदीशा । मुनिजनमनविश्रामधाम[1] हरि निगम[2] वर्णिती यशा ॥
ऐकुनि वृत्तिपिशा । स्वमन मीनवत तळपत लक्षुनि प्रभुपदरजआमिषा ॥
चाल ॥ हे प्रभु त्रिभुवनआलया ।
वसे पद्मा पदआलया ।
नुपेक्षी शरणालया ॥
टीप ॥ यदुकुलमणि फणिशयना गहना कालियअहिमर्दना ॥ नंदाच्या० ॥२॥
मंदरधर माधवा । मंदहसितमुख कुंदरदन मुनिवृंद[3]सौख्यसिंधवा ॥
हे प्रभो दीनबांधवा । छंद तुझा निर्द्वंद्वद्वंद्व हरि पद दाविसि केधवां ॥
चाल ॥ मम मनोवृत्ति तुजवरी ।
जाहली तुझी नोवरी ।
निशिदिनिं हे मानस वरी ॥
टीप ॥ युगसम लव पद क्षण तुजविण हा विबुध बंधछेदना. ॥ नंदाच्या० ॥३॥
गोविंदा गुरुवरा । विमलकमलदललोचन कोमल पद दावा मावरा ॥
मम करुणा श्रवणीं वरा । दुस्तरतर[4] अतिदुर्धर भव कर[5] देउनि मज सांवरा ॥
चाल ॥ जय जय पतितोद्धरा ।
मज पतितातें उद्धरा ।
ब्रिद साच करा श्रीधरा ॥
टीप ॥ देवनाथ नत प्रार्थित करुणानाथ मुरलिवादना ॥ नंदाच्या० ॥ ४ ॥

## पद १९ वें.

नंदनंदना विश्वसूत्रा । सख्या पशुपतिप्राणमित्रा हो ! ॥
रमारमण अघ[6]शमन नमन तुज ये राजिव[7]नेत्रा ! ॥ ध्रुवपद. ॥
मंदरोद्धरा मदनताता । मधुसूदना रमाकांता हो ! ॥
मजवरि करि हरि दया प्राणसखया श्रीअनंता ॥
माधवा ये मायारहिता । मणि यदुवंश श्रीमंता हो ! ॥
मुनिजनमनहारका दीनतारका कृपावंता ॥
चाल ॥ हे विबुधबंधछेदका विश्वपोषका मूळकंदा ॥
हे परात्परा सुखकरा आदि ईश्वरा चिदानंदा[8] ॥
हे गुणातिता षड्गुणा भक्तभूषणा परमसुखदा ॥

---

१. विश्रांतीचें घर. २. वेद. ३. समुदाय. ४. तरून जाण्यास अधिक कठीण. ५. कर देणें= हात देणें, आश्रय देणें. ६. पाप. ७. कमळ. ८. ज्ञानानंदा.

टीप ॥ प्रभो हे सच्चित्सुखपात्रा । निगमनिजबीजमूळमंत्रा हो ॥
अधोक्षजा श्रीअजा [1]कमलजाप्रिय [2]कमनीयगात्रा ॥ नंदनंदना० ॥ १ ॥
शीणल्या श्रुति वर्णिति महिमा । नेणवे अद्भुत तव [3]गरिमा हो ! ॥
मां पाळय अच्युता ममांतरगत आत्मारामा ॥
शरण मी तुला पूर्णकामा । मान विनवणि हे गुणग्रामा हो ! ॥
भवाब्धिची अतिलहर कहर करि ये मंगलधामा ॥
चाल ॥ [4]षड्रिपू गांजिती दुष्ट वाटती कष्टांतःकरणी ॥
हे मनोवृत्ति या न्याइ व्याघ्रसमुदायीं जशी हरणी ॥
श्रीहरी बहुत घाबरी किति परोपरी विनवुं चरणीं ॥
टीप ॥ दीनवत्सला पुण्यक्षेत्रा । पूर्णब्रह्मा हरि स्वातंत्रा हो ! ॥
आजि आद्य तूं वैद्य देइ भवरोगदहनमात्रा ॥ नंदनंदना० ॥ २ ॥
बुडत भवपुरीं होत आपदा । [5]कर्णधारा परमानंदा हो ! ॥
विरहबाण हरि प्राण मान विनवणी श्रीगोविंदा ॥
तारिल्या वृजवासी प्रमदा । व्यभिचारिणि गणिका मंदा हो ॥
नगोद्धरा उद्धरिली रक्षिली त्वां० पावनबिरुदा ॥
चाल ॥ जो स्वसुत मिषें पाहता तुला बाहता परमपुरुषा ॥
तव नाम [6]अनळ अतिप्रबळ सकळ तृणवत जाळित [7]कलुषा ॥
सोडविलें विप्रा तया तुवां तोडुनियां यमपाशा ॥
टीप ॥ शीण वर्णितां शेषवक्त्रा । उदारा त्रिगुणागुणयंत्रा हो ! ॥
अढळ पदासन दिलें भलें [8]उत्तानचरणपुत्रा ॥ नंदनंदना० ॥ ३ ॥
अजी सायोज्य सौख्यसदना । मदनमोहना कुं[9]दरदना हो ! ॥
द्रौपदीलाजरक्षका यदुनायका कंसकंदना ॥
नखें सांडवी कोटि मदना । प्रार्थितें तुला कमलवदना हो ! ॥
पुरउनि वसन रक्षिली लाज [10]भगिनीची केशिसुदना ॥
चाल ॥ दुर्वास छळणिं ये वनीं सत्वहरणार्थ मनीं तृष्णा ॥
मागती मध्यरात्रिसी अन्न संकटीं पडे [11]कृष्णा ॥
ते समयीं आठवी सती म्हणे, 'श्रीपति धांव कृष्णा !' ॥
टीप ॥ येसि घालिसी अन्नसत्रा । जीवनीं निर्मुनियां पात्रा हो ! ॥

---

१. लक्ष्मीवल्लभा. २. सुंदरदेहा. ३. मोठेपणा. ४. षड्रिपु—सहा रिपु. (काम, क्रोध, मद, लोभ, मोह आणि मत्सर.) ५. नाविक—कर्णधार. ६. अग्नि. ७. पापाला. ८. ध्रुवा. ९. रदन=दांत. १०. द्रौपदीची. ११. द्रौपदी.

तृप्तचि अघमर्षणें तृप्त करिसी तूं सर्वत्रा ॥ नंदनंदना० ॥ ४ ॥
कृपाळा हरि त्रिभुवनधन्या । विश्वपोषका वेदमान्या हो ! ॥
दयाघना दिनबंधु दिला क्षिरसिंधू उपमन्या ॥
विलया ने दुष्कृतसैन्या । देई बा ! निजसुखसौजन्या हो ! ॥
अकळ तुझी हरि कळा यशोदाबाळा ये चिमण्या ॥
चाल ॥ किति तरी दुःख सोसणें सांग निज मनें पांडुरंगा ! ॥
धरवेना धीर मज मनीं बैस येवोनि अंतरंगा ॥
दे प्रेम भजनरस असा वास हृदयीं करी श्रीरंगा ॥
टीप ॥ नाशि दुःसंगा अपवित्रा । स्वात्मगति देई भक्तितंत्रा हो ! ॥
देवनाथप्रभुनाथ तात मात तूं पुत्रपौत्रा ॥ नंदनंदना० ॥ ५ ॥

## पद २० वें.

प्रियकरा, भुवनसुंदरा, रुक्मिणीवरा, आजि गोपाळा ।
किति तरी पाहसी अंत येइ कनुवाळा ! ॥ ध्रुवपद. ॥
सुखकरा, मदनमनोहरा, नंदकुमरा, हरि मधुसूदना ।
सांवळ्या सुहास्यवदना ॥
श्रीधरा, पूर्ण भास्करा, अजी ईश्वरा, कशि नये करुणा ।
जगदीशा जगत्रजिवना ॥
चाल ॥ यदुपति चिद्घनानंदा ।
व्रजपति श्रीपरमानंदा ।
यशोमतीसुता गोविंदा ॥
टीप ॥ करि त्वरा, अरे मुरहरा, समय नाहिं बरा, उठा घननीळा ।
कशि कठिण आलि ही वेळा. ॥ प्रियकरा० ॥ १ ॥
जगदिशा, त्रिभुवनईशा, वोस दाहि दिशा, तूजवांचोनी ।
जाळितो तुझा विरहाग्नि ॥
श्रीपति, खंति वाटती, होय कशि गती, नेणवे स्वमनीं ।
घाबरा जीव दिनरजनीं ।
चाल ॥ लोचनीं अश्रुच्या धारा ।
चालुनी येति अपारा ।
या जनीं न दीसे थारा ॥

---

१. पापरूप सैन्याला. २. अंतःकरणाला. ३. पौत्र=पुत्राचा पुत्र. ४. सूर्य. ५. शून्य.

टीप ॥ भवहरा, करुनि ये त्वरा, अजी मावरा[1], विभो जगपाळा! ।
निशिदिनीं ध्यास हृत्कमळा. ॥ प्रियकरा० ॥ २ ॥
वामना!, चुकवि भ्रमणा, ठेवि या मना, सख्या तव पायीं ।
तुजविना कोणि मज नाहीं ॥
सुखघना, कंजलोचना[2], अजी तुजविना, असें मी कांहीं ।
ठेविना जीव या देहीं ॥
चाल ॥ जातसे प्राण विरहानें ।
होतसे विकळ या स्वमनें ।
गातसे तुझें गुणगाणें ॥
टीप ॥ नरहरी, नाम महिवरी, दीन उद्धरी, अरे कृपाळा ।
पावना परम स्नेहाळा. ॥ प्रियकरा० ॥ ३ ॥
विधिहरा, तुझ्या अंतरा, ध्यास श्रीकरा, निर्गम तुज गाती ।
वर्णितां भागल्या श्रुति[3] ॥
मनोहरा, जी विश्वंभरा, शीण फणिवरा[4], वर्णितां कीर्ति ।
मदनारिप्रिया सुखमूर्ति ॥
चाल ॥ गुणसिमा नाहिं सुखधामा[5] ।
प्रियतमा विलसे पद पद्मा[6] ।
रजतमा वारि गुणग्रामा[7] ॥
टीप ॥ किति तरी, विनउं परोपरी, दया अंतरीं, कशी नये अचळा ।
व्यापका गुणा वेल्हाळा ॥ प्रियकरा० ॥ ४ ॥
श्रीहरि, बहुत अंतरीं, जालि घाबरी, मनोवृत्ति राधा ।
वाहते येइं गोविंदा! ॥
तुजवरी, अनन्य मी वरी, तुझी नोवरी, श्रीपरमानंदा ।
हरिं वेगीं भवभयबाधा ॥
चाल ॥ गोपती गोपिकारमणा ।
मम मती प्रार्थि तुज करुणा ।
चूकती सकळ भवभ्रमणा[8] ॥
टीप ॥ असें करीं, धरुनियां हरी, तारि भवपुरीं, चिद्घना अबळा ।
ये देहिं दावि सुखसोहळा. ॥ प्रियकरा० ॥ ५ ॥

---

१. लक्ष्मीपते. (मा=लक्ष्मी, वर=पति.) २. कंज=कमळें. ३. वेद. ४. शेष. ५. धाम=गृह. ६. लक्ष्मी. ७. ग्राम=समुदाय. ८. संसाराचा फेरा.

निर्गुणा, आदिकारणा, विश्वतारणा, विभो! अपारा ।
स्वामीया निर्वीकारा ॥
मुनिजना, ध्याय निजमना, पूर्णकामना, सगुणसाकारा ।
दिनबंधो दीनोद्धारा ॥
चाल ॥ श्रीगुरूनाथगोविंदा ।
दे वरू हरुनि भवआपदा ।
तूं तरू स्वरुप सुखफलदा ॥
देवनाथ, भावें गुण गात, तात आणि मात, तूंचि मज सकळा ।
येउंदे दया कनुवाळा. ॥ प्रियकरा० ॥ ६ ॥

**पद २१ वें.**

विमलकमलदललोचन कृष्णा! निजजनसुखकरणा! ।
करुणाब्धे! तुज यावी करुणा, भवभयसंहरणा! ॥ ध्रुवपद. ॥
मंदरधर हरि कुंदरदद्युत माधव श्रमशमना! ।
मदनमनोहर मुकुंद मापति माया मद्रमणा! ॥
मधुमुरमर्दन श्रीमनमोहन मम मतिगजगमना ।
मंदभानुपरि शरणागत मी तुला रमारमणा ॥
चाल ॥ हे गोकुलेश हरि गोपति गोविंदा ।
हे गरुडध्वज गतिदायक स्वानंदा ।
हे गदाधरा गजतारक प्रभु सुखदा ॥
टीप ॥ पयनिधिवासा, परमपरेशा, विधिहर तव चरणा ।
स्मरती भूधरशयना! तो तूं येइं दिनोद्धरणा. ॥ विमल० ॥ १ ॥
सनक सनंदन व्यासशुकादिक नारद हृदिं ध्याती ।
परम पुरुष तूं आत्मारामा निगम तुला गाती ॥
मंदरधर माधवा ऐक केशवा सख्या विनती ।
चरणकमल मृदु विमल दाविं, मम नयन मार्ग पाहती ॥
चाल ॥ हे दीननाथ दिनबंधु श्रीरंगा ।
हे मुरमर्दन! मुनिहृदयकमलभृंगा! ।
हे भक्तवत्सला भवभयश्रीरंगा ॥
टीप ॥ गोगोपीजन पालय कालयमर्दन सुखसदना ।
कर्ममोचका येइं त्वरें मज तारि कंसकदना ॥ विमल० ॥ २ ॥

---

१. इच्छा. २. लोचन=नेत्र. ३. रद=दांत. ४. मोक्षदायक. ५. पृष्ठ २९ टीप ३ पहा.

प्रल्हादास्तव चिरुनि स्तंभि मारिलें दुष्ट छळका ।
निजजनतारका सत्य दाविलें ब्रिद यदुकुळटिळका ॥
परम सदय अति हृदय असुनि मजविशींच निर्दय कां? ।
पतित॰थोर उत्कृष्ट म्हणुनि संकष्ट म्हणसि हरि! कां? ॥
चाल ॥ द्विज अजामिळादी गेणिका उद्धरिली ।
मम पातक याहुनि वर्जनिं अधिक भरली ।
यास्तव उपेक्षा माजि हृदयिं धरिली ॥
टीप ॥ तव नामानळें न जळति पापें आलि नाहिं करुणा ।
तारि तारि भवपुरीं मला श्रीहरि! ऐकें करुणा ॥ विमल॰ ॥ ३ ॥
सच्चित्सुख आनंद गुरु गोविंद विश्वरूपा ।
अविट अमल अक्षया दयाळा ये त्रिभुवनभूपा ॥
बुडतां भवपुरिं देउनि स्वकरें तारी भवतापा ।
पतितपावना राखिं ब्रिदा चिद्धना मायबापा ॥
चाल ॥ हे देवनाथ प्रभु वरद पांडुरंगा ।
ये त्वरें साहाय चूकवी काळ ढंगा ।
वांछिले पूर्वि देऊनि अंतरंगा ॥
टीप ॥ स्वात्मस्वरूपीं रमविसि निशिदिनीं कृपारवी कीर्णा ।
खंडरहित अखंड समाधी सुख लाधे स्वमना. ॥ विमल॰ ॥ ४ ॥

## पद २२ वें.

मधुसूदना कमलनयनसुखसदना ।
हे दिनानाथ दिनबंधु दावि निजवदना. ॥ ध्रुवपद. ॥
जगजिवना जन्ममरणभयहरणा ।
विश्वेशा त्रिभुवनपती पतितपावना ॥
तुज करुणा यावी दीनोद्धरणा ।
हे मनोहरा श्रीधरा आदिकारणा ॥
चाल ॥ श्रीगोकुलपति गोविंदा गोपीवरा ।
हा जीव फिरत भवचक्रिं जसा भोंवरा ।
भ्रांतिस्थ विस्मृतिबळें होत बावरा ।
भवपुरीं बुडत कर देउनियां सांवरा ॥

---

१. पृष्ठ २९ टीप १ पहा. २. पिंगळा. (पृष्ठ २९ टीप २ पहा.) ३. नामाग्नीनें.

टीप ॥ जनार्दना जगपालय हरि कृष्णा ।
तनुदीप्ति स्वतेजें तुझि आणि उनिमर्दना ॥ मधु० ॥ १ ॥
सुकुमारा मुनिमानसमंदारा[१] ।
अविलंबें यावें प्राण बहुत घाबरा ॥
रति उशीर किमपी न करि उदारा ।
तुजवांचुनि तरि मज कोण सखा सोयरा ॥
चाल ॥ तूं धांउनि ये करी धरी हरी सोडवीं ।
तूं जननी, मी तानुलें, मला लाडवी[२] ।
दे अभयवरद कर शिरीं, भ्रांति ऊडवी ।
मन स्वरुपीं समरस समाधिसुख वाढवी ॥
टीप ॥ गुणगहना, गुरुतर सौख्यनिधाना ।
जगतारक गोपीपति गोपपालना ॥ मधु० ॥ २ ॥
श्रमशमना, सुरवर करिती नमना ।
अजअजिता श्रीअच्युता ठेविं पदिं मना ॥
अहिदमना[३] सच्चिदानंद मारमणा[५] ।
ये त्वरा करुनि तूं पूर्ण करी कामना ॥
चाल ॥ त्वां तारियले गणिकादि[४] अजामिळ द्विजा ।
मर्दोनि नक्र सोडविले त्या पशु गजा ।
राखिली लाज भगिनीची[६] अधोक्षजा ! ।
फोडोनि स्तंभ रक्षियलें दैत्यात्मजा[७] ॥
टीप ॥ खगवहना अज्ञानतिमिरतृणदहना ।
घे धांव त्वरें, तव विरह मला साहवेना ॥ मधु० ॥ ३ ॥
कां वेळ असा लाविला क्षिराब्धिवासा ।
जसि मोकलुनियां जाय हरिणी पाडसा ॥
हा न्याय तसा त्वां केला विश्वविलासा ।
गति काय मतीच्या पायिं सकळ भरंवसा ॥
चाल ॥ स्तनपान न दे जसि रोषें जननि तानया[८] ।
त्वां हरि तेचि परि केलि मला कान्हया ।

---

१. मंदार=कल्पवृक्ष. २. माझे लाड कर. ३. कालियमर्दना. ४. वेश्या. (पिंगला.) ५. पृष्ठ २५ टीप ३ पहा. ६. द्रौपदीची. ७. प्रल्हादा. ८. तान्ह्या मुलाला.

किति अंत पाहणें? मन व्याकुळ कानया ।
तव भजन पूजन अर्चन द्या मज दान या ॥
टीप ॥ हे प्रभुचरणा अजि आठवोनि हृद्भुवना ।
हो देवनाथ अतिविनित करी प्रार्थना ॥ मधु० ॥ ४ ॥

## पद २३ वें.

दीनबंधु भवताप निवारीं ये मेघश्यामा ।
मायबाप श्रीहरी दयानिधि गोविंदा रामा ॥ ध्रुवपद. ॥
कामव्यांळ[1] अतिविशाळ डंखित तमाळनिळ सखया ।
अहिगरळ[2] शमवी गरुडध्वज ये ! बा ये यादवराया ॥
विमलकमलदलनयन सुकोमलचरणयुगुल सदया ।
हरिसि सकळ भ्रमपडळ दावि तै प्रबळ भाग्य उदया ॥
टीप ॥ दशडफळ करि विफळ सकळ मग जन्म पूर्णकामा । मायबाप० ॥ १ ॥
आळ करित पदिं भाळ पाळ लडिवाळ काळहरणा ।
अति जाळ जनित भवजाळ भाळलोचन प्रियसुखकरणा ॥
टाळ विघ्न दुष्काळ बाळगोपाळ दिनोद्धरणा ।
जरि वेळ उशिर अनुमाळ, ताळ जाइल विश्वाभरणा ॥
टीप ॥ भ्रम माळ गळा त्रिकाळ दिसत बंबाळ सार्वभौमा । मायबाप० ॥ २ ॥
तार तार भवपार करी निर्धार तुझे पायीं ।
सुकुमार पदीं दे थांर[3], मला आधार दुजा नाहीं ॥
मारमदन दुर्वार छळित मज फार दुःखदायी ।
वारसहित परिवार गरुड हो स्वार त्वरें येई ॥
टीप ॥ सार दुष्कृतासार दान दे सार भजन प्रेमा । मायबाप० ॥ ३ ॥
कदन करुनि अरिवदन दावि सोयऱ्या दिनानाथा ।
कंसनिकंदन मुरलीवादन विभो मदनताता ॥
कालयमर्दन देव जनार्दन सख्या रमाकांता ।
देवनाथ प्रभुनाथ चुकवि बा ! जन्ममरणचेंळथा[4] ॥
टीप ॥ कुंदरदन सुखसदन बाप मधुसुदन सौख्यधामा । मायबाप० ॥ ४ ॥

## पद २४ वें.

ये कंसारी !, मी दीन पतित तव द्वारीं ।
ठाकलों उभा भवपुरीं तारिं मज हरी ! ॥ ध्रुवपद. ॥

---

१. सर्प. २. गरळ=विष. ३. आश्रय. ४. चक्र, फेरा.

हे महाहटी, करिति तपें बहु मोठीं ।
मुनि शिणले ब्रह्मारणीं हरी तुजसाठीं ॥
तूं जगजेठी, न पडसि त्यांचे दृष्टी ।
त्या भक्तिस्तव तूं उभा ठेउनि कर कटीं ॥
चाल ॥ हे दीनबंधु सोयऱ्या दयाळा हरी ।
तुज करुणा येउंदे कांहिं तरी अंतरीं ।
सांवळ्या विठू वा! वळ्या येउनि धरि करीं ॥
टीप ॥ हे पुतनारि, यमुनातीरविहारी ।
मी दीन करितों प्रार्थना येइं लौकरी ॥ ये कंसारी० ॥ १ ॥
हे तव ख्याती, वर्णितां श्रुति बहु श्रमती ।
शुकसनकादिक मुनि नारद तुज चिंतिती ॥
हे यदूपती, वा! दिनानाथ सुखमूर्ति ।
किति अंत पाहसी सांग सख्या यदुपती ॥
चाल ॥ हे गोवर्धनधर हरि मुरलीवादना ।
हे मायातित मूकुंदा मुरमर्दना ।
हे देवदयानिधि विभो नंदनंदना ॥
टीप ॥ बहुतापरी, प्रार्थितों तुज अंतरीं ।
सोकला कंठ आळवितां शिणलि वैखरी ॥ ये कंसारी० ॥ २ ॥
हे महाराजा, पावन पंढरिराजा ।
द्विज अजामिळा तारिले तापसी द्विजा ॥
हे निर्लज्जा, पापिणि कणिकात्मजा ।
पढविता शुका तारिले अधोक्षजा ॥
चाल ॥ हे विमलस्वरूपा हरी विश्वव्यापका ।
हे अमलकमलदलनयन कर्ममोचका ।
हे अधोक्षजा तूं येई असुरांतका ॥
टीप ॥ हे सर्पारी, वहनासहित हरी ॥
मी दीन तुला प्रार्थितों येइं लौकरी ॥ ये कंसारी० ॥ ३ ॥
हे गोविंदा, गुरुवर ब्रह्मानंदा ।
हे जगदुद्धारा प्रभो वारि आपदा ॥

---

१. अत्यंत बलवान्. २. वेद. ३. वाणी.

हे अतिसुखदा, मी अनाथ मज द्या वरदा ।
मी अखंड प्रार्थितों पदिं हा भजनी धंदा ॥
चाल ॥ हे देवनाथप्रभु दात्या कमलावरा ।
हे मदनारी मजप्रियकर करुणाकरा ।
हे परात्परा सोयरिया विश्वंभरा ॥
टीप ॥ घेई पदरीं, किमपि उपेक्षा न करीं ।
दे प्रेमभजन रस करीं वास अंतरीं ॥ ये कंसारी० ॥ ४ ॥

## पद २५ वें.

प्रभु रे आत्मारामा । सखया सावळिया गुणग्रामा ! ॥ ध्रुवपद. ॥
सुरवरवरद परात्पर सुखकर मुनिजनमनविश्रामा ।
स्थिरचरव्यापक नित्य निरंतर दे तव भजनप्रेमा ॥ प्रभु रे० ॥ १ ॥
मुकुंद मदसंहर मधुसूदन मापति[1] पूर्णकामा ।
मदनारिप्रिय मानसमोहन मायातीत अनामा ॥ प्रभु रे० ॥ २ ॥
मनुजतनुधर मद्गतिदायक चालवि नित्य नेमा ।
देवनाथप्रभु नाथ निरंजन गुरु गोविंदा रामा ॥ प्रभु रे० ॥ ३ ॥

## पद २६ वें.

काय करिसी गति रे । दयाळा ! ॥ ध्रुवपद. ॥
कोण मी कैसा कैशा रीतिनें । आणियली स्वस्थिति रे ॥ दयाळा० ॥ १ ॥
जें जें होईल तें तें दिसतें । झाली मंदमति रे ॥ दयाळा० ॥ २ ॥
देवनाथप्रभु श्रीगोविंदा । फसली मनोवृत्ति रे ॥ दयाळा० ॥ ३ ॥

## पद २७ वें.

चाल चाल चाल चाल त्वरा करुनि ये नंदाचे बाळी ।
आशक तुजवर आम्ही तुझें रूप पाहूं नेत्रकमळीं. ॥ ध्रुवपद. ॥
निगम[2] वचन गुण रूप तुझें वर्णितां श्रवणिं पडलें ।
ऐकतांच तव रूप पाहुनि मन उतावळें झालें ॥
घरबार बंधु सुत दार सखे तुजसाठिं सकळ त्यजिले ।
विरह तुझा अत्यंत मातकर कंठिं प्राण उरले ॥
टीप ॥ महा ठगणी ना दिससी नयनीं असूनियां जवळी । आशक० ॥ १ ॥
निर्विकार तूं निरुपम उपमा नसे तुला दुसरी ।
अनंत कोटि ब्रह्मांड खेळ हा तुझाच पुतनारी ॥

---

१. लक्ष्मीपते. २. वेद.

जगत्पाल हा ख्याल तुझा तूं व्याप्त चराचरीं ।
किति ग पाहशिल अंत त्वरित ये कष्टि जीव भारी ॥
टीप ॥ पहिलि भाक तुज हाक मारिली वचना सांभाळी । आशक० ॥ २ ॥

सनक सनंदन नारद मुनिजन तुझ्या रुपीं जडले ।
कवटाळिन तूं मोहे ओढिता पुन्हा नाहिं फिरले ॥
उद्धव अक्रुर प्रिये तुला तव रूपींच अनुसरले ।
विधि इंद्रादिक थकित वर्णितां निगम ही शिणले ॥
टीप ॥ तुझ्या रुपाच्या छंदें स्मशानीं लोळे चंद्रमौळी । आशक० ॥ ३ ॥

समर्थ आमुचा गुरू शिरावर सूत्र तयाहातीं ।
तुझ्यासाठिं आम्ही फकीर झालों धरुनि तुला हातीं ॥
अग सांवळे अरुपनिर्मळे अघटित तव स्थिती ।
कदा सोडिना तुतें भोगुनी मनांत अतिप्रीती ॥
टीप ॥ देवनाथ म्हणे प्रेमें बांधिलें तुला हृदयकमळीं । आशक० ॥ ४ ॥

### पद २८ वें.

गोविंदा मधुसूदना, कमललोचना, सख्या यदुविरा ।
हे दीनबंधु माधवा, स्वामि केशवा! करुन ये त्वरा. ॥ ध्रुवपद. ॥
भवजिवन अब्धिचा थाट, उसळती लाट, प्राण घाबरा ।
तुजवीण स्मरावा कोण, गणगोत? आप्त तूं खरा ॥
जय दाशरथी श्रीराम योगिविश्राम, अजी रघुविरा ।
तूं पूर्ण परात्पर गडी, नेइं परथडी, धरुनियां करा. ॥
श्लोक ॥ दिनकरकुलदीपा! आदिरूपा विभो! रे
जगगुरु जगदीशा प्रार्थितों श्रीप्रभो! रे ।
अकळहि गुणलीला वर्णितां वेदवाचा
शेषहि शिणतसे जी काय केंवा जिवाचा ॥
टीप ॥ हा अरुप भक्तिचा भाव दयाळा धांव घेइ धनु करा ।
षड्रिपू गांजिती अरी वेळ हे भारी जानकीवरा ॥ गोविंदा० ॥ १ ॥
नारायणपुत्रान्वयें छंद निश्चयें द्विजा लागता ।
तूं अंतकाळिच्या समयिं उडी तूं सदय घालिसी स्वतां ॥

---

१. शिव. २. शेष. ३. पर्वा, मातब्बरी. ४. अजामिळ नामक द्विजाला.

सोडविले विप्रा तया स्मरारी प्रिया केंवि कृपणता ।
त्वां धरियेला मजविशीं सख्या हृषिकेशि! भेद तत्वता ॥

श्लोक ॥ किति तरि पाहसी रे! अंत आम्हां दिनांचा?
तुजविण श्रम हारी कोण जी! या मनाचा? ।
अतिशय करि वेगा टाकुनी वायु मागें
लवकरि हरि! अनाथा पाव रे! लागिं वेगें. ॥

टीप ॥ पुत्रासि गांजिता पिता अजी अच्युता दीनोद्धारा ।
लक्षिला भक्त निजहटी होउनि प्रगटे स्तंभांतरा. ॥ गोविंदा० ॥ २ ॥
आकळिता नक्रें गजा तयीं संकटासि आठवी पदा ।
ते काळी करुणा तुला सख्या विठ्ठला! हरिसि आपदा ॥
व्यभिचारिणि गणिका अती नव्हे ती सती तिच्या दुर्मदा ।
ही दोन्ही कुमती भली तुवां दीधली स्वरुपसंपदा ॥

श्लोक ॥ किति युगयुगअंतीं रक्षिले भक्त त्वां ते
कमलदलहिताक्षा! दीन मी, पाव मातें, ।
करुणा अयकुनीयां भार्गवी जीतरामा
लवकरि हरि येई श्री सिताकांत रामा! ॥

टीप ॥ मी बाळ तुझें लडिवाळ करिसि सांभाळ भुवनसुंदरा! ।
अज्ञान नाशिजे ज्ञानसहित विज्ञान पूर्णभास्करा. ॥ गोविंदा० ॥ ३ ॥
ऐकुनि हे करुणावरी बाप श्रीहरी उडिच घातली ।
बुडतांचि भवार्णवजळीं धरुनि करकमळीं क्षणें काढिली ॥
षड्रिपू मातता अति दुष्ट दुर्मती सर्व नाडिले ।
नेलेसि ब्रह्मभूवनी द्वैत काहाणी सर्व आथिले. ॥

श्लोक ॥ हरिपदिं अति झाली वृत्ति संलग्न आतां,
मज कवळि असी हे शक्ति नाहीं कृतांता; ।
हरिभजन प्रतापें पूर्णस्वानंद वृत्ति
जगदिश गुरुरुद्रें दीधलें नाथ हस्ती. ॥

टीप ॥ वदे देवनाथ निजमनीं चित्त अनुदिनीं नामांतरा ।
कानडा सखा ना वेडा नेत रोकडा किं पैलेतिरा. ॥ गोविंदा०॥ ४ ॥

---

१. हृषीक+ईश=इंद्रिय+स्वामी. २. नाशरहित (कृष्णा). ३. पृष्ठ २९ टीप ३ पहा. ४. वेश्या पिंगळा. पृष्ठ २९ टीप २ पहा. ५. पृष्ठ ३१ टीप ४ पहा. ६. यमाला.

## पद २९ वें.

तुज काय म्हणावें आम्हीं । दयाळू नाथ जगाचा तूं स्वामी. ॥ ध्रुवपद. ॥
पावन ब्रीद तुझें गा कंसारी, वेद गर्जती चारी[1] ।
पतित तारिले त्वां बहु भारी, गजगणिका[2] व्यभिचारी ॥
ऐकुनि कीर्ति तुझी बा पुतनारि, शरणागत मी द्वारीं ।
आलों ठेविं मला निजपदपद्मीं. ॥ तुज० ॥ १ ॥
आदौ[3] पैलवि[4] उचलुनियां घ्यावें, मग परते लोटावें ।
दिसतें उचित हें का बरवें, कृपाघना! बोलावें ॥
दास तुमचा जगीं म्हणवावें, तेणें विलया जावें ।
नवल वाटतें अंतरयामीं[5] ॥ तुज० ॥ २ ॥
करुणासागरा श्रीगोपाळा! कृष्णा! त्रिभुवनपाळा[6]! ।
पांडवपाळका जी घननीळा, नंदयशोमतिबाळा ॥
झालें मानस हें अतिविकळा, तव विरहाग्नीज्वाळा ।
दुःखित झालों मी बहुत श्रमी ॥ तुज० ॥ ३ ॥
विश्वोद्धारका गुरु गोविंदा, किति भोगावी आपदा, ।
सरली आयुष्याची मर्यादा, काळें काढिल्या फरदा ॥
अजुनि दया येईना का मर्दा, बोल परमानंदा ।
रतला देवनाथ प्रभु या नामीं. ॥ तुज० ॥ ४ ॥

---

१. चार वेद–ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद. २. पृष्ठ २९ टीप २,३ पहा. ३. आधीं. ४. पदरांत. ५. 'अंतर्याम'—या शब्दाचा अर्थ 'हृदय' 'अंतःकरण' असा आहे; जसें 'अंतर्याम कळकळल्यावांचून असा उद्गार निघायचा नाहीं,' 'अंतर्यामीची गोष्ट सहसा कोणाशीं प्रगट करूं नये,' 'ज्याचें मन त्याला अंतर्यामीं साक्ष असतें.' आतां लोकभाषेंत इतका गाढतर रूढ झालेला जो हा वरील शब्द याच्या स्वरूपाचा जर विचार केला तर ध्यानांत येईल कीं, धड शेंडा ना बुडखा अशासारखा हा शब्द आहे. संस्कृतांत 'अंतर्यामी' हें 'अंतः' (आंत) व 'यामी' (गमन करणारा) असें सिद्ध झालेलें विशेषण आहे. याचा अर्थ 'अंतर्गत,' 'आंतला' असा आहे; जसें 'हृदयांतर्यामीं परमेश्वर' 'शरीरांतर्यामी ज्वर' इत्यादि. मराठी भाषेंतही असें म्हणतात कीं 'वर दिसत नाहीं तरी याच्या अंतर्यामीं ताप आहे.' येथें वरील संस्कृत प्रयोगाप्रमाणेंच 'अंतर्यामी'शब्दाचा मूळचा प्रयोग होता; पण पुढें लोकांचा असा समज होत गेला कीं, 'अंतर्यामीं' हें विशेषण नसून सप्तम्यंत नाम आहे, तेव्हां अर्थातच 'अंतर्याम' असें प्रतिपदिक पुढें सिद्ध झालें. (निबंधमाला अंक ४३.) ६. स्वर्ग, मृत्यु, व पाताळ या तीन भुवनांला पाळणारा.

## पद ३० वें.

लज्जा तूज हरि! । निजाची ॥ ध्रुवपद. ॥
पडतां संकट निर्वटी[1] क्षण दे । परमामृतलहरी. ॥ निजाची० ॥ १ ॥
तुजविण आमुचा कोण सखा दुजा । पालन कोण करी. ॥ निजाची०॥२॥
देवनाथ म्हणे राखि ब्रिदाप्रति । भवजिवनीं तारी. ॥ निजाची० ॥ ३ ॥

## पद ३१ वें.

मुनिजनमानसहंसा । यदुकुलवंशोत्तंस[2] हरि ।
मावर वर जगदीश्वर ईश्वर स्मर नर नरहरी. ॥ ध्रुवपद. ॥
हरिल भय हर जाणुनि जो वाजवी मोहरी[3] ।
चित्ता चित्पदस्पदनत जो भवभ्रमा संहरी. ॥ मुनि० ॥ १ ॥
अतसिकुसुमसम कांतरुचि त्वां पूर्ण परेशार्वरी ।
उदय करिल हृदि आत्मा दिनमणी नाशिल तम शार्वरी. ॥ मुनि० ॥ २ ॥
धृतकरकंजी व्रजजनरंजी सज्जनमनमोहरी ।
हयदोरे[4] धरि स्वकरें 'होरे' वदत पार्थरहंवरीं[5]. ॥ मुनि० ॥ ३ ॥
नंदतनय गोविंद गुरुश्री सच्चितपद अंतरीं ।
देवनाथ हृदिं चिंतित नांदत निजसुखसदनांतरीं. ॥ मुनि० ॥ ४ ॥

## पद ३२ वें.

काय म्हणुन सांग । कशी करुणा नये रे! ॥ ध्रुवपद. ॥
भवजिवनीं बुडताहे । सांग केंवि न होसी साह्य ।
आठवितां पाय । कशी करुणा नये रे! ॥ काय० ॥ १ ॥
त्रिभुवनपतिराय । आम्हा तूंचि सकळ बापमाय ।
मोकलितो धाय । कशी करुणा नये रे! ॥ काय० ॥ २ ॥
देवनाथ वदत काय । म्हणुनी सांग अंतराय ।
उदाराचा राय । कशी करुणा नये रे! ॥ काय० ॥ ३ ॥

## पद ३३ वें.

भक्तोत्सल[6] भवशमना हरि! तूं गुंतलासि कोठें? ।
चाल त्वरें गोविंदा! येउनि मम नयनीं प्रगटें. ॥ ध्रुवपद. ॥

---

१. निवारण करी. २. उत्तंस=तुरा, शिरोभूषण. ३. मुरली. ४. घोड्याची लगाम. ५. उत्तम रथांत. भक्तांची मोतद्दारी कृष्ण करतो असें वर्णन काव्यग्रंथांतूनही अनेक स्थळीं आहे. (मोरोपंत— केकावली ७.) ६. भक्तवत्सल.

कर्ममोचना कंजनयना कृष्णा सुकुमारा ।
नंदतनय अच्युत गोकुलपति गोरसचोरा ॥
मुरलीवादन कंसनिकंदन मधुमुरसंहारा ।
गोमतिजयवासिया द्वारकापति दीनोद्धारा ॥
गुणगणवर्णित शिणला शेषहि नेणति श्रुतिपारा ।
जय जय पांडवपालक रुक्मिणिवल्लभ सुखसारा ॥
टीप ॥ वाढवेळ बहु झाला येई सख्या मला भेटे । चाल० ॥ १ ॥
निजात्मगतिदायका, रमानायका, देवदेवा ।
मायामय मददहना, मदनमोहना वासुदेवा ॥
किति अंत पाहसी कशी हृषीकेशी नये कणवा ।
करुणासागर नाम सत्य करी उगवी भवगोवा ॥
परम सदय तूं भवभय निवटुनि अभय वरद द्यावा ।
तूं जननी मी बाळ तान्हा उसंगाच घ्यावा ॥
टीप ॥ विरहबाण हरि प्राण मनीं अज्ञान दुःख वाटे । चाल० ॥ २ ॥
पतित बहु तारिले अजामिळ गणिका पापराशी ।
त्याहुनी पतित थोर मी म्हणुनि करुणा नायकसी ॥
वोंगळ वक्रा सरळा केली ते कुब्जा दासी ।
केव्हांचा मी आळवितों कां मजविशीं निजलासी. ॥
नामाग्निनें न जळति किमपि न पातकें ऐसी ।
तारि पतित एवढा राखी पावन बिरुदासी ॥
टीप ॥ अजि विनति हे मान हरि अज्ञानतिमिर तगटे । चाल० ॥ ३ ॥
दुर्घट माया घाट अचाट हा मला उलंघेना ।
शरणागतवत्सल म्हणुनि तुज प्रार्थियली करुणा ॥
मोहजाळ अतिविशाळ वारी मुनिमानसहरणा ।
निजात्म प्रतिती देई पदिं गति निजजनसुखकरणा ॥

---

१. कमलनेत्रा. २. पृष्ठ २९ टीप १ पहा. ३. पृष्ठ २९ टीप २ पहा. ४. कुब्जा ह्या नांवाची अंगानें तीन ठिकाणीं वांकडी अशी कंसाची एक दासी होती; तिचें काम उत्तम चंदनाची उटी तयार करण्याचें होतें. कृष्ण व बळराम ह्यांस कंसानें गोकुळांतून आणविलें असतां ते मथुरेंत रस्त्यांतून चालले, तेव्हां त्यांस पाहून कुब्जेनें त्यांच्या अंगास गंधाची उटी लाविली. मग कृष्णानें तिची हनुवटी हातानें धरून व पायावर पाय देऊन तिला सरळ केलें, आणि तिच्यावर कृपा केली; अशी कथा आहे. (नवनीत.) ५. मन.

नारद शुक[1] सनकादिक[2] ध्याती जें अंतःकरणा ।
अरूप त्या निजरूपीं रमवी समरस या स्वमना ॥
टीप ॥ चिदानंदआनंद[3] मती स्वानंद सौख्य दाटे । चाल० ॥ ४ ॥
कल्पविकल्पें असुख कारकें समूळ सांडावे ।
शांतिक्षमा आणि विवेक वैराग्यासन मांडावें ॥
वंड त्यजुनि मन खंडरहित अखंड स्वरुपीं राहावें ।
समाधि उत्थानिं तुज एका व्यापक पाहावें ॥
समत्व योगें अंतरंगें अशा गुणा ध्यावें ।
स्वात्मभजनें निःसंगें जनीं विजनीं हिंडावें ॥
टीप ॥ देवनाथ प्रभु श्रीगोविंदा मागत बाळ हटे ।
कृपावरद दे ऐसा जेणें जन्म मृत्यु वोहटे ॥ चाल० ॥ ५ ॥

## पद ३४ वें.

हरि ! अघभयसंहरणा, योगिजनमुनिमानसहरणा हो ।
दयाघना लोचना दावि तव रूप सौख्यभरणा. ॥ ध्रुवपद. ॥
निगम वर्णिती निर्विकारी, यशोदातनय पूतनारी हो ।
दास तुझा म्हणविलों, बहु कष्टलों, या संसारीं ॥
होसि दासाचा साहकारी, अंत पाहसि किति कंसारी हो ।
भवाब्धिचा अति थाट, उसळती लाट, क्रूर लहरी ॥
चाल ॥ तूं कर्णधार[4] ये फार घाबरा जीव बहुत देवा ।
मज दिनालागिं आधार पायिं दे थार वासुदेवा ।
हा सार नव्हे संसार वेगिं बा ! सार तुला कणवा[5] ॥
टीप ॥ येऊंदे माझि तारि शरणा हो । दयाघना० ॥ १ ॥
वांझ प्रसवली पुत्र पोटीं, अजि हे साच काय गोठी हो ।
नसुनि वृत्ति मोहिली, साच दाविली, कर्मसृष्टि ॥
बांधिला मोहपाश कंठीं, फिरविले नाना संकष्टीं हो ।
मी माझे म्हणविले, चित्त भुलविलें, केले कष्टी ॥

---

१. शुक—कृष्णद्वैपायन व्यासाचा शुकीचें रूप धारण केलेल्या घृताची नामक अप्सरेपासून झालेला पुत्र. हा उपजत मोठा वैराग्यशील, ज्ञानसंपन्न आणि परमभागवत होता. २. सनक—सर्व महर्षींच्या पूर्वी ब्रह्मदेवानें जे चार मानसपुत्र निर्माण केले होते, त्यांतील एक. ३. ज्ञानानंद. ४. नाविक. ५. करुणा.

चाल ॥ धरि आस बहु हृदयास मानि उल्हास फार चित्ता ।
हिंडतां देशोदेशास नमनि मनिं त्रास वाहे चिंता ।
करि थोर थोर सायास होत जगदास वांछि वित्ता ॥
टीप ॥ अशी गति का जगदुद्धरणा, केली त्वां हरी विश्वंभरणा हो । दयाघना० २
न मिळतां वित्त दु:ख वाटे, उभे रोमांच कंठ दाटे हो ।
दु:खरूप संसार, रुतति हे फार, विषय कांटे ॥
होत परिश्रमी चित्त न विटे, मागुती त्याच पथीं विनटे हो ।
काय करूं माधवा, येइं येधवा, मला भेटे ॥
चाल ॥ जाहला मुक्त परिपाश न संडी आस गती कैसी ।
करुं काय तरी मी यास, करितसे ग्रास माय[1] विवे[2]सी ।
जिवलगा वोढि चित्तास याजि करि वास हृषीकेशी ॥
टीप ॥ गुरुगोविंदा दावि चरणा, प्रकट तूं हो अंत:करणा हो ।
देवनाथनुत तारि त्वरित बा लावि तुझ्या स्मरणा ॥ दयाघना० ॥ ३ ॥

## पद ३५ वें.

नंदनंदना अहो सुखसदना हरि ! भवभयमोचना ।
दीनदयाळा परमकृपाळा ये राजिवलोचना ॥ ध्रुवपद. ॥
गोकुलवासा जगन्निवासा सांवळिया हृषीकेशी ।
परम सदय मृदु हृदय तुझें तरि करुणा नायकसी ॥
अनाथनाथा रुक्मिणीकांता श्रुति गाती संरसी ।
पतितपावन नाम दयाघन ब्रिद हे वागविसी ॥
हीन दीन परि तुझा म्हणवितों तुजविण मी परदेशी ।
करुणासागर नाम तुझें तरी कठीण का मजविशीं ॥
टीप ॥ गरुडावरि हो स्वार त्वरें ये श्रीयदुकुलभूषणा । दीन० ॥ १ ॥
हरि मनमोहना अहिअरिवहना[3] गोपीपति अच्युता ।
अद्भुत ध्यातां निगम[4] शीणले तव गुणगण वर्णितां ॥
शुक वामदेव ऋषि नारद वाल्मिक सेविति नामामृता ।
तारिले बहु पतित अजामिळ[5]गणिकादी तत्वता ॥

---

१. माया. २. जखीण. ३. गरुडवाहना. ४. वेद. ५. पृष्ठ २९ टीप १, २, ३, पहा.

शास्त्र पुराणें गाति तारिसी आल्या शरणागता ।
ऐकुनि कीर्ति शरण पातलों निवटी भव दुष्कृता ॥
टीप ॥ मदनारिप्रियमानसमोहना मधुकैटभमर्दना । दीन० ॥ २ ॥
गोरसचोरा नंदकुमारा गोपीरमणा हरी ।
करुणा ऐकुनि धांव घेइ ये भवदुष्कृत संहरी ॥
गोपमुलासवें किती गोधनें चारिसी यमुनेतिरीं ।
केव्हांचा मी आळवितों, परि करुणा नये अंतरीं ॥
दुर्धर मोठ्या उसळति लाटा भवसिंधूच्या निरीं ।
बुडतों येई कर्णधार तूं उतरी पैले तिरीं ॥
टीप ॥ त्रिभुवनभूपा आदिस्वरुपा गुणातीता निर्गुणा । दीन० ॥ ३ ॥
अमोल काया जाती सखया आयुष्याची घडी ।
अशाश्वत तनु शाश्वत नाहीं काळवरी कडकडी, ॥
कांहिं कळेना सांग कितितरी क्रीडसी यमुनेथडी ।
कष्ट होती संकष्ट अशा या वेळीं घाली उडी ॥
संचित सुखदा गुरुगोविंदा ये करुनी तांतडी ।
घाबरला जिव धांव घेई ये अनादिचा तूं गडी ॥
टीप ॥ देवनाथप्रभु वदे सोयऱ्या करि कृपा ये क्षणा । दीन० ॥ ४ ॥

### पद ३६ वें.

चाल चाल वेगी, कृष्णा मनमोहना ।
दिनोद्धारका गरुडवहना ॥ ध्रुवपद. ॥

---

१. शास्त्रें सहा आहेत,—सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा, आणि वेदांत. २. पुराणें अठरा आहेत त्यांचीं नांवें:—"ब्राह्मं पाद्मं वैष्णवं च शैवं भागवतं तथा । तथान्यन्नारदीयं च मार्कंडेयं च सप्तमम् ॥ आग्नेयमष्टकं प्रोक्तं भविष्यन्नवमं तथा । दशमं ब्रह्मवैवर्तं लिंगमेकादशं तथा ॥ वाराहं द्वादशं प्रोक्तं स्कांदं चात्र त्रयोदशम् । चतुर्दशं वामनं च कौर्मं पंचदशं तथा ॥ मात्स्यं च गारुडं चैव ब्रह्मांडाष्टादशं तथा. ॥" व अठरा उपपुराणें आहेत तीं अशीं:—"अष्टान्युपपुराणानि मुनिभिः कथितानि तु । आद्यं सनत्कुमारोक्तं नारसिंहमतः परम् । तृतीयं नारदं प्रोक्तं कुमारेण तु भाषितम् । चतुर्थं शिवधर्माख्यं साक्षान्नंदीशभाषितम् । दुर्वाससोक्तमाश्चर्यं नारदोक्तमतः परम् । कापिलं मानवं चैव तथैवोशनसेरितम् । ब्रह्मांडं वारुणं चाथ कालिकाह्वयमेव च । माहेश्वरं तथा शांबं सौरं सर्वार्थसंचयम् । पराशरोक्तं प्रवरं तथा भागवतद्वयम् । इदमष्टादशं प्रोक्तं पुराणं कौर्मसंज्ञितम् । चतुर्धा संस्थितं पुण्यं संहितानां प्रभेदतः ॥." ३. नाशी. ४. पापाला. ५. देह. ६. लौकर, त्वरेनें.

संकटीं पडलों, अरे! न सुचे मज कांहीं ।
म्हणुनियां शरण तुझ्या पायीं ॥
आलों दिनबंधु अरे! अर्प भाव हृदयीं, ।
धरुनि सावळ्या शेषशायी ॥
चाल ॥ अरे हरि! कमलनयनारे ।
अरे हरि! फणिशयनारे ॥
अरे हरि! जात वय सारें ।
टीप ॥ ग्रासित काळ वदना ।
प्राण घाबरा सौख्यसदना ॥ चाल० ॥ १ ॥
नुतन तनु उत्तम, हे ब्रह्मरत्नखाणी ।
प्राप्त चौऱ्यांशी[1]लक्षयोनी ॥
हिंडता झाली, हे पूर्व भाग्य पुण्यीं ।
विसरलों स्वहित क्रिया करणी ॥
चाल ॥ अरे हरि! वृथा वय जाईल ।
अरे हरि! कशी गति होईल ।
अरे हरि! कोण मज देईल ॥
टीप ॥ तुजवांचुनि जगजिवना ।
................................ ॥ चाल० ॥ २ ॥
तरुण वय माझें मदन करि क्लेशा ।
सुतासुत दारधनी आशा ॥
द्रव्य मिळवाया हिंडलों देशोदेशा ।
गुंतुनी पडलों मोहपाशा ॥
चाल ॥ अरे हरि! मिळविले व्याही ।
अरे हरि! बरवे जावाई ।
अरे हरि! [2]उसंत कधिं नाहीं ॥
टीप ॥ मानिले सौख्य जाणा ।
विषयवासना ग्रासि स्वमना ॥ चाल० ॥ ३ ॥

---

१. चौऱ्यायशीं लक्ष योनी पुढें लिहिल्याप्रमाणें आहेत:—२० लक्ष वृक्षयोनी, ११ लक्ष कीटकयोनी, ३० लक्ष पशुयोनी, ९ लक्ष जलचरयोनी, १० लक्ष पक्षीयोनी, ४ लक्ष मनुष्ययोनी मिळोन ८४ लक्षयोनी. २.विश्रांति.

पडे उकरीतां कूकरा टाकि दाणे ।
खाति सकळ हा खाउ नेणे ॥
परी सांडीना विश्रांति लभ्य तेणें ।
पुन्हा उकरितो साभिमानें ॥
चाल ॥ अरे हरि ! तो धरि त्रास ।
अरे हरि ! झालें मज तैसं ।
अरे हरि ! करूं मी कैसं ॥
टीप ॥ [1]भवभयदुःखशमना ।
भक्तवत्सला पीत[2]वसना ! ॥ चाल० ॥ ४ ॥
श्रम अद्भुत चित्ता हा दुःखरूप असार ।
गोड मानिला कसा संसार ॥
धनिक अर्जविले राजेही बहु म्यां फार ।
दृश्य धनियाचा धरुनि आधार ॥
चाल ॥ अरे हरि ! द्रव्य बहु झालें ।
अरे हरि ! सुहृज्जन आले ।
अरे हरि ! मिळति भंवताले ॥
टीप ॥ वेष्टुनी असति जाणा ।
घाली मोह महा स्वमना ॥ चाल० ॥ ५ ॥
चाल ॥ काळ तो गेला हे दिवस कठिण आले ।
सुहृद आप्त ते घरा गेले ॥
दिसेना कोणी परदेशी ऐकिले ।
देह माझेचि असे उरले ॥
चाल ॥ अरे हरि ! म्हणुनि मज चित्तीं ।
अरे हरि ! वाटते खंती ।
अरे हरि ! कोणिच सांगाती ॥
टीप ॥ नाहींच कळलें जाणा ।
बहू वाटलें दुःख स्वमना ॥ चाल० ॥ ६ ॥
चित्त वीटलें म्हणवोनि तुला हो ! कां ।
शरण मी आलों [3]नंदतोका ! ॥

---

१. भव=संसार. २. पिंवळें वस्त्र ज्याचें तो. ३. नंदबालका (कृष्णा).

कृपे अवलोकी दिनबंधु [1]पुण्यश्लोका ।
अभय वर देई मिटवि धोका ॥
चाल ॥ अरे हरि! ऐक [2]अनंता ।
अरे हरि! माझि तुज चिंता ।
अरे हरि! तो तु हे ममता ॥
टीप ॥ देवनाथ विनवि चरणा ।
येउंदे करुणा [3]गोपीरमणा! ॥ चाल० ॥ ७ ॥

पद ३७ वें.

भुवनसुंदरा, सुंदरा चक्रपाणी । मधुसूदना! मोक्षदानी! ॥ ध्रुवपद. ॥
कमललोचना, लोचना कर्मदहना । कमलजापति गरुडवहना ॥
रमावल्लभा, वल्लभा [4]विश्वजिवना । कसी तुज नयेचि बा! करुणा? ॥
छळिसि तरि किती, किती [5]कनकवसना! । [6]राजिवाक्षा! हरि! मनमोहना! ॥
गोपी भाकिती, भाकिती दीनवाणी. । मधुसूदना० ॥ १ ॥
मुरलिरव सुखद, सुखद मधुर भारी । दुष्ट आमुचें चित्त हारी ॥
मुरलि हे नव्हे, नव्हे महामारी । बहु त्रासविल्या [7]व्रजनारी ॥
................................ । ...................... ॥
प्राण घेतसे, घेतसे धसुनि श्रवणीं. । मधुसूदना० ॥ २ ॥
श्रवणिं ध्वनि पडतां, पडतां गृहधंदा । कदा नाठवे गोपिवृंदा ॥
शिरत मानसीं, मानसीं करित भेदा । नंदनंदन हरि गोविंदा ॥
कशास्तव असी, असि परमानंदा । धरिसि तरि कशी विश्वकंदा ॥
[8]परमलाघवी, लाघवी पूर्ण मोहनी. । मधुसूदना० ॥ ३ ॥
मानविनवणी, विनवणि प्रभु गोपाळा! । अशा मुरलिचा सांडिं चाळा ॥
वाजविसी किती, किति वेळोवेळा । बहु श्रमि झालों आम्ही [9]अबळा ॥
दया तुज यावी, यावी कनवाळा । म्हणुनि प्रार्थियलें पदकमळा ॥
ठेविं शिरिं त्वरें, त्वरें अभय पाणी । मधुसूदना० ॥ ४ ॥
पतितपावना, पावना ऐक बापा । [10]विबुधजनप्रिया विमलरूपा ॥
[11]दुरितभवनदी, नदी तारि तापा । चुकवि चौऱ्यांशि दुःख [12]खेपा ॥

---

१. पावन (पुण्य) आहे श्लोक (कीर्ति) ज्याचा तो. २. ज्याचा अंत नाहीं तो. ३. गोपीवल्लभा. ४. विश्वाधारा. ५. सुवर्णवसना. ६. कमलाक्षा. ७. गोपी. ८. परम कुशल. ९. स्त्रिया. १०. देवांना प्रिय. ११. पाप. १२. चौऱ्यांशी योनी. (पृष्ठ ४८ टीप १ पहा).

भरवि लोचनीं, लोचनीं स्वरूप मापा । कृपे दाखवी मार्ग सोपा ॥
देवनाथीय, नाथीय ऐक्य मिळणी । मधुसूदना० ॥ ९ ॥

### पद ३८ वें.

जाग रे! जाग बापा, विश्वपालका कृष्णा ।
दीन आम्ही उभे द्वारीं, आमुची बोळवीं तृष्णा. ॥ ध्रुवपद. ॥
त्रासलों प्रपंचीं या, बहु कष्टलों भारी ।
म्हणउनि शरण आलों, विभो! तुझिया द्वारीं. ॥ जाग रे० ॥ १ ॥
सांग बा! न्यून काय, हरि! तुझिया भांडारीं ।
याचक भीक मागे, प्रेम देईं झडकरी. ॥ जाग रे० ॥ २ ॥
गुरुकृपे उदयो झाला, हरि उदया आला ।
सुख तें काय सांगूं, जिवलग भेटला. ॥ जाग रे० ॥ ३ ॥
श्रीगुरुनाथराया, कृपासिंधु गोविंदा! ।
देवनाथ प्रार्थिताहे, प्रभुपदारविंदा[1]. ॥ जाग रे० ॥ ४ ॥

### पद ३९ वें.

काय माझी गति तुज करुणा न आलिया. ॥ ध्रुवपद. ॥
हा भवसागर[2] दुस्तर दुर्धर ।
उसळती लाटा माजी समूळ बुडालिया. ॥ काय० ॥ १ ॥
मद मत्सर काम क्रोध हीं सावजें[3] ।
देउनियां मिठि येणें वोढोनी नेलिया. ॥ काय० ॥ २ ॥
तारक तुजविण दुजा नसे ।
यावयासि तुजलागीं उशिर हा झालिया. ॥ काय० ॥ ३ ॥
देवनाथ प्रभुनाथ श्रीगोविंदा ।
म्हणवितों तुझा तुवां उपेक्षा केलिया. ॥ काय० ॥ ४ ॥

### पद ४० वें.

करुणाघन दिनबंधु दयाळा! ये पंढरिराया! ।
अनाथ मी अतिदीन शरणागत तुझिया पाया. ॥ ध्रुवपद. ॥
समपद विटेवर कटि कर ठेउनि काय मौज पाहसी ।
काय तुझे मानसीं हेत तव सांग हृषीकेशी[4]! ॥
दुर्धर दुर्मद सुसरि वासना हे मजला ग्रासी ।
काम क्रोध मद मत्सर बांधुनि मन ममतापाशीं ॥

---

१. प्रभुचरणकमला. २. संसारसमुद्र. ३. श्वापदें. ४. इंद्रियस्वामी. (कृष्णा.)

कृपे अवलोकी दिनबंधु पुण्यश्लोका[1] ।
अभय वर देइं मिटवि धोका ॥
चाल ॥ अरे हरि! ऐक अनंता[2] ।
अरे हरि! माझि तुज चिंता ।
अरे हरि! तो तु हे ममता ॥
टीप ॥ देवनाथ विनवि चरणा ।
येउंदे करुणा [3]गोपीरमणा! ॥ चाल० ॥ ७ ॥

**पद ३७ वें.**

भुवनसुंदरा, सुंदरा चक्रपाणी । मधुसूदना! मोक्षदानी! ॥ ध्रुवपद. ॥
कमललोचना, लोचना कर्मदहना । कमलजापति गरुडवहना ॥
रमावल्लभा, वल्लभा विश्वजिवना[4] । कसी तुज नयेचि बा! करुणा? ॥
छळिसि तरि किती, किती कनकवसना[5]! । राजिवाक्षा[6]! हरि! मनमोहना! ॥
गोपी भाकिती, भाकिती दीनवाणी. । मधुसूदना० ॥ १ ॥
मुरलिरव सुखद, सुखद मधुर भारी । दुष्ट आमुचें चित्त हारी ॥
मुरलि हे नव्हे, नव्हे महामारी । बहु त्रासविल्या व्रजनारी[7] ॥
................................ । ...................... ॥
प्राण घेतसे, घेतसे धसुनि श्रवणीं. । मधुसूदना० ॥ २ ॥
श्रवणिं ध्वनि पडतां, पडतां गृहधंदा । कदा नाठवे गोपिवृंदा ॥
शिरत मानसीं, मानसीं करित भेदा । नंदनंदन हरि गोविंदा ॥
कशास्तव असी, असि परमानंदा । धरिसि तरि कशी विश्वकंदा ॥
परमलाघवी[8], लाघवी पूर्ण मोहनी. । मधुसूदना० ॥ ३ ॥
मानविनवणी, विनवणि प्रभु गोपाळा! । अशा मुरलिचा सांडि चाळा ॥
वाजविसी किती, किति वेळोवेळा । बहु श्रमि झालों आम्ही अबळा[9] ॥
दया तुज यावी, यावी कनवाळा । म्हणुनि प्रार्थियलें पदकमळा ॥
ठेविं शिरिं त्वरें, त्वरें अभय पाणी । मधुसूदना० ॥ ४ ॥
पतितपावना, पावना ऐक बापा । विबुधजनप्रिया[10] विमलरूपा ॥
दुरितभवनदी[11], नदी तारि तापा । चुकवि चौऱ्यांशि[12] दुःख खेपा ॥

१. पावन (पुण्य) आहे श्लोक (कीर्ति) ज्याचा तो. २. ज्याचा अंत नाहीं तो. ३. गोपीवल्लभा. ४. विश्वाधारा. ५. सुवर्णवसना. ६. कमलाक्षा. ७. गोपी. ८. परम कुशल. ९. स्त्रिया. १०. देवांना प्रिय. ११. पाप. १२. चौऱ्यांशी योनी. (पृष्ठ ४८ टीप १ पहा).

भरवि लोचनीं, लोचनीं स्वरूप मापा । कृपे दाखवी मार्ग सोपा ॥
देवनाथीय, नाथीय ऐक्य मिळणी । मधुसूदना० ॥ ९ ॥

## पद ३८ वें.

जाग रे! जाग बापा, विश्वपालका कृष्णा ।
दीन आम्ही उभे द्वारीं, आमुची बोळवीं तृष्णा. ॥ ध्रुवपद. ॥
त्रासलों प्रपंचीं या, बहु कष्टलों भारी ।
म्हणउनि शरण आलों, विभो! तुझिया द्वारीं. ॥ जाग रे० ॥ १ ॥
सांग बा! न्यून काय, हरि! तुझिया भांडारीं ।
याचक भीक मागे, प्रेम देईं झडकरी. ॥ जाग रे० ॥ २ ॥
गुरुकृपे उदयो झाला, हरि उदया आला ।
सुख तें काय सांगूं, जिवलग भेटला. ॥ जाग रे० ॥ ३ ॥
श्रीगुरुनाथराया, कृपासिंधु गोविंदा! ।
देवनाथ प्रार्थिताहे, [1]प्रभुपदारविंदा. ॥ जाग रे० ॥ ४ ॥

## पद ३९ वें.

काय माझी गति तुज करुणा न आलिया. ॥ ध्रुवपद. ॥
हा [2]भवसागर दुस्तर दुर्धर ।
उसळती लाटा माजी समूळ बुडालिया. ॥ काय० ॥ १ ॥
मद मत्सर काम क्रोध हीं [3]सावजें ।
देउनियां मिठि येणें वोढोनी नेलिया. ॥ काय० ॥ २ ॥
तारक तुजविण दुजा नसे ।
यावयासि तुजलागीं उशिर हा झालिया. ॥ काय० ॥ ३ ॥
देवनाथ प्रभुनाथ श्रीगोविंदा ।
म्हणवितों तुझा तुवां उपेक्षा केलिया. ॥ काय० ॥ ४ ॥

## पद ४० वें.

करुणाघन दिनबंधु दयाळा! ये पंढरिराया! ।
अनाथ मी अतिदीन शरणागत तुझिया पाया. ॥ ध्रुवपद. ॥
समपद विटेवर कटि कर ठेउनि काय मौज पाहसी ।
काय तुझे मानसीं हेत तव सांग [4]हृषीकेशी! ॥
दुर्धर दुर्मद सुसरि वासना हे मजला ग्रासी ।
काम क्रोध मद मत्सर बांधुनि मन ममतापाशीं ॥

---

१. प्रभुचरणकमला. २. संसारसमुद्र. ३. श्वापदें. ४. इंद्रियस्वामी. (कृष्णा.)

सोडवील तुजवीण कोण बा! दुःख हें विध्वंसी ।
घाबरला अति जीव सख्या! तूं धांउनि कधिं येशी ? ॥
टीप ॥ लोभ दंभ हे दुष्ट मिळोनी विटंबिली काया[१] । अनाथ० ॥ १ ॥
कष्ट बहुत संकष्ट जाणुनी ते **पां**डवपत्नी ।
ये **कृ**ष्णा **गो**विंदा तूंतें बाहत **या**ज्ञसेनी[२] ॥
करुणास्वर निजकर्णिं ऐकतां त्वरें मोक्षदानी ।
धांवलासि मनपवनाहुनि अतिवेग **ग**रुड त्यजुनी ॥
दुष्ट बहुत **दु**ःशासन फेडित धरुनि निरिसि पाणी ।
बहुतां बा! शेवटीं पितांबर नेसविला जघनीं ॥
टीप ॥ निज सत्वर भगिनिची लाज रक्षिली बा! **य**दुराया! । अनाथ० ॥२॥
गजेंद्र नक्रें[३] आकळितां तैं आळविलें तूज ।
चक्र फेंकुनी नक्र मर्दिला, सोडविला गज ॥
भक्तकामकल्पद्रुम ऐशा श्रुति गाती पैज ।
शुका[४] पढवितां वेश्यागणिका उद्धरली सहज ॥
पुत्रमिषें घे नाम तारिला **अ**जामीळ द्वीज ।
त्याहुनि पतीत थोर मी तूं तो पावन महाराज ॥
टीप ॥ लाज सकळही तूज उपेक्षा न करि परम सदया । अनाथ० ॥ ३ ॥
**दे**वनाथ प्रभुनाथ तारिं हरि **पुं**डलीकवरदा ।
आत्मनिवेदन पुजितां न्याहळी दाखवि या स्वपदा ॥
कृपाकटाक्षें पाहें साह्य हरि! वारीं भवआपदा ।
हेंचि दान देव मनासमान वाटो हे प्रमदा ॥
प्रेमभीक दे नाम वदवि श्रीमुखिं परमानंदा ।
स्वात्मस्वरूपीं रमविशि निशिदिनिं या चित्सुखकंदा ॥
टीप ॥ सगुणरूप साजिऱ्या येइं सोयऱ्या नयनिं उदया । अनाथ० ॥ ४ ॥

**पद ४१ वें.**

मी बाळ तुझें तानये! पय पाजीं उसंगा घेईं ।
**पं**ढरपुरवासिनि **अं**बे! झडकरि ये माय[५] **वि**ठाई! ॥ ध्रुवपद. ॥

---

१. देह. २. द्रौपदी. ३. पृष्ठ २९ टीप ३ पहा. ४. पोपटा. ५. स्तवनीय देवतेचा निर्देश स्त्रीलिंगेंकरून करण्याचा संप्रदाय सर्वप्रसिद्ध आहे. तुकारामादिक कविही विठोबास 'विठाई' 'विठाबाई' वगैरे शब्दांनीं संबोधनपूर्वक आळवितात असें त्यांच्या काव्यांवरून दिसतें.

भीमातटिं कटिद्वयपाणी ठेउनियां कौतुक पाहसी ।
मोहपाशीं गुंतुनि पडलों, ग्रासितसे मायाविवशी[1] ।
त्राता मज कोण दुसरा, तुजवांचुनि मी परदेशी ।
टीप ॥ घावरला जीव माझा, धांवुनि कधीं सांग येशी? ॥ पंढर० ॥ १ ॥
अतिसदय हृदय मृदु अतां कठिण कां मानस केलें? ।
मी पतित भारि म्हणतां जी! ताराया चित्त भ्यालें ।
एवढा जरी जी! जोर, कासियासि तरि मग व्यालें? ।
टीप ॥ पतिताचे पावन ऐसें, ब्रिदे[2] पायीं बांधियलें. ॥ पंढर० ॥ २ ॥
तुजवांचुनि कोण मला गे! भवसागरिं या भयत्राता ।
मम प्राण रिघों पाहातो कीं, लाविशी उशिर कां येतां? ।
लक्षितसे मार्ग दयाळे! विरहाग्नी जाळित चित्ता ।
टीप ॥ स्तुतिभागा काय करूं मी, श्रुति वाणिति गुणगण गातां. ॥ पंढर० ॥३॥
प्रार्थितसें मी धांवें क्षणभरि हा विलंब न करीं ।
जरि दास तुझा म्हणवीतों शरणागत आलों भिकारी ।
दे प्रेमभीक भजनाची तोडुनियां सर्व विकारी ।
टीप ॥ ये प्रगटें मम हृद्भुवनीं, कंजाक्ष[3] कैटभारी! ॥ पंढर० ॥ ४ ॥
केव्हांचा आळवितों मी, करुणारव न पडे श्रवणीं ।
माउली सुदिन जनांची कनुवाळे! विनवणि मानी ।
तुजवांचुनि कोण आतां? त्रैलोक्यीं तूंची धणी ।
टीप ॥ उडि घालीं लवकर ये धांवें, गिर्वसलें[4] मज वैऱ्यांनीं. ॥ पंढर० ॥ ५ ॥
किति म्हणुन तरि अंत आतां, पाहतोसी करुणामूर्ति! ।
मजला तों कांहीं सुचेना, घाबरी झाली वृत्ति ।
अंगिकार त्वां केलासी, मिरविलें ब्रिद त्रीजगती ।
टीप ॥ देवनाथ जननी माझी, लज्जा हे तुझिये हातीं. ॥ पंढर० ॥ ६ ॥

## पद ४२ वें.

माझि विनवणी, विनवणि हरिला सांगा ।
कधीं भेटाल पांडुरंगा! ॥ ध्रुवपद. ॥
संत तुम्ही दयाळ, दयाळ मज कृपा । करुनि भेटवा मायबापा ॥
भवाब्धिमधें, मधें बुडतों तापा । कोण दाखवी मार्ग सोपा? ॥

---

१. मायारूप जखीण. २. निशाण, चिन्ह. ३. कमलाक्ष. ४. पकडिलें.

चाल ॥ काय मी करूं ।
कोणता मार्ग तरि धरूं ।
किति म्हणुनि चित्त आवरूं ॥
टीप ॥ आवरूं अंतरंगा ॥ कधीं० ॥ १ ॥
गोपीवल्लभा, वल्लभा गोपवेषा । कधीं दाविशी पादरेषा ॥
¹वोस तुजविणा, तुजविणा दाहि दीशा । विरही जाल्या वृत्ति पीशा ॥
चाल ॥ जीव घाबरा ।
भवनदी खोल भोंवरा ।
बुडतों या जी! सांवरा ॥
टीप ॥ सांवरा लाग वेगा ॥ कधीं० ॥ २ ॥
जाहली बहू, बहू वाढ वेळा । कठिणता धरिलि हृदयकमळा ॥
काय म्हणुनियां, म्हणुनियां जी ²घननीळा! । त्वां धरियलें विश्वपाळा! ॥
चाल ॥ दिनोद्धारणा ।
भक्तवत्सल भयहरणा ।
ऐकुनि माझी करुणा ॥
टीप ॥ करुणा लाग वेगा ॥ कधीं० ॥ ३ ॥
भगिनी द्रौपदी, द्रौपदी तिच्या काजा । कसा धांवलासि महाराजा! ॥
वस्त्र पुरविले, पुरविले तिच्या लाजा । त्वां रक्षिलें महाराजा! ॥
चाल ॥ होसि सज्जना ।
सांवळ्या दुःखभंजना ।
अपमानस कुरु दुर्जना ॥
टीप ॥ दुर्जना गर्वभंगा ॥ कधीं० ॥ ४ ॥
प्रभु गुरुवरा, गुरुवरा नाथराया । शरणागत आलों पायां ॥
ऐकें करुणा, करुणा पूर्ण सदया । दिसोंदिस झिजतसे काया ॥
चाल ॥ झालि बावरि ।
अविलंबें ये तांतडी ।
जिविंचा तूं जिवलग गडी ॥
टीप ॥ गडी आत्मलिंगा ॥ कधीं० ॥ ५ ॥
करुणा भाकिते, भाकिते दीनरजनी । दीनबांधवा मोक्षदानी ॥
ऐकें करुणा, करुणा माझि श्रवणीं । केले अपराध मना नाणीं ॥

१. उजाड, ओस. २. घनश्यामा!

चाल ॥ पतितपावना ! ।
सांवळिया नारायणा ! ।
भवपाशबंधछेदना ! ॥
छेदनादि निःसंगा । देवनाथासि नुपेक्षि कदा ॥ माझि० ॥ ६ ॥

## पद ४३ वें.

भवपुरिं बुडतों हरि ! तारीं मज भीमातिरवासिया ! ।
धांउनी ये पंढरिराया ! ॥ ध्रुवपद. ॥
दुहिता[1] सुत गृह दार धनी मनिं जडली आशा ।
घातला मोह गळां फांसा ॥
घाबरला जिव काय करूं न पुरे मला धिंवसा[2] ।
बैसला टपत काळ उसा ॥
लवपलक्षण[3] हरावया दया नये करूं योग कैसा ।
सांग बा सांग श्रीनिवासा ! ॥
चाल ॥ तूं करुणसागर हरि ।
मम भवदुष्कृत[4] संहरीं ।
कर देउनियां सांवरीं ॥
टीप ॥ दीननाथ दिनबंधु दयाळा विनविले पायां । धांउनी० ॥ १ ॥
गर्भवास दुःखास सोशिलें, जननीउदरकमळीं ।
पातलों बाहिर ते वेळीं ॥
वृथाच परि खोविलें बाळपण मुलांसवें खेळीं ।
विषय भोगिला तरुणकाळीं ॥
क्षीण दिसोदिस काया वृद्धपणीं जरा येउनि कवळी ।
गलित इंद्रियें झालीं सगळीं ॥
चाल ॥ सुतदारादिक दुर्धरीं ।
हांसती पिशुनें सोयरीं ।
सोसेना दुःख अंतरीं ॥
टीप ॥ म्हणउनि तुज प्रार्थिलें कांहीं तरि दया येउं दे हृदया । धांउनी० ॥२।
वात पित्त कफ बहुत रोग हे तनु ग्रासिली येणें ।
उपायान्तर कांहीं नेणें ॥

---

१. मुलगी. २. उत्कंठा, हव्यास. ३. क्षणभर. ४. संसारांतील पाप.

बहु दुःखें दुखविलों दयाळा ! काय गति करणें ।
गुज हृदयींचें कोण जाणे ॥
एका तुजविण दयानिधे! ऐकुनि मम करुणे ।
सांग बा ! कोण करिल धांवणें? ॥
चाल ॥ त्वरितगति **गरु**डावरि बैसूनि ।
अवलंबे येई येक्षणीं ।
दाखवीं रूप लोचनीं ॥
टीप ॥ भवभयसंहारका ये **य**दुनायका परमसदया । धांउनी० ॥ ३ ॥
गोकुलपति **गो**विंदा श्री**गुरु**वरा दिनोद्धारा ।
गोपीपती गोरसचोरा ॥
**नं**दतनय गोवळ्या अरे सांवळ्या ! निर्विकारा ।
विमलरूपा विश्वाधारा ॥
शिणत गिरा[1] **शे**षाची श्रुतिही थकित न कळे पारा ।
परमपुरुषा पतितोद्धारा ॥
चाल ॥ पावना बुधमानसमोहना ।
कमललोचना कलुषदहना[2] ।
कर्ममोचना पक्षिवहना ॥
टीप ॥ **दे**वनाथप्रभु दाव्या बाह्या कवळुनि भेटाया । धांउनी० ॥ ४ ॥

## पद ४४ वें.

**विठ्ठल** त्रैअक्षराक्षरातित अनुभव गुरुपुत्रा ।
तन्मय झाल्या वृत्ति जेणें सेविलि गुरुमात्रा. ॥ ध्रुवपद. ॥
विहिताविहितविचारण जें तें सभराभर सर्वीं ।
विजाति ना तें सजात म्हणणें पदार्थ ना पदवी ॥
विधिनिषधाचा विटाळ नातळे नांत मध्य पूर्वीं ।
विकासलें तें विश्व विलासे चिद्वस्तु बरवी. ॥ **विठ्ठल**० ॥ १ ॥
ठक्क पडले श्रुतिशास्त्रपुराणा निगम मौन पाठ ।
ठळक स्वानंदाची उसळे सुखसिंधुलाट ॥
ठळ ठळ ठळ ठळ ठसलें जेणें पडली ऐक्यगांठ ।
ठसले श्रीगुरु गोविंद कृपे उजळे आत्मदीठ. ॥ **विठ्ठल**० ॥ २ ॥

---

१. वाणी. २. पापनाशका.

लक्षालक्षातीतरूप जें रूप अरूप अमले ।
लक्षण वर्णन नोहे जयाचें शेषहृदय शिणलें ॥
लहरी जयाची अतूट ते गुरुभक्तां अनुसरले ।
लवण जळीं जसें देवनाथ मन स्वानंदीं भरलें. ॥ विठ्ठल० ॥ ३ ॥

### पद ४५ वें.

पांडुरंग स्मर अभंग भंग या भवा ।
संतसंग साधि रंग नीजवैभवा. ॥ ध्रुवपद. ॥
योग याग तपन चांग साध्यता घडे ।
करिसि सांग साधनांग देह कोरडे ॥
वदसि वाग्विलास[1] शब्दज्ञान चोखडे[2] ।
आत्मप्राप्तिविना जाण नुगवि सांकडें[3]. ॥ पांडुरंग० ॥ १ ॥
करिसि साधनासि आस धरुनियां मना ।
श्रमसि व्हावयासि हेतु पूर्ण कामना ॥
क्षीण व्यर्थ गमत सर्व भ्रमसि सज्जना ।
स्मर हरीस पाश तुटति चुकति यातना. ॥ पांडुरंग० ॥ २ ॥
सजल जलद[4]श्यामल हरि अंतरीं स्मरे ।
गुरु कृपाळ चुकवि काळ वांछिलें पुरे ॥
भव ढिसाळ हा विशाळ भास तैं नुरे ।
देवनाथ जपत नाम निजसुखा भरे. ॥ पांडुरंग० ॥ ३ ॥

### पद ४६ वें.

विठोबा व्यापक जनिंविजनीं. ॥ ध्रुवपद. ॥
भीमरथीतटीं नांदतसे हरि । निजजनसुखदानी. ॥ विठोबा० ॥ १ ॥
अरुप रूप जे पूर्ण निरामय[5] । अद्वय एकपणी. ॥ विठोबा० ॥ २ ॥
देवनाथप्रभु आत्मा गोविंद । पाहे निजनयनीं. ॥ विठोबा० ॥ ३ ॥

### पद ४७ वें.

सये ग बाई! पुरला मनिंचा हेतु ।
देखिला विठो पंढरिचा फिटलीं मीतूं. ॥ ध्रुवपद. ॥

---

१. वाक्चातुर्य. २. सुंदर. ३. संकट. ४. मेघ. ५. रोग(आमय)रहित.

कानडा देव सांवळा विटेवरी उभा ।
ववघवित म्यां देखिली गजाची शोभा ॥
[1]कासिला पितांबर कासे प्रकाशली प्रभा ।
वेदश्रुति वर्णिति ज्यातें सच्चितगाभा ॥
................................................ ।
................................................ ॥
टीप ॥ भक्तांचें साह्य करितो दुष्टाघातू । देखिला० ॥ १ ॥
भीमातिरिं नांदे बाई! नाथ दीनाचा ।
वेदश्रुति वर्णिति सये ग! महिमा ज्याचा ॥
जे स्थळिं पुरला बाई! काम योगियांचा ।
विभु नांदतसे पंढरि पति रुक्मिणीचा ॥
भक्तां आणि अभक्तां जो समगतिचा ।
जिव्हाळा किं ग बाई! विश्वाचा ॥
टीप ॥ लीला हे तुमगे शेषा झाली मातू । देखिला० ॥ २ ॥
[2]सनक सनंदन सनकादिकमुनि ध्याती ।
आराध्य दैवत त्याच चिद्घनमूर्ति ॥
[3]शुक वामदेव [4]प्रऱ्हाद भक्त अति सुमती ।
रक्षिला पित्यानें छळिता अभिनव शक्ति ॥
नारायण हरि गोविंदा करुणा उक्ति ।
ऐकतां धांवला विभु जो अतिनिजप्रीती ॥
टीप ॥ प्रगटोनि स्तंभांतरीं मारिला दैत्यू । देखिला० ॥ ३ ॥
नुपेक्षी शरणागता आलिया द्वारी ।
हरि पावन कीं [5]पैतिताचा दास साहाकारी ॥

---

१. नेसिला. २. पृष्ठ ४५ टीप २ पहा. ३. पृष्ठ ४५ टीप १ पहा. ४. प्रऱ्हाद हा हिरण्यकशिपूस कयाधूपासून झालेला ज्येष्ठ पुत्र. हा भगवन्निष्ठ आणि विष्णूचा उपासक म्हणून पित्यानें ह्याचा छळ केला. परंतु पुढें परमभागवताच्या सेवेनें प्रसन्न होऊन विष्णूनें नृसिंहाचा अवतार धारण करून याच्या पित्याच्या वध केला आणि याचें संरक्षण केलें.—अशी कथा आहे. (भागवत सप्तम स्कंध, अध्याय १-१० पहा.) ५. पापी जनाचा.

हा अजामीळ[1] आणि गणिका[2]वेश्यानारी ।
तारिले पतित कीं मागे अतिशय भारी ॥
वेदांसी पडलें मौन वर्णितां थोरी ।
काळातित कालिय[3]मर्दन भिवरातिरीं ॥
टीप ॥ पार्वतीपती शिव ध्यातो हृदयाआंतू । देखिला० ॥ ४ ॥
श्रीरुद्ररूपें लाधली सोयरा मोठी ।
सद्गुरुनाथ गोविंद देखिला दृष्टी ॥
श्रीरुद्रनाथ गोविंद विठ्ठल त्रिपुटी ।
ऐक्यत्व जाहलें ठायीं पडली मीठी ॥
देखिले पूर्ण परब्रह्म जगजेठी[4] ।
मोहक तुटला भास कल्पना खोटी ॥
टीप ॥ स्वानंद देवनाथासी समरस युक्तू. । देखिला० ॥ ५ ॥

## पद ४८ वें.

पंढरपुरवासिनी विठाबाई! येई हो ।
सावळिया आनंदें कीर्तनीं विठाबाई ! येई हो ॥ ध्रुवपद. ॥
विठ्ठल भक्तांची माऊली । द्रौपदि हे बहिणुली ।
वैरियें गांजितां । ते वेळीं लज्जा त्वां रक्षिली ।
अद्भुत दाविला नवलाये ॥ पंढरपुर० ॥ १ ॥
अघभवजळ हा पुर दाटे । उसळति लाटा नेटें ।
कांहीं केल्या हा ना लोटे । संकट पडलें मोठें ।
जिव घाबरला करूं मी काये ॥ पंढरपुर० ॥ २ ॥
गजेंद्र[5] नक्रानें गांजितां । आळवि तुज भगवंता ।
केलें धांवणें अनंता । रक्षियलें निजभक्तां ।

१. पृष्ठ २९ टीप १ पहा. २. पृष्ठ २९ टीप २ पहा. ३. कालिय नांवाचा सर्प. हा यमुनेंत होता, म्हणून याच्या विषानें दूषित झालेलें डोहांतील पाणी पिऊन गोकुळांतील गुरेंवांसरें मरूं लागलीं. हें जाणून कृष्णानें कदंबवृक्षावरून मोठ्या वेगानें डोहांत उडी टाकून याला इतकें चेंचलें, कीं याचे प्राण कासावीस झाले. असें शासन झाल्यावर तो शरण आला, आणि तेथून निघून समुद्रांत राहावयास गेला. (भागवत स्कंध १० वा पहा.) ४. जगज्येष्ठ, जगामध्यें मोठा. ५. पृष्ठ २९ टीप ३ पहा.

दोघे उद्धरिले अति सदये ॥ पंढरपुर० ॥ ३ ॥
[1]माणकोजी बोधला भक्त भला । शरणागत तुज आला ।
छळितां अविंधें रक्षिला । वाढविलें कीर्तीला ।
सुख पदिं दिधला निज ठाये ॥ पंढरपुर० ॥ ४ ॥
[2]तुकारामाचे कीर्तनीं । उल्हासशी निज मनीं ।
अद्भुत तुझी करणी । भक्तां रक्षियलें निदानीं ।
पतितपावन हें ब्रीद माये ॥ पंढरपुर० ॥ ५ ॥
करुणा ऐकुनियां ये आतां । रखुमाईच्या कांता ।
आतां तूं तारीं देवनाथा अनाथा । शरणागत तुज आतां ।
हृदयीं आठवितों तव पाये ॥ पंढरपुर० ॥ ६ ॥

### पद ४९ वें.

श्रीगुरुचरणीं रतलें मानस न दिसे मज दुसरें ।
[3]समरस त्या चित्स्वरूपीं आतां आठव ना विसरे. ॥ ध्रुवपद. ॥
दैशिक रायें सोहं शब्दें गुज सांगुन करणी ।
अनुपम उपमे विरहित ते हें दाखविलें नयनीं ॥
घव घव घव घव प्रकाश पडला उदय स्वात्मकिरणीं ।
स्वयंभ तेजःपुंज विकसले चिद्रुपहृद्भुवनीं ॥
चाल ॥ व्यापक अद्वय अवीट ।
भरला सघन [4]घनदाट ।
तेथें शब्दा न फुटे वाट ॥
टीप ॥ अनुभविं पाहाता निर्विकारे ॥ समरस० ॥ १ ॥
गुणातीत जे निर्गुण म्हणती मुळ ॐकाराचे ।
स्वतेज तेजें विलसे न दिसे नाम विकाराचे ॥

---

१. हा धामणगांवचा पाटील होता. याचें आडनांव जगताप. जातीचा शूद्र. ह्याच्या बायकोचें नांव ममताई. मुलाचें नांव यमाजी. मुलाच्या बायकोचें नांव भागिरथी. हीं सर्व माणसें त्याचे सारखींच भगवद्भक्त होतीं. विशेष माहिती भक्तविजय अध्याय ५३ यांत पहावी. २. हा पंढरपुरच्या पांडुरंगाचा एक भक्त होता. हा शालिवाहन शके १५३० मध्यें देहूस जन्मला. हा जातीचा वाणी होता, ह्याला दोन बायका होत्या. पहिली बायको दमेकरीण होती, ती लवकरच वारली. दुसरी बायको जिजाबाई ही मोठी कर्कशा होती; ह्याच्या सत्राव्या वर्षी त्याची आईबापें वारलीं. ह्याचा मृत्यु शके १५७१ त झाला, ह्याचे अभंग पुष्कळ आहेत. विशेष माहिती भक्तविजय अध्याय ४८ व ४९ यांत पहावी. ३. एकरस, ब्रह्मानंद. ४. गच्च भरलेला.

काळे पिवळे ढवळे नव्हे ते अन्य प्रकाराचे ।
ज्याच्या भासें भासे हें वचन श्रुतिकाराचें ॥
चाल ॥ भासातित जेथें वस्तु ।
पाहातां गाळुन्या मी तूं ।
चिन्मय शिखागत तंतू ॥
टीप ॥ अनुभवी गवसल सारें ॥ समरस० ॥ २ ॥
नामरूप ना गुण वर्ण ज्या पोट नसे पाटी ।
निघोट जे अतिदाट घोटले व्यापुनियां सृष्टी ॥
ध्येय ध्याता ध्यान धारणा आटोनिया त्रिपुटी[1] ।
पाहता पाहता पाहणें विरालें समावलें पोटीं ॥
चाल ॥ दाविले दिटि गुरु गोविंदें ।
रतला देवनाथ छंदें ।
धालें मन ब्रह्मानंदें ॥
टीप ॥ लाधलें सुख परात्परें ॥ समरस० ॥ ३ ॥

## पद ५० वें.

सद्गुरू मायबापा! ये त्वरें नाथराया! ॥ ध्रुवपद. ॥
हिंडतां कष्टलों मी चौऱ्यायशीलक्ष[2] योनी ।
निजभाग्यें प्राप्त झाला नरदेह पुण्यखाणी ॥
सत्संग धरुनि येथें निजठाव तुझे चरणीं ।
टीप ॥ भ्रमवोनि चित्त माझें वसविली मायराणी ॥ सद्गुरू० ॥ १ ॥
सुत स्नुषा[3] गळां घाली आणोनि मोहपाशा ।
भ्रमविलें चित्त माझें सोयऱ्या श्रीनिवासा ! ॥
नचलेच कांहीं देवा! उपाय करूं कैसा ।
टीप ॥ ये धांव त्वरें आतां धरवेना मला धिर्वसा[4] ॥ सद्गुरू० ॥ २ ॥
वासना मला गोंवी[5] हिंडवि देशोदेशा ।
सेववी धनिकदारा धरुनियां द्रव्यआशा ॥
बुडविलें स्वहित येणें जाहल्या वृत्ति पीशा ।
टीप ॥ मी काय करूं आतां सांवळ्या[6] पंढरीशा ! ॥ सद्गुरू० ॥ ३ ॥

---

१. ज्ञान, ज्ञाता आणि ज्ञेय; ध्यान ध्याता आणि ध्येय. २. पृष्ठ ४८ टीप १ पहा. ३. सून.
४. धैर्य, उत्कंठा, हव्यास. ५. बांधी, गुंतवी. ६. श्यामला.

घाबरा जीव झाला दुःख हें सोसवेना ।
सद्गदित कंठ माझा शब्दही बोलवेना ॥
काढिबा काढि वेगीं लोचनीं पाहावेना ।
टीप ॥ जग त्रिविध भाग्रणाचा शब्दही ऐकवेना ॥ सद्गुरू० ॥ ४ ॥
कितितरी अंत पाहासी कां दया येईना जी ।
मी पतित भारी म्हणता उपेक्षा पावना ! जी ॥
तुझि ब्रिदावळी कैसी हे दीनतारणा जी ।
टीप ॥ परिसावि ग्लानि माझी रुक्मिणीजिवना जी ॥ सद्गुरू० ॥ ५ ॥
देवनाथ प्रभुदाला न लागि वेळ यावें ।
हिनदीन पतित तूझा प्रार्थितों प्रेमभावें ॥
तूं जननि, तानुलें मी, [1]वोसंगिं मला घ्यावें ।
टीप ॥ पाजोनि प्रेमपान्हा निजस्वरूपा दाखवावें ॥ सद्गुरू० ॥ ६ ॥

## पद ५१ वें.

गुरू दयाळा परम कृपाळा ! बुडलों भवडोहीं ।
तारि तुजविना कोणी नाहीं ॥ ध्रुवपद. ॥
कर्मविपाकें जननीजठरीं[2] नवमास राहीलों ।
तेथें मळमूत्रानें कढलों ॥
जातवेद[3] संतप्त जाळी बहुतचि श्रमी जालों ।
आजि तदनंतर जन्मलों ॥
सोहं[4] मुळींचें स्मरण बुडालें कोहं मुखिं वदलों ।
भ्रांति अज्ञानतिमिरिं[5] पडलों ॥
चाल ॥ खेळ खोविले बाळपण ।
आलें धडधडित तारुण्य ।
गुंतलें विषयावरि मन ॥
टीप ॥ जसा मिन गळाचिये ठायीं ।
चालेना उपाय करुं कायी ॥ गुरू० ॥ १ ॥

---

१. उत्संगीं, अंकीं. २. पोटांत. ३. अग्नि. ४. प्राणी गर्भांत असतो तोंपर्यंत 'सोऽहं' म्हणजे मी ईश्वर आहें असें म्हणतो, जन्मास आला म्हणजे 'कोंऽहं' म्हणजे मी कोण आहें असें म्हणतो आणि पुढें मोठा होऊन त्यास समजूं लागलें म्हणजे 'अहं' म्हणजे 'मीच काय तो आहें' असें म्हणतो, म्हणजे ईश्वरास विसरतो. (नवनीत, पृष्ठ ३७४.) ५. काळोखांत.

प्रीत स्त्रियेची भारी म्हणुनी नृपती अर्जविले ।
द्रव्य हें बहुत मिळवीलें ॥
प्रपंच खटपट करितां शिणलों वय सर्वहि गेलें ।
नाहिं श्रेष्ठाचें ऐकीलें ॥
कन्या सुत दारा धन साचे मानुनि मन भुललें ।
जें जें करूं नये तें केलें ॥
चाल ॥ कळा चातुर्य नीज अंगीं ।
रतलों विषयाचे संगीं ।
चेतना[1] नाहीं अंतरंगीं ॥
टीप ॥ मिळाले व्याही जावाई ।
त्याच सौख्यांत मस्त पाही ॥ गुरू० ॥ २ ॥
दो प्रहराची छाया संपत गेली बापुडी ।
आलें दारिद्र हुडहुडी ॥
प्रारब्ध उलटें पडलें करितां श्रम न मिळे कवडी ।
जीव हा दुःखित चरफडी ॥
अळंकार वस्त्राचे लोभें स्त्री तडतड तोडी ।
मागे द्रव्याची गांठोडी ॥
चाल ॥ असें मन भवजाळीं फसलें ।
शेखिं[2] तारुण्य तेंहि गेलें ।
जरेनें ठाणें बसवीलें ॥
टीप ॥ झालि शक्ति हे क्षीण ठायीं ।
चढली नयनांवर शाई ॥ गुरू० ॥ ३ ॥
श्रवण झाले बधिर कांहीं दिसेचिना डोळा ।
झालों अविचारि आंधळा ॥
[3]दीर्घ लैहूचे कठीण पडले नाडि झाल्या गोळा ।
हासती पिशुनांचा[4] मेळा ॥
स्त्रीपुत्रादिक त्रास मानिती करिती कंटाळा ।
ऐशी कठिण आलि वेळा ॥
चाल ॥ सोसेना दुःख अतिभारी ।

---

१. जीवित्व, चलनवलन शक्ति. २. शेवटीं. ३. दीर्घशंका आणि लघुशंका यांचे. ४. दुष्टांचा.

म्हणउनि आलों तुझे द्वारीं ।
करुणार्णवा[1] ! मला तारी ॥
टीप ॥ अर्पिलें चित्त तुझे पायीं ।
नाथजी ! अभय त्वरें देई ॥ गुरू० ॥ ४ ॥
पतितपावना राखी ऐशी लाज ब्रिदाची ।
माउलि होसी अनाथाची ॥
शरणागत वत्सल उभये करि ध्वजा कीर्तीची ।
हेतो गाही[2] निगमाची[3] ॥
मायबाप आणि ताप निवे करी छाया कृपेची ।
कल्पना वारी चित्ताची ॥
चाल ॥ सद्गुरूनाथा श्रीरंगा ।
देइं मज पायिं तुझे जागा ।
नेइं मज भवभ्रांतीभंगा ॥
टीप ॥ सावळे माय विठाबाई ! ।
सर्वदा मम हृदयीं राही ॥ गुरू० ॥ ५ ॥
देवनाथ म्हणे विनंति ऐकिजे या रुक्मिणिरमणा ! ।
सोयऱ्या नाथा जगजीवना ॥
याचक असें मी द्वारीं उभा नोपेक्षी गरुडवहना ! ।
देइं मज भजनप्रेमदाना ॥
चाल ॥ सच्चिदानंदा जगजेठी ।
येउंदे दया तुझे पोटीं ।
न लावि उशिर देइं भेटी ॥
टीप ॥ माझे कनवाळु आई ।
देइं मज प्रेम चहू बाही ॥ गुरू० ॥ ६ ॥

पद ५२ वें.

धन्य श्रीगुरू, श्रीगुरूनाथराणा ।
नवल दाखविं मुखिं वदवेना ॥ ध्रुवपद. ॥
सखे दैशिकें, दैशिकें नवल केले ।
धरुन कर उलटें चालवीलें ॥
पंचसोपान[4], सोपान उलंघीले ।

---

१. दयासागरा ! २. साक्ष, ग्वाही. ३. वेदाची. ४. शिडी, पायऱ्यांचा जिना.

प्रकाशें भुवनत्रय भरलें ॥
तेज अद्भुत, अद्भुत पाहवेना । नवल० ॥ १ ॥
पाहे मी जिकडे, तिकडे तेंचि भासे ।
भासणें समूळही नाशे ॥
अखिल[1] निजवस्तु, निजवस्तु पूर्ण विलसे ।
बाह्यांतर व्यापोनि दिसे ॥
देखणेपणा, पणा ठाव न दिसे ।
मनत्वा मनपण मुकलेंसे ॥
बुद्धि पांगुळी, पांगुळी वर्णवेना । नवल० ॥ २ ॥
श्वेत रक्त ना, रक्त ना पीत शाम ।
पूर्ण रंगातीत निःसीम ॥
अचल अक्षय, अक्षय परंधाम ।
वर्णितां थकित श्रुति निगम[2] ॥
सद्गुरुकृपे, कृपे अतिसुगम[3] ।
जाणती अनुभविं हे वर्म[4] ॥
शब्दज्ञानिया, ज्ञानिया आकळेना । नवल० ॥ ३ ॥
पूर्ण श्रीधनी, धनी गुरुगोविंद ।
अद्वय चिद्घन[5] सुखकंद ॥
कृपे दीधला, दीधला अभय वरद ।
महावाक्याचा[6] निजशब्द ॥
कर्णि सांगुनी, सांगुनी दावि निषेध ।
देवनाथासि निजानंद[7] ॥
प्राप्त जाहला, जाहला सांगवेना । नवल० ॥ ४ ॥

### पद ५२ वें.

गुरुतर सुख मज प्राप्त सये! सद्गुरु वाक्य बोधी ।
गलितभेद[8] भवभ्रांति फीटली झालि आत्मशुद्धी. ॥ ध्रुवपद. ॥

---

१. सर्व. २. वेद. हे वेद चार आहेत. त्यांचीं नांवें:—ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्वणवेद. ३. अतिसुलभ. ४. गुह्य. ५. ज्ञानघन. ६. उपनिषदांतील महावाक्याचा. ७. आत्मानंद. ८. स्वपर हा भेद.

नवल गुरूचा बोध रिपू हा कामक्रोध गळला ।
लोभ दंभ मद मोह सुबोधें मर्दियला मेला ॥
विवेक आणि वैराग्य स्थापुनि निजशांती विमला ।
प्राप्त तरी हे गुप्त समजले शुद्ध भाव फळला ॥
भावाभाव शांती झाली श्रीगुरू आप्त केला ।
चिद्धन घननिज मेघ साजनी! गुरुकृपे वळला ॥
टीप ॥ क्षणभंगुर जगडंबर माया निरसली[1] आधी । गलितभेद० ॥ १ ॥
गुरुवर पदरज वंदिताचि शिरिं कुबुद्धि मुख फिरले ।
सद्बुद्धि सखि शांति सुलिनता गृहांत हे शिरले ॥
चिद्धन घनसुखसार त्यजुनि आसार मनें वरिले ।
कोटि रवि लज्जीत स्वरूप ते हृदयभुवनीं भरले ॥
गुप्त गंगेचा थाट सभर घनदाट उगमिं शिरले ।
उगमरूप मग मीच पाहता कांहीं नसे उरले ॥
टीप ॥ चंचळ जळ नदी सर्व आटली निश्चयात्मबुद्धी । गलितभेद० ॥ २ ॥
अनादिची निज वस्तु गुरुनें दाखविली नयनीं ।
पाहाताचि मन तन्मय समरस[2] वृत्ति मिळे शून्यीं ॥
शून्य विसरले निखिल ऊरला प्रकाश चिद्गगनी[3] ।
अनुभव हा जिव शीव आटला व्योमशशी[4] तरणी[5] ॥
देवनाथ तो नाथ तोचि तो एक जनीं विजनीं[6] ।
साक्षिरूप ध्या लक्ष लावुनी अनुभव ध्या कोणी ॥
टीप ॥ दया गुरूची समाधि साची वरिली निरुपाधी । गलितभेद० ॥ ३ ॥

## पद ५४ वें.

दाता धन्य गुरू हो धन्य गुरू । जो भवसागरिं तारू. ॥ ध्रुवपद. ॥
जो कीं ईक्षणमात्रें । स्वरुपी रमवी सत्तासूत्रें ॥ दाता० ॥ १ ॥
मस्तकिं दे अभयकर । ब्रह्मचि दाखवि विश्व चराचर[7] ॥ दाता० ॥ २ ॥
तोडुनिया आपदांतें[8] । दे जो निजसुख स्वात्मपदातें ॥ दाता० ॥ ३ ॥
श्रीगोविंद दयाघन । देवनाथ ब्रह्मचि निजनवन ॥ दाता० ॥ ४ ॥

---

१. नाहींशी केली. २. एकरस, ब्रह्मानंद. ३. ज्ञानरूप आकाशांत. ४. आकाशांतील चंद्र. ५. सूर्य. ६. अरण्यांत, एकांतांत. ७. स्थावर जंगम. ८. दुःखांतें.

## पद ५५ वें.

कृपा होतां श्रीगुरुराजयाची । तृप्ति झाली अनुभवीं आज याची ॥ ध्रुवपद. ॥
आत्मस्वरूपीं रमविले गुरुरायें । कृपा केली हे मुखें वदो काय? ॥कृपा०॥१॥
जेथें जेथें हे फिरे निजदृष्टी । ब्रह्मरूप हे चोजवित सृष्टी ॥ कृपा०॥ २ ॥
केली उघडी हे आत्मरत्न पेटी । निजवृत्तीची वरी पडे मिठी ॥कृपा०॥३॥
[1]सोहंशब्दें फुंकूनि कर्णद्वारीं । दावी नयनी हे ब्रह्म चराचरी ॥कृपा० ॥४॥
धन्य धन्य गोविंद गुरु दाता । कृपे दिधला स्वानंद देवनाथा॥ कृपा०॥५॥

## पद ५६ वें.

गुरुनाथजीचें स्वरूप । निज नयनिं दाटलें जी ॥
घालितां मुळी दिठी निज सार भेटल जी ।
संशय भंगला हा बंधन तुटल जी ।
टीप ॥ आभास व्यर्थ झाला । मृग तोय आटल जी ॥ गुरु० ॥ १ ॥
नश्वर सुखालागी मानस विटल जी ।
अज्ञान भ्रांतिजाळ हे पडळ फीटल जी ।
माय या अविद्येचे हे वसन फाटल जी ।
टीप ॥ हृद्गगनी आत्म रविच निज तेज थाटल जी ॥ २ ॥
विश्व हे ब्रह्म अघव अनुभवे वाटल जी ।
संचित क्रियमाण प्रारब्ध काटल जी॥
समरसे चिदानंदी हे चित्त लोटल जी ।
टीप ॥ जन्म हे मरण मिथ्या भय सर्व खुंटल जी ॥ ३ ॥
गोविंददातयाचे मानस तुष्टल जी ।
निज कृपादान देता सबाह्य वेष्टल जी ।
तेणे भेद कल्पनेचें मृदु भांड तूटल जी ।
टीप ॥ निज सूख देवनाथा हृदयी प्रगटल जी ॥ ४ ॥

## पद ५७ वें.

आहो आहो गुरुराजया ।
क्षमा करी अपराध क्षमानिधी ॥ ध्रुवपद. ॥

---

१. मागें पद ५० वें पहा.

नवल गुरूचा बोध रिपू हा कामक्रोध गळला ।
लोभ दंभ मद मोह सुबोधें मर्दियला मेला ॥
विवेक आणि वैराग्य स्थापुनि निजशांती विमला ।
प्राप्त तरी हे गुप्त समजले शुद्ध भाव फळला ॥
भावाभाव शांती झाली श्रीगुरू आप्त केला ।
चिद्धन घननिज मेघ साजनी! गुरूकृपे वळला ॥
टीप ॥ क्षणभंगुर जगडंबर माया निरसली आधी । गलितभेद० ॥ १ ॥
गुरुवर पदरज वंदिताचि शिरिं कुबुद्धि मुख फिरले ।
सद्बुद्धि सखि शांति सुलिनता गृहांत हे शिरले ॥
चिद्धन घनसुखसार त्यजुनि आसार मनें वरिले ।
कोटि रवि लज्जीत स्वरूप ते हृदयभुवनीं भरले ॥
गुप्त गंगेचा थाट सभर घनदाट उगमिं शिरले ।
उगमरूप मग मीच पाहता कांहीं नसे उरले ॥
टीप ॥ चंचळ जळ नदी सर्व आटली निश्चयात्मबुद्धी । गलितभेद० ॥ २ ॥
अनादिची निज वस्तु गुरूनें दाखविली नयनीं ।
पाहाताचि मन तन्मय समरस[२] वृत्ति मिळे शून्यीं ॥
शून्य विसरले निखिल ऊरला प्रकाश चिद्गगनी[३] ।
अनुभव हा जिव शीव आटला व्योमशशी[४] तरणी[५] ॥
देवनाथ तो नाथ तोचि तो एक जनीं विजनीं[६] ।
साक्षिरूप घ्या लक्ष लावुनी अनुभव घ्या कोणी ॥
टीप ॥ दया गुरूची समाधि साची वरिली निरुपाधी[१] । गलितभेद० ॥ ३ ॥

## पद ५४ वें.

दाता धन्य गुरू हो धन्य गुरू । जो भवसागरिं तारू. ॥ ध्रुवपद. ॥
जो कीं ईक्षणमात्रें । स्वरुपी रमवी सत्तासूत्रें ॥ दाता० ॥ १ ॥
मस्तकिं दे अभयकर । ब्रह्मचि दाखवि विश्व चराचर[७] ॥ दाता० ॥ २ ॥
तोडुनिया आपदातें[८] । दे जो निजसुख स्वात्मपदातें ॥ दाता० ॥ ३ ॥
श्रीगोविंद दयाघन । देवनाथ ब्रह्मचि निजनवन ॥ दाता० ॥ ४ ॥

---

१. नाहींशी केली. २. एकरस, ब्रह्मानंद. ३. ज्ञानरूप आकाशांत. ४. आकाशांतील चंद्र. ५. सूर्य. ६. अरण्यांत, एकांतांत. ७. स्थावर जंगम. ८. दुःखांतें.

## पद ५५ वें.

कृपा होतां श्रीगुरूराजयाची । तृप्ति झाली अनुभवीं आज याची ॥ ध्रुवपद. ॥
आत्मस्वरूपीं रमविले गुरूरायें । कृपा केली हे मुखें वदो काय? ॥कृपा०॥१॥
जेथें जेथें हे फिरे निर्जदृष्टी । ब्रह्मरूप हे चोजवित सृष्टी ॥ कृपा०॥ २ ॥
केली उघडी हे आत्मरत्न पेटी । निजवृत्तीची वरी पडे मिठी ॥कृपा०॥३॥
[1]सोहंशब्दें फुंकूनि कर्णद्वारीं । दावी नयनी हे ब्रह्म चराचरी ॥कृपा० ॥४॥
धन्य धन्य **गो**विंद गुरु दाता । कृपे दिधला स्वानंद **दे**वनाथा॥ कृपा०॥५॥

## पद ५६ वें.

गुरुनाथजीचें स्वरूप । निज नयनिं दाटलें जी ॥
घालितां मुळी दिठी निज सार भेटल जी ।
संशय भंगला हा बंधन तुटल जी ।
टीप ॥ आभास व्यर्थ झाला । मृग तोय आटल जी ॥ गुरु० ॥ १ ॥
नश्वर सुखालागी मानस विटल जी ।
अज्ञान भ्रांतिजाळ हे पडळ फीटल जी ।
माय या अविद्येचे हे वसन फाटल जी ।
टीप ॥ हृद्गगनी आत्म रविच निज तेज थाटल जी ॥ २ ॥
विश्व हे ब्रह्म अघव अनुभवे वाटल जी ।
संचित क्रियमाण प्रारब्ध काटल जी॥
समरसे चिदानंदी हे चित्त लोटल जी ।
टीप ॥ जन्म हे मरण मिथ्या भय सर्व खुंटल जी ॥ ३ ॥
गोविंददातयाचे मानस तुष्टल जी ।
निज कृपादान देता सबाह्य वेष्टल जी ।
तेणे भेद कल्पनेचें मृदु भांड तूटल जी ।
टीप ॥ निज सूख **दे**वनाथा हृदयी प्रगटल जी ॥ ४ ॥

## पद ५७ वें.

आहो आहो गुरूराजया ।
क्षमा करी अपराध क्षमानिधी ॥ ध्रुवपद. ॥

---

१. मागें पद ५० वें पहा.

हीनदीन मतिमंद परि तव दास म्हणवि निरद्वंद्व
करुनि निजपदारविंदी स्थिर राखी मम बुद्धी ॥ १ ॥
नामामृतरसपान करवि भव हरवि नुरवि रति
भरवि स्वरूप हृदि सरवि माय उपाधी ॥ २ ॥
श्रीमद्गुरुवर परमसदयकर अभयवरदकर
पूर्ण निरंतर देही भोगवी उघड समाधी ॥ ३ ॥
देवनाथ प्रभु सदानंद स्वानंदकंद गोविंद
कृपाळु भेदरहित आभेद कृपांबुधी ॥ ४ ॥

---

## उपदेशपर पदें.

### पद ५८ वें.

गडिया ! नदि दूथडिया भरली सद्गुरु करि सांगडिया ॥ ध्रुवपद. ॥
वासव[1]सम मी मानिसि पाहुनि मालाच्या कोठडिया ।
हर्षें अतिउत्कर्षें बांधिसी द्रव्याच्या गाठोडिया ।
पर्वकाळिं त्या धर्मे न कवडी केला रे आठोडिया ।
समजे मनिं हे घातक हाणोनि फोडिल यम होटडिया ॥ गडिया० ॥ १ ॥
हेम[2]भूषणें गळां अलंकृत मिरविशि किति चोकडिया ? ।
................................................ ।
नवग्रह पौच्या हिरकणि मुदिया मणगटि घालुनि कडिया ।
सुख मानिसि परि नुमजसि हित हें नकळत जाती घडिया ॥ गडिया० ॥ २ ॥
सप्तखणी ह्या उंच हवेल्या बांधिसि किति आवडिया ।
तऱ्हेतऱ्हेचे बैठक आयने[3] लावियल्या चोकडिया ।
काम सुनेरी वहुत मुलायम[4] चौरंडोल[5] हलकडिया ।
वर बैसुनिया कांते करिच्या खाशि किति तरि विडिया[6] ॥ गडिया० ॥ ३ ॥

### पद ५९ वें.

मग तूं ब्रह्म गड्या रे ब्रह्म गड्या । सोडि अहंमति[7] लुगड्या. ॥ध्रुवपद.॥
वैराग्याग्नि संगड्या[8] । पेटवी स्वरूपी घाली फुगड्या. ॥ मग० ॥ १ ॥

---

१. इंद्रासारखा. २. सुवर्णाचे अलंकार. ३. आरसे. हा शब्द फारशी आहे. ४. मुलाईम, मृदु, कोमल, सुंदर. ५. चवरडोल—हत्तीवर अंबारीसारखें बसायाचें वितानयुक्त आसन. ६. हें पद त्रुटित आहे. शोधकांनीं समग्र पद मिळविण्याचा उद्योग करावा अशी सविनय विज्ञापना आहे. ७. अहंकार. ८. शेगडी.

वेचिसि का भ्रमकवड्या । फोडी अहंकार मति उबड्या. ॥ मग० ॥ २ ॥
वृत्ति करूनी नि[1]धड्या । निघ निव लवकर जाती सुघड्या. ॥ मग० ॥३॥
द्वैताद्वैत ह्या बेड्या । तोडुनि चुकविसि यमभय रगड्या. ॥ मग० ॥ ४ ॥
चित्सागरीं दे सुबुड्या । पाहे देवनाथ प्रभु उघड्या. ॥ मग० ॥ ५ ॥

## पद ६० वें.

होईल काय गती रे । मूर्खा ॥ ध्रुवपद. ॥
विसरुनि या निज स्वरूपालागुनि । विषयीं रतली मति रे ॥ मूर्खा० ॥१॥
[2]अशाश्वत तनु समजुनि धरिसी । दाराधनीं प्रीती रे ॥ मूर्खा० ॥ २ ॥
वृद्धाप्ये तुज हें आल्या इंद्रियें । शक्ति मग गळती रे ॥ मूर्खा० ॥ ३ ॥
देवनाथ प्रभुनाथ निरं[3]जन । नाठविशी चित्तीं रे ॥ मूर्खा० ॥ ४ ॥

## पद ६१ वें.

तनु उत्तम हे श्रीनाथें तुजलागीं दिधली बा रे ।
करी भक्ति राघोबाची वाजवी हे नामनगारे ।
लागे संत गुरूच्या पायीं निजस्वरुपा सहज विचारे ॥ ध्रुवपद. ॥
योनि या लक्ष चौ[4]ऱ्याशी फिरतां तूं बहु श्रमलासी ।
मळमूत्र दा[5]थरामाजी नवमास गर्भ धरिलासी ॥
चाल ॥ भरताचि नेम दिवसासी ।
तनु बाहेर जन्मलासी ।
बालत्वदशा तुज ऐसी ॥
टीप ॥ लागता अविद्या वायु [6]सोहं मे श्रुति भुललासी ॥ तनु० ॥ १ ॥
बालत्व मुलांचे संगें खेळतां सर्व वीसरलें ।
येतांचि तरुण अवस्था मन कां[7]तेतें अनुसरलें ॥
चाल ॥ पशुवत् भ्रमवि[8]र्जनि फिरे रे ।
तृणविषयालागिं सरे रे ।
सुख मानि किमपि न फिरे रे ॥
टीप ॥ सुतदार मनीं धरि प्रीति विसरुनियां स्वहित बरें रे ॥ तनु० ॥ २ ॥
जातांचि तरुण अवस्था वृद्धत्व दशा तुज आली ।
क्षिण झालें तेज नेत्रांचें श्रवणाचि दे[9]वंता गेली ॥

---

१. धैर्यवान्, पराक्रमी. २. चिरकाल न राहणारे. ३. मायारहित (प्रभु). ४. पृष्ठ ४८ टीप १ ली पहा. ५. दाथर=उकाडा. ६. मागें पद ५० वें पहा. ७. स्त्रियेतें. ८. निर्जन प्रदेशांत. ९. ऐकण्याची शक्ति.

चाल ॥ वय वर्षें सत्तर भरलीं ।
तनुमाजी शक्ति विरा[1]ली ।
गृहदारमुलेंही फिरलीं ॥
टीप ॥ वहु वाटताति श्रम तेव्हां अतिदुःखें मति चा[2]चरली. ॥ तनु० ॥ ३ ॥
फिर मागें सत्वर आतां गुरुनाथा शरण रिघावें ।
सद्भाव धरुनियां हृदयीं तत्पदीं हें मन अर्पावें ॥
चाल ॥ वचनामृत पान करावें ।
मग निजगुज जिविंच धरावें ।
स्वस्वरूपीं चित्त विरावें ॥
टीप ॥ प्रभु देवनाथ स्मर भावें मरणें तरि जितेंच मरावें ॥ तनु० ॥ ४ ॥

**पद ६२ वें.**

अमोल [3]काया जाइल वायां जसी काच किं फुटे फटकन् ।
उभा काळ विक्राळ लक्षितो वेळ होय सावध झटकन् ॥ खुप समजा. ॥ ध्रुवपद. ॥
कृतिं त्रेतिं द्वापारीं होती आयुष्याची बहु भरती ।
कळीमाजि शतवर्षें नेमिलीं परि तींहि न भरति पहा पुरतीं ॥
बारा चौदा पंधरा विंशति पंचविसांमधिं किती मरती ।
मागें मेले पुढेंही मरणार कोण करिल याची गणती ॥
आजा काका मामा मेला याचि साक्ष घ्या चित्तीं ।
त्यांचे शोकें दुःखित मानस शेवट तुमची तेचि गती ॥
देह आपुला जाइल याहो धरा सोय कांहीं झटकन् ।
समय पातल्या उशिर न लागे गिळी काळ येउनि गटकन् ॥ खुप समजा. ॥१॥
हत्ती घोडे माल [4]खजीना कोणाची मंदिर माडी ।
शेवटिं जाइल कांहिं न राहिल काय धरुनि याची गोडी ॥
तारुण्याच्या भरें घालशिल विषयभरें दाटुनि फुगडी ।
आहा रांडेच्या ! समय कठिण तो जेव्हां काळ येउनि रगडी ॥
कांता सुंदर [5]रंभा जैशी तिची मनाला प्रित गाढी ।
जबरदस्त हा पाश स्त्रियेचा जशी कवाडा कुलुपकडी ॥
मोहसूसरी वोंगळ जी जळ पाय धरुन ओढी मटकन् ।
जशी [6]नंगि [7]समशेर देहाचे तुकडे तुकडे करि कटकन् ॥ फिर मागें. ॥ २ ॥

१. विरल, गलित झाली. २. वावरली. ३. देह. ४. हा शब्द फारशी आहे. ५. अप्सरा. ६. नग्न, उघडी. ७. तरवार. [हा शब्द फारशी आहे].

श्रीगुरु गोविंदनाथ निरंजन पादरेणु जेव्हां वरिला
आत्मात्मी ब्रह्मानुभव शुद्ध भाव तेव्हां कळला ॥
जिकडे पाहे तिकडे अवघा चराचरी चिद्घन भरला ।
देवनाथ म्हणणेंचि आटली लवण जळीं जैसा विरला ॥
विरला पुरला भरोनि उरला तो सुमनें गिळिला गटकन् ।
देहविदेही स्थिति वाणली जन्ममरण चुकलें खटकन् ॥ धन्य गुरु. ॥ ३ ॥

## पद ६३ वें.

उत्तम हा नरदेह तुला लाधला पूर्वभाग्यें ।
साधन ऐसें साध किं जेणें कीर्ति उरे मागें ॥ ध्रुवपद. ॥
धनकणसुत कामिनि हे मानुनि सत्य स्वमन भुललें ।
न सुचे निशिदिनीं दुसरें अनुही विषयसुखा रतलें ॥
लंपट होउनि खटपट करितां पटपट वय सरलें ।
काळवेळ सन्नीध पातल्या उघडति ना डोळे ॥
समय कठिण तो संगि न होती कोणी आप्तवर्गे । साधन० ॥ १ ॥
समज उमज अरे गमज टाकुनी शरण होय गुरुतें ।
अशाश्वत तनु शाश्वत न दिसे समज मनीं पुरतें ॥
भवभ्रंश बद्धांश पाशसुखविषय करी परते ।
गुरुवर कर शिरिं कृपावरद मग प्राप्ति परे परते ॥
हेचि देहि स्थिति पूर्ण विदेही मनिं अनुभव वेगे । साधन० ॥ २ ॥
आत्मा आपण चिद्घन अनुभव समजुनियां देही ।
[1]समरस करि मन तयांत भोगी समाधि निजठायीं ॥
उघड समाधी निजात्मबोधी उपाधिरति नाहीं ।
योग साधि हा भोग त्यजुनि मग रोग नुरे कांहीं ॥
समां [2]सर्वभूतेषु पाहणें तरीच [3]भव भंगे । साधन० ॥ ३ ॥
देवनाथ तुज हात जोडि मनखोडि सकळ सांडी ।
ज्ञान आणि विज्ञान ग्रासुनी पूर्ण खेळ मांडी ॥
तूं तूं तूं चैतन्य तूंचि तूं दुजा नसे धुंडी ।
सद्गुरुवचनें स्वात्मधनाची भरूनि घे हुंडी ॥
मान वचन अनुमान त्यजुनि हा अनुभव घे अंगें । साधन० ॥ ४ ॥

---

१. ब्रह्मानंद, एकरस. २. सर्व प्राण्यांच्या ठायीं. ३. संसार.

## पद ६४ वें.

ही तनु प्राप्त तुजला निजभाग्यें सख्या तूं साधि त्वरें हित जें ॥ ध्रुवपद. ॥
देह अमोल्य परि अशाश्वत जाइल हे नुमते ।
यास्तव साधन हेंचि करि निजस्वात्मसुखा उमते ॥ ही तनु० ॥ १ ॥
राम हरि जय कृष्ण हरि हे वाणि सुखें गर्जे ।
चिद्घन हें सुखसार निरंतर सेवि सुखा परजे ॥ ही तनु० ॥ २ ॥
श्रीगुरु गोविंदनाथ निरंजन[1] या पदिं मन विरजे ।
देवनाथ निजस्वानुभवीं रुप सभराभर भरजे ॥ ही तनु० ॥ ३ ॥

## पद ६५ वें.

उत्तम नरदेह तुला लाभला सौख्यखाणी ।
आत्मा आपण ब्रह्म उमज अनुभवी वचन मानी. ॥ ध्रुवपद. ॥
उठ जाय गुरुपाय धरी बा! काय बैसलासी ।
क्षणिक विषय मनिं सुख मानूनी त्यांतच रमलासी ॥
कन्यासुतधनदारमोहा हृदिं फारच धरिसी ।
लंपट होउनि खटपट करितां बहुत श्रमलासी ॥
उलट उलट माघारा चतुरा उगाच भ्रमलासी ।
अशाश्वत तनु शाश्वत नाहीं उठ कां निजलासी ॥
टीप ॥ जाग स्वरुपिं निजमार्ग धरुनि बा! लाग हरिभजनीं । आत्मा० ॥ १ ॥
भजन हरीला प्रिय त्यागी तुज प्रिय कनकदारा[2] ।
जाय शरण निजभावें त्रिभुवनपति हरि सरदारा ॥
राम कृष्ण गोविंद छंद निशिदिनिं धरि मुरदारा! ।
करुणा उपजेल तुझी मग त्या मुनिमनमांदारा ॥
कृपावंत भगवंत धरुनि करि गुरू सुभेदारा ।
निरविल तैं मग निजात्म स्वसुखें येशिल उज दारा ॥
टीप ॥ लक्ष धरिसि करि लक्षपाति गुरु नेइल निजभुवनीं । आत्मा० ॥ २ ॥
पाहे लोचनीं निजात्मभुवनीं नांदत चितपुतळा ।
अनंत दिनमणि[3] लज्जित तेजी स्वतेज बंबाळा ॥
नाम न रूप न वर्ण व्यक्ति गुण परम पुरुष भोळा ।
निघोट जो घनदाट थाटला व्यापुनि नीराळा ॥

---

१. मायारहित, निष्कलंक. २. सोनें आणि स्त्री. ३. सूर्य.

ज्या वर्णित मुखिं फणिवर[1] शिणला श्रुतिशास्त्रमेळा[2] ।
तो तूं तुजविण अन्य नसे निजस्वरुपीं लावि डोळा ॥
टीप ॥ समरस[3] करि मन भोगि सोहळा समाधि व्युत्थानी । आत्मा० ॥ ३ ॥
देवनाथ प्रभुनाथ निरंजन कृपांजना देता ।
निरसि[4] तिमिरें[5] अज्ञान लाहसी[6] सुख नयनीं लेता ॥
उदय करिल चित्सूर्य जाय भ्रमअंधकार परता ।
मग तुं साच तूं शाश्वत बाहे निजगुज अनुभविता ॥
गुरुवचनीं विश्वास धरुनि वरि बांधि कास[7] आतां ।
चिदानंद[8] आनंदप्राप्ति तुज ऐक्यपणें रमता ॥
टीप ॥ जसे अन्य तुजवीण एक तूं व्याप्त जनीं विजनीं । आत्मा० ॥ ४ ॥

### पद ६६ वें.

ही तनु, बहुत सुख घनु, लाधली मनु, थोर दैवें ।
हित अशांत उमजावें ॥ ध्रुवपद. ॥
किति तरी, विषयसुखभरी भरिसि, अंतरीं, कसे न कळे ? ।
भोगिसी दुरित[9] सोहळे ॥
वैखरी[10], स्मरेना हरी, दुःखसागरीं, शरीर सगळें ।
भुललें चित्त अंबळे[11] ॥

१. शेष. २. वेद आणि शास्त्रें यांचा समूह. 'श्रुति'शब्दाविषयीं पुढील विवेचन मनन करण्यासारखें आहे:—'जिच्या योगानें धर्म ऐकू येतो (समजतो) ती श्रुती, असा 'श्रुति'शब्दाचा मूलार्थ आहे. वेदमंत्र म्हणण्याचे वेळेस पाठकाचे चित्ताची एकाग्रता राहून अर्थानुसंधान राहावें म्हणून पुस्तकावरून पठन करण्याचा निषेध शास्त्रकारांनीं केला आहे. ऐकून म्हणणें यावरून वेदास 'श्रुति' हें नांव पडलें, व 'श्रुति' शब्दावरून प्राचीनकाळीं लेखनकला भरतखंडांत नव्हती, अशीं अनुमानें यूरोपांतील विद्वान् करतात तीं बरोबर नाहींत. याप्रमाणेंच वेदार्थाचें स्मरण करून त्यांत प्रतिपादित केलेल्या धर्माचें ऋषींनीं विस्तारानें ज्यांत कथन केलें आहे, असे जे ग्रंथ त्यांचें नांव 'स्मृति.' असा 'स्मृति'शब्दाचा अर्थ प्राचीन संस्कृत ग्रंथकारांनीं केला आहे. याकरितां 'स्मृति' म्हणजे केवळ 'स्मरणानें पढण्याचे ग्रंथ' असा अर्थ करून स्मृतिकालींही भरतखंडांत लेखनकलेचा अभाव होता असें म्हणणें निराधार आहे. कारण स्मृतींमध्यें न्यायसभेंत मानण्याचीं प्रमाणें सांगितलीं आहेत त्यांत लेखप्रमाण धरलें आहे'. (व्युत्पत्तिप्रदीप–पृष्ठ ६६ पहा.) शास्त्रें सहा आहेत. पृ० ४७ टीप १ पहा. ३. एकरस. ४. नाहींसें करशी. ५. अज्ञानांधकार. ६. पावसी. ७. कास बांधणें=कांस घालणें=कमर बांधणें, तयार होणें. ८. ज्ञानानंद. ९. पाप. १०. वाणी. ११. श्रियेला.

### पद ६४ वें.

ही तनु प्राप्त तुजला निजभाग्यें सख्या तूं साधि त्वरें हित जें ॥ ध्रुवपद. ॥
देह अमोल्य परि अशाश्वत जाइल हे नुमते ।
यास्तव साधन हेंचि करि निजस्वात्मसुखा उमते ॥ ही तनु० ॥ १ ॥
राम हरि जय कृष्ण हरि हे वाणि सुखें गर्जे ।
चिद्घन हें सुखसार निरंतर सेवि सुखा परजे ॥ ही तनु० ॥ २ ॥
श्रीगुरु गोविंदनाथ निरंजन[1] या पदिं मन विरजे ।
देवनाथ निजस्वानुभवीं रुप सभराभर भरजे ॥ ही तनु० ॥ ३ ॥

### पद ६५ वें.

उत्तम नरदेह तुला लाभला सौख्यखाणी ।
आत्मा आपण ब्रह्म उमज अनुभवी वचन मानी. ॥ ध्रुवपद. ॥
उठ जाय गुरुपाय धरी बा! काय बैसलासी ।
क्षणिक विषय मनिं सुख मानूनी त्यांतच रमलासी ॥
कन्यासुतधनदारमोहा हृदिं फारच धरिसी ।
लंपट होउनि खटपट करितां बहुत श्रमलासी ॥
उलट उलट माघारा चतुरा उगाच भ्रमलासी ।
अशाश्वत तनु शाश्वत नाहीं उठ कां निजलासी ॥
टीप ॥ जाग स्वरुपिं निजमार्ग धरुनि बा! लाग हरिभजनीं । आत्मा० ॥ १ ॥
भजन हरीला प्रिय त्यागी तुज प्रिय कनकदारा[2] ।
जाय शरण निजभावें त्रिभुवनपति हरि सरदारा ॥
राम कृष्ण गोविंद छंद निशिदिनिं धरि मुरदारा! ।
करुणा उपजेल तुझी मग त्या मुनिमनमांदारा ॥
कृपावंत भगवंत धरुनि करि गुरू सुभेदारा ।
निरविल तैं मग निजात्म स्वसुखें येशिल उज दारा ॥
टीप ॥ लक्ष धरिसि करि लक्षपाति गुरु नेइल निजभुवनीं । आत्मा० ॥ २ ॥
पाहे लोचनीं निजात्मभुवनीं नांदत चितपुतळा ।
अनंत दिनमणि[3] लज्जित तेजी स्वतेज बंबाळा ॥
नाम न रूप न वर्ण व्यक्ति गुण परम पुरुष भोळा ।
निघोट जो घनदाट थाटला व्यापुनि नीराळा ॥

---

१. मायारहित, निष्कलंक. २. सोनें आणि स्त्री. ३. सूर्य.

ज्या वर्णित मुखिं फणिवर[1] शिणला श्रुतिशास्त्रमेळा[2] ।
तो तूं तुजविण अन्य नसे निजस्वरुपीं लावि डोळा ॥
टीप ॥ समरस[3] करि मन भोगि सोहळा समाधि व्युत्थानी । आत्मा० ॥ ३ ॥
देवनाथ प्रभुनाथ निरंजन कृपांजना देता ।
निरसि[4] तिमिरें[5] अज्ञान लाहसी[6] सुख नयनीं लेता ॥
उदय करिल चित्सूर्य जाय भ्रमअंधकार परता ।
मग तुं साच तूं शाश्वत बाहे निजगुज अनुभविता ॥
गुरुवचनीं विश्वास धरुनि वरि बांधि कास[7] आतां ।
चिदानंद[8] आनंदप्राप्ति तुज ऐक्यपणें रमता ॥
टीप ॥ जसे अन्य तुजवीण एक तूं व्याप्त जनीं विजनीं । आत्मा० ॥ ४ ॥

## पद ६६ वें.

ही तनु, बहुत सुख घनु, लाधली मनु, थोर दैवें ।
हित अशांत उमजावें ॥ ध्रुवपद. ॥
क्षिति तरी, विषयसुखभरी भरिसि, अंतरीं, कसे न कळे ? ।
भोगिसी दुरित[9] सोहळे ॥
वैखरी[10], स्मरेना हरी, दुःखसागरीं, शरीर सगळें ।
भुललें चित्त अंबळे[11] ॥

---

१. शेष. २. वेद आणि शास्त्रें यांचा समूह. 'श्रुति'शब्दाविषयीं पुढील विवेचन मनन करण्यासारखें आहे:—'जिच्या योगानें धर्म ऐकू येतो (समजतो) ती श्रुती, असा 'श्रुति'शब्दाचा मूलार्थ आहे. वेदमंत्र म्हणण्याचे वेळेस पाठकाचे चित्ताची एकाग्रता राहून अर्थानुसंधान राहावें म्हणून पुस्तकावरून पठन करण्याचा निषेध शास्त्रकारांनीं केला आहे. ऐकून म्हणणें यावरून वेदास 'श्रुति' हें नांव पडलें, व 'श्रुति' शब्दावरून प्राचीनकाळीं लेखनकला भरतखंडांत नव्हती, अशीं अनुमानें यूरोपांतील विद्वान् करतात तीं बरोबर नाहींत. याप्रमाणेंच वेदार्थाचें स्मरण करून त्यांत प्रतिपादित केलेल्या धर्माचें ऋषींनीं विस्तारानें ज्यांत कथन केलें आहे, असे जे ग्रंथ त्यांचें नांव 'स्मृति.' असा 'स्मृति'शब्दाचा अर्थ प्राचीन संस्कृत ग्रंथकारांनीं केला आहे. याकरितां 'स्मृति' म्हणजे केवळ 'स्मरणानें पढण्याचे ग्रंथ' असा अर्थ करून स्मृतिकालींही भरतखंडांत लेखनकलेचा अभाव होता असें म्हणणें निराधार आहे. कारण स्मृतींमध्यें न्यायसभेंत मानण्याचीं प्रमाणें सांगितलीं आहेत त्यांत लेखप्रमाण धरलें आहे'. (व्युत्पत्तिप्रदीप–पृष्ठ ६६ पहा.) शास्त्रें सहा आहेत. पृ० ४७ टीप १ पहा. ३. एकरस. ४. नाहींसें करशी. ५. अज्ञानांधकार. ६. पावसी. ७. कांस बांधणें=कांस घालणें=कमर बांधणें, तयार होणें. ८. ज्ञानानंद. ९. पाप. १०. वाणी. ११. खिन्न झाले.

१२ दे० का०

सुसरी, नव्हे हे बरी, कट्यारी उरीं, दिली काळें ।
कां धुरें[1] धुंद डोळे ॥
चाल ॥ सांडि हा त्वरेनी छंद, अहो छंद ।
काळानें मांडिला फंद[2], अहो फंद ।
कां बुद्धी झाली मंद, अहो मंद ॥
चाल दुसरी ॥ हा विचार नव्हे रे सार[3], अहो सार ।
या गुणें बुडाले फार, अहो फार ।
कां उगाच वाहसी भार, अहो भार ॥
टीप ॥ वदो किती, फिरे ना मती, कामिकाप्रती, तरिसि भावें । हित० ॥१॥
हा कुभंड, प्रीतिचा भंड, होइल मग दंड, देणें लागे ।
सत्पथीं म्हणुनि वागे ॥
तो प्रचंड, यमाचा दंड, करिल तनुखंड[4], फिरे मागे ।
उठि उठि त्वरित जागे ॥
हें बंड त्यजुनि, औदंडें[5] भजनिं अखंड, चित्त लागे ।
भवमूळ समूळ भंगे ॥
चाल ॥ विषयाचा सांडी रंग, अहो रंग ।
साधूंचा धरावा संग, अहो संग ।
हरिनामें वाजवि चंग[6], अहो चंग ॥
चाल दुसरी ॥ धरि प्रीति हरीचे नामीं, अहो नामीं ।
नांदसी बरा सुखधामीं[7], अहो धामीं ।
विनटल्या[8] मती श्रीरामीं, अहो रामीं ॥
टीप ॥ श्रीराम, पूर्ण मनुकाम, करिल विश्राम, प्रीति गावें । हित० ॥ २ ॥
लाधली, तुला हे भली, ईश्वरीं दिली, बरी काया[9] ।
खोवितोसि हे वायां ॥
भ्रमभुली, कशी भूलली, मती भ्रष्टली, तुझी राया ।
इच्छिसी द्रव्य जाया[10] ॥
थोरली, यमें धाडिली, दूति आपुली, चाळवाया ।
नेसते निरयें[11]ठाया ॥

---

१. मदानें. २. नाद, छंद. ३. उत्कृष्ट, श्रेष्ठ. ४. शरीराचे तुकडे. ५. उद्दंड, विपुल. ६. चंग हा शब्द फारशी आहे. ७. सुखप्रद गृहांत. ८. रतल्या, तल्लीन झाल्या, प्रवीण झाल्या, रंगल्या. ९. देह. १०. बायको. ११. नरकस्थाना.

चाल ॥ नेत्राचा तीक्ष्ण बाण, अहो बाण ।
लावोनी हरिते प्राण, अहो प्राण ।
मारिले थोर सज्ञान[1], अहो सज्ञान ॥
चाल दुसरी ॥ हे केवळ विषयमूळ, अहो मूळ ।
नाशिसी हे सहकूळ, अहो कूळ ।
बहुत केली धूळ, अहो धूळ ॥
टीप ॥ चांडाळ, रांड हें जाळ, भासत काळ, मनोभावें । हित० ॥ ३ ॥
करि त्वरा, तूं जा बरा, शरण गुरुवरा, जाय वेगीं ।
श्रीगुरुराजयोगी ॥
सुखकरा, कृपा अंतरा, उदेल्या खरा, दुःख भोगी ।
सद्भाव धरी अंगीं ॥
प्रियकरा, प्रीति अन्हेरा, स्वरूप सुख धरा, अंतरंगीं ।
रंगोनि आत्मरंगीं ॥
चाल ॥ सहजची गळाला भ्रम, अहो भ्रम ।
आपणची झाला ब्रह्म, अहो ब्रह्म ।
लाधला सुखें संभ्रम, अहो संभ्रम ॥
चाल दुसरी ॥ गुरुनाथ दयाघन थोर, अहो थोर ।
विनेटिला[2] सकळही घोर, अहो घोर ॥
स्वानंदें नाचे मोर, अहो मोर ।
टीप ॥ देवनाथ, भावें गुण गात, जाहली, मात न वर्णवे । हित० ॥ ४ ।

**पद ६७ वें.**

धन दरकुटे, भरी चिरकुटे, उंचलेत गोमटी ।
उमजेना मतिमंद तनूची रक्षा हे शेवटीं ॥ ध्रुवपद. ॥
नश्वर मदें अतिमत्त आपणा समज मनीं आणिके ।
हय रथ गज वैहनादी[3] उष्ट्र बसुनि मिरविसी बिके ॥
उंच हवेली नरम बिछाना, किंनखापी[4] तोषके ।
निजत वसत कांतेला घेउनि मटमट घेतो मुके ॥
सुख मानुनिया भुलला भारी, करीतसे कौतुकें ।
'अचडे बचडे छकडे' म्हणउनि लाडवितो बाळकें ॥

---

१. ज्ञानी. २. नष्ट झाला. ३. पालखी इत्यादि. ४. किनखाप हा शब्द फारशी आहे.

चाल ॥ भोगितो विषय धडफुडा ।
अति समय कठिण पुढें कुंडा ।
वाजवी काळ चौघडा ॥
टीप ॥ नेत जीव तनुप्रत शुभा मग रचती गंगातटीं । उमजेना० ॥ १ ॥
जननिजनक निज आप्त सोयरे मामा आणि चूलता ।
घालुनियां यम पाश नेत कीं तुज देखतदेखता ॥
जाणुनि ऐसें त्याच विषयिं तूं रमसि फिरुनि मागुता ।
खटपट करसी हाव धरुनि तुज लाज नये शीणता ॥
माया विद्या दृश्य भासकी सकळही जाणता ।
भ्रमसी दाटुनि उगाच याहुनि कोण तुझी मूर्खता ॥
चाल ॥ हे क्षणीक रे संपती ।
जाणोनि सांडि अहंकृति ।
श्रुतिवाक्य वदति हे निती ॥
टीप ॥ नेणुनि माझे माझे म्हणसी धनदारा कारटी । उमजेना० ॥ २ ॥
किति तरि वायां शिणसिल आतां फिर मागें सज्जना ।
निवटुनि श्रीगुरुपायीं वदनीं करि हरिनामें गर्जना ॥
काय करिसि हा भवरोगरे त्याज्य करुनियां जना ।
वैराग्यें तनु शुष्क करावे सोडुनि लोकेशना ॥
कन्यासुतगृहदारधनाची समुळ सांडि वासना ।
गुरुकृपेनें स्वमना बैसवी निजात्म निजासना ॥
चाल ॥ घातक हे ईषणा खरी ।
पाहा दारा जैसी खैरी ।
निश्चय मान वैखरी ॥
टीप ॥ विनटे निजात्मसाधनें दुस्तर कुटिळ वासना कुटी । उमजेना० ॥ १ ॥
यथायुक्त श्रुति अन्वय ग्रहणें नाम जपे सरसे ।
गुरुवचनाशय प्रत्यय जाणुनि चित्स्वरुपा लइ वसे ॥

---

१. वांकडा, दुष्ट. २. वेदवचन. ३. लोकेषणा=लोकांनीं चांगलें म्हणावें अशी इच्छा. ४. स्त्री पुत्रवित्त इत्यादिकांच्या ठायीं जी आस्था ती. ५. गाढवी. ६. वाणी. ७. नष्ट कर, नाश कर. ८. कुटून चूर्ण कर. ९. त्वरेनें.

मेळउनि मन स्वरुपिं समाधिसुख भोगिसि समरसे ।
निजात्मरंगें रंगुनि आपणा जगिं मिरवावे पिसे ॥
सर्वं खलोमिति ब्रह्मश्रुतिचा अनुभव घे मानसें ।
[1]आब्रह्मस्तंबादि पाहतां तुजविण कोणी नसे ॥
चाल ॥ या [2]निगम नीज उक्तिनें ।
करि समाधान युक्तिनें ।
अति निर्विकल्प भक्तिनें ॥
टीप ॥ देवनाथ प्रभुनाथ निरंजन भज भज हृदयसंपुटीं । उमजेना० ॥ ३ ॥

## पद ६८ वें.

उमज उमज मन मूर्खा अझुनी ।
आत्मा गुरु प्रत्यक्ष नांदतो अनुभव घे हृदयीं ॥ ध्रुवपद. ॥
[3]अशाश्वत तनु जाईल हीचा नाहीं भरंवसा ।
जाणुनि ऐसें गाउनि घेसी उगाच भ्रम फासा ॥ उमज० ॥ १ ॥
पाहे वर्ष पन्नास वयाला पण गेला अर्धा ।
लव पल क्षण घडि मोजित तनुसी काळ करिल स्पर्धा ॥ उमज० ॥ २ ॥
कन्या सुत गृहदार धनी मनीं आस भरी भरसी ।
उत्तम तनु जाइल मग फेरे चौऱ्याशी[4] फिरसी ॥ उमज० ॥ ३ ॥
श्रुतिनिगदित परि अधित अझुनि कसे तुला न सुचे ।
फिर फिर फिर माघारा बारे अमोल वय वेचे ॥ उमज० ॥ ४ ॥
भाव धरुनि निज हृदयीं जाई शरण गुरुद्वारा ।
गुरुगुज मनिं तूं उमज लागो नेदि भववारा ॥ उमज० ॥ ५ ॥

---

१. सकळ विश्व. २. वेद. ३. नश्वर, क्षणिक. ४. या चौऱ्याशीं लक्ष योनींची संख्या अशी:— २१लक्ष अंडज खाणींत [९ लक्ष योनि सर्प मुंगी इत्यादि, ४ लक्ष योनि जळचरांत, ८ लक्ष योनि पक्षिकुळांत,—मिळून २१लक्ष]; २१ लक्ष जारज खाणींत [९ लक्ष द्विपद योनि, ४ लक्ष चतुष्पद योनि, ८ लक्ष श्वापद योनि,—मिळून २१ लक्ष]; २१ लक्ष उद्भिज्ज खाणींत, [९ लक्ष अन्नधा॰न्यादिक, ४ लक्ष सुगंधादिक पदार्थ, ८ लक्ष वृक्ष तृण इत्यादि,—मिळून २१]; २१ लक्ष स्वेदज खाणींत [९ लक्ष तारांगणादिक, ४ लक्ष मेघमाला, ८ लक्ष हिरे रत्न माणिकादि, मिळून २१ लक्ष]; याप्रमाणें प्रत्येक खाणींत २१ मिळोन चार खाणींत ८४ योनि होतात. दुसऱ्या मताप्रमाणें २१ लक्ष वृक्षयोनि, ११ कीटकयोनि, ३० लक्ष पशुयोनि, ९ लक्ष जळचर योनि, १० पक्षियोनि, आणि ४ लक्ष मनुष्ययोनि, मिळून ८४ लक्ष योनि होतात.

देवनाथ प्रभुनाथ निरंजन दे अंजन जेव्हां ।
आत्मा आपण ब्रह्म सनातन[1] सुख लाहसि तेव्हां ॥ उमज० ॥ ६ ॥

### पद ६९ वें.

आहारे रांडेच्या परि मूर्खा ! हें काय ॥ ध्रुवपद. ॥
चौऱ्याशि[2] लक्ष रे योनी ह्या हिंडतां शेवटीं नरतनु[3] पावे ।
त्या तनुमाजि उत्तम देह हा ब्राह्मणजन्मासी[4] यावें ॥
सच्छास्त्रश्रवणें सत्संगत साधुनि स्वअंगें ब्रह्मचि व्हावें ।
हे तों कांहिं तुवां न कळे साधन कैसेनि निजगुज पावे रे ॥ आहारे० ॥१॥
अत्युत्कट संपत्ति कांता रूपवती दुर्धर विषय मना ।
ब्राह्मणभोजन अतिथिपूजन कवडी ही न दिधली दाना ॥
आपपर[5] कांहीं वळखिलें नाहीं दृष्टिसि थोर न सांना[6] ।
वृथा पुष्ट काया संरक्षिली, वाया दोषही केले नाना रे ॥ आहारे० ॥ २ ॥
आलिया जन्मासी मुलाचेनि संगें बाल्यत्व गेलें ।
द्वादश[7] षोडश[8] विंशति[9] वय हे विषय तारुण्य नेले ॥
वार्धक्य अवस्था शक्ती क्षीण झाल्या शरीर कदा न हाले ।
साधन हें साचें सार्थक जन्माचें कांहिंच नाहीं झालें रे॥ आहारे० ॥ ३ ॥
देवनाथ म्हणे वाहिली ते गंगा राहिलें तीर्थ जाणावें ।
स्वहितापेक्षा जरी तरि बा रे वेगें संतासीं शरण जावें ॥
आपआपणाते उमजुनि गुरुकृपे समरस ब्रह्मचि व्हावें ।
जनिं वनिं मग आपणची अवघे द्वैतांसी[10] गाळुनि घ्यावें रे ॥ आहारे० ॥४॥

### पद ७० वें.

तूं पाहेरे रुप घननीळ[11] सांवळ ।
गुरूचें आठवी पदयुगुल[12] ॥ ध्रुवपद. ॥
कोण मी आलों कोठूनि ।
हा विचार रे, विचार करि निजमनीं ॥

---

१. शाश्वत. २. पृष्ठ ४८ टीप १ पहा. ३. नरदेह. ४. असेच उद्गार इतर कवींचे आढळतात:' 'पटुत्व सकलेंद्रियीं मनुजता सुवंशीं जनीं द्विजत्वहि दिलें भलें बहु अलभ्य जें कीं जनीं' (केका' वलि १२ पहा.) ५. स्वकीयपरकीय. ६. लहान. ७. बारा. ८. सोळा. ९. वीस. १०. भेदबुद्धि, जीव आणि परमात्मा निराळा आहे असें मानणें. ११. मेघश्याम. १२. दोन पाय.

कोण जनिता[1] आणि जननी ।
हे मायेची, बंधु आणि भगिनी ॥
काळ टपतो दिनरजनी ।
घडि भरल्या रे, भरल्या नेत उचलुनि ॥
चाल ॥ गृह धन हे सुत संपती ।
सर्वेहि बा ! त्यागुनि जाती ।
कोणि येईचना सांगाती ।
हे त्वरेन उचला माती[2] ।
असे सांसर्गिक बोलती ॥
टीप ॥ दया येईनारे, येइना एक तिळ ॥ गुरूचे० ॥ १ ॥
हा विचार करि निजसार ।
दिठिं[3] पाहे बरे सद्गुरुपद सकुमार ॥
तेणें होशिल हा भवपार[4] ।
हे त्यागीरे त्यागी दृश्य असार[5] ॥
करी भक्तीचा व्यापार ।
हे मानी रे, मातेसम परद्वार ॥
चाल ॥ हा भाव धरुनि निजमनीं ।
जो सद्गुरूचूडामणी ।
तु शरण जाई येक्षणी ।
तरणार्ता भवजीवनी ।
..................... ॥
टीप ॥ गुंज[6] समजरे, समज होय कुशळ ॥ गुरूचे० ॥ २ ॥
गुरूमुखेशि उमजुनि खुण ।
मग आत्मा हा देवच कीं आपण ॥
आटलें द्वैत मीपण[7] ।
उपर तोरे स्वयंस्वरूपचिद्घन ॥
असें असतां भ्रमलें पण ।
हे वृथाच रे, भुललें चंचळ मन ॥

---

१. पिता. २. देहाची अचेतन स्थिति. ३. डोळ्यानें, दृष्टीनें. ४. संसारमुक्त. ५. क्षुद्र, व्यर्थ. ६. गुह्य. ७, अहंकार.

चाल ॥ वे विवेक अंकुश करीं ।
मग चहडुनि माथ्यावरी ।
त्वरें मनगज हा आवरी ।
पेलावा सत्ता करी ।
.................... ॥
टीप ॥ करि राज्य नको विठ्ठल ।
मग काळाच्या मुखिं माखी काजळ ॥ गुरूचे० ॥ ३ ॥
गुरूनाथ वद कर शिरीं ।
तेणें तरलोंरे निश्चय हा भवपुरीं ॥
समरसता रसमंजरी ।
रस देउनियां रोग दवडला दुरी ॥
आरोग्य देह नगरी ।
गुरू आत्मा हा राज्य नगरिचे करी ॥
चाल ॥ बोलाया नाहीं ठाव ।
बुडालें रूप आणि नांव ।
वैऱ्याचा जिंकिला गांव ।
काळाचि खुंटलि धांव ।
हा गुरुकृपेचा भाव ॥
टीप ॥ गड्या देवनाथ निर्मळ ।
करीं लाधला नाथ कृपेचा फळ ॥ गुरूचे० ॥ ४ ॥

### पद ७१ वें.

मनु ऐक तनु राउळिग । गुरू आत्मा देव न्याहाळी ।
मागुति नये तनु ऐसी घे साध्य करूनि ये काळीं ॥ ध्रुवपद. ॥
हिंडतां लक्षचौऱ्याशी योनी तु बहु श्रमलासी ।
अनंतर जननीजठरीं येऊनि गर्भ धरलासी ॥
मळमुत्रदाथरीं ऐसी त्या दुर्गंधित पचलासी ।
अति दुःख गर्भवासाचे, जठराग्नीमाजी कढलासी ॥

---

१. मनोरूप गज. २. काळाच्या मुखीं काजळ माखणें=काळास खालीं पहावयास लावणें. ३. पृष्ठ ४८ टीप १ पहा. ४. दाथर=उकाडा. [हा शब्द ज्ञानेश्वरी ग्रंथांत आढळतो.]

भरतांचि नेम नव मासी तनु बाही जन्मलासी ।
लागतां अविद्या वायु भ्रमपाशीं वेष्टीलासी ॥
टीप ॥ [1]ग्मोविलें बाळपण खेळीं । अज्ञानमुलाचे मेळीं ॥ मागुति० ॥ १ ॥
सांडिरे विषयमद चाळा, वरपडा होसि तूं काळा ।
म्हणऊनि सांगतों [2]गुज रे! भज रामकृष्णगोपाळा. ॥
मागुती न ये असि वेळा, तुमगसी कसा चांडाळा ! ।
हो शरण सद्गुरूराया निजस्वरूपिं भोगी सोहळा ॥
टीप ॥ [3]द्वैतासि गाळुनी समुळी । धरिं ध्यानीं हरि [4]वनमाळी ॥ मागुति०॥२॥
तारुण्य त्रियेचे संगें, भोगिसी विषय [5]अनुरागें ।
भ्रमलासि कसा मन मूर्खा! मृग जेंवी [6]मृगां युत रंगे, ॥
हित साधीं याच प्रसंगें करि विचार गुरु सत्संगें ।
अनुभविता निज गुज हृदयीं सहजात समुळ [7]भव भंगे, ॥
हरिनामरसीं या रंगे, चुकतिल सकळ यमदंगे ।
गुरुकृपामृतातें सेवी, ब्रह्म तूं होशी निजांगें ॥
टीप ॥ सद्भाव धरुनि हृत्कमळीं । हो लीन गुरुपदयुगुळीं. ॥ मागुति० ॥ ३ ॥
श्रीगुरुवरद करी माथा बैसता चुके भव[8]वेर्था ।
निज स्वरूपी वृत्ती रमवी म्हणउनी शरण हो! नाथा ॥
विश्व हे ब्रह्म या अर्था सजुनि उमज परमार्था ।
सुखसमाधि सोहळा भोगी, हरि गुण देवनाथा ॥
टीप ॥ द्वैताचि करी रांडोळी । धरि भक्ति हरिपदीं भोळी. ॥ मागुति० ॥ ४ ॥

### पद ७२ वें.

संसार नव्हे हा [9]सार करुनि विचार, त्यागि मी[10]पणा ।
ये देहीं तुझा तूं ब्रह्म उमज निज वर्म सद्गुरू खुणा. ॥ ध्रुवपद. ॥
कन्या सुत दारा धन, धरुनी अभिमान भ्रमाचे भरीं ।
भुललासि कसा? नेणसी स्वहित मानसीं, विचार अंतरीं ॥

---

१. गमाविलें. २. रहस्य. ३. भेदबुद्धीला. ४. वनमाला धारण करणारा (कृष्ण). वनमालेचें वर्णन संस्कृतांत आहे तें असें:—'आपादपद्मं या माला वनमालेति सा मता' इति कलिंगः; अथवा—'आजानुलंबिनी माला सर्वर्तुकुसमोज्ज्वला । मध्ये स्थूलकदंबाढ्या वनमालेति कीर्तिता ॥'; तात्पर्यार्थ—कंठांत घातली असतां पायांपर्यंत पोंचणाऱ्या मालेला 'वनमाला' असें नांव आहे. पूर्वोक्त प्रकारची माला श्रीकृष्णाची असे म्हणून त्यास 'वनमाली' असें म्हणतात. ५. प्रेमानें. ६. मृगीशीं संयुक्त होऊन रमतो. ७. संसार. ८. व्यथा. ९. श्रेष्ठ, उत्तम. १०. गर्व.

करुनियां पाहे निजसोय, निजाचा ठाय लाधे निजकरीं ।
कां तनु खोविशी वृथा नव्हे अन्यथा शब्दकुसरी[1] ॥
श्लोक ॥ अति अगणित पुण्य प्राप्ति हे जाण कार्या
उमजुनि हित येथें साधि बा! नीज कार्या ;
अमोल हे परि नाहीं शाश्वतार्या विलोकी
निजहित सुख जेथें साधना हेच लोकीं. ॥
टीप ॥ हा विचार करुनि निजसार त्यजुनि आसार[2] आवरी मना, ।
कल्पना सकळ त्यागिता, पावसी हिता, तारिसि सज्जना[3] ॥ संसार० ॥ १ ॥
हो सद्गुरुनाथा शरण, तुटे जन्म मरण निश्चयो मती ।
ठेउनि पाहे विश्वास गुरू अविनाश चुकवि दुर्गती[4] ॥
निर्विकार भक्तिच्या बळें स्वरुप आकळे गर्जती श्रुती, ।
गुरुविना प्राप्त न कदा शीण दुर्मदा साधनारिती ॥
श्लोक ॥ बहु बहु रिति असाध्या साधनाते करीता
न पवे किमपि वस्तु सद्गुरूवीण हाता, ।
म्हणउनि गुरुदास्यालागिं तूं अंगिकारी,
धरुनि हृदयिं भावा[5], त्यागि बुद्धी विकारी ॥
टीप ॥ ऐकुनी वचन तत्वता, साधि निजहिता, त्यजी कल्पना ।
गुरुराज करिल तव काज, सांडुनी लाज, विनट[6] साधना ॥ संसार० ॥ २ ॥
गुरुराज प्रेरिता बीज अनुभवी नीज उदय वस्तुला ।
होताचि कळे निज वर्म तुटे दुष्कर्म योग योगिला ॥
अविनाश मीच मी खरा, नसे दूसरा भास आटला ।
आत्मा मी माझा एक, विश्वि हा देख सघन दाटला ॥
श्लोक ॥ मजविण पाहाता की दूसरा हा न दीसे
उर्वरित भरुनीया मीच मी चिद्विलासे ।
अविट अमळ माझा मीच मी एकलक्षी
अकाळ अरुप तो मी अद्वयानंद साक्षी. ॥
टीप ॥ अनुभव घेऊनी असा, आत्मनिजरसा पाहे आपणा, ।
विश्वात्मा मीची एक भास आनेक दृश्य कल्पना. ॥ संसार० ॥ ३ ॥

---

१. कौशल्य. २. व्यर्थ, निकृष्ट. ३. सत्+जना=चांगल्या लोकांना, साधूंना. ४. नरकपात, अधोगति. ५. भक्तिभावा. ६. साधनाची तयारी कर.

सद्गुरुनाथ गोविंद, पूर्ण निर्द्वंद्व ब्रह्मचिद्घन ।
देखिल हृदयीं रेखिल, समुळ आटल द्वैत मीपण ॥
नयनेविन उघडोन अरुप अयन अनादि खुण ।
हा द्वैवनाथि अनुभव नवल निज ठेव हे नवले विण ॥
श्लोक ॥ समरस निजवृत्ती नीजरूपीं मिळाली
अचल चल नसे ज्या भ्रांति सर्वै गळाली ।
अकळ गुरु गरीमा[1] ज्यासी हा पार नाही
अनुपम निजवस्तु दाविली येच देही ॥
टीप ॥ देही हे विदेही स्थिती, हा ही ज्या प्रती शब्द साहिना ।
सद्गुरुकृपा ज्या प्रती तेचि जाणती अनुभवीं खुणा ॥ संसार० ॥ ४ ॥

## पद ७३ वें.

अभय वरदकर गुरुवर स्मर मग स्मरबाधा न घडे ।
सुखकर गुरुतर नित्य निरंतर चिन्मय रुप उघडे ॥ ध्रुवपद. ॥
क्षणभरि तरि वरि सावध राहती जों वरि वरि करणें ।
करकर वर वर टाळुनि हरिहररसिं रसना भरणें ॥
गौरव हा तिस रौरव[2] नामक गोष्पद[3] भव तरणें ।
श्रुतिमति अति गति अधिष्ठिती स्थिती सत्संगति करणें ॥
चाल ॥ सत्संग करिल भवभंग भ्रांति उडवी ।
अभंग सहज निजरंग प्राप्ति घडवी ।
निःसंग त्यागि वैराग्य वृत्ति जडवी ॥
टीप ॥ सांग शुद्ध चिद्रांगप्राशनीं द्वैतमूळ उपडे ।
आत्मसाधना विनटे नर मग भवपाशीं न पडे ॥ अभय० ॥ १ ॥
आत्मसाधना गुरुवचनामृतरस रसना चाखी ।
तादृश तदंतर्यामीं[4] गोडी काय असे निरखीं ॥
स्वानुभवोद्भव स्वसुखासाठीं निजमानस पोखीं[5] ।
ब्रह्म सबाह्याभ्यंतर भरलें परि भक्ति नसो वैरखी[6] ॥
चाल ॥ गुरुनाथ व्यापुनी स्थावर जंगम[7] हा ।
समरसें चित्त आत्मांबुधि संगम हा ।

---

१. मोठेपणा. २. रौरव नांवाचा नरक. ३. गाईच्या पावलासारखा संसार तरणें. ४. अंतर्यीम=मन. (पृष्ठ ४२ टीप ५ पहा.) ५. पोखणें=पोसणें. ६. वरपंगी. ७. हालणारें, चालणारें.

सहजांत होत करि बा सत्संग महा ॥
टीप ॥ संगमिं त्या सुखात जाहल्या मनमळ जळिं न बुडे ।
एकत्वें सुखशयनी वृत्ती चित्स्वरुपीं पहुडे[1] ॥ अभय० ॥ २ ॥
होतां ऐक्य उरी न उरी कर्पूर दीप जैसा ।
मिळतां येणें रिति स्वानंदें चित्स्वरूपीं तैसा ॥
पाहतां पाहाणें श्रमलें न चले शब्दाचा वळसा ।
तें तूं तूं तें तें मी नाहीं नाहीं आहेसा ॥
चाल ॥ हें सभराभर भरलेंसें सर्वस्वीं ।
अनंतरवीतेजाहुनि तेजस्वी ।
हें वर्म जाणती तज्ज्ञ न तापस्वी ॥
टीप ॥ स्वानुभवें ज्या तद्रुप जे त्या हे झाडेझूडे ।
ब्रह्मरूप करि घोडे सर्वहि मुंगी माकोडे ॥ अभय० ॥ ३ ॥
सच्चित्सुख आनंद गुरू गोविंद कृपाघन हा ।
वळला तैं मग गळला भवभ्रम[2] व्यापक जनिं वनिं हा ॥
निघोट जो अतिथाट दाटला निजात्मजीवन हा ।
पाहति त्याप्रति लोचन पाहते पण गाळुनि पण हा ॥
चाल ॥ हें परमपरात्पर गुज दे गुरु दाता ।
जो विश्वांतरगत[3] नांदे भयत्राता ।
वर्णितां शीणल्या श्रुति मुखिं गुण गातां ॥
टीप ॥ देवनाथ पदकमळा मोदा सेवित सुखाडे[4] ।
वाढे तै साम्राज्यसमाधी सुख सुमना गाढे ॥ अभय० ॥ ४ ॥

---

## प्रासंगिक पदें.

### पद ७४ वें.

वियोगानळ[5] जाळित त्रास, देत हरि मम मानसहंस हो ।
विरहबाण हरि प्राण नये का यदुवंशोत्तंस[6] ॥ ध्रुवपद. ॥
दुतीला मनोवृत्ति अबला, म्हणे तुझिया मी पदयुगला हो ।
नमन करित जा त्वरित आणि सखये श्रीघननीळा ॥

---

१. निजे, लीन होई. २. संसाररूप मोह. ३. विश्वव्यापी. ४. सुख. ५. विरहाग्नि. ६. यदुभूषणा.

म्हणावे त्रिभुवनभूपाळा, अंत पाहसि किति पशुपाळा हो ! ।
चाल चित्तचाळका विकळ[1] झाली ते वेल्हाळा[2] ॥
चाल ॥ हे मदनमोहना ! विभो! दुःखदहना ये मधुसूदना ।
हे विश्वव्यापका हरी रमानायका सौख्यसदना ।
हे मुरलिवादना दावि यशोदा चुंबित ज्या वदना ॥
टीप ॥ नंदनंदन गोविंदास, विनवी ये रिति अरिध्वंस हो । विरह० ॥ १ ॥
प्राण घाबरा करूं काय, सोसेना विरह मला माय हो ।
युगसम लवपल जात मला हरि आणि त्वरित जाय ॥
बहु किति मोकलूनि धाय, सख्याला कां करुणा नये? हो ।
तळमळ जिविं गोपाळ मला दाविना कसे पाय? ॥
चाल ॥ निर्वाण[3] मांडिलें कसें लाउनी पिसें मला आधीं ।
श्रुति[4] वर्णिताति संरसे नाम तरि असे दया उदधी[5]।
परि परम कठिण हा दिसे प्राण जातसे नसे अवधी ॥
टीप ॥ तुला करुणा तरि हृदयास, येऊं दे आजि श्रीनिवास हो। विरह० ॥२॥
ऐक सखये तुज विनवीते, कृपा करि जाय माय निरुते[6] हो ।
बोध विबुधजनसखा[7] विरहानळशिखा जाळि मातें ॥
यमुनातिरिं गोवत्सातें, चारितो जाय सांग त्यातें हो ।
दया नये तिचि, हरी तरी येऊनि मारि हातें ॥
चाल ॥ हे कमलनयन अहिशयन[8] खगारीवहन[9] दैत्यकदना ।
बहु बहुरिती प्रार्थुनी आणि साजणी निजसदना ।
वधि मदनबाण[10] घे प्राणदान दे दावि हरी वदना ॥
टीप ॥ तुझी अनुचरि[11] मि होत दास, किमपि न करी हा आळस हो। विरह० ॥३॥
असी राधिकामनोवृत्ती तिनें, प्रार्थिली भक्तिदूती हो ।
नमन करुनि पदयुगुळि म्हणे वेल्होळि[12] ऐक विनती ॥
तूं सम ते मज प्राप्ति, घडे हें वाटतसे चित्तीं हो ।
तुझ्या ठायीं विश्वास, बांधि तूं कास, भजनिं निगुती[13] ॥

---

१. व्याकुळ. २. प्रिय स्त्री. ३. अंत. ४. वेद. ५. सागर. ६. खरें. ७. देवांचा मित्र. ८. शेषशयन. ९. गरुडवाहन. १०. मदनाचे बाण पांच आहेत:–['अरविंदमशोकं च चूतं च नवमल्लिका । नीलोत्पलं च पंचैते पंचबाणस्य सायकाः ॥' अथवा 'उन्मादनस्तापनश्च शोषणः स्तंभस्तथा । संमोहनश्च कामस्य पंचबाणाः प्रकीर्तिताः ॥'] ११ दासी. १२. सुंदरी. १३. निभ्रांत, यथार्थ.

चाल ॥ प्रभु देवनाथ नये नाथ सांग मी लक्षु किती अयना ।
तुजवीण नव्हे माउले काय समजलें त्या फणिशयना ।
क्षणभरी न करि आळसा दावि राजसा अजी नयना ॥
टीप ॥ गोपिवल्लभा गोवळास, भेटवी जननी दयाळास हो । विरह० ॥ ४ ॥

## पद ७५ वें.

सांवळ्या सगुणसुंदरा, चला मंदिरा इंदिरावरा ।
अतिसदय हृदय मृदु तरि हरि तुम्ही कठीणता कां वरा ॥ ध्रुवपद ।
होतां गुंतला कोठें, भक्ति पेठे मज [1]नाकळे ।
कोण भक्त तरि ऐसा जेणें वोढियले निजबळें? ॥
बहुदुःखित मी झालें मानस विरहाग्नीनें जळे ।
दयाघना तुम्ही वर्षा या जी विझवा कृपे जळे ॥
अंगिकारिलें आधीं आतां लोटितसां वेगळे ।
दासी होउनि ब्रीद मिरविलें शेवटीं हें कां फळे? ॥
चाल ॥ हे उचित नव्हे श्रीधरा ।
या लवकरि स्वकरी धरा ।
मी दीन मला उद्धरा ॥
टीप ॥ दीन बंधुजी करुणासिंधु ब्रीद हें सत्य करा । अति० ॥ १ ॥
[2]कुंदरदन सुखसदन मदनमोहन जी मधुसूदना ।
तव विरहकदन करि मदन जाळी [3]मापति मुरलीवादना ॥
नावडती उपभोग रोग मज गमती मुरमर्दना ।
वि[4]खारखत शृंगार काय मी करूं या स्रक्चंदना ॥
युगसम लवपलक्षण तुजविण हा जातो सुरवंदना ।
अंत किती पाहतां अनंता नंदाच्या [5]नंदना ॥
चाल ॥ हे सच्चित्सुखदायका ।
गोरक्षक यदुनायका ।
विनवणी श्रवणिं आयका ॥
टीप ॥ मी अन्यायी क्षमा करा अन्याया विश्वंभरा ।
[6]हृषीकेशी मी दासी मस्तकीं ठेवा अभय करा ॥ सांवळ्या० ॥ २ ॥

---

१. न समजे. २. कुंदपुष्पांप्रमाणें रदन (दांत) ज्याचे तो. ३. लक्ष्मीपते! ४. विषासारखा. ५. आनंद देणाऱ्या पुत्रा. ['नंदनं वासवोद्याने सुते ना हर्षके त्रिषु' इति रत्नमाला.] ६. इंद्रियस्वामी.

अंतरगृह वोवरी बरी ते शुद्ध सत्वाथिली[1] ।
अष्टभाव पैर्यंकीं[2] भक्तिनें सुमनसेज[3] रचियली ॥
मार्ग पाहतां शिणले लोचन[4] दुति मागें परतली ।
न दिसति कोठें हरि ऐकतां बहु मी घाबरली ॥
जळावीण मिन जैसा तैसा तगमग[5] जिवि लागली ।
तुजसाठीं जगजेठी भुवनें चतुर्दश[6] शोधिलीं ॥
चाल ॥ पाहता थकित झाली मती ।
न पडती ठायिं गोपिपती ।
आतां कैसी होइल गती ॥
टीप ॥ कोण मला दावील पाय मी काय करूं श्रीधरा । अति० ॥ ३ ॥
देवनाथ प्रभुगुरु गोविंदा येइना का माझी करुणा ।
करुणासागर ब्रीद मिरविलें तुम्हींच नारायणा ॥
गणिका[7] पापी अजामिळादी[8] उद्धरले सज्जना ।
काय म्हणुन मजविषींच आली कठीणता जी मना ॥
कोण सखा सोयरा तुम्हांविण सांगा मनमोहना ।
कृपावंत तुम्ही कृपा करुनियां पद दावा[9] लोचना ॥
चाल ॥ वर्णितां शिणल्या श्रुति ।
शेषाची न चले मती ।
तेथें मी पामर किती ॥
टीप ॥ ब्रिदाभिमानी श्रवणीं ऐकुनी निगमाची[10] निजगिरीं[11] ।
शरणागत मी द्वारीं आलें प्रभु त्रिभुवनसुंदरा ॥ सांवळ्या० ॥ ४ ॥

**पद ७६ वें.**

कोणीकडे तुम्ही जातां, जातां जिवलगा? ।
घडीभर बसा, गोष्ट सांगा ॥ ध्रुवपद. ॥
विरह तुमचा जी!, तुमचा जी! साहीना ।
चित्त पायाविण पाहीना ॥

---

१. सत्वगुणयुक्त. २. पलंगावर. ३. पुष्पांची शय्या. ४. डोळे. ५. तळमळ. ६. सप्त लोक व सप्त पाताळें मिळून चवदा भुवनें होतात. [सप्त पाताळें–अतळ, वितळ, सुतळ, रसातळ, महातळ, तळातळ, पाताळ; सप्त लोक–भूर्लोक, भुवर्लोक, महर्लोक, स्वर्लोक, जनलोक, तपोलोक, सत्यलोक, मिळून एकंदर चौदा भुवनें.] ७. पृष्ठ २९ टीप २ पहा. ८. पृष्ठ २९ टीप १ पहा. ९. दाखवा. १०. वेदाची. ११. वाणी.

माझी कसी दया, दयाच येईना ।
कठिणता[1] काय म्हणुनि स्वमना ॥
तुम्ही धरियली, धरियली जगजीवना[2] ! ।
हात जोडितें विनंति माना ।
दासि मी तुमची, तुमची जिवलगा ! । घडीभर० ॥ १ ॥
आधिं घेतलें, घेतलें मला पदरीं ।
लोटितां काय म्हणुनि दूरी ? ॥
आहें अपराधी, अपराधी गोष्ट खरी ।
अंगिकारिल्यावरी दूरी ॥
उपेक्षूं नये, नये जी निर्धारी ।
शरण आलिया दिनोद्धारी ॥
चालाया घरीं, घरीं लागवेगा । घडीभर० ॥ २ ॥
साधनांतरीं, अंतरीं लक्ष कोटी ।
साधली बहु तुम्हांसाठीं ॥
गिरीकंदरी[3], कंदरी जी कपाटी ।
वैसलें धैर्य धरुनि पोटीं ॥
योग साधिला, साधिला महाहाटी ।
झालें मी फार हिंपुटी[4] ॥
दृष्टि तुम्ही न पडा, न पडा भवभंगा । घडीभर० ॥ ३ ॥
अंतरगृही गृही जी सातबंकी ।
अष्टभावाच्या[5] पर्यंकीं ॥
प्रेमभरित म्यां, भरित म्यां रचलें कीं ।
भक्तिनें सुमनसेज[6] निकी[7] ॥
लहर मदनाची, मदनाची महाबाकी ।
दुःख दे मला जाचते कीं ॥
चला ह्या त्वरें, त्वरें अंगसंगा । घडीभर० ॥ ४ ॥

---

१. कठोरपण, निष्ठुरता. २. जगताच्या प्राणाधारा. ३. पर्वतगुहा. ४. दुःखी, कंजूष. ५. अष्टभाव येणेंप्रमाणें आहेत. ['स्तंभः स्वेदोऽथ रोमांचः स्वरभंगोऽथ वेपथुः । वैवर्ण्यमश्रुप्रलयौ अष्टौ भावाश्च सात्विकाः ॥' १ स्तंभ (स्तब्धता), २ स्वेद (घाम येणें), ३ रोमांच (अंगावर कांटा उभा राहणें), ४ वेपथु (कंप), ५ वैवर्ण्य (तोंडाचा वर्ण बदलणें), ६ अश्रु (डोळ्यांतून पाणी येणें), ७ प्रलय (बेशुद्धि), ८ वैस्वर्य (स्वर पालटणें)]. ६. पुष्पांची शय्या. ७. खरोखर.

द्वैत अद्वैत, गाळुनियां सहजे ।
स्वरूपीं अखंड मन विरजे ॥
अक्षयी पहुडू, पहुडू सुखसेजे ।
भोगुं स्वानंदसायोज्य[1] ॥
हेंचि मागणें, मागणें गुरुराजे ! ।
इतुकें दान मला दीजे ॥
देवनाथाच्या, नाथाच्या अंतरंगा । घडीभर० ॥ ५ ॥

## पद ७७ वें.

सखे ! मज भेटवी दयाळनाथ सोयरा गे ! ॥ ध्रुवपद. ॥
विरहें मम प्राण जाय । काय करूं सांग माय ? ।
उपाय न सुचे कांहीं, जिव घाबरा गे ! ॥ सखे० ॥ १ ॥
युगसमान जाय रात्र । नावडेचि वस्तुमात्र ।
पडत देह धरणी कोणी सांवरा गे ! ॥ सखे० ॥ २ ॥
देवनाथ प्रभु सदये । कठिण काय म्हणुनि हृदय ।
निष्ठुरता धरिली काय, अंतरंगे ॥ सखे० ॥ ३ ॥

## पद ७८ वें.

आषक[2] आम्ही, पिसे झालों ग ! तुजवरते ।
नको होऊं नयनाच्या पैरते[3]. ॥ ध्रुवपद. ॥
वर्णिती चौरी[4] साहि[5] कसे वाचे ।
अतिशय तेज स्वरूपाचें ॥
कोटि रवि लज्जित पदनखीं तेज त्याचे, ।
गणति कोण करि रतिमदनाचे ? ॥
चाल ॥ अग सखे ! अशी श्रुतिवाणी[6] ।
अग सखे ! ऐकिली कानीं ।
अग सखे ! धरुनियां स्वमनीं ॥
टीप ॥ हेतुचित्त सरते ।
पातलों शोध करित पुरते ॥ आषक० ॥ १ ॥
बैसला हृदयीं श्रुतिवचन बाण फटका ।
लागला मनीं तुझा चुटका ॥

१. सायुज्यता मुक्ति. २. खुष, फिदा. ३. पलीकडे. ४. चार वेद. ५. सहा शास्त्रें. ६. वेदवाणी.

सार[1] वाटेना संसार समुळ लटका ।
निघालों तोडुनियां तटका ॥
चाल ॥ अग सखे! उदासीन वृत्ती ।
अग सखे! विरह जाळित चित्तीं ।
अग सखे! प्राण रिघो पाहती ॥
टीप ॥ कांहीं सुचेना ते ।
गुज सांगावें कवणातें ॥ आषक० ॥ २ ॥
शोध करितांना झालों बहु कष्टी ।
शोध लागे ना हिंपुटी ॥
करुनि पांचाची[2] एकंदर मीठी ।
शोधिलीं तत्वें तुजसाठीं ॥
चाऊ ॥ अग सखे! भुमि सप्तही[3] ।
अग सखे! शोधिल्या त्याही ।
अग सखे! पडसीना ठायी ॥
टीप ॥ लावण्यसगुणभरिते ।
बुडालों तुझ्या विरहगर्ते[4] ॥ आषक० ॥ ३ ॥
शोधिले चारी वेद बहू नेटें ।
चतुर्थ स्थानीं गुरु[5] भेटे ॥
वरद कर माथा देवोनि लावि वाटे ।
खूण दाविली वचन खोटें ॥
चाल ॥ अग सखे! दया गुरुनाथा ।
अग सखे! आळिया लावि पंथा ।
अग सखे! उन्मनीं माथा ॥
टीप ॥ चढवोनि गुरु वरते ।
लक्ष दाविले गुणातीते ॥ आषक० ॥ ४ ॥
पाहुनि रूप तूझें हर्ष अंतरंगा[6] ।
निववि देवोनि अंगसंगा ॥

---

१. उत्कृष्ट, सरस. २. पांच तत्वांची. ३. सात भुवनें, सात लोक. ४. वियोगरूप खळग्यांत. ५. गुरुग्रह. ६. मनाला.

उशीर न लावी तूं चिदानंद गंगा ।
तुझ्या स्वरुपीं देईं जागा ॥
चाल ॥ अग सखे! मनोरम बाळे ।
अग सखे! सगुण वेल्हाळे ।
अग सखे! ........... ॥
टीप ॥ चालवी त्वरें ते ।
पाववी काम पूर्णते ॥ आषक० ॥ ५ ॥
तुझा पाहुनियां घाट स्वरूपाचा ।
खवळला काम योगियाचा ॥
निजी निजशयनीं भोगुं भोग साचा ।
सोहळा सुख सायोज्याचा ॥
चाल ॥ अग सखे! तुला जनिं विजनीं ।
अग सखे! पाहु निजनयनीं ।
अग सखे! समाधि व्युत्थानीं ॥
टीप ॥ नाहीं तुज परते ।
हृदयीं धरियलें देवनाथें ॥ आषक० ॥ ६ ॥

## पद ७९ वें.

निबिड सघन हे मध्यशार्वरी[1] हरि वाजवि मुरली ।
मम मानस वश झालें विशेषें मति त्या रविं मुरली. ॥ ध्रुवपद. ॥
भर्ता भोक्ता अलिसुमशर[2] तनु अब्जि[3] ऐक्य असतां ।
भव्य सुखद रव मंजुळ गुरुतर तैं श्रवणीं बसतां ॥
हिमनगजापतिचा अरिसायक होय हृदयिं सलता ।
पद चाली अलि तसीच वृंदावनिं कोणी नसतां ॥
चाल ॥ लागला छंद त्या रवांत सुमनाचा ।
विगलीत वसनपथ धरीत भ्रमणाचा ।
लक्षोनि अयन चालत फणिशयनाचा ॥
टीप ॥ प्रपंचि अरुची धरि रुचि हरिपदसरोजाचि वरिली ।
तगमग अति जिविं लगबग करुनी वनवृंदीं शिरली. ॥ निबिड० ॥ १ ॥

---

१. मध्यरात्र. २. भ्रमररूप पुष्पबाण. ३. कमळीं.

सार[1] वाटेना संसार समुळ लटका ।
निघालों तोडुनियां तटका ॥
चाल ॥ अग सखे! उदासीन वृत्ती ।
अग सखे! विरह जाळित चित्तीं ।
अग सखे! प्राण रिघो पाहती ॥
टीप ॥ कांहीं सुचेना ते ।
गुज सांगावें कवणातें ॥ आषक० ॥ २
शोध करितांना झालों बहु कष्टी ।
शोध लागे ना हिंपुटी ॥
करुनि पांचाची[2] एकंदर मीठी ।
शोधिलीं तत्वें तुजसाठीं ॥
चाऊ ॥ अग सखे! भुमि सप्तही[3] ।
अग सखे! शोधिल्या त्याही ।
अग सखे! पडसीना ठायी ॥
टीप ॥ लावण्यसगुणभरिते ।
बुडालों तुझ्या विरहगर्ते[4] ॥ आषक० ॥ ३
शोधिले चारी वेद बहू नेटें ।
चतुर्थ स्थानीं गुरु[5] भेटे ॥
वरद कर माथा देवोनि लावि वाटे ।
खूण दाविली वचन खोटें ॥
चाल ॥ अग सखे! दया गुरुनाथा ।
अग सखे! आलिया लावि पंथा ।
अग सखे! उन्मनीं माथा ॥
टीप ॥ चढवोनि गुरु वरते ।
लक्ष दाविले गुणातीते ॥ आषक० ॥ ४
पाहुनि रूप तूझें हर्ष अंतरंगा[6] ।
निववि देवोनि अंगसंगा ॥

---

१. उत्कृष्ट, सरस. २. पांच तत्वांची. ३. सात भुवनें, सात लोक. ४. वियोगरूप खळग्यांत. ५. गुरुग्रह. ६. मनाला.

उशीर न लावी तूं चिदानंद गंगा ।
तुझ्या स्वरुपीं देई जागा ॥
चाल ॥ अग सखे ! मनोरम बाळे ।
अग सखे ! सगुण वेल्हाळे ।
अग सखे ! ………… ॥
टीप ॥ चालवी त्वरें ते ।
पाववी काम पूर्णते ॥ आषक० ॥ ५ ॥
तुझा पाहुनियां घाट स्वरूपाचा ।
खवळला काम योगियाचा ॥
निजी निजशयनीं भोगुं भोग साचा ।
सोहळा सुख सायोज्याचा ॥
चाल ॥ अग सखे ! तुला जनिं विजनीं ।
अग सखे ! पाहु निजनयनीं ।
अग सखे ! समाधि व्युत्थानीं ॥
टीप ॥ नाहीं तुज परते ।
हृदयीं धरियलें देवनाथें ॥ आषक० ॥ ६ ॥

## पद ७९ वें.

निबिड सघन हे [1]मध्यशार्वरी हरि वाजवि मुरली ।
मम मानस वश झालें विशेषें मति त्या रविं मुरली. ॥ ध्रुवपद. ॥
भर्ता भोक्ता [2]अलिसुमशर तनु [3]अब्जि ऐक्य असतां ।
भव्य सुखद रव मंजुळ गुरुतर तैं श्रवणीं बसतां ॥
हिमनगजापतिचा अरिसायक होय हृदयिं सलता ।
पद चाली अलि तसीच वृंदावनिं कोणी नसतां ॥
चाल ॥ लागला छंद त्या रवांत सुमनाचा ।
विगलीत वसनपथ धरीत भ्रमणाचा ।
लक्षोनि अयन चालत फणिशयनाचा ॥
टीप ॥ प्रपंचिं अरुची धरि रुचि हरिपदसरोजाचि वरिली ।
तगमग अति जिविं लगबग करुनी वनवृंदीं शिरली. ॥ निबिड० ॥ १ ॥

१. मध्यरात्र. २. भ्रमररूप पुष्पबाण. ३. कमळीं.

कनककमलमृदुमृणाल अशनी वहन गहन ज्याचें ।
मुक्तीमुखगत प्रमुख मनोहर मुख तप्तितयाचें ॥
बाल मेहेरशत[1] लज्जित गति बा! भालचंद्र ज्याचे ।
नाम जपत शम दाहा गरळगळ रूप वाद्य प्रमुखें ॥
चाल॥ मनमीन आकळी बळें प्रेमसूत्रें ।
खबाण हाणितां भेदि मोहयंत्रें ।
तनु भावरहित जाहलीं गलित गात्रें ॥
टीप ॥ रमारमण निजवदन विलोकूनि मति जी अनुसरली ।
गेरसम[2] घर करि हर हर खगति हृदयीं संचरली. ॥ निबिड० ॥ २ ॥
सजल सघन घन वळला गरगर सभर स्रवति बिंदू ।
सजल चीर अति रुचिर समीरण[3] ये साधित द्वंद्व ॥
न गणुनि श्रम मम मानस धरी ईशपदांबुजिं छंदू ।
आनंदुसिंधु दिनबंधु रवि ज्या तटिं ब्रह्मानंदू ॥
चाल॥ स्वानंद पूर्ण निरखिता रूप नयनीं ।
समरसें चित्त सांठवी हृदयभुवनीं ।
नासला भास जाहला ऐक्य मिळणी ॥
टीप ॥ पूर्ण ब्रह्म गोविंदजिची श्रीमूर्ति मनिं भरली ।
देवनाथ सायुज्यवृत्ति त्या सुखांत तरतरली. ॥ निबिड० ॥ ३ ॥

## पद ८० वें.

वाजविलीस त्वां कशी मदनमोहना चक्रपाणी ।
जळो आग लागो रे! तुझि मुरली हे घरघेणी ॥ ध्रुवपद. ॥
मध्यरात्रिचे अवसरिं निसूर निज आली मजला ।
निचेष्टीत मी झालीं असतां भ्रतारसेजेला ॥
मुरलीरव अतिमधुर सुस्वर स्वर कानीं शिरला ।
दचकुनि उठली कांहिं सुचेना जीवच घाबरला ॥
तशीच झालि बावरी मग म्यां कुंजमार्ग धरिला ।
घोर निशीं अतिभ्यासुर गगनीं मेघ वळुनि आला ॥
गजशुंडावत धारा गर्जुनी[4] वर्षतसे पाणी । जळो० ॥ १ ॥

---

१. शंभरसूर्य. २. विषतुल्य. ३. वायु. ४. गाढ.

सजल चीर जाहलें [१]शीत सूटलें कंप अंगा ।
खडखड वाजति दांत होत प्राणांत कलुष भंगा ॥
कष्ट बहुत संकष्ट परि न मानोनि अंतरंगा ।
प[२]दिं अन्हवाणी कुंजवनीं मी आलें **श्री**रंगा ! ॥
ऐसा करिसी काय म्हणुनि सोसणें किती दंगा ।
व्रज सोडुनियां जावें योगीमानसाब्जभृंगा ॥
कोठुनि कैची आणियली सवत महामोहिनी । जळो० ॥ २ ॥
आम्ही भोळ्या झालों वावऱ्या सकळहि व्रजनारी ।
भुलविलें आमुचे मानस, पाणी घातलें संसारीं ॥
विश्वव्यापका चित्तचाळका **गो**वर्धनधारी ।
कोणि तुला शिकविना **नं**दनंदना **पू**तनारी ! ॥
काय करावी गती सांग **श्री**पति ! हे निर्धारी ।
ध्यास तुझा हृदयास निशिदिनीं [३]**म**धू**कै**टभारी ॥
प्रपंच धंदा कांहिं सुचेना नावडे अन्नपाणी । जळो० ॥ ३ ॥
**दे**वनाथ प्रभु गुरु **गो**विंदा कां रे ! असा छळसी ।
बहूत श्रमली आवरी आतां वृत्ति झाली पिशी ॥
मान विनवणी प्राणविसांव्या ! अंत किती पाहसी ।
तोडि समुळ तरी माया बेडी श्रीमत् हृषिकेशी ॥
दुःख वाटतें मनीं लोक ईश ना मला ग्रासी ।
म्हणउनि विनवणि अशी मुरली कां मोहक वाजविसी ॥
आसनीं शयनीं भोजनीं गमनीं रूप तुझें नयनीं । जळो० ॥ ४ ॥

## पद ८१ वें.

अहारे ! मेल्या **कृ**ष्ण्या ! वाजविली कैशी मुरली ॥ ध्रुवपद. ॥
तुझ्या मुरलीची मधुर ध्वनी । अकल्पित पडली श्रवणीं ।
विव्हल झाली अंतःकरणीं । गृहधंदा मी विसरलीं. ॥ अहारे० ॥ १ ॥
तुझ्या मुरलीच्या सुस्वर तान । ऐकुनि विसरली देहभान ।
गृह सोडुनियां धरलें रान । **वृं**दावनांत मी शिरलीं. ॥ अहारे० ॥ २ ॥

---

१. थंडी. २. पायतणाशिवाय. ३. मधु आणि कैटभ या दोन दैत्यांचा संहार करणारा. (विष्णु.) हे दैत्य विष्णूच्या कर्णापासून उत्पन्न झाले होते.

मुरली ना हे केवळ बाण । माझा हरियला प्राण ।
संसार केला दाणादाण[1] । हृदयीं येउनि संचरली. ॥ अहारे० ॥ ३ ॥
दीनानाथ गुरुगोविंदा । पतितपावन[2] परमानंदा ।
देवनाथे भजनीं धंदा । वृत्ती तव रूपीं जडली. ॥ अहारे० ॥ ४ ॥

## पद ८२ वें.

वृंदावनीं हरिनें अतिमंजुळ वाजविला सये ! वेणू. ॥ ध्रुवपद. ॥
बाहातसे[3] मुरलीमधे ये राधे ! । भुलति काय मी नाणू ॥ वृंदावनीं० ॥१॥
मागतसे भलतैसे हें दान । बैसविली याणें कान्हू ॥ वृंदावनीं० ॥ २ ॥
देवनाथ प्रभु नाथ निरंजन । मूर्ति मनोहर सान्[4] ॥ वृंदावनीं० ॥ ३ ॥

## पद ८३ वें.

मुरली वाजविली कृष्णानें । नंदाच्या कान्ह्यानें. ॥ ध्रुवपद. ॥
रात्र झालीसे दो प्रहर । मधूर मुरलीस्वर ॥
कानीं पडताती सुस्वर । विन्हळ झालें अंतर ॥
बाई मोहियलें मनमोहनें । नंदाच्या० ॥ १ ॥
बाई ऐकागे, सखे ऐसी । छळितो हा हृषीकेशी ॥
घालुनि मुरलीमधें मोहनीसी । वृत्ति केली पीशी[5] ॥
बाई मोहियलें मनमोहनें । नंदाच्या० ॥ २ ॥
भ्रतार सेजेला, अगे पलंगीं । निजली मी रतरंगीं ॥
मुरलीस्वर तेव्हां, अतिसंगी । शिरला अंतरंगीं ॥
तशीच चालली अग ! धडक्यानें । नंदाच्या० ॥ ३ ॥
पाहतां मुरलीचा स्वर बाई । ऐसा त्रिभुवनिं नाहीं ॥
चेटकि नाटकी अग बाई । मोठा शेषशायी ॥
गाही[6] दीधली, वेदानें । नंदाच्या० ॥ ४ ॥
देवनाथाचे मन नांदे । मोहियलें गोविंदें ।
लागुनि भजनाच्या निजछंदें । रमविलें स्वानंदें ॥
वृत्ति झालीसे तल्लीन । नंदाच्या० ॥ ५ ॥

---

१. अव्यवस्थित, मोडलेला. २. पातकीजनास पवित्र करणारा. ३. बोलावितो. ४. लहान. ५. वेडी. ६. साक्ष.

## पद ८४ वें.

मधुर अलापें सुरस वाजवी मानस मोहक हरी ।
जळो गे! मुरली याचि बहुकहरी ॥ ध्रुवपद. ॥
मध्यरात्रिचा समय सखे! मी निजलें पतिसह शयनीं ।
अकल्पित येउनि पडलि मम श्रवणीं ॥
जीव घाबरा कांहीं सुचेना विव्हळ झालें मनीं ।
आलि पदचाली यमुनापुलिनीं ॥
सजल सभर हे बिंदु टपकती मेघ वळला गगनीं ।
चमकति सौदामिनी त्या अति कडकडोनी ॥
टीप ॥ घोर शार्वरी नयनीं दिसेना भयभीत अंतरीं । जळो० ॥ १ ॥
बहुत हिंपुटी फिरतां सखये, एकट मी त्या वनीं ।
हरिच्या विरहें व्याकुळ हृद्भुवनीं ॥
मदनबाण करि उठाण प्राण जाईल कीं ये क्षणीं ।
वाटते अश्रु लोटले नयनीं ॥
तुंबळ यमुना भरली दुथडा खळखळ वाजे पाणी ।
सावजें बोभाती गे त्या जिवनीं ॥
टीप ॥ परम समय हा कठिण पातला काय करूं सुंदरी । जळो० ॥ २ ॥
मुरली नव्हे गे केवळ चेटक, वाजवि धरुनि अधरीं ।
आम्ही पिशाच झालों व्रजनारी ॥
मोहियलें गे! मानस येणें ठकडा हा पुतनारी ।
घातलें पाणी आमुचे संसारीं ॥
त्रास दिधला या मनमोहनें सोसावें किति तरी? ।
सोडुनी जावें हे गोकुळनगरी ॥
टीप ॥ थकित जाहलें काय करावें छळतो ग! नानापरी । जळो० ॥ ३ ॥
देवनाथ प्रभु श्रीगोविंदें हरियेलें गे! माझ्या मना ।
लव पल क्षण हरिवांचुनियां गमेना ॥
अशनीं शयनीं भोजनीं गमनीं हरिविण अन्य दिसेना ।
हरिचें भरलें गे! रूप या नयनां ॥

---

१. स्वरें. २. कडक. ३. यमुनेच्या वाळवंटांत. ४. वीजा. ५. रात्र. ६. ओरडतात. ७. ठकविणारा. ८. भोजनीं.

दिनमपि रजनी सायंप्रातर् नामामृतरसरसना ।
सेवितां जडलि वृत्ति हरिचरणा ॥
टीप ॥ समरस स्वरुपें समाधि सोहळा भोगित स्वसुखाभरी । जळो० ॥ ४ ॥

## पद ८५ वें.

निश्चळ [1]ससमिर यमुनानिर दे लहर उष्ण काळीं ।
तटीं निकटी [2]जगजेठी ओष्ठीं पुटित वेणू कवळी ॥ ध्रुवपद. ॥
कदंबवृक्षि मुमुक्षु दानीं वेणु अधरिं धरिला ।
सप्तस्वर षड् राग रागिणी बि[3]भास आळविला ॥
तंत वितंतें घन सुस्वर सोराठ राग वदला ।
जळचर भूचर खेचर वनचर समूदाय जुळला ॥
चाल ॥ तव वृषभानुसुता ते राधा । गृहिं अनयाचे करितां धंदा ।
वेणुस्वर ऐकुनि गोविंदा । हृदयीं विव्हल झाली मुग्धा ॥
टीप ॥ चंद्रनभाची [4]अभा क्षितीवरी पडली निशि काळी ।
मृगनयना गजगमना आली श्रीकृष्णाजवळी ॥ निश्चळ० ॥ १ ॥
ये हे राधे! ऐसी ध्वनी मुरलीमाजि बाहे ।
शुष्क द्रुमपत्रें खडखडिती हरि चकित पाहे ॥
[5]कामकुरंगी खंजरीटनयना ये उभि राहे ।
[6]त्वंपद निरसुनि [7]तत्पद शोधुनि असि पदिं सुख लाहे ॥
चाल ॥ हे वेदश्रुति मुख्य जाणा । हरिसुख घ्याया आली सगुणा ।
केवल शामविलासित तरुणा । चुंबन देउनि पाहे वदना ॥
टीप ॥ जघनघट निघट मट भङ्नी उरला अंतराळीं ।
मीमांस सांख्यमति प्रकृति पुरुष राधेजवळी ॥ निश्चळ० ॥ २ ॥
कुंजवनीं तो चक्रपाणी विलसित राधेसीं ।
विरामरामा मेघश्यामा जडली रूपासीं ॥
त्रिकुट श्रीहाट गोल्हाट औटपिट ब्रह्मरंध्रासीं ।
सुख भोगित ते राधा धरुनि श्रद्धा सगुणासी ॥
चाल ॥ मधुरिपु भोगी सुख सायासी । पुष्पवनीं क्रीडे कृष्णासी ।
महामहा योगी जपतपरासी । परि ते ध्याना नये कवणासी ॥

---

१. वायुसहित, २. मोठा बळवान ...

टीप ॥ गोपगडी संवगडी थडी बरि कडोविकडि न्याहळी ।
तंव गोकुळिंच्या मुग्धा[1] आल्या मिनेल्या[2] वनमाळी. ॥ निश्चळ० ॥ ३ ॥
षोडशदळ द्वादशदळ द्विदळच्या दोन्ही युवती ।
दशदळ षड्दळ चतुर्थदळि सगुण हरितें पाहती ॥
नामरूपातित वस्तु त्या गोपी तैं सुख घेती ।
नेति[3] नेति इतिहास परि निगम[4]वचनोक्ति ॥
चाल ॥ ऐशी वस्तू रासोल्हासी । यामिनि[5] मानी गोपीकासी ।
लीला नटला मृग क्रीडेसी । न वर्णवे हो! या जिव्हेसी ॥
टीप ॥ देवनाथ भावार्थ लावि चरणारविंदजवळी ।
जेणें जपतपसाधन तव गुण महिमा बरली ॥ निश्चळ० ॥ ४ ॥

## पद ८६ वें.

या गोविंदें मुरलीनादें मोहियलें मन गडे! ।
हरिरुप अखंड नयनापुढें. ॥ ध्रुवपद. ॥
भुवनसुंदरें गुणमंदिरें वाजविली मोहँरी[6] ।
किं नांदे मम मानस मोहँरी ॥
निर्विकारे, श्रीमुरारे! केली ग! बाहेरी ।
किं अवघा प्रपंचमद संहरी. ॥
चाल ॥ या हरिलागीं काय म्हणावें ।
सांग सखे! तरि किति सोसावें ।
कांहीं सुचेना काय करावें ॥
टीप ॥ मन हें झालें वेडें. । हरिरुप० ॥ १ ॥
नंदनंदनें या मधुसूदनें लावियेलें गे! पिसें ।
किं जनवनिं अवघा आपण दिसे ॥
कंसमर्दनें, मुरलिवादनें, अघटित केलें कसें? ।
किं आभास कांहिंच उरला नसे ॥
चाल ॥ नवल वाटलें मला सुंदरी ।
नेणो जालें काय कसि परि ।

---

१. तरुणी. २. जमल्या. ३. न इति न इति=नाहीं नाहीं असें. ४. वेद. ५. रात्रि. ६. वेणु,

पाहतां याते बाह्य अंतरीं ॥
टीप ॥ व्यापक हा चहुंकडे. । हरिरुप० ॥ २ ॥
[1]कुंदरदन सुखसदन अगे ! हा मदनदहन प्रियगडी ।
सावळा क्रीडत यमुने थडी ॥
राजस सुंदर मूर्तिमनोहर जो गोवेळ[2] संवगडी ।
वर्णितां श्रुतिशास्त्रा सांकडी[3] ॥
चाल ॥ जो योगीहृदय हरि हा ।
स्मरतां नांव दुँष्कृत[4] संहरि हा ।
वेणु वाजवी नाना परि हा ॥
टीप ॥ ओढी आपणा कडे. । हरिरुप० ॥ ३ ॥
आम्ही अबळा या व्रॅजबाळा[5] नेणो याची गती ।
वेणुरवें भुलली आमुची मती ॥
लागट होउनि या हृद्भुवनीं नंदात्मज यदुपति ।
भोगवी समाधिसुख संविती ॥
चाल ॥ समाधि व्युत्थानीं हरि विलसे ।
याविण कांहीं अन्य न भासे ।
देवनाथ गुण वर्णित ऐसे ॥
टीप ॥ मौन हे वाचे पडे. । हरिरुप० ॥ ४ ॥

### पद ८७ वें.

मंद मंद वाजवि गोविंद मुरली. ॥ ध्रुवपद. ॥
वृंदावनीं वृंदगोप वृंदसह मुकुंद हरि ।
मदनदहन प्राणमित्र अधरिं कसी धरली. ॥ मंद० ॥ १ ॥
आळवितां तान सुरस संगित रस सुरस कसा ।
मोहियलें चित्त नादें येउनि हृदयीं शिरली. ॥ मंद० ॥ २ ॥
कुंदरदन सौख्यसदन सच्चिदानंद तनु ।
देवनाथिं श्रवणमननीं मूर्ति मनीं भरली. ॥ मंद० ॥ ३ ॥

### पद ८८ वें.

तनों तनों त्रों तननन श्रीहरि हा वाजवि मुरली ॥ ध्रुवपद. ॥

---

१. कुंदपुष्पाप्रमाणें रदन (दांत) ज्याचे तो. २. गवळी. ३. संकट. ४. पाप. ५. गोपी.

वृंदावनकुंजामाजी मधुरध्वनि उठला बाई ! ।
सुस्वर रव श्रवणीं पडतां गृहदार न सुचे कांहीं ।
अतिगुरुतर हे तमरजनी मेघाची पडली साई ।
अतिभ्रमिष्ट चाले मार्गी पडलें मी नादप्रवाहीं ॥ तनों० ॥ १ ॥
गीत संगित तान प्रबंधें रव मोहक त्या मुरलीचे ।
सुर किन्नर नर तल्लिन ते महिसहीत अहिपति नाचे ।
वर्णनीं शिणल्या वाणी न चले मुख वदे श्रुतीचें ।
शेषाच्या चिरल्या जिव्हा, अघटित गे! करणें याचें. ॥ तनों० ॥ २ ॥
मंजुळ ध्वनि सुंदर बाई ! वाजवितां पडतां श्रवणीं ।
खग मृग अति तल्लिन झाले ते पिऊं विसरले पाणी ।
वृक्षाचें पत्र न हाले, रविरथु स्थिरावला गगनीं ।
सूर चकित पाहति अवघे मुकले रस अमृतपाणी. ॥ तनों० ॥ ३ ॥
तृण भक्षिती ना त्या गाई, पक्षिणी त्यजिला चारा ।
वनिं व्याघ्र वृकादिक सारे हिंसेचा त्यजति उभारा ।
नरनारी स्तब्धचि अवघे सोडुनियां मोहपसारा ।
गर्जना मेघ न करिती, मुनि त्यजती आत्मविचारा. ॥ तनों० ॥ ४ ॥
सुर असुरादिक स्थिर झाले, सांडुनियां सकळहि द्वंद्वा ।
अघटित हे लीला न कळे वर्णितां न वर्णवे वेदा ।
भांब्रावलिं शास्त्रें साही बोलत न शकती शब्दा ।
देवनाथ प्रभु त्या गातो निजभावें नाम प्रबंधा. ॥ तनों० ॥ ५ ॥

## पद ८९ वें.

अझुनिया तरि हरि कां ग बाई ! येईना ? ॥ ध्रुवपद. ॥
विरहें व्याकुळ घाबरलें अतिशय ।
तगमग जिविं बहु प्राण कां गे! जाईना ? ॥ अझुनिया० ॥ १ ॥
सुखकर सुंदर मदनमनोहर ।
सावळा सुकुमार कां ग! भेट देईना. ॥ अझुनिया० ॥ २ ॥
गुरुतर मोहक मधुरालाप तो ।
सुस्वर मुरलीचा नाद कां गे! होईना. ॥ अझुनिया० ॥ ३ ॥

---

१. घरचें काम इत्यादि तद्विषयक व्यापार. २. शेष. ३. आकाशांत. ४. उचल. ५. युद्धा, वैरभावा. ६. या शास्त्रांचीं नांवें मागें पृष्ठ ३७ टीप १ येथें पहा. ७. काळजी, धाकधुक. ८. मदनाप्रमाणें मन वश करणारा. ९. मधुर आहे आलाप (भाषण) ज्याचें तो.

देवनाथप्रभु कां गे! निष्ठुर जाहला ।
आलिंगुनि प्रेमें हृदयीं उचलुनि घेईना ? ॥ अञ्जुनिया० ॥ ४ ॥

**पद ९० वें.**

अबलामति प्रार्थिते हरितें प्रेमयुक्त राधा ।
कमलनयन जगजिवन हरि तव विरह मला बाधा. ॥ ध्रुवपद. ॥
विश्वभूषण भयशमन दयाघन हे परमानंदा! ।
अघटित तव गुण चरित [१]नाकळे मौन पडलें वेदा. ॥
[२]दुरित गर्व हरि सर्व दयार्णव तोडि समुळभेदा ।
मुरलिधर गोवर्धनधर! मति तत्पद तत्पादा ॥
चाल ॥ तव विरहाग्नी अतिशयजाळी ।
ज्वाळा उठताती हृदयकमळीं ।
कृपाघना वर्षे वनमाळी ॥
श्लोक ॥ अकळविमळरूपा स्वामि वैकुंठपीठा
निशिदिनिं तव नामीं ध्यास हा नीळकंठा! ।
अतिसदय सुदाता विश्वताता दयाळा
[३]भवपुरिं बुडताहे तारिं मातें कृपाळा! ॥
टीप ॥ दुःखतरु अतिवृद्धि ययाच्या समुळ करि छेदा ।
गोइंद्रियचाळका हरि गोवळ गोपति गोविंदा! ॥ अबला० ॥ १ ॥
एकेदिनीं [४]वृषभानुनंदिनी जे [५]हंसकचरणा ।
जळ आकर्षे पिते गजगमनी जात असे यमुना ॥
कटावरी घट निकट वाट पदिं चालत शुभवदना ।
नंदद्वारावरुनि निघत तैं दृष्टि पडे कान्हा ॥
चाल ॥ गोदोहन करितां विभु साक्षी ।
बाळा हरि मुखकमळ निरीक्षी ।
जा योग्या ध्याता नये लक्षी ॥
श्लोक ॥ देखूनि गोपतनयेप्रति गो त्यजूनी
दोही हरी वृषभ पात्र करीं धरूनी ।
तों पातली त्वरित अंगणिं [६]नंदजाया
देखे बसे त्यजुनि गोवृषभा दुहाया. ॥

१. कळत नाहीं. २. पाप. ३. संसाररूप प्रवाहांत. ४. राधा. ५. हंसगामिनी. ६. यशोदा.

टीप ॥ दटावूनि वदे नंदराणि हरि चक्रपाणि सुबुधा ! ।
त्यजुनि गाय वृषभासि दोहिसी भ्रमिष्ट तूं बहुधा. ॥ अबला० ॥ २ ॥
वदत माय श्रुत वचन होत तैं भीत बहुत कान्हा ।
हळुच म्हणत 'मज गमत जननि ! आश्चर्य आज नयना ॥
स्तन चार हरपुनी एक जाहले मला कळेना ।
बहु वेळ श्रमत [1]अळुमाळ नये गाईला कसा पान्हा ॥
चाल ॥ जालें कर्म महा पैं खोटें ।
दैवत खंडेराव हें मोठें ।
चुकली नवस असे मज वाटे ॥
श्लोक ॥ ऐकूनि वाक्य हरिचें मग जों निरीक्षी
द्वारीं उभी तरुणि देखिली [2]कंजनाक्षी, ।
राधेसि बोलत दटावुनि नंदराणी
'कां गे ! उभी धमकटे ! [3]बिदि आणि पाणी'. ॥
टीप ॥ अधोवदन परतली म्हणे सावळ्या विश्वकंदा ।
विरहबाण हरि प्राण किति भोगणें दुःख आपदा. ॥ अबला० ॥ ३ ॥
यमुनातीरीं भरित उदक सुंदरी कंजनयनी ।
अकस्मात येउनी पाठिसी उभा चक्रपाणी ॥
उदक भरुनि जों फिरे दृष्टि तों पडत मोक्षदानी ।
पीतपटें कट राजत पाहता निकट वदे रमणी ॥
चाल ॥ म्हणे राधिका विश्वोद्धारा ।
[4]भूधरशयना भुवनसुंदरा ।
तव विरहानळ जाळि उदारा ॥
श्लोक ॥ विश्वात्मया जगदिशा हरि देवदेवा
माझी गती तरि कसी वद वासुदेवा ! ।
तूझा वियोग अतिदुर्धर साहवेना
मातें कदापिहि नुपेक्षि दयानिधाना ! ॥
टीप ॥ [5]अज [5]अव्यय [5]अक्षया [5]अनादि पुरुष परम सुखदा ।
जळो जिणें हें व्यर्थचि तुजविण श्रीपरमानंदा ! ॥ अबला० ॥ ४ ॥

---

१. किंचित्. २. कमलाक्षी. ३. गल्लींत. ४. शेषशायना. ५. हें ईश्वराचें गुणबोधक नांव आहे.

आद्यदीप श्रीकृष्ण तयाची ती राधा ज्योती ।
परम पुरुष हा दयाळ श्रीहरि त्याची ते प्रकृति ॥
हा चित्सिंधु ते चित्सरिता ऐक्यपणें मिनती ।
खचित रवि परिपूर्ण तयाची अबाधिते दीप्ति ॥
चाल ॥ वेद पुरुष हा ते श्रुति जाणा ।
स्वरूपीं समरसली गजगमना ।
समाधि ग्रासुनि ये व्युत्थाना ॥
श्लोक ॥ आत्मत्वि ते उघड सौख्यसमाधि भोगी
घेऊनि जीवन निघे मग ते शुभांगी ।
जो देवनाथ वरद प्रभु विश्वयोगी
प्रार्थी तयासि पुढती गुणरत्नखाणी. ॥
टीप.॥ म्हणे, 'विश्वव्यापका! रमानायका! मी मतिमंदा ।
दासि तुझी म्हणवितें, ठेविं पदिं, तोडिं समुळद्वंद्वा.' ॥ अबला० ॥९

## पद ९१ वें.

चाल सख्या! जी घनश्याम वरूं ॥ ध्रुवपद. ॥
निजात्म निजगृहामाजी जाउनी शिरूं ।
ब्रह्मरूप सृष्टि सकल लोचनीं भरूं ॥ चाल० ॥ १ ॥
गुरुसिं शरण जन्ममरणरहित पद वरूं ।
सेवन करुनि बोध जिवन जिवपणा हरूं ॥ चाल० ॥ २ ॥
व्याप्त दशदिशांत सर्व मंद लेकरूं ।
देवनाथ श्रवणिं मननिं मूर्ति मनिं भरूं ॥ चाल० ॥ ३ ॥

## पद ९२ वें.

यशोदे! बहु दुःख, गांजिले यान ।
मोहिलें चित्त कान्हान ॥ ध्रुवपद. ॥
दुडदुडा हरि कानडा रिघे मंदिरीं ।
माझी सासु गेलि बाहेरी ॥
एकांत वेळ श्रीकांत न्याहाळुनि बरी ।
धांवत जवळी आला हरि. ॥

१. एकजीव झाली.

चाल॥ घाली हात गळ्याभीतरी, ।
दोकरीं कुचातें धरी, ।
माझी तोडियली गरसोळी ॥
टीप ॥ दृढतर धरित मुरहर घेतो चुंबन । मोहिलें० ॥ १ ॥
यशोदे ! ऐक कितितरी दुःख सोसावें ।
गोकुळा त्यजुनियां जावें ॥
बाहेरी केली बोहरी[1] किती सोसावें ।
हाणोनि तोंड फोडावें ॥
चाल॥ वाटते पुरला अंत काय सांगावें ।
.............................. ।
.............................. ॥
टीप ॥ याजला वर्णितां शिणला वेद, धरि मौन । मोहिलें० ॥ २ ॥
माझे घरिं सासु म्हातारी अविद्या खरी ।
अहंकार सासरा भारी ॥
नांदती दीर दुर्मती सहाजण[2] अरी ।
हा त्यांचें नांव ना धरी ॥
चाल ॥ साजणी गृहिं येउनी मला धरि करी ।
चहुंकडे पाहे घाबरी ।
.............................. ॥
टीप ॥ निजबळें मला वोढिले धुरळे घालुन । मोहिलें० ॥ ३ ॥
मधुर मुरली सुस्वर वाजवी कर्णी ।
विंधिलें पाहुनी रूप नयनीं तन्मय स्वमनीं ॥
नाठवे दुजी काहणी ।
पाहतां न दिसे रिता ठाव जननी ॥
चाल॥ व्यापिला चक्रपाणी ।
.............................. ।
.............................. ॥
टीप ॥ माया भास मिटे आभास मन उन्मन । मोहिलें० ॥ ४ ॥

---

१. अग्नि. २. काम, क्रोध, लोभ, मद इत्यादि.

यापरि भोगि श्रीहरि सखे साजणी ।
संसारा घातलें पाणी ॥
केले असे लाविले दिसे तुटलि वाणी ।
लाविलें निजध्यानीं ॥
चाल ॥ नाटकी तुझा सूत की भक्तवरदानीं[1] ।
दुरिताचि[2] करि हानी ।
.................................. ॥
टीप ॥ देवनाथ हृदयीं गुण गात छंद अनुदिन[3] । मोहिलें० ॥ ९ ॥

**पद ९३ वें.**

पार्वतिचा[4] पति शिव भोळा जेजुरगडपर्वतीं[5] ।
सोयरा नांदतो हैबती. ॥ ध्रुवपद. ॥
दैत्यभारं दुर्धर भूमीवर मातले तुंबळ ।
खळानें प्राशिलें भूमंडळ ॥
दैत्याधिपती मणीमल्ल तो दुष्टरूप चांडाळ ।
गांजिले ऋषि आणि द्विजकुळ ॥
विध्वंसिले यज्ञ सकळही झाला हलकल्लोळ ।
किं धाके सुरांसि सुटला पळ ॥
विधि इंद्रादिक शरणागत हे कैलासाला जाती ।
सुर गाऱ्हाणें शिवाला देती ॥ पार्वतिचा० ॥ १ ॥
गाऱ्हाणें ऐकुनि देवानें दिधलें आश्वासन ।
कृपाळु दाता पशुवहन[6] ॥
दैत्य मर्दुनी धर्म रक्षिले पतितासी[7] पावन ।
किं धरिला अवतार सगुण ॥
दीन दयाळ राव मैराळ[8] भस्म लेप त्यागुन ।
किं अंगीं हळदीचें उटण[9] ॥
निळ्या घोड्यावरते स्वार खांडा घेउनि हातीं ।
म्हाळसा[10] झाली हिमनगसुती[11] ॥ पार्वतिचा० ॥ २ ॥

---

१. भक्तांना वर देण्यांत. २. पापाची. ३. प्रत्यहीं. ४. मोरोपंतकृत 'खंडोबास्तव' पहा. (काव्यसंग्रह–पंतकृत स्फुटकाव्यें पृष्ठ १६१.) ५. जेजुरीच्या देवाला खंडोबा म्हणतात. ६. पशुपति, नंदिवाहन. ७. पातकी जनाला. ८. खंडोबा. ९. हळदीचे उटणासच भंडार म्हणावयाचें. १०. ही खंडोबाची स्त्री. ११. हिमालयाची कन्या.

वामभागीं राणि म्हाळसा चिच्छक्ति सुंदरी।
कि दुसरी बाणाई धनगरी ॥
कडे पटार ठाणें देवाचें वसविली गड जेजुरी।
गडाला नवलक्ष पायरी ॥
चंपाषष्टी यात्रा भरती, आनंद होतो भारी,।
पाहा देव नितनवरा मेल्हारी ॥
वाघे मुरळ्या भजन करिती भंडार उधळती।
कि वाचे येळकोट बोलती ॥ पार्वतिचा० ॥ ३ ॥
निर्गुण मूर्ति देव महिपती सगुण रूप मल्हारी,।
केली दैत्यावरते स्वारी ॥
दैत्य मर्दुनी धर्म रक्षिले, पतितांचा साहकारी।
कि ठाणें वसविलें गड जेजुरी, ॥
दीनदयाळ राव मैराळ भगवी ध्वज उभारी।
कि हरुषे सुरवर बहु अंतरीं ॥
त्रैलोक्यामधें सत्ता ज्याची व्यापक सर्वांभुतीं,।
कि भोळ्या भक्ताचा सारथी ॥ पार्वतिचा० ॥ ४ ॥
गुरुकृपेनें झालें सोपें फळला निजसद्भाव,।
गुरुनें दाखविलें नवलाव ॥
देह जेजुरी पाहे अंतरीं विचार मुळचा ठाव।
प्रकाशे चिद्घन रुप घवघव ॥
सद्गुरु गोविंदनाथ निरंजन आत्मा खंडेराव।
लक्षिता ठसावला अनुभव ॥
देवनाथाचा समर्थ धनि रे! ज्ञानखांडा हातीं।
मर्दिले निंदक खळ दुर्मती ॥ पार्वतिचा० ॥ ५ ॥

---

१. मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीस चंपाषष्ठी म्हणतात. या दिवसीं खंडोबाचा यात्रोत्सव होतो. २. मल्लारी, मल्ल दैत्याचा अरी. ३. वाघ्ये हे खंडोबाचे भक्त. हे गळ्यांत खंडोबाची वाघी (भंडार ठेवण्याची व्याघ्रचर्माची पिशवी) घालून देवाचे नांवानें भिक्षा मागतात. ४. एळकोट=एळकोटभेर=खंडोबाचे भक्त देवापुढें जेव्हां तळी उचलतात अथवा भिक्षा मागतात तेव्हां 'एळकोट' असा उच्चार करतात. मल्ल दैत्याबरोबर खंडोबाचें महायुद्ध झालें त्यांत ज्या देवसैन्यानें खंडोबास साहाय्य केलें त्याला एळकोट (सात कोटि सैन्य) अशी संज्ञा आहे. ५. सकल प्राण्यांवर.

### पद ९४ वें.

[1]करि खोडी बहू हरी। आवरीं माय यशोदे ! ॥ ध्रुवपद. ॥

गोपमुलांसवें येउनि मंदिरीं।
भक्षित [2]नवनीत [3]मोदें ॥ आवरीं० ॥ १ ॥

नष्ट बहू व्रजनारींसी कष्टवी,।
यास गृहींच असूं दे ॥ आवरीं० ॥ २ ॥

देवनाथ प्रभु नाथ निरंजन।
मोहित मानस नादें ॥ आवरीं० ॥ ३ ॥

### पद ९५ वें.

आँळुनि कां रे ! न येसी। हरि ! सांग दयानिधि ! ॥ ध्रुवपद. ॥

घाबरला जीव, कां कींव न ये। तुजवांचुनि मी परदेशी. ॥ हरि० ॥ १ ॥

स्वरुपीं [5]समरस भोगिन सोहळा। मानस हेच [6]मिराशी. ॥ हरि० ॥ २ ॥

देवनाथ प्रभु बहु करुणेचा। सागर तूं म्हणवीसी. ॥ हरि० ॥ ३ ॥

---

## वेदांतपर कविता.

### पद ९६ वें.

तें तूं ब्रह्मचि पूर्णपणें ॥ ध्रुवपद. ॥

गुणवर्णादिक नाम रूपही। व्यापुनि ज्या असणें ॥ तें तूं० ॥ १ ॥

[7]रंगातित निज वर्णावर्णी। वेद असे मौनें ॥ तें तूं० ॥ २ ॥

जे घनदाट ज्या पाठ न पोटही। नाहीं अधिक उणें ॥ तें तूं० ॥ ३ ॥

देवनाथ प्रभु आत्मा श्रीगुरु। अनुभवि निज स्वमनें ॥ तें तूं० ॥ ४ ॥

### पद ९७ वें.

नाहीं ज्या विकार रे ! । सदा [8]निर्विकार रे ! ।
पूर्ण बोधें निजानंदी वृत्ती [9]तदाकार रे ! ॥ ध्रुवपद. ॥

भासेना आकार रे ! । ………………… ।
लक्षालक्षातीत आपण ब्रह्म [10]सांचोकार रे ! ॥ नाहीं० ॥ १ ॥

---

१. हें गोपांगनांचें कृष्णाविषयीं यशोदेपाशीं गाऱ्हाणें आहे. २. लोणी. ३. आनंदानें. ४. यांत गोपीप्रार्थना आहे. ५. एकात्मक, ब्रह्मानंद. ६. वतनदार. ७. रंगहीन. ८. विकारशून्य. [१ जायते, २ अस्ति, ३ वर्धते, ४ विपरिणमते, ५ अपक्षीयते, आणि ६ विनश्यति या सहा विकारांनीं रहित.] ९. तन्मय, तल्लीन, तदात्म. १०. सत्यता, खरें.

निर्गुण मुळ ॐकार रे! ।.................... ।
आ ब्रह्मस्तंभादी सर्वव्यापक जगदाकार रे! ॥ नाहीं० ॥ २ ॥
कोटी मिहिरा[1]कार रे! । ऐसे तेजाकार रे! ।
गुरुपुरातें अनुभव येरा अंधकार रे! ॥ नाहीं० ॥ ३ ॥
गुरु सुवर्णाकार रे! । जग नग अळंकार रे! ।
मुळीं दृष्टी घालुनि पाहतां एकचि नानाकार रे! ॥ नाहीं० ॥ ४ ॥
देवनाथी अंगीकार रे! । गुरुविश्वाकार रे! ।
पाहतां आत्मा गोविंद ऐसा तुटला भ्रमाकार रे! ॥ नाहीं० ॥ ५ ॥

### पद ९८ वें.

ऐके गे! सखये! बाई! जिवींची ही खूण ।
सांगतसें तुजपासीं श्रवणीं दे मन. ॥ ध्रुवपद. ॥
देखियलें नयनीं म्यां अद्भुत कसे, ।
एकचि नाथ निरंजन जगीं व्याप्त असे, ॥
जेवीं पटिं कीं तंतु हें विश्व तैसें, ।
एकपणीं ऐक्याची मूस वोतली असे ॥ ऐके० ॥ १ ॥
अघटित हें गुरुनाथें दाविलें मला, ।
विहिर आकाशीं, खालीं वाहे प्रवाह भला, ।
चाले तीन पाट पाणी वाफ्या सीवला, ।
हातपायांविण सोका चाळी वेळोवेळां ॥
[3]गगनीं बैसोनि स्थिर तो राखितो मळा. ॥ ऐके० ॥ २ ॥
आणिक म्यां नवल देखिलें कीं हें ।
दृष्टी हे उफराटी करुनियां पाहे ।
अद्भुत कीं ते स्थानीं एक नगर आहे ।
भवतालीं एक [4]गंगा झुळझुळ वाहे ॥ ऐके० ॥ ३ ॥
नगराचे पूर्वेसीं रविचंद्र कसे ।
अद्भुत तेजें गगन उजळलें दिसे ।
आदि अनादि जेथें कांहींच नसे ।
एकचि चिद्घन चिदपठाईच असे ॥ ऐके० ॥ ४ ॥
अनुभवि पाहतां बाई! रूप हाटवटी ।
पडली ग! ते ठायीं निजऐक्यमिठी ।

---

१. मिहिर=सूर्य. २. ऐकण्यांत. ३. आकाशांत. ४. नदी.

सद्गुरुनाथ गोविंदें दाविलें दिठी[1] ।
देवनाथ स्वच्छंदें निजसौख्य लुटी ॥ ऐके० ॥ ९ ॥

पद ९९ वें.

प्रबळ स्वमनिं मज नवल नानुभवि न त्याच श्रुतिमानें ।
अप्रत्ययी परि अहंप्रत्ययें मिरवित अभिमानें ॥ ध्रुवपद. ॥
स्वरुपानुभव नसता नुसता शाब्दिक परिवार ।
शिकवीला तो बोले जैसा शुक[2] वारंवार ॥
ओस नगर परि व्यर्थ भवता उगाचि आवार ।
क्लीब परि शिरिस मला वागवी स्वकरीं तलवार ॥
चाल ॥ तदन्यायें होय शब्दरचना ।
हे कदा न मानिति बुधजन या वचना ।
श्रीगुरुकृपेविण कवित्व तें रुचना ॥
टीप ॥ जळो जळो तें ज्ञान, कवित्वा स्फुरे अहंस्फुरणें ।
कालविता निजमतिनें कर्दम नुटे काल धरणें ॥ प्रबळ० ॥ १ ॥
परोत्कर्षें देखुनि लोचनीं कुबुद्धिनें सरळा ।
होतो निंदा परि ह्या लावित शब्दाच्या चरळा ॥
दुर्वाक्याची रुची मुखीं ते सांडित विष गरळा ।
पाहतां दिसतो गोठ्यांतिल पशु बैल जसा मरळा ॥
चाल ॥ मतिमंद करित परि छंद शब्द उघडा ।
अतिदुष्ट हृदय जो साधुछळनिं निधडा[3] ।
मुसमुसित द्वैत मी ज्ञानि म्हणवि गधडा ॥
टीप ॥ जळो तयाचें तोंड शिणविली रांड महा तेणें ।
पितृरेत तो नव्हे, बुडविला जन्म वृथा जेणें ॥ प्रबळ० ॥ २ ॥
वंध्या ते परि चिंध्या बांधुनि वाढविलें पोटा ।
पदर घेत वरि गरोदरीचा जगांत बोभाटा ॥
वेण न येतां पुत्र नव्हे हा फजीतिचा वांटा ।
तज्ज्ञ[4] जाणती किति लपवावें सुइणिपुढें * * ॥
चाल ॥ कां पुत्रवंतिच्या विरहें मन डोहळा ।
कां वांझेलागी व्हावा असा डोहळा ।

---

१. दिठी=दृष्टि. २. पोपट. ३. वीर्यवान्, पराक्रमी. ४. त्याला जाणणारे.

हे निरयगती तो प्राप्त नव्हे सोहळा ॥
टीप ॥ ज्ञानी नव्हे अज्ञान भ्रमासीं उगी फिरे रानें ।
मद्मत्सर मति भूतीं भरले ब्रह्म सभर जेणें ॥ प्रबळ० ॥ ३ ॥
वृथा पुष्टमति भ्रष्ट तयाचें नाम न घ्या वाणीं[2] ।
नष्ट महा सज्जन मन कष्टवि जो इष्टाअशनीं ॥
श्रेष्ठ महाजन एकनिष्ट जे रत भगवद्भजनीं ।
स्पष्ट करित जो दुष्ट साधुच्या चेष्टा दिनरजनी[3] ॥
चाल ॥ जो सज्जन निंदापर सदैव नाचे ।
अजि कार्य तयाच्या न पडो दर्शनाचें ।
मग काय प्रयोजन त्यासि भाषणाचें ॥
टीप ॥ देवनाथ म्हणे काय काज त्या संगतिला करणें ।
स्वस्थ ठेवुनी मानस सज्जनीं 'हरि हरि' तें स्मरणें ॥ प्रबळ० ॥ ४ ॥

### पद १०० वें.

आम्ही लिंगाइत वाणी । आमचा सैवदा[4] घ्याना कोणी ।
घेणाऱ्याचें हित होय न घे त्याचि हाणी ॥ ध्रुवपद. ॥
नरदेह पेठ माजी पांचखणी जाण । ज्ञान दुकान ।
विज्ञानेसि वस्तु भरली शुद्ध सोऽहं केन ॥ आम्ही० ॥ १ ॥
वस्तु घेतां लाज चित्ता दुरी ठेवुनि यावें । भक्तिद्रव्य घ्यावें ।
लक्षरूपी मोज घेउनि आपिआप व्हावें ॥ आम्ही० ॥ २ ॥
सद्भावेसि संत गुरुसि शरण तुम्हीं जावें । हित करुनि घ्यावें ।
देवनाथ गुज सांगे देह लया पावे ॥ आम्ही० ॥ ३ ॥

### पद १०१ वें.

'तुकाराम' चतुराक्षरी मंत्र जपतां निज हृदयीं ।
दे पद साम्राज्याचें[5] येउनि मुक्ति रुळे पायीं ॥ ध्रुवपद. ॥
तूं तूं तूं चैतन्य तूंचि तूं त्यागुनियां मी तूं ।
तूं साक्षी अपरोक्ष परात्पर आदि अनादि तूं ।
तूं पाहे मजमाजि सकळ हें विश्व चराचर[6] तूं ।
तूं तूं म्हणणें शब्द न साहे, अगम अगोचर तूं ॥ तुका० ॥ १ ॥

---

१. अधोगती. २. वाणीनें. ३. रात्र. ४. हा शब्द फारशी आहे. ५. सार्वभौमत्वाचें. ६. स्थावरजंगम.

कार्याकारण कर्तृत्वाचा संबंध तुज हाका ।
कांहिं न दिसे काळाचा तूं काळ नसे शंका ।
काळ त्रिकाळीं अबाधीत तनु शुद्ध बुद्ध नीका ।
काया छाया माया नसे तुज, अरुप रूपरेखा ॥ तुका० ॥ २ ॥
राणा त्रैलोक्याचा तो तुजविण नाहीं दुसरा ।
रानिजनीं तूं व्यापक अससी अद्वय रे! चतुरा ।
रात्रंदिवस भासतसे हा मायेचा थारा ।
राहणें येणें जाणें नसे तुज ब्रह्मनिर्विकारा ॥ तुका० ॥ ३ ॥
महा अखिल निजरूप रुपेविण तो तूं पूर्णकाम ।
मनोन्मनीं सुख भोगी आपुलें निजात्म विश्राम ।
ममत्व हें तव ठायीं न साहे निजजन हें धाम ।
मंथन करुनी रस सेवीसी तैंच तुकाराम ॥ तुका० ॥ ४ ॥
देवनाथ म्हणणेंचि आटलें पाहाणें पण सुमदें ।
देणें घेणें मुळींच खुंटलें चिद्घन आनंदें ।
देउनि बलिदानातें मन मग निरसियलें द्वंद्वें ।
देही असतां देहविदेहा चित्त स्वयंभ नांदे ॥ तुका० ॥ ५ ॥

### पद १०२ रें.

अरुपानंदी अद्वय श्रीगुरु दत्तचि अवतरला ।
गुरुची अद्भुत गुणलीला ॥ ध्रुवपद. ॥

हा नाथनाथ कलियुगांत करितो मात बहू भारी ।
पहा हा मानवतनुधारी ।
ना ब्राह्मण ना क्षत्रिय वैश्य शूद्र वर्ण चारी ।
चहुतित हा ब्रह्मचारी ॥
ब्रह्मचारी गृहस्थ वानप्रस्था त्रिपुटी सारी ।
नव्हे हा यतीवेषधारी ॥
परमहंस परमात्म आनंदी सच्चिद्घन पुतळा । गुरुची० ॥ १ ॥
निर्विकल्प हा निर्विकार आकार धरी ऐका ।
प्रभु हा पालवि भाविकां ॥
प्रेमें पहात रता ठायीं निजसुख साधकां ।
भवजलतरणीं पहा नौका ॥

पूर्णसिद्ध हा प्रसिद्ध मणिचा कल्प समुळ टोका ।
भावें वदनीं नामा घोका ॥
नाम करिल आराम सर्वही चुकेल यमघाला । गुरुची० ॥ २ ॥
हा योगिराज महाराज ग्रासितो माज दुर्जनाचा ।
पूर्ण साहाकारी दासाचा ॥
चव देहाचे साक्ष चढोनी घाट उन्मनींचा ।
खेळतो निजानंदिं साचा ॥
निजानंद आनंदकंद निर्द्वंद्व स्वरूपाचा ।
ठायिं हा योग समाधीचा ॥
उघड समाधी निजात्मबोधें पूर्णपणें घाला । गुरुची० ॥ ३ ॥
वदे बाळ नाथ लडिवाळ किती पाल्हाळ शब्दवाणी ।
अरे! हा योगि महाज्ञानी ॥
ज्ञान आणि विज्ञान ग्रासुनी योग कसे दोन्ही ।
नांदतो निजात्मनिजभुवनीं ॥
दत्त दत्त अवधूत दिगंबर श्रुति गाती गाणीं ।
तोचि हा देखियला नयनीं ।
देवनाथ म्हणे नाथ आमुचा पूर्ण वोळखीला । गुरुची० ॥ ४ ॥

## पद १०३ वें.

'गोविंदनाथ' [1]पंचाक्षरि मंत्र [2]अखंडित हा जपा. ।
अखंड जपतां [3]भावें चुकवी जन्ममृत्युखेपा ॥ ध्रुवपद. ॥
गोप्यवस्तु चौपरती निरुती लक्षिति ते लागो ।
'गो'इंद्रिय चाळक पद वरुनी सत्पथ सम वागो ।
गोप जिला अति गोप्य समुच्चय दुष्टविषय त्यागो ।
गोगौतमिसम निर्मळ मन शुद्ध हें स्वरुपिं जागो ॥ गोविंद० ॥ १ ॥
विश्वीं भरुनी उरलें तें गुज निजदृष्टी दावी ।
विकल्प छेदुनि ऐक्यपणें श्रीदूतपणा नुरवी ।
विलास लाजो ऐक्य अनादि नानुस्वानुभवी ।
वेदश्रुति नेति नेति गुज गुरु दे देहा पदवी ॥ गोविंद० ॥ २ ॥

---

१. पांच अक्षरें (गोविंदनाथ हीं) ज्यांत आहेत असा हा मंत्र. २. सदोदित. ३. एकनिष्ठेनें, भक्तीनें.

दमन इंद्रियां करुनी दमना सम सांडी कुमुद ।
दलकमलाक्षीवर स्मर हृदयीं सेवि सुखामोद ।
हृद् दलसहस्रा परते निरुपम निघोट जे सुखद ।
म्हणतां 'दत्तात्रयगुरु सच्चिदानंदकंद' ॥ **गो**विंद० ॥ ३ ॥
नामरूप ज्या नसेचि कांहीं, अदेख देखना ।
नाकळलें गुज वेदा म्हणउनि धरियलें मौना ।
नारायण[1] आश्रया नारा तें पद उमजाना ।
'नाना' म्हणतां नाथ दयार्णव फेडियली भ्रमणा ॥ **गो**विंद० ॥ ४ ॥
थैथै नाचति या निजवृत्ति समजुनि गुह्यार्थ ।
थरारिला हा काळ भयाभित फिरे घेउनि गुंथ ।
थकति **विधिहर** शोधित ज्याच्या हुगमे भावार्थ ।
'थ' 'थ' म्हणणें शब्द न साहे दुजेपणा नाथ ॥ **गो**विंद० ॥ ५ ॥
एक परात्पर पूर्ण सदोदित भरला रे! एक ।
एका व्यसनीं भरला म्हणता शब्दचि मायीक ।
एक तुचि तुज परतें दुसरें नाहीं आणीक ।
एकानुभवितां **दे**वनाथ **गो**विंदचि एक ॥ **गो**विंद० ॥ ६ ॥

### पद १०४ वें.

**पा**र्था[2]! ते तरले ते तरले । जे नामीं अनुसरले. ॥ ध्रुवपद. ॥
वैराग्यें गरगरले । जे चित्सुखांत कीं तरतरले. ॥ **पा**र्था० ॥ १ ॥
शांतिसुखें आभरले । जैसें लवण जळीं कीं विरलें. ॥ **पा**र्था० ॥ २ ॥
**दे**वनाथि मन मुरलें । स्वरुप ब्रह्म दिठीं जग भरलें. ॥ **पा**र्था० ॥ ३ ॥

---

१. नारायण. या नांवाच्या उत्पत्तिविषयीं पुढील श्लोक अवलोकनीय आहेत:—'नराज्जातानि तत्त्वानि नराणीति विदुर्बुधाः । तस्य तान्ययनं पूर्वं तेन नारायणः स्मृतः ॥ १ ॥ आपो नारा इति प्रोक्ता आपो वै नरसूनवः । अयनं तस्य ताः पूर्वं तेन नारायणः स्मृतः ॥ २ ॥,' अर्थ—पंडित लोक नारापासून उत्पन्न झालेल्या तत्वांना 'नर' असें समजतात. तीं नारें (तत्वें) पूर्वीं परमेश्वराचीं अयनें (आश्रयस्थानें) झालीं होतीं म्हणून त्याला 'नारायण' असें नांव पडलें. ॥ १ ॥ उदक नरा' पासून उत्पन्न झालें म्हणून त्याला 'नर' असें म्हणतात. तें 'नर' (उदक) पूर्वीं ईश्वराचें अयन (वसतिस्थान) होतें म्हणून परमेश्वराला 'नारायण' असें नांव पडलें. ॥ २ ॥. २. हे अर्जुना.

### पद १०५ वें.

नाथा सखा सूखदानीं । मला भेटवा कोणीं ॥ ध्रुवपद. ॥
दु:खित बहु मी या संसारीं । नावडती नगलेणीं[1] ॥ मला० ॥ १ ॥
निजरूप याचें पाहीन लोचनीं । गाईन मी गुणगाणी ॥ मला० ॥ २ ॥
देवनाथ प्रभु नाथ निरंजन । त्याविण कोण निदानीं ॥ मला० ॥ ३ ॥

### पद १०६ वें.

मन ! भज भज रे ! आतां । धनि दयाळ गुरु दाता ॥ ध्रुवपद. ॥
उदरनिमित्तें[2] फिरसी वनवन । वाहसि कां चिंता ॥ धनि० ॥ १ ॥
नउ महिने जननीचे उदरीं । पाळसि निजसत्ता ॥ धनि० ॥ २ ॥
पालनार्थची रक्तमांस पैं । उत्पत्ती करतां ॥ धनि० ॥ ३ ॥
देवनाथ प्रभु नाथ निरंजन । तारिसि निजभक्तां ॥ धनि० ॥ ४ ॥

### पद १०७ वें.

या गे ! या गे ! गुरुपायिं रता बाई ! ।
भ्रमें भुलल्या संसारसार त्राहीं नाहीं ॥ ध्रुवपद. ॥
वृथा कन्यासुतगेह[3]धन आशा ।
मायाजाळीं गुंतोनि मोहपाशा ।
बुडवीलें स्वहिताची केले नाशा ।
पुढें होती या गती वदा कैशा कैशा ॥ या गे० ॥ १ ॥
शरण व्हावें सद्गुरू देवदेवा ।
पदीं ठेवोनी शुद्ध निजभावा ।
निर्विकल्पें मनमयूर दान द्यावा ।
साधा अपुला निज आत्म निज ठेवा ठेवा ॥ या गे० ॥ २ ॥
धन्य धन्य गोविंद गुरुराणा ।
नयनद्वारें सांठवा हृदयभुवना ।
जन्ममरणाचा ठाव नुरे जाणा ।
देवनाथाची विनति मना आणा आणा ॥ या गे० ॥ ३ ॥

### पद १०८ वें.

श्रीराम जयराम जय जय राम वदा वाचे ।
तराल भवपुरीं सार्थक होइल जन्माचें ॥ ध्रुवपद. ॥

---

१. अलंकार. २. पोटासाठीं. ३. गेह=घर.

फिरुनियां मागुती न ये कदापी ऐसी नर[1]काया ।
विसरुनिया श्रीरामा कां हो! जातां नरका या ॥ श्रीराम० ॥१॥
गाती मुनिजन ध्याती नारद तुंबर गुण[2]गाणीं ।
वर्णिती महिमा ज्याचा शिणली कुंठित वाणी[3] ॥ श्रीराम० ॥ २ ॥
नाम घेतां तरले पापी अजामिळ गणिका[4] ।
राम राम राम दोन्हीं अक्षरें घोका ॥ श्रीराम० ॥ ३ ॥
भजा भक्तिभावें निश्चय ठेवुनियां पायीं ।
देवनाथ प्रभु दाता स्मरतां भवभय[5] नाहीं ॥ श्रीराम० ॥ ४ ॥

## पद १०९ वें.

अग! बाई! सांवळियाचा[6] वेणू वाजे वृंदावनिं ग! ॥ ध्रुवपद. ॥
मध्यभागीं झाली रजनी[7] । पतिसह सुखशयनीं ।
निजलें मी असतां श्रवणीं । अकल्पित पडला ध्वनि ग! ॥ अग० ॥ १ ॥
रव नव्हे साजणी । विंधियलें कामबाणीं ।
विव्हळ मी अंतःकरणीं । चाल, जातें अनवाणी[8]. ॥ अग० ॥ २ ॥
देवनाथ प्रभु धनी जनिं । वनीं भरला नयनीं ।
आसनिं शयनीं गमनीं । त्याविण कोण निदानीं ॥ अग० ॥ ३ ॥

## पद ११० वें.

नाथा! जडलें रे! गोविंदा! । तुझिया पदारविंदा[9] ॥ ध्रुवपद. ॥
ही दीन मी मंदमती । परि लज्जा तुझिये हातीं ॥ नाथा० ॥ १ ॥
बहु मी अन्यायी अन्यायी । परि क्षमावंत तूं आई ॥ नाथा० ॥ २ ॥
अझुनि पाहसि कां निर्वाण । कंठीं उरला प्राण ॥ नाथा० ॥ ३ ॥
देवनाथाच्या प्रभु धन्या । ये धांव त्वरें धांवण्यां[10] ॥ नाथा० ॥ ४ ॥

## पद १११ वें.

निजसुखसाधनीं सद्गुरुचरणीं भावें शरणागता ।
जातां दे गुरु सायुज्यता[11] ॥ ध्रुवपद. ॥
जप तप साधन खटपट करितां मनासि आला विटं[12] ।
म्हणोनी हरिचे भजनीं निट ॥

१. मानवतनु. २. गुणगीतें. ३. सरस्वती. ४. वेश्या पिंगला. ५. संसाररूप भीति. ६. श्यामवर्ण कृष्णाचा. ७. रात्र. ८. पादुकारहित. ९. चरणकमळा. १०. धावण्यास येणें=साहाय्य करण्यास सरसावणें. ११. मुक्ति. १२. कंटाळा.

होतां हरितें कृपा उपजली झाली सद्गुरुभेट ।
गुरूनें धरियेलें मनगट ॥
नेलें अंतरसदनीं करुनी जाणविला बोभाट ।
'सोऽहं' मंत्र ह्या उद्घट ॥
शिरतां अंतरीं दुःख दिगंतरीं झाली आरोग्यता ।
सकळही विटली दारिद्रता ॥ निज० ॥ १ ॥
सोऽहं मंत्रीं गुज लाधलें ॐ[१]काराचें मुळ ।
जेथुनी उद्भवलें सकळ ॥
नामरूपातित वस्तू नाहीं वर्णव्यक्ति वीटळ ।
नाहीं स्थीर ना चंचळ ॥
रंगातित निजरंगिं चंचल अविट जें अढळ ।
[२]स्वयंभ ज्योति ते निर्मळ ॥
नाम रूप ज्या नसेचि कांहीं अखंड त्या पूर्णता ।
आपुला आपण एकूलता ॥ निज० ॥ २ ॥
एकचि म्हणतां अनेक दिसतो अनेकीं एकला ।
पाहतां आपणची पीकला ॥
पिकला ना तो अपक्व सुकला अनेकीं ना एकला ।
जेथें शब्दचि मौनावला ॥
अनंत दिन मनिं गाळुनि तेजें स्वतेज उदया आला ।
माजी देखना बूडाला ॥
समरस झाली वृत्ती भ्रांती ठाव नसे बोलतां ।
चित्सुख निज आंगीं बाणतां ॥ निज० ॥ ३ ॥
सद्गुरु गोविंदनाथ निरंजन ज्ञानांजना दीधलें ।
लेतां अनुपम गुज लाधलें ॥
मी माझे मजमाजि मिसळलों मीपण मुळिं आटलें ।
माझें निजरुप मज भेटलें ॥
झाली भेटी, पडली मीठी, पोटीं सामावलें ।
अंतर्बाह्य प्रकाशलें ॥

---

१. प्रणवाचें. २. स्वयंभू.

देवनाथ प्रभु निजसुखसाधनें सेवी नामामृता ।
नामीं लाधली पूर्णता ॥ निज० ॥ ४ ॥

### पद ११२ वें.

गोविंदा रामा कृष्णा गोपाळा गोपीरमणा ! ।
भजतयासि अतिसुख देसी भक्तवत्सल भवभय[1]हरणा ! ॥ ध्रुवपद. ॥
शरणागत जे तुज येती आपदा [2]हरिशी त्यांची ।
कमलापति [3]कमलदलाक्षा करुणा तुज फार दीनाची ॥
विदुराच्या खासि कण्या रे ! पोहे भक्षि सुदामयाची ।
हरुनिया दरिद्र दिधली नगरी त्या सोनियाची ॥ गोविंदा० ॥ १ ॥
अतितीक्ष्ण दंश मिठी दे नक्रें गज धरिला बाई ! ।
ओढितांचि जळिं घाबरला स्मरला तो तुज ते समयीं ॥
करुणारव पडतां श्रवणीं करुणा तुज आली हृदयीं ।
उद्धरिला पशुगज कीं तो कनवाळे शेषशाई ! ॥ गोविंदा० ॥ २ ॥
पुरविलीस संकटिं वस्त्रें स्मरतां ते द्रुपदबाळा, ।
रक्षुनिया लज्जा सतिची [4]संबोखिली ते [5]वेल्हाळा ॥
भक्तवत्सल पूर्ण ब्रिदाचा अभिमानी होसि दयाळा ।
तूं धनि म्हण तुज मी [6]बाहें जाणुनियां संकटवेळा ॥ गोविंदा० ॥ ३ ॥
देवनाथ प्रभु गुरु देवा विनवितसे पदारविंदा ।
ये सत्वर घालि उडी बा ! संरक्षीं अपुल्या बिरुदा ॥
झालीसे या कोटीची येथोनि आजि मर्यादा ।
हा पाश तोडि पदिं ठेवी स्वामिया सदानंदा ! ॥ गोविंदा० ॥ ४ ॥

### पद ११३ वें.

किति तरि तुज शिकवुं जाण ।
मानवा सुजाणा [7]मर्मणा सुजाणा ॥ ध्रुवपद. ॥
वेदशास्त्रपुराण तूज । सांगताति निजगूज ।
जाणुनिया हृदयिं कसा त्यजसि नानुमाना ॥ किति० ॥ १ ॥
काय करिसि दंतकथा । भक्तिवीण ज्ञान वृथा ।
अनंतनाम गासि किती बा ! उगा तनाना ॥ किति० ॥ २ ॥

---

१. दुःख. २. निवारण करिशी. ३. कमलपत्रनयना. ४. सांत्वन केलें, सांत्विली. ५. सुंदर स्त्री. ६. हांक मारतों. ७. मर्मज्ञा !

कन्याधनस्वसुतदार[१] । मानियलें हेंचि सार[२] ।
हिंडे भ्रमवि जनीं फार कां मती फिरेना ॥ किति० ॥ ३ ॥
संतभक्त महानुभाव[३] । तत्पदींच धरुनि भाव[४] ।
भक्तियोग करुनि सांग वारि जन्ममरणा ॥ किति० ॥ ४ ॥
देवनाथ वदत मात ग्रहण करी हे हितार्थ ।
चराचरीं व्याप्त गुरु विनट भाव चरणा ॥ किति० ॥ ५ ॥

## पद ११४ वें.

जळो याची हें मुरलि अगे! बाई! ।
श्रवणीं पडतां देहभान नुरे कांहीं कांहीं ॥ ध्रुवपद. ॥
उभा कुंजवनीं मुलें मेळवीतो । मधुर आलापें वेणु वाजवीतो ॥
तानमानाच्या गती आळवीतो । नादें गोपीचीं मनें भुलवीतो व्रीतो ॥ जळो० ॥
रुचिर नेसलिसे चीर[५] तये वेळां । निघे बाहेर तों मेघ वरुनि आला ॥
विजा चमकती तेज बंबाळा । घोर शार्वरी[६] कांहीं न दिसे डोळां डोळां ॥जळो०॥२॥
शेजीं असतां गे! माझा गृहधनी । अकल्पीत येवोनि पडे कानीं ॥
हृदयिं शिरुनियां घालि मोहणी । पिशी[७] झालें मी आलें कुंजभुवनीं भुवनीं ॥जळो०॥
छळी आम्हां ते यास प्रीय झाली । सवत नेणों हे कोठुनिया आली ॥
वश केला गे! इनें वनमाळी । पाणि[८] संसारा आमुचिया घाली घाली ॥जळो०॥४॥
काय म्हणुनि हे पेटलिसे द्वंद्वा । सुचूं नेदी आम्हासि गृहधंदा ॥
देवनाथाच्या प्रभु सदानंदा । इनें मोहियलें चिदानंदकंदा कंदा ॥जळो०॥५॥

## पद ११५ वें.

सार घ्यावा हा अनुभव देहीं । शब्दज्ञानाचें काज येथें नाहीं नाहीं॥ ध्रु०॥
बोलुं जातां बोलासि नुरे ठाव । पाहुं जातां पाहणें झालें वांव[१०] ।
नामरूपातित पूर्ण निरामेव[११] । तरिच लाभे तुष्टेल गुरु देव देव ॥ सार० ॥ १ ॥
नयनिं येतां नयनासि स्वयें ग्रासी । विकासलें[१२] स्वतेज तेजराशी ।
व्यापकत्वें संपूर्ण लोकवासी । स्वजनपालय संहार नाहिं ज्यासी ज्यासी ॥सार०॥२॥
नये लक्षीतां लक्ष लक्ष नेटें । अणूरेणूहुनि सहान महान मोठें ।
अहं ब्रह्मास्मि ऊर्मि[१३] जेथें आटे । गुरुकृपें निजगुज हृदयिं प्रगटे प्रगटे॥सार०॥३॥

---

१. बायको. २. श्रेष्ठ. ३. महाशय, उदारमनस्क. ४. विश्वास, भक्ति. ५. वस्त्र. ६. रात्र. ७. वेडी. ८. पाणी घालणें=सोडणें, सांगणें. ९. युद्धा. १०. व्यर्थ. ११. निरामय. १२. प्रकाशलें. ९. तरंग, लाट.

नसे पाठीना पोट म्हणणें शब्द । जया स्तविती श्रुति मौन धरिति वेद ।
...........पूर्ण निजानंद । देवनाथाच्या प्रभू सदानंद नंद ॥ सार० ॥ ४ ॥

---

## हिंदुस्थानी पदें.

### पद ११६ वें.

बजी[1] कान्हा बंसी[2] तेरी[3] । ज्यालम[4] वे ॥ ध्रुवपद. ॥
सोते[5] हैंति[6] मैं अपने[7] पियासंगे[8] । धुन कटियारी मारी ॥ ज्यालम वे ॥ १ ॥
नादभरी मन कछु[9] नहि सूचत । उंघारी[10] मैं आई दौरी[11] ॥ जालम वे ॥२॥
देवनाथ प्रभु नाथ निरंजन । बेनसि नही मोहनि डोरी[12]. ॥ जालम वे ॥३॥

### पद ११७ वें.

भज मन श्रीराजा रघुनाथ ॥ ध्रुवपद. ॥
कहुको मातापिता और भाई । कहुको ये जामात ॥ भज मन० ॥ १ ॥
कामिनी कामकी कठन पडत है । गहिरी अंधेरी रात ॥ भज मन० ॥ २ ॥
जल अंजुली जल जाय पले पल । तव तनू सुहाग ॥ भज मन० ॥ ३ ॥
देवनाथ प्रभु नाथ निरंजन । साच बनी है बात ॥ भज मन० ॥ ४ ॥

### पद ११८ वें.

सोबी[13] अकलवंत बडा है । नसीब सिकंदर[14] है उसका[15] ॥ ध्रुवपद. ॥
जबलो पल्लो गठडी तबलग ज्यो करेसो उसीका ।
हता रावन कीरत वढी जद अंधधुंदमो राज किया ॥
तेहतिसकोटी देव पकडके दारबंदमो कैद किया ।
सुनो[16] अकलकी तारीफ जिन्हे चार बेदका [17]खोज किया ॥
चौदाचौकडे[18] राज झुकाया[19] दौलता खुब हजा लिया ।
छुटी पल्लोकी गठडी जद आध घडीकू डुबा दिया ॥

---

१. वाजते. २. वंशी (मुरल–पांवा). ३. तुझी. ४. जालीम, तीव्र, जुलमी. ५. निजली. ६. होत्यें. ७. आपल्या. ८. प्रियाचे संगें. ९. कांहीं. १०. उघडी ११. धांवत, दौडत. १२. घातली. १३. तोही. १४. धनवत्तर. १५. त्याचें. १६. ऐका. १७. रावणानें वेदाचें पदें (खंडें) केली इत्यादि कथेवर कविकटाक्ष आहे. १८. चौकड्या. (चौकडी=चार युगांचा समुदाय.) चौदा चौकड्या=छप्पन युगें. स्वर्गांत इंद्राचें राज्य छप्पन युगें व पृथ्वीवर मनूचें छप्पन युगें असें समजजात. १९. चालविलें, केलें.

अकलकी बे नकल रही जिने समस्त कुल भस्म किया ।
बिभिखनने बहोत सिकाया जरा न माने उसीका ॥
आई कालकी घडी चुके नही फिरा काल जद दैतोका ॥ बस मौत लिखी ॥ १ ॥
अनंतफंदिने नानाफडनीसकी अक्कलकी तारिफ किई ।
क्या है उसकी अक्कल दौलत पेशवेकी डुबा दिई ॥
ज्यो मैं करूंगा सोहि होयगा ऐसी मनमें मगरूरी भई ।
मालखजीना आपने हात खावंदके घर कच्छु न रही ॥
सवाई माधवराव मुवा जद अक्कल चोदी भूल गई ।
बाजिरावकू देता गादी सोबी ज्यानत हतासही ।
फिरा नसीबा चुकी किरिया काहा ठिकाना अकलका ॥
नमकहरामी करे खावंदसो किने बजाया है डंका ॥ बे अबी सुनो ॥ २ ॥
छोटे छोटे अदमी बढाये उसीपासमो आन खडे ।
अपने आगे कछु गत नही ज्यो होय सो आप बडो, ॥
ना खावंदका घरही राखा ना फौजो साबूत खडे ।
मनमें मगरुरी करके गाफल ना बैरीसो जरा अडे ॥
कंबक्तीका पहेरा यारो बदमस्तीसो बहोत चढे ।
करम गंडिया आखर नाना ज्या सिंदेके कैद पडे ॥
मिलाई सोई खोई यारो लिया ठिंकरा अपजसका ।
देवनाथ कहे मुजे गरज नहि राज डुबाया बम्हनका ॥ वे कछु न किया ॥ ३ ॥

## पद ११९ वें.

राम न जाने तो नर जिया तो क्या जी? ॥ ध्रुवपद. ॥
धनदवलत धन मालखजीना ।
और मुलुख सर किया तो क्या जी? ॥ राम० ॥ १ ॥

---

१. नाना फडनैविसाविषयीं कवीचे उद्गार कितपत यथार्थ आहेत हें जाणण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं रा. रा. वासुदेव वामन शास्त्री खरे यांनीं लिहिलेलें **'नानाफडनविसांचें चरित्र'** हें उत्तम पुस्तक अवश्य वाचावें. देवनाथाचें म्हणणें केवळ कवित होय, त्यांत यथार्थत्वाचा लवलेश नाहीं अशी वाचकांची खात्री वरील पुस्तक लक्षपूर्वक पाहिलें असतां होणार आहे. २. मालीक, यजमान. ३. वारला. ४. टपका. ५. अपयशाचा, अपकीर्तिचा. ६. जीवंत. जो नर रामाला जाणत नाहीं तो जीवंत कसचा? ७. त्याचा काय उपयोग? ८. हा शब्द आरबी आहे. ९. हा शब्द फारशी आहे. १०. सर करणें=जिंकणें.

गंगा गोमति रेवा तापी ।
और बनारस न्हाया तो क्या जी? ॥ राम० ॥ २ ॥
गोकुल मथुरा मधुबन द्वारका ।
और अजुध्या[1] कर आया तो क्या जी? ॥ राम० ॥ ३ ॥
दुर्वेषसे बडा जंगम जोगी[2] ।
और कानफाडा[3] आया तो क्या जी? ॥ राम० ॥ ४ ॥
वेदपुरानकी चर्चा घनेरी ।
और शास्त्र पढ आया तो क्या जी? ॥ राम० ॥ ५ ॥
जरहि जौहेर[4] महाल बनाया ।
खालितियां[5] संग सोया तो क्या जी? ॥ राम० ॥ ६ ॥
आत्मग्यानकी खबर न जानी ।
और बानी[6] बक दिया तो क्या जी? ॥ राम० ॥ ७ ॥
देवनाथ प्रभु आत्मा गोविंद ।
इस नयननमो नहिं छाया तो[8] क्या जी? ॥ राम० ॥ ८ ॥

## पद १२० वें.

प्रीतकी रीत कठण निभाना ॥ ध्रुवपद. ॥
यह जगमें कोई नहीं है आपना मन मिले प्रित काहुसो करना ॥ १ ॥
जोले कृपा करे नाथ दयाघन तबले भली बुरी सब किंहु सहना ॥२॥
देवनाथ प्रभु सच्चा साहेब[9] देखत नैनमो मस्तहो रहेना ॥ ३ ॥

## पद १२१ वें.

हम तो बैरागी बैरागी । निजरुपसो लय लागी ॥ ध्रुवपद. ॥
ग्यान[10] ध्यानका अचला । बांधा दिल मायासो बिचला ॥ हम० ॥ १ ॥
शांती बभुत[11] लगाई । मनकी दुग्धा मार भगाई ॥ हम० ॥ २ ॥
बुंद फुला है जरदा । वामों लाल सुफेदी फरदा ॥ हम० ॥ ३ ॥
रतिपति मार लुटाया । जत सतका लंगोट चढाया ॥ हम० ॥ ४ ॥
श्रीगुरु गोविंद नैना । बन रहे देवनाथ मस्ताना ॥ हम० ॥ ५ ॥

---

१. अयोध्या. २. योगी. ३. एका पंथाचा अनुयायी. ४. जवाहिरी महाल. (जवाहिर–हा शब्द आरबी आहे.) ५. हा शब्द आरबी आहे. ६. वाणी. ७. वाईट. ८. कां, कशाकरितां. ९. हा शब्द आरबी आहे. १०. ज्ञान. ११. विभुत (भस्म).

## पद १२२ वें.

सखी! [1]मेरो [2]पिया कौन [3]बतावे। [4]ताकी जाउंगी हुं [5]बलहारी. ॥ ध्रुवपद. ॥
[6]कहा करो, [7]कित ज्याउ [8]अरि! [9]अब। [10]धुंडत हूं नही पावे. ॥ सखी० ॥ १ ॥
[11]रैनदिन [12]मोहे चैन पडे नहीं। [13]सोवत निंद न आवे. ॥ सखी० ॥ २ ॥
[14]बावरी [15]भई [16]सांवर न देखत। [17]याँ मन बिरह सतावे. ॥ सखी० ॥ ३ ॥
देवनाथ प्रभु नाथ निरंजन। मेरो पिया नाहि [18]दिखावे. ॥ सखी० ॥ ४ ॥

## पद १२३ वें.

[19]बिनो [20]भगत भगवान भजनबिन कह कैसे [21]भवतरण,।
[22]काल शिर करनें बैठा हरन. ॥ ध्रुवपद. ॥
नहीं [23]फाम, [24]बेफाम हुवा [25]तैं, नहीं खबर [26]तुझे जरा।
[27]बिखय [28]बिख [29]गर्द [30]जर्दमे [31]परा ॥
हुवा [32]सर्द तैं, मर्द नही [33]बेबहा [34]दर्दने घेरा,।
अकलगुंम [35]बेसुध होकर परा. ॥
[36]याद पकर, मन [37]ठौरहि धरके, [38]गुरु दरवाजे खरा।
जाय [39]बेनाहक [40]भ्रमसो भरा ॥
देवनाथ वदत भावें श्रीगुरुसी शरण जावें ।
नामामृत सेवितांचि निजभाग्य येइल घरा. ॥ ध्या रे० ॥ ४ ॥

## पद १८३ वें.

न मागों भिक त्याला भिक त्याला । दयाच नाहिं जयाला. ॥ ध्रुवपद. ॥
ब्राह्मण देखुनियां ६खिंजतो । वेश्याडफ गाणियां रिझतो.॥ न मागों० ॥ १ ॥
श्वशुरादिक गृहीं सवडी । बाहिर मातृपित्यांतें दवडी. ॥ न मागों० ॥ २ ॥
अहंकारमदें फुगला । जो कां निंदितसे संतांला. ॥ न मागों० ॥ ३ ॥
देवनाथ म्हणे ऐसा । अनुपकारी गर्वी हैसा. ॥ न मागों० ॥ ४ ॥

---

१.मनोरूप मस्त घोड्याला. २. श्रेष्ठ. ३. दार=स्त्री. [आप्तजनांचा स्नेहसंबंध जी तोडून टाकते-विदीर्ण करते-ती स्त्री.] ४. देहाची. ५. ज्ञानवन्हीमध्यें. ६. आंगावर धांउन जाउन चिरडतो.

### पद १८४ वें.

हरी! वाजविसी मधुर अशी मुरलि कसा रे! ॥ ध्रुवपद. ॥
धन्य नेणवे प्रताप । श्रवणीं पडतां हरी त्रिताप[1] ॥
नाठवेचि मायबाप । बंधु स्वसा[2] रे! ॥ हरी० ॥ १ ॥
समरसरस सुरस तान । ऐकतांचि जाय प्राण ॥
जीवनरहित[3] मीनें मान । वेध असा रे! ॥ हरी० ॥ २ ॥
देवनाथप्रभु खचित । हेंचि काय तुज उचित ॥
जाहला हा पूर्ण चित्त । मयुरपिसा रे! ॥ हरी० ॥ ३ ॥

### पद १८५ वें.

मना! तूं भज रे! गुरु गोविंद ।
वारण विघ्ननिवारण कारण सच्चित्सुखारविंद[5]. ॥ ध्रुवपद. ॥
जाइल काया, जाइल माया, वांया कां शिणसी ।
तें कां ग्रहण करावें दाणा न मिळे ज्या कणशीं ? ।
सोस धरोनी माझें माझें उगाच कां म्हणसी ? ।
सेखीं[6] कांहीं तुझें नव्हे बा! हें मायेचें चिंद. ॥ मना० ॥ १ ॥
असतां संपत्ती भोंवतीं मिळतीं सारीं खाणारीं ।
मामा चुलता बंधू बहिणी आणिक नरनारी ।
कन्यासुतदारादिक खाउनि सारीं जाणारीं ।
ममता सुसरी ओढित तीणें हा रचिलासे फंद. ॥ मना० ॥ २ ॥
फिर फिर मागें येईं वेगें या मार्गें आतां, ।
'रामराम श्रीराम' नाम गा वदनीं गुणवंता ।
भवगजदमना[7] हरी! श्रमशमना श्रीरुक्मिणिकांता! ।
शरणागत जा भावें प्रभुच्या नामीं धरीं रे! छंद. ॥ मना० ॥ ३ ॥
देवनाथ विनवी मन सांडी विकल्पसंकल्पा ।
घेइं विसावा श्रीसद्गुरुच्या पदपंकजखोपा ।
नाहीं संशय निजात्मगतीचा मार्ग सहज सोपा ।
स्वात्मानुभवीं रमतां होय मानस मन निर्द्वंद ॥ मना० ॥ ४ ॥

---

१. त्रिविध ताप. २. स्वसा=भगिनी. ३. उदकरहित. ४. मांसा. ५. अरविंद=कमळ. ६. अंतीं. ७. संसाररूप हत्तीचें दमन करणाऱ्या.

## पद १८६ वें.

गोविंदजी! पाय तुमचे चला येउं द्या मला पाहूं द्या. ॥ ध्रुवपद. ॥
दुर्धरु अतिभारी। उठे या भवाब्धिची लॅहरी[1] क्रूरकहरी ॥
भयभीत मी अंतरीं बहु। व्याकुळ जीव तुम्ही या जी कंसारी! ॥
सांवळिया पुतनारी!। तुम्हां वांचुनिया जी! कोण मला तारी? ॥
भॅव[2] दुस्तर लंघूं द्या. ॥ गोविंदजी० ॥ १ ॥
तुम्ही ऐका सर्वेशा!। मी दीन माझी जी! पदिं तुमच्या आशा ॥
गोवळा! गोपवेषा!। तुम्ही उपेक्षिल्या जी! गति अमुच्या कैशा? ॥
नाथ! जी! विश्वाधीशा!। द्या ठाव मला पदीं हरुनी भवक्लेशा; ॥
हें मस्तक वाहूं द्या. ॥ गोविंदजी० ॥ २ ॥
जय भीमातीरवासा!। ध्या पॅलवीं[3] योगीजनमानसहंसा! ॥
उपेक्षा न करावी सहसा,। रक्षा पावन ब्रीद श्रीनिवासा! ॥
करुणा कां न तुम्ही परिसा?। मी अनाथ जी! तुमच्या पायिं मला धिंवसा[4] ॥
रूप नयनीं गवसूं द्या. ॥ गोविंदजी० ॥ ३ ॥
देवनाथप्रभुवरदा। तुम्ही अझुनि[5]जी किति पाहतां मर्यादा ॥
नेमाचा वायदा। घडि भरल्यावर यम काढिल कीं फरदा, ॥
द्या मुद्रांकित सनदा। मग निर्भय होइन मी चित्सुखकंदा ॥
द्या दान स्वसंवेद्या! ॥ गोविंदजी० ॥ ४ ॥

## पद १८७ वें.

निजहृदयीं गुरुरूप पहावें,। नलगे त्यासी विजनिं फिरावें. ॥ ध्रुवपद. ॥
सद्भावें गुरुसी शरण रिघावें। अपुलें स्वहित पुसावें. ॥ नलगे० ॥ १ ॥
मन हें गुरुपदिं अर्पुनि[6] बापा!। गुरुवचनामृत पान करावें. ॥ नलगे० ॥२॥
देह अशाश्वत जाइल वायां। जाणुनि ऐसें हरितें भजावें. ॥ नलगे० ॥ ३ ॥
देवनाथप्रभु नाथ निरंजन। त्या पदिं सुंदरा स्वस्थ असावें. ॥ नलगे० ॥ ४ ॥

## पद १८८ वें.

चाल त्वरें हरि! लवकर यावें. ॥ ध्रुवपद. ॥
या भवसंकटीं पडलों जी! मी। म्हणवुनि बाँहतों[7] वेगें धांवें. ॥ चाल ० ॥ १ ॥
तूं करुणाघन माय दीनाची। पॅलवीं[8] मज उचलुनि घ्यावें. ॥ चाल० ॥ २ ॥
देवनाथप्रभु श्रीगोविंदा!। पावन ब्रिद आपुलें राखावें. ॥ चाल० ॥ ३ ॥

---

१. लाट. २. संसार. ३. पदरांत. ४. धैर्य, फार इच्छा. ५. जावें. ६. देऊन. ७. हांका मारतों.
८. पदरांत.

### पद १८९ वें.

नामामृतरस रसने[1]! । भरावा. ॥ ध्रुवपद. ॥
सर्वांतर्गत श्रीगुरु व्यापक । जाणुनियां पदिं भाव धरावा. ॥ नामा० ॥ १ ॥
आत्मा आपण उमजुनि अनुभवीं । मीतूंपण हा हेतु हरावा. ॥ नामा० ॥ २ ॥
नयनद्वारें हृदयभुवनीं । सच्चित्सुख गुरु पूर्ण शिरावा. ॥ नामा० ॥ ३ ॥
देवनाथप्रभु नाथ निरंजन । प्रेमादरें निज आप्त करावा. ॥ नामा० ॥ ४ ॥

### पद १९० वें.

धन्य श्रीगुरू, गुरूनाथ भोळा । दाविलें चिद्धन निज डोळां. ॥ ध्रुवपद. ॥
सखे! गुरुवरें, गुरुवरें नवल केलें । अविद्या पडळ[2] हारियेलें. ॥
देउनि ज्ञानदीठी[3], उघड दावियेलें । पाहतां मन तन्मय[4] झालें. ॥
धरुनि निजकरीं, करीं उलट चालवीलें । निजात्म निजभुवना नेलें. ॥
चित्समरसें, भोगित सुखसोहळा. । दाविलें० ॥ १ ॥
मौळे[5] स्पर्शिलें, कृपावरद पाणीं । दाविलें निजगुज निजनयनीं ॥
ज्ञानरविउदय, उदय चिद्गगनीं । दवडली दुर्धर तम रजनी. ॥
तेज घनवटे[6], घनवटे हृदयभुवनीं । जाहली ऐक्यरूप मेळणी ॥
भास सर्वही, सर्वही सखे! गळला । दाविलें० ॥ २ ॥
पाहे मी जिकडे, तिकडे पैं जाणा । व्यापिला सकळहि गुरुराणा. ॥
न दिसे दुजें, दुजें त्याजवीना । उभा नयनाचे आंगणा ॥
वर्णितां श्रुती, श्रुती धरिति मौना । विसांवा त्या स्वरुपीं स्वमना ॥
सखे! निर्गुण, हा राजस पुतळा । दाविलें० ॥ ३ ॥
समुळ आटलें, आटलें आजि द्वंद्व । दाटला मनीं ब्रह्मानंद ॥
गुणातीत तो, निर्गुण निर्द्वंद्व । देखिला श्रीगुरु गोविंद. ॥
देवनाथाचा, नाथाचा स्वानंद । तन्मय वृत्ति निजानंद ॥
अनुहत ध्वनी, ध्वनि वाजत थाळा । दाविलें० ॥ ४ ॥

### पद १९१ वें.

तुझिया रंगणीं नाचावें । हेंचि दान बा! मज द्यावें. ॥ ध्रुवपद. ॥
तुझिया नामाचे प्रबंध[7] । राहो अनुदिनीं मज छंद. ॥ तुझिया० ॥ १ ॥
भक्तिमुक्तीच्या माहेरा । नंदनंदना[8]! सुकुमारा! ॥ तुझिया० ॥ २ ॥
देवनाथ विनवी । गोविंदा! करुणा ऐकावी. ॥ तुझिया० ॥ ३ ॥

---

१. जिव्हे! २. पडदा. ३. ज्ञानदृष्टि. ४. तल्लीन. ५. मस्तक. ६. दाटे, जमे. ७. ग्रंथ.
८. कृष्णा!

### पद १९२ वें.

तारक ब्रह्म विटेवरि उभें । पाहे समपद शोभे. ॥ ध्रुवपद. ॥
मयूरमुगुट शिरीं अनुपम । निजतेजें उद्दाम ।
कस्तुरीतिलक बरा अतिरम्य । रेखियलें ललाम[1]. ॥ तारक० ॥ १ ॥
मकराकृति कर्णी कुंडल । सुंदर श्रीमुखकमळ ।
कमललोचन हा घननीळ । सच्चिद्घन गोपाळ. ॥ तारक० ॥ २ ॥
द्विजपदचिन्ह[2] पहा हृदिं मिरवे । कटिं कर ठेवुनि बरें. ।
कांसही कशियली पितांबरें । सुंदर रूप साजिरें. ॥ तारक० ॥ ३ ॥
वांकीं तोडर हे नखीं चंद्रकळा । ध्या तो हृदिं शिव भोळा ।
ध्वजवज्रांकुश हे पादतळां । वामांगीं[3] धृत कमळा[4]. ॥ तारक० ॥ ४ ॥
निर्गुण निजरूप परात्पर । भक्तास्तव साकार ।
वर्णित गुणलीला साचार । न कळे ज्याचा पार. ॥ तारक० ॥ ५ ॥
सद्गुरु गोविंद अभेद । भेदातीत निर्द्वंद्व ।
देवनाथाचा स्वानंद । ब्रह्मीं ब्रह्मानंद[6]. ॥ तारक० ॥ ६ ॥

### पद १९३ वें.

तूं नाम जपसी रे! वाचे । भय नाहीं मग काळाचें. ॥ ध्रुवपद. ॥
नश्वर देह शाश्वत मानुनी । वय गमाविसी व्यर्थ फुकाचें. ॥ भय० ॥ १ ॥
आशातृष्णा त्यागुनि सर्वही । सार्थक करीं बापा! जन्माचें. ॥ भय० ॥ २ ॥
रामकृष्णहरिध्यास हृदीं धरीं । तुटतिल पाशहि सर्व यमाचे. ॥ भय० ॥ ३ ॥
प्रार्थितसें मना लागुनी सुंदर । नाम सदा मुखिं गाइं हरीचें. ॥ भय० ॥ ४ ॥
देवनाथप्रभु नाथसखा रे! । काय उणें मग आहे सुखाचें? ॥ भय० ॥ ५ ॥

### पद १९४ वें.

श्रीगुरुची माय । झाल्यें मी दासी. ॥ ध्रुवपद. ॥
श्रीगुरुवांचुनि आणिक नेणें । आठवितें मी पाय. ॥ श्रीगुरुची० ॥ १ ॥
विश्वचराचर श्रीगुरुचें रूप । स्वरुपीं वृत्ति विलया जाय. ॥ श्रीगुरुची० ॥ २ ॥
देवनाथप्रभु नाथ निरंजन । अंजन दे तैं धाय. ॥ श्रीगुरुची० ॥ ३ ॥

### पद १९५ वें.

श्रीगुरुच्या पदिं भाव धरावा. ॥ ध्रुवपद. ॥
श्रीगुरुच्या निजस्वरुपाईक्षणें(?) । स्वात्मानुभव सांग वरावा. ॥ श्रीगुरु० ॥ १ ॥

---

१. भूषण. २. श्रीवत्सांक. ३. डाव्या मांडीवर. ४. लक्ष्मी. ५. नाशाला. ६. ज्ञानप्रकाश.

द्वैताद्वैता गाळुनि ठायीं । मीतूंपण हा भेद हरावा. ॥ श्रीगुरु० ॥ २ ॥
देवनाथप्रभु नाथ निरंजन । पूर्णपणें निजनयनीं वरावा. ॥ श्रीगुरु० ॥ ३ ॥

### पद १९६ वें.

राम न कां स्मरसी? । मना! तूं. ॥ ध्रुवपद ॥
लक्षुनि जेंवि मृगांबुसी[1] तो मृग धांवत ते रिति तूंहि तसा करिसी ॥रा० ॥१॥
कामकलाप हे पाप यथार्थ प्रलापमुखें भव तापत्रया वरिसी ॥ राम० ॥२॥
सार त्यजोनि असार कसे सुतदारधनादिक फार हृदीं धरिसी ॥राम० ॥३॥
देवनाथप्रभुच्या स्मरणेंविण दुस्तर जीवनसागर कसा तरसी ॥राम०॥ ४ ॥

### पद १९७ वें.

येईं सीतापति! रामा! शरयुतटवासिया! ॥ ध्रुवपद. ॥
सुंदर आनन[2] कुंदरदा[3] । मनमोहन मेघश्यामा! ॥ येईं० ॥ १ ॥
गाती श्रुतिनिगमादिक । शेषही नेणे तव गुणमहिमा ॥ येईं० ॥ २ ॥
पादरजें सती गौतमऋषिवधू[4] । उद्धरि सुखधामा ॥ येईं० ॥ ३ ॥
देवनाथप्रभु नाथा । चराचरीं व्यापक आत्मारामा ॥ येईं० ॥ ४ ॥

### पद १९८ वें.

ते समदर्शि[5] भले रे! पार्था! ॥ ध्रुवपद. ॥
गविहस्तिनि शुनि चांडालादिक[6] । मद्रुप अवगमले. ॥ ते सम० ॥ १ ॥
जाणुनि आपणा स्वात्मानुभवीं । स्वरुपीं समरसलें[6]. ॥ ते सम० ॥ २ ॥
विश्वचराचर ब्रह्म निरंतर । नयनीं देखियलें ॥ ते सम० ॥ ३ ॥
देवनाथप्रभु मी मजमाजी । जें ऐक्यत्वें रमलें ॥ ते सम० ॥ ४ ॥

### पद १९९ वें.

सांवळें ब्रह्म तें मज आवडे ।
त्याविण अन्य हें नावडे. ॥ ध्रुवपद. ॥

---

१.मृगजलासी.२. मुख.३. कुंदपुष्पासारखे रद (दांत) ज्याचे तो.४.अहल्या.५.सारखें पाहणारे. ६.'विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि । शुनि चैव श्वपाके च पंडिता: समदर्शिन:॥' [भगवद्गीता-अध्यय ५ श्लोक १८]. याचा भावार्थ:—जे पंडित आहेत त्यांची दृष्टि विद्वान् आणि विनयसंपन्न अशा ब्राह्मणाच्या ठिकाणीं, बैलाच्या ठिकाणीं, हत्तीच्या ठिकाणीं, कुत्र्याच्या ठिकाणीं, आणि कुत्रीं खाणाऱ्या नीच चांडालाच्या ठिकाणीं सुद्धां समान असते. देवनाथाच्या मनांत वरील गीतावाक्य हें पद लिहीत असतां घोळत असावें. ६. एकवट झालें.

गुणगण गाती ह्या श्रुति निजवाणी ।
ज्या स्तवितां शिणती योगी ब्रह्मारण्यीं ॥
ब्रह्मादिकां न कळे करणी ।
तें हें रांगे नंदाच्या आंगणीं. ॥ सांवळें० ॥ १ ॥
दुडदुडा धांवे वत्साचिये पाठीं, ।
कांबळी खांदां हातीं काळी काठी. ॥
भोंवतीं शोभे गोवळाची दाटी ।
गोजिरें रूप बरवा जगजेठी. ॥ सांवळें० ॥ २ ॥
पहातां नयनीं जयाचें रूपडें ।
संशयाचें मूळ हें ऊपडे ॥
भेदाभेदालागीं शून्य पडे ।
व्यापक जिकडे पाहों गे! तिकडे. ॥ सांवळें० ॥ ३ ॥
मूललें मन पाहुनि हरिरूपा ।
समरस वृत्ती चुकल्याती खेपा ॥
निर्लज्ज नामीं सांडियली कृपा ।
मोडिल्या प्रपंचाच्या खेपा. ॥ सांवळें० ॥ ४ ॥
देवनाथप्रभु हा गोविंद ।
निशिदिनीं त्याचा मजलागीं छंद ॥
ज्याच्या नामें तोडिल हा भवबंध ।
स्वरुपीं त्याच्या भोगितों आनंद. ॥ सांवळें० ॥ ५ ॥

## पद २०० वें.

'महादेव महादेव महादेव' वदा रे! ॥ ध्रुवपद. ॥
पशुपति हर त्रिपुरगौर । परमसदय पार्वतीवर ।
स्वकरीं धरित त्रिशुलडमर । हरित मदा रे! ॥ महादेव० ॥ १ ॥
भक्तोत्सल पंचवदन । सुंदर अति अधररदन ।
ध्याल हृदयीं मदनकदन । सौख्य सदा रे! ॥ महादेव० ॥ २ ॥

---

१. जगांतील ज्येष्ठ (आद्य पुरुष). २. जन्ममरणाच्या. ३. संसाररूप पाश. ४. पशूनां (जीवानां) पतिः=शिवः ['अयं च सर्वविद्यानां पतिराद्यः सनातनः । अहं वै पतितो येन पशुमध्ये (जीवमध्ये) व्यवस्थितः । अतः पशुपतिर्नाम त्वं लोके ख्यातिमेष्यसि' (वराहपुराण), 'पशुपतिराणवमायीवकार्माख्यपाशत्रयबद्धाः पंचकलाकलिता जनाः पशवस्तेषामीशो' (स्तुतिकुसुमांजलि–स्तोत्र ११ श्लोक ९७ टीका.)] ५. भक्तवत्सल. ६. सद्योजात, तत्पुरुष, अघोर, वामदेव आणि ईशान–अशीं महादेवाचीं पांच वदनें होत. (स्तुतिकुसुमांजलि–स्तोत्र ११ श्लोक ११६ टीका.)

अंगिं भस्म भूषणास । धरित सर्वदा उदास ।
काळविघ्न भजति यास । न करी········रे! ॥ महादेव० ॥ ३ ॥
दयाळ नीलकंठ परम । पांघरे गजव्याघ्रचर्म ।
स्मरतां हरित दुरित कर्म । ········आपदा रे! ॥ महादेव० ॥ ४ ॥
देवनाथप्रभु कृपाल । भालचंद्र विश्वपाल ।
वर्णिताति यश विशाल । निगम सदा रे! ॥ महादेव० ॥ ५ ॥

## पद २०१ वें.

ये रे! कृष्णा! गोविंदा! गोपवेषा! ।
दिनानाथा! दाखवी पादरेषा रे! ॥ ध्रुवपद. ॥
मानसमोहना! खगवहना गोपीरमणा! ।
हरि गुणगहना अघदहना भवभयशमना! ॥
कमलनयना मधुसूदना! कंसकंदना! ।
कां बा! माझी अझुनी येइना करुणा? ॥ ये रे! कृष्णा० ॥ १ ॥
मायातीता मुरमर्दन! हे हरि देवा! ।
वर्णितां शिणले श्रुतिशास्त्र गुणवैभवा ॥
तेथें मज पामराचा काय केवा? ।
································· ॥ ये रे! कृष्णा० ॥ २ ॥
सनकादिक शुकव्यास तन्मय ध्यानीं ।
नारदतुंबर गाताती गुणगण गाणीं ॥
पक्षिवहना अहिशमना! मोक्षदानी! ।
हे सुखसिंधो! दीनबंधो! चक्रपाणी! ॥ ये रे! कृष्णा० ॥ ३ ॥
देवनाथ भावार्थें करि विनवणी ।
प्रभु गोविंदा! करुणारव ऐकें कानीं ॥
वृत्ति माझी लावीं बा! तुझिये भजनीं ।
सगुणरूपा प्रगटावें या निजनयनीं ॥ ये रे! कृष्णा० ॥ ४ ॥

## पद २०२ वें.

सखये! गुरुनें नवलाव केला माय ।
अनुभवसुख तें वाचेसि बोलों काय? ॥ ध्रुवपद. ॥

---

१. वाघाचें आणि गजाचें ओलें कातडें शिव पांघरतो—असा समज आहे २. पाप. ३. शिव. (चंद्रशेखर.) ४. गरुडवहना. ५. पापदाहका. ६. लेखा, हिशेब, किंमत. ७. कालियदमना!

अभयवरदें स्पर्शिलें स्वकरें मौळा[1] ।
अनुभववस्तू दाविलिया निजडोळां ॥
अद्भुत पाहतां तेजाचा उठे बंबाळा ।
जया तेजीं लोपती रविशशिकळा[2]. ॥ सखये० ॥ १ ॥
त्या निजतेजध्रवलें हें चिद्गगन ।
पाहतां नयनीं समरस झालें मन ॥
वृत्ति समुळीं चित्स्वरुपीं झाली लीन ।
नुरे कांहीं भेदाचें अणुही भान ॥ सखये० ॥ २ ॥
तुष्टला हा गोविंद श्रीगुरु योगी ।
समाधि स्वसुखें धालें गे! अंतरंगीं ॥
न पडे दृष्टि किमपिही दृश्य तरंगीं ।
................................. ॥ सखये० ॥ ३ ॥
देवनाथ प्रभु व्यापक या जनिंवनीं ।
पाहतां सरली दशाची सर्वही कहाणी ॥
पाहतां पाहणें आटोनियां निजस्थानीं ।
साम्राज्यत्वें नांदे गे! या चिद्भुवनीं ॥ सखये० ॥ ४ ॥

### पद २०३ वें.

धन्य धन्य धन्य श्रीगुरूराणा । माझें मज चोजविलें या निजनयना ॥ ध्रुवपद.॥
उघडी केली आत्मत्वें अनुभव दिटीं । दृष्टिमाजी हरपली सकळही सृष्टी ॥
सच्चित्स्वरुपीं समरसें पडली मिठी । बोलों विसरे द्वैताचि सर्वहि गोष्टी॥धन्य०॥१॥
विश्वाकारें कोंदलें सभराभर । आदिमध्य अंत ना निरंतर ॥
गौप्य प्रगट नाहीं जें परात्पर । सेवियलें साचें निजसार. ॥ धन्य० ॥ २ ॥
संचलेंसें रंगातीत जें निजरंग । आद्य जें कां अक्षय पूर्ण अभंग ॥
फावलें (?) तें निभाग्य (?) या सत्संग । मिळतां मिळणी द्वैताचा झाला भंग ॥३॥
कृपा केली गोविंद श्रीगुरूराय । समाधि स्वसुखें अंतरीं धालि माय ॥
अनुभववार्ता वाचेसि बोलुं काय? । देवनाथा लाधला निजसुखठाय॥ध०॥४॥

### पद २०४ वें.

सजणे! कृष्णा जा वेगीं आणवि तृष्णा ।
हरिवांचुनि कोण माझी बोळवी गे! सांग तृष्णा ॥ ध्रुवपद. ॥

---

१. मस्तकाला. २. सूर्याच्या द्वादशकला, चंद्राच्या षोडश (सोळा) आणि अग्नीच्या दश (दहा) कला स्मृतिग्रंथांत प्रसिद्ध आहेत. [स्तुतिकुसुमांजलि–स्तोत्र ३८ श्लोक २५ टीका]. ३. तृप्त झालें. ४. सुखदुःख इत्यादि भेदाची.

विरहाग्नी अतिशय [1]पोळी, पेटे भडभड ह्या उठती ज्वाळा ।
व्याकुळ मम प्राण झाला दाखवी गे! हरिरूप डोळां ।
कधिं पाहिन गे! निजनयनीं योगीजनचित्त[2]मराळा ॥
चाल ॥ गोकुलपति श्रीघननीळा ।
व्रजवासीया गोपाळा ।
जा सांग तुझिया पदयुगुळा ॥
टीप ॥ दाखवी तीस तारी दयाळा तुजवांचुनि कोण कृपाळा? ॥स०॥१॥
हरिविरह मला साहवेना मनमोहन येइना कां गे! ।
कठिण मानस केलें मायिया अंतरंगें ।
[3]योगीजनहृदयनिवासा सत्वर घेउनि ये गे! ॥
चाल ॥ मज कांहींच मनीं नुमगे ।
किती सोसूं गे! भवदंगे ।
मन विटलें नश्वर भोगें ॥
टीप ॥ दाखवी ग! हरिपद दृष्टीं न करी हा विलंब, जा गे! ॥ स०॥२॥
वृंदावनवृंदविहारा अझुनी कां नुपजे करुणा ।
युगसम हा लव पळ जातो दुःखित बहु अंतःकरणीं ।
अति सदयहृदय मृदु त्याचें तरि माझी दया कां ये ना? ॥
चाल ॥ [4]षड्रस मला रुचतीना ।
घरधंदेही सुचतीना ।
सखे! प्राण रिघों पाहती ना ॥
टीप ॥ हरिप्राप्तिस्तव गे! बाई! धरितें मी तुझिये चरणीं ॥ स० ॥ ३ ॥
देवनाथप्रभु गोविंदें निष्ठुरता धरिली हृदयीं ।
हरिविरहकाम मजलागीं छळितो अतिदुःखदायी ।
सखे! बाई! वेळ बहु झाला अझुनि कां न ये शेषशायी? ॥
चाल ॥ हरिप्राप्तिस्तव करूं काय? ।
शिणलें, बहु अन्य उपाय ।
.............................. ॥
टीप ॥ ........................................................ ॥ सजणे० ॥ ४ ॥

---

१. भाजी. २. हंसाला. ३. कृष्णाला. (हें सुरेख 'पर्यायोक्त' आहे.) ४. मधुर, आंबट, खारट, कडु, तुरट आणि तिखट हे सहा रस.

### पद २०५ वें.

खटपट किती नटनटुनि करिसी? ।
चाल झटपट उठ भज सखा हरी ॥ ध्रुवपद. ॥
निपट कपट हृदीं लपटुनी ।
कामिनिसी मटमट दाम किती घेशिल तरी ॥ खटपट० ॥ १ ॥
उंच तट भट भाट म्हणसी ।
माझा राज पाट मटमट वय खातसे अरी ॥ खटपट० ॥ २ ॥
निकट प्रगट गुरु घटघट विलसत ।
वटवट सोडी अनुभव चरी ॥ खटपट० ॥ ३ ॥
देवनाथप्रभु दाट निघोंट अविट जगीं ।
उलट अतुट सुख घेई करीं ॥ खटपट० ॥ ४ ॥

### पद २०६ वें.

योगीयांच्या नये ध्यानीं । वर्णितां शिणली श्रुतीची वाणी ।
तो नंदाच्या आंगणीं । सांवळि ग! माझी. ॥ १ ॥
न कळे जो कां ब्रह्मादिकां । बाळलीला करी कौतुका ।
उंबरा चढतां धरितो टेंका । सांवळि ग! माझी. ॥ २ ॥
दुडदुड आंगणीं रांगत जाये । 'माय यशोदे' म्हणवुनि बाहे ।
स्मरतां निर्गमासी होतें साह्य । सांवळि ग! माझी. ॥ ३ ॥
रडतां किमपी उँगलि न राहे । माता उचलुनि घे जे कडिये ।
विश्वीं व्यापुनि अलिप्त राहे । सांवळि ग! माझी. ॥ ४ ॥
माता नेउनियां निजसदना । चुंबन देउनि पाहे वदना ।
स्वरूपें उणें आणी वदना । सांवळि ग! माझी. ॥ ५ ॥
आंगणीं गडबड घे लोळणी । माता देताहे खेळणीं ।
नेउनि निजवी पाळणीं । सांवळि ग! माझी. ॥ ६ ॥
निजवितां निज घे ना । बाहेर आणितांही ये ना ।
बाळलीला दावी नाना । सांवळि ग! माझी. ॥ ७ ॥
धरितां हातीं....धंदा । अकस्मित आली राधा ।
तिचिया जवळी देत यशोदा । सांवळि ग! माझी. ॥ ८ ॥

---

१. केवळ, अगदीं. २. स्त्रीशीं. ३. निघोंट=दाट, गच्च, परिपूर्ण. ४. वेदाची. ५. हाक मारी. ६. वेदातें. ७. उगा. ८. घराला. ९. वृषभानुकन्या.

राधा बोलत····नेटें । कां गे! रडतेसी गोरटे? ।
राधा देखुनि हर्षें दाटे । सांवळि ग! माझी. ॥ ९ ॥
राधिकेनें ते अवसरीं । उचलुनि घेतां कडियेवरी ।
उगी राहे निर्विकारी[1] । सांवळि ग! माझी. ॥ १० ॥
राधेलागीं बोलत माता । मातें श्रमवीलें····ता ।
उगी राहे गे! त्वां घेतां । सांवळि ग! माझी. ॥ ११ ॥
आतां स्वगृहीं घेउनि जाईं । राधा 'अवश्य' म्हणवुनि पाही ।
घेउनि आली ते निजगेहीं । सांवळि ग! माझी. ॥ १२ ॥
दूध भात कालवोनी । पुढें ठेवित कामिनी ।
राधा धाली[2] पाहुनि नयनीं । सांवळि ग! माझी. ॥ १३ ॥
श्रीमुख लक्षित उभी राधा । कामबाणें[3] केली बाधा ।
जाणुनि तिचिया अंतरंगा[4] । सांवळि ग! माझी. ॥ १४ ॥
तिचें विव्हळ पाहुनि मन । राधे! मुख कां झालें म्लान? ।
हळुच बोलताहे वचन । सांवळि ग! माझी. ॥ १५ ॥
मी तों मुग्धा वयसा पाही । उगेंच बोलुनि होतें कांहीं ।
मोठी असती जरी कान्हाई । सांवळि ग! माझी. ॥ १६ ॥
धांपा[5] दाटुनियां पोटीं । हळुच बोले ते गोरटी ।
मूर्ति सगुण धाकुटी । सांवळि ग! माझी. ॥ १७ ॥
राधेलागीं चढला कीं मद । बोलुनि हृदयीं झाली सद्गद ।
ऐकुनि हंसताहे खदखद । सांवळि ग! माझी. ॥ १८ ॥
मोठी होऊं बोले वचना । ऐकुनि हांसे व्रजांगना[6] ।
पुरवी भक्ताची कामना[7] । सांवळि ग! माझी. ॥ १९ ॥
तेव्हां धरुनी तरुण रूप । पुरवी मनींचा संकल्प ।
हरी दासाचे त्रीताप[8] । सांवळि ग! माझी. ॥ २० ॥
देहभाव समूळ त्यागी । राधा समाधिसौख्या भोगी ।
व्यापक बाह्य अंतरंगीं । सांवळि ग! माझी. ॥ २१ ॥
देवनाथाची निजजननी । गातां कुंठित श्रुतीची वाणी ।
जीची अघटित न कळे करणी । सांवळि ग! माझी. ॥ २२ ॥

---

१. विकाररहित. (षड्विकारशून्य. पृष्ठ १०६ टीप ८ पहा.) २. तृप्त झाली. ३. मदनशरानें. ४. मनाला. ५. श्वासाला. ६. व्रजांतील (गोकुळांतील) अंगना (स्त्री). ७. इच्छा. ८. पृष्ठ २५ टीप १ पहा.

## पद २०७ वें.

येउंदे दया, दया देवदेवा ! । शरण मी तुला वासुदेवा ! ॥ ध्रुवपद. ॥
गुंतलों माया, मायामोहपाशीं । जीव दुःखित बहु परदेशी ॥
कशी गत करूं, करूं हृ[1]षीकेशी । प्राण घाबरा कधीं येशी ॥
आज कीं उद्यां, उद्यां किंवा परवां । शरण मी० ॥ १ ॥
कमललोचना, लोचना कनकवसना ! । कर्ममोचना गरुडवहना ! ॥
पतितपावना, पावना जी ! मनमोहना ! । कशी तुज न ये माझी करुणा ॥
दीन मी नेणें, नेणें भक्तिभावा । शरण मी० ॥ २ ॥
कुंदरद्युती, द्युती मंदहासा ! । दीनबांधवा श्रीनिवासा ! ॥
विश्वजीवना, जीवना काय ऐसा । किती मे[2]जविशीं धरशी आळसा ॥
वर्णूं मी किती, किती कीर्ति केशवा ! । शरण मी० ॥ ३ ॥
पतित तारिले, तारिले बहू भारी । कीर्ति ऐकूनि आलों द्वारीं ॥
[3]रमानायका !, नायका जी ! [3]कंसारी ! । पतित एवढा भव भारी ॥
कीर्ति यशध्वजा, ध्वजा आजि उभवा । शरण मी० ॥ ४ ॥
भक्ति बाहतों, बाहतों हरी ! तुजला । कदा बससी ना बा ! [4]उगला ॥
येसी धांवुनी, धांवुनी कसा प्याला । [5]मिराबाईस्तव वि[6]षप्याला ॥
माझी कां न ये, न ये सख्या ! [7]कणवा । शरण मी० ॥ ५ ॥

---

१. हृषीक+ईश=इंद्रिय+स्वामी=जितेंद्रिय (कृष्ण). २. माझ्याविषयीं; बद्दल. ३. कृष्णा! ४. रिकामा. ५. मिराबाईची कथा भक्तविजय अध्याय ३८ यांत आहे ती अशी:—ही उदेपुर येथील एका राण्याची सुरूपसंपन्न कन्या होती. हिनें कोणाशीं लग्न न करितां श्रीकृष्ण हाच आपला पति मानून त्याची सेवा करूं लागली. व साधुसंत पुरुषांबरोबर मोकळेपणानें भगवच्चर्चा करूं लागली; तेणें करून दुष्ट लोक राण्याची कुटाळकी करूं लागले. तेव्हां त्यानें हिला विष पिण्यासाठीं दिलें. त्याचें हिनें श्रीकृष्णास नैवेद्य दाखवून पान केलें. तेव्हां हिला कांहीं न होतां श्रीकृष्णाचा गळा मात्र निळा झाला. पुढें हिच्या प्रार्थनेनें श्रीकृष्णाचा गळा पूर्ववत् झाला. हिचीं हिंदीभाषेंत पदें बरींच आहेत. हिनें आपल्या पदांच्या शेवटीं 'मिराके प्रभु गिरिधर नागर' असा उल्लेख केला आहे. हीच कथा लोकहितवादीकृत ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती, भाग दुसरा, पृ०६१-६२ यांत लिहिली आहे ती अशी:–मिराबाई ही मेरत्याच्या (जोधपूर प्रांत) राजाची मुलगी असून ती उदेपूरच्या राजास दिली होती. तिची सासू देवीउपासक असून तिचें व सुनेचें बनेना, सबब तिजला राजवाड्यांतून काढून दिलें होतें. एकवेळ तर तिला राजानें (नवऱ्यानें) विष दिलें होतें, परंतु त्यापासून तिचें कांहीं झालें नाहीं! पुढें ती श्रीकृष्णाची भक्ति करून द्वारकेस व वृंदावनास यात्रा करी. नवऱ्यानें तिला नेमणूक करून दिली होती. पुढें उदेपुराहून तिला बोलावणें आलें. त्या वेळीं ती श्रीद्वारकेस देवाजवळ निरोप घेण्यास म्हणून गेली, व तेथें स्वरचित पद्यें म्हणूं लागली. तों द्वारकाधिशाचे मूर्तीचे दोन भाग होऊन मिराबाई त्यांत शिरली व ती मूर्ति पूर्ववत् जडून गेली! त्यानंतर उदेपुरास व द्वारकेस तिची मूर्ति बसविली आहे. ६. विषाचा पेला. ७. दया.

चिरें[1] पुरवुनी, पुरवुनी सत्य साची । लाज रक्षिली त्वां भगिनीची[2] ॥
होसी माउली, माउली निज दासांची । चित्सागरा दया वीची[3] ॥
लोटिं मजवरी, मजवरी दे निज विभवा । शरण मी० ॥ ६ ॥
स्वामी सद्गुरू, सद्गुरू श्रीगोविंदा[4] ! । परमपुरुषा परमानंदा ! ॥
अविट अक्षया, अक्षया परमसुखदा । तोडीं हे मायिक अघआपदा ॥
होऊं नेदिया, नेदिया ज्ञानगर्वा । शरण मी० ॥ ७ ॥
प्रार्थितों अती, अती विनितें[5] भावें । श्रवण[6] देवोनि ऐकावें ॥
कृपासागरा !, सागरा त्वरित यावें । देवनाथासी अपंगावें ॥
दीन आपुला, आपुला म्हणवा । शरण मी० ॥ ८ ॥

### पद २०८ वें.

गुरुरायाचा हस्त धरुनियां परभुवना गेलों ।
देहिच असतां विदेहस्थितिनें जिताचि मी मेलों. ॥ ध्रुवपद. ॥
प्रपंच अजवरी सत्य मानिला रतलों[7] मी तेथें ।
दाराधनसुत मंदिरमाड्या संपादुनि अर्थ ।
अनुतापाचा उदय पावलों तंव अवघें व्यर्थ ।
जाणुनि मग मी शीघ्र निघालों धरिला गुरुपंथ ॥
चाल ॥ गुरुकृपावरदान मला फळलें ।
निजगुज माझें मजला तंव कळलें ।
भवभान[8] पूर्विचें तें गळलें ।
मी माझें सर्वहि स्मरण तें हरलें ॥
टीप ॥ आनंदामृत प्राशन करुनी अभ्यंतरिं धालों[9] । देहिच० ॥ १ ॥
गुरुरायाचा विचार कथितों तरलों ज्या योगें ।
जागृतिस्वप्नसुषुप्ति उलंघुनि प्रवेशलों वेगें ।
दृष्टी देउनि कवतुकाला विलोकिलें त्यागें ।
तुर्यादेवी[10] त्रिपुरसुंदरी तीच्या संयोगें ॥
चाल ॥ तिच्यापरिस सुंदर नार तिच्यावरती ।
उन्मनि विख्यात प्रबळ युवती ।

---

१. वस्त्रें. २. द्रौपदीची. ३. वीचि=ऊर्मि, लाट. ४. गोविंदनाथ हें देवनाथाच्या गुरूचें नांव. ५. नम्र. ६. कान. ७. आसक्त झालो. ८. संसारज्ञान. ९. तृप्त झालों. १०. चतुर्थावस्थादेवी (जागृति, स्वप्न, सुषुप्ति ह्या इतर तीन अवस्था.)

अविकल्प समाधी अशा श्रुति म्हणती ।
ते ठायीं गेल्यावर येणें ना पुढती ॥
टीप ॥ योगी जाउनि रमती तेथें तन्मय मी झालों । देहिच० ॥ २ ॥
देतों घेतों येतों जातों पाहतों निज कुडिला ।
[1]पंच विषयीं याचा आश्रय म्यां धरिला ।
परंतु माझे सत्तेवांचुनि न चले जडगोळा ।
मी ऐसा साक्षात् सर्वात्मक गुणवर्जित भोळा ॥
चाल ॥ बोलतां मौन भंगेना.................. ।
जास्वंदावरि स्फटिकाचा मणि जैसा ।
ऐकुनि न आयके अनुभव हा ऐसा ।
जाणुनि कांहींच नेणें मी सहसा ॥
टीप ॥ हें माझें मी वर्म जाणुनी परम सुखी झालों । देहिच० ॥ ३ ॥
लिंगस्थिति जरि जीव म्हणों तरि उपाधि मज नाहीं ।
हिरण्यगर्भस्थिति शिव पाहतां उपाधिला तोही ।
घटभट भंगें महा आकाशीं अभेद ज्या पाही ।
तैसा मी पूर्ण पुरातन भेदत्रय[2] नाहीं ॥
चाल ॥ मी केवळ गुरुप्रसादें आत्माराम ।
[3]महावाक्यार्थ प्रत्ययें निष्काम ।
उन्मनि घाट उलंघुनि निजसुखधाम ।
चरमाख्य अवस्था पूर्ण माझा ग्राम ॥
टीप ॥ देवनाथ हें नाम विसरुनि तत्स्वरुपीं भरलों । देहिच० ॥ ४ ॥

## विधिनिंदा.

(शार्दूलविक्रीडित वृत्त.)

भावें जो हरिनाम सेवि न कदा विश्वास नाहीं जया
नाहीं ज्यास परोपकार करणें ना [4]सर्वभूतीं दया ।
लक्ष्मी गेहिं असोनि पाळि न कदा मातापित्या बांधवा
ब्रह्मा वेडझंवा म्हणूनि [5]विभवा देतो अशा गाढवा. ॥ १
नाहीं दान व्रतादि तीर्थतपही केलीं कदा दुर्जनें,
नाहीं निश्चय वेदवाक्यश्रुतिचा शास्त्रार्थ उच्छेदणें ।

---

१. शब्द, स्पर्श, रूप, रस, आणि गंध हे पंच विषय होत. २. सजातीय, स्वगत आणि विजातीय असे त्रिविधभेद. ३. 'तत्त्वमसि' इत्यादि महावाक्य. ४. सर्व प्राण्यांवर. ५. ऐश्वर्याला.

मींची एक धनाढ्य मानुनि मनीं अर्पीत वेश्यां धना
ब्रह्मा वेडझंवा म्हणूनि विभवा देतो अशा गाढवा. ॥ २
देखोनी द्विजराज माज चढतो ज्याचे स्वआंगीं बरा
गर्वें जाय भुलोनियां धनमदें रेडाच पैं दूसरा, ।
कर्णीं कुंडल माळ मौक्तिक गळां दावी जगां मानवा
ब्रह्मा वेडझंवा म्हणूनि विभवा देतो अशा गाढवा. ॥ ३
कांतेचे गणगोत पोशित सुखें मानीचना श्लाघ्यता
जैसें रासभ मातलें तदपरी लज्जा नसे भोगितां ।
वस्त्रें उंच वरीं सदा करि तिला संपादितो आर्जवा
ब्रह्मा वेडझंवा म्हणूनि विभवा देतो अशा गाढवा. ॥ ४
विप्राचे पद क्षालिना, सुमनसें वेश्यापदांतें शिरीं
प्रेमें आकळुनी सदा निजकरीं मानी सुखा अंतरीं, ।
आल्या साधु घरासि पाठ फिरवी हो दुःख वाटे जिवा
ब्रह्मा वेडझंवा म्हणूनि विभवा देतो अशा गाढवा. ॥ ५
ज्यातें वाटत त्रास क्रोध उसळे चित्तीं हरीकीर्तनीं
धर्मीं बुद्धि नसे, सदा धुपतसे चांडाळ तो या जनीं ।
ताठा देहिं बहू धरी धनमदें लेखीचना वासवा
ब्रह्मा वेडझंवा म्हणूनि विभवा देतो अशा गाढवा ॥ ६
श्रेष्ठीं शीकवितां कदापि न मनी, द्वेषी पित्यातें सदा,
बोले कुश्चळ नित्य दुष्ट कुरुपी वंदी स्त्रियेच्या पदा ।
गाद्या तोषक लोड टेंकुनि मनीं मानीतसे वैभवा
ब्रह्मा वेडझंवा म्हणूनि विभवा देतो अशा गाढवा ॥ ७
दासीदास बहूत अश्व गजही त्या शीबिका पैं घरीं
चित्तीं हांव धरोनि खर्चित धना माड्या हवेल्या करी, ।
वस्त्रें उंच अमोल पैठणि वरी शाला दुशाला नवा
ब्रह्मा वेडझंवा म्हणूनि विभवा देतो अशा गाढवा. ॥ ८
भावें सांबशिवा भवानि अथवा पूजीच ना माधवा,
भोगीतो विधवास्त्रिया निशिदिनीं, ना आदरी बांधवा, ।
ना दाता धनवान होउनि नवा वर्ते जसा गा! ढवा,
ब्रह्मा वेडझंवा म्हणोनि विभवा देतो अशा गाढवा. ॥ ९

---

१. गाढव. २. पुष्पासारखें. ३. हृदयांत, मनांत. ४. इंद्राला. ५. भवानी=पार्वती.

लक्ष्मीवंत असोनि संत विबुधीं सत्कीर्ति जो ना करी,
सांगे त्यावरि कोपला मग जसा श्वानापरी गुरूगुरी ।
वेंचीना वेचनें कदापि हि धनें जारस्त्रियेचा ढेवा
ब्रह्मा वेडझंवा म्हणोनि विभवा देतो अशा गाढवा. ॥ १०
ऐसा जो खळ दुष्ट त्या गृहिं धना राहोनियां कायसे?
पूजीना द्विजसंतपाय कधिंही दासीस अर्पीतसे ।
वाणीं बोलत देवनाथ, पचतो तो नर्कि त्या ना शिवा
ब्रह्मा वेडझंवा म्हणूनि विभवा देतो अशा गाढवा. ॥ ११

---

## कृष्णस्तोत्र.

(वसंततिलक वृत्त.)

जो विश्व व्यापुनि अलिप्तपणें निराळा, हें वर्म ठाउक असे विबुधां मराळां ।
जो गोकुळांत हरि घालितसे तमामा तो नांदतो विटवरी अभिमन्युमामा. ॥ १
भीमातटीं कर कटीं विलसे पहा कीं ज्याची सदा सदय कीं श्रुति कीर्ति हांकी ।
ज्या नारदादि स्तविती स्मरताति नामा तो नांदतो विटवरी अभिमन्युमामा.॥ २
घे जन्म नाभिकमळांत कसा विधाता? ज्या नामरूप गुणकर्म दिसे न ध्यातां? ।
ध्यानींच जो प्रगटतो गुरुदेव आत्मा तो नांदतो विटवरी अभिमन्युमामा. ॥ ३
जो विश्वरूप नयनीं सखयार्जुनातें दावीत देत सुख जो प्रभु सज्जनातें ।
हस्तें धरीत हयरश्मि सदास्य सीमा तो नांदतो विटवरी अभिमन्युमामा. ॥ ४
ज्या वर्णनीं गति नव्हे निगमादिकांची जो ध्येय मूर्तिच शुकासनकादिकांची ।
व्यासादि ज्या स्तविति वाल्मिक पूर्णकामा तो नांदतो विटवरी अभिमन्युमामा.५
जो भंगुनी धनुष्य मातुलघातकर्ता जो दीनवत्सल हरी करुनी अकर्ता ।
जो ब्रह्मचारि अजि भोगुनि गोपरामा तो नांदतो विटवरी अभिमन्युमामा. ॥ ६
जो पूर्ण ब्रह्म हृदिं नांदत योगियांच्या, गातां फणींद्र शिणला स्वगुणा जयाच्या ।
जो ईक्षणें करित नाश दुरीत कर्मा, तो नांदतो विटवरी अभिमन्युमामा. ॥ ७
नामामृतें हरित जो विष सांबवाचें, गा रे! तवा समुळ छेदित जो भवाचें ।
पद्मा सदा वसत सेवित पादपद्मा, तो नांदतो विटवरी अभिमन्युमामा. ॥ ८
श्रीमद्गुरूवर दयाकर सौख्य सिंधू, जो देवनाथवरद प्रभु दीनबंधू ।
जा रे! तुम्ही शरण त्या हरि सार्वभौमा तो नांदतो विटवरी अभिमन्युमामा. ॥९

---

१. 'सुवचनें' असा पाठ आहे, २. उपपति. ३. हंसाला. ४. कृष्ण. ५. घोड्याचे दोरे. ६. ध्यान करण्यास योग्य. ७. कंस. ८. गोपांगना, गौळणी. ९. शेष. १० शिवाचें.

## गुरुस्तुति.

(दिंडी.)

मायबापा सद्गुरु देवदेवा! । देईं प्रेमा मजलागिं वासुदेवा! ।
तुझ्या भजनाची [1]सोय मला लागो! । हृदयिं माझ्या निजरूप तुझें जागो. ॥ १
अनाथ मी [2]पैलवीं मला द्यावें । भजनप्रेमाचें दान तुझ्या[3] द्यावें ।
हेंचि [4]मागें मी भाव पदीं भोळा । देवनाथाचा पाळि लडीवाळा. ॥ २

## अभंग १ ला.

आम्ही गणराजा! आरंभीं तुजलागी । वंदूं अंतरंगीं बैसे आतां ॥ १ ॥
निर्विघ्न चालवीं देईं मती स्फूर्ति । वांछिलें जें चित्तीं पुरवावें ॥ २ ॥
बाराशत अभंग व्हावी ऐसी आशा । सिद्धि न्यावी ईशा! गणाचिया ॥३॥
भक्तिज्ञानामाजी वैराग्याची खाणी । उघडी करूनि दावी स्वामी! ॥ ४ ॥
देवनाथ म्हणे सिद्धिबुद्धिपती! । इच्छिलें जें चित्तीं सिद्धि न्यावें ॥ ५ ॥

## अभंग २ रा.

इतकें मातें द्यावें दान । विनंती मान दासाची ॥ १ ॥
आतां पाहतोसी काय । पुढें पाय [5]करीं वेगीं ॥ २ ॥
अखंडित भजन प्रेमा । पुरुषोत्तमा! मज द्यावा ॥ ३ ॥
प्रेमें गाईन नाम [6]वाणीं । नाचेन कीर्तनीं आनंदें ॥ ४ ॥
देवनाथ याचक द्वारीं । प्रेमवारी चालावी. ॥ ५ ॥

## स्फुट दोहरे.

खटपट सगरी छांड दे । झटपट हरिगुण बोल ॥
निपट निकट हर हेरले । कपटपट दे खोल ॥ १ ॥
भावहीको भूको । हरनही ग्यानअग्यानको ॥
जैसो भाव जाको । जैसो राम तैसो हो ॥ २ ॥
विधिमनभावें तात । जसोदापूत कर भात ॥
भावें प्रभू अमरनाथ । मेरो तो प्रभू साहकारी सो है ॥ ३ ॥
भक्तनको ऐसो जान । यह परब्रह्म भगवान ॥
सनकसनंदन धरतध्यान । ज्याके हृदय कमलवास है ॥ ४ ॥
कहत वचन देवनाथ । मेरो तो परब्रह्म गुरुनाथ ॥
जैसो जाको मनमाता! जैसो को नाथ तैसो है. ॥ ५ ॥

---

१. 'आस' असा अन्य पाठ आहे. २. पदरांत. ३. 'मला' असाही पाठ आहे. ४. मागतों. ५. भक्ति. ६. वाणीनें, वाचेनें.

## देवनाथकृत आणखी मिळालेलीं पदें.

### पद २०९ वें.

विमल निजरूप, रूप गुरुरायाचें । घे अनुभवीं भाग्य त्याचें ॥ध्रुवपद.॥
परंब्रह्म तें ब्रह्म तें स्वात्मभुवनीं । स्वयं चित्प्रकाश निज किरणीं ॥
सभर दाटलें, दाटलें पूर्ण भरुनी । उघड चैतन्य जनीं विजनीं ॥
रंगरूपरहित, रहित निजवर्णी । अविट[1] चित्प्रभा कोण वर्णी ? ॥
टीप ॥ सज्जना! प्रचुरतर[2] असे । सज्जना! सकळिं जें वसे, ।
सज्जना! वसुनि ना दिसे। ना दिसे रूप ज्याचें. ॥ घे अनु० ॥१॥
पाठीं पोट ना, पोट ना ज्यास कांहीं । निबिड[3] निघोट सर्वदाही ॥
सकळ जें वसे, वसे अंतरबाहीं । व्यापुनी नुरे दिशा दाही ॥
जया वर्णितां, वर्णितां चारी[4] साही[5] । श्रुतिस्मृति न चले अठराही[6] ॥
टीप ॥ सज्जना! शब्द खुंटले। सज्जना! स्तब्ध घोटले ।
सज्जना! स्वरुपीं आटलें । आटलें सुख तेथींचे. ॥ घे अनु० ॥ २ ॥
स्वरुप पाहतां पाहतां नयन बैटी । पाहणें हरपे तया पोटीं ॥
तेज अद्भुत, अद्भुत दीप्ति मोठी, । तेज लोपलें रविकोटी, ॥
देह ध्याता, ध्येय हें ध्यान त्रिपुटीं । नुरेचि हें विश्वथाटीं ॥
टीप ॥ सज्जना! भरोनी उरले । सज्जना! निगमिं[7] वर्णिलें ।
सज्जना! विमल अर्चिलें । अर्चिलें अनिर्वाचें. ॥ घे अनु० ॥ ३ ॥
धन्य गुरुदयाळ, दयाळ जगजेठी । आजि पाहतां कृपादृष्टीं ॥
सहज उघडिली, उघडिली स्वात्मपेटी, । वरी समरसें पडे मीठी ॥
ब्रह्मस्वरूप तें, स्वरूप तें सकळ सृष्टीं । देवनाथा[8] गुरु हतवटी ॥
टीप ॥ सज्जना! द्वैत तैं झडे । सज्जना! प्रगट ऊघडे, ।
सज्जना! पडळ तैं उडे । उडे संशयाचें ॥ घे अनु० ॥ ४ ॥

---

१. अविकार्य. २. विपुल. ३. दाट, घन. ४. चार वेद. ५. सहा शास्त्रें. ६. अठरा पुराणें व अठरा उपपुराणें. ७. वेदांमध्यें. ८. हें पद देवनाथाचें किंवा दयाळनाथांचें अशी शंका येण्यासारखी आहे खरी, परंतु हें पद देवनाथांचेंच आहे. कारण, एक तर भाषासरणी त्यांचीच दिसते. दुसरें, हें पद देवनाथांचें किंवा दयाळनाथांचें ही शंका उत्पन्न होण्यास जें ठिकाण आहे त्या ठिकाणीं 'धन्य गुरु दयाळ, दयाळ जगजेठी' असें म्हटलें आहे. तेथें 'दयाळ' हा शब्द दयाळनाथांबद्दल नसून तो शब्द गुरूचें विशेषण आहे. व ह्या पदाच्या नियमानुरूप 'दयाळ' शब्दाची द्विरुक्ति आहे.

### पद २१० वें.

यदुकुलभूषणासी जाउनी आणा ॥ ध्रुवपद. ॥

निशा[1]पति तीव्र कीति? पुष्प जाती प्राणहरणीं ।
करूं मी सये! काय? आतां ठेवीं भाळीं पाणी ॥ यदुकुल० ॥ १ ॥
वधू येती हाटीं[2]हुनी, हाची सर्व बोल कानीं ।
कुं[3]ब्जे कुब्जेलागीं हरि लागलासे ध्यानीं ॥ यदुकुल० ॥ २ ॥
देवनाथप्रभुसी स्तव करुनी आणीं तूं युक्ती करुनी ।
तरीच तूं मायपरी धन्य धन्य वानी ॥ यदुकुल० ॥ ३ ॥

### पद २११ वें.

सखिये! आनंद नंदराजगृहीं ॥ ध्रुवपद. ॥

कृष्णजन्मदिनीं व्रजजननायिका देती रत्न मैं[4]ही ॥ आनंद० ॥ १ ॥
तैल हरिद्रा कुंकुम चंदन सिंपिती गोप दहीं ॥ आनंद० ॥ २ ॥
होउनी पूर्णमनोरथ जाती गुणीजन याचकही ॥ आनंद० ॥ ३ ॥
गोपग्रामवधू म्हणताती यशोदे बाई हें भाग्य नव्हतें कधीं ॥ आनंद० ॥ ४ ॥
देवनाथ म्हणे जननीस्तव अगणित कोण कथी ॥ आनंद० ॥ ५ ॥

### पद २१२ वें.

आज दिवस हा सोनियाचा झाला ।
स्वामी माझा हृदयभुवनीं आला ॥ ध्रुवपद. ॥

अँ[5]कल्पीत निजतां जागी झालें ।
नवल नेत्रीं म्यां चोज देखिलें ।
अद्भुत तेजें ब्रह्मांड धँ[6]वळलें ।
पूर्णानंदें निजज्योती प्रकाशलें ॥ आज० ॥ १ ॥
ज्योतिर्मय भासलें त्रिभुवन ।
भासाभास आटलें पडे शून्य ।
समरस रेतें तन्मय झालें मन ।
ब्रह्मरूप हें अवघें जन विजन ॥ आज० ॥ २ ॥
पाहतां पाहण्याचा ठाव उरला नाहीं ।
कोंदँ[7]टलें निजरूप निजठायीं ।

---

१. चंद्र. २. बाजारांतून. ३. कुबड्या. ४. पृथ्वी. ५. एकदम, अचानक. ६. धवल (पांढरें, शुभ्र) झालें. ७. व्यापलें, भरलें.

अंतर्बाह्यव्यापक दिशा दाही ।
बोलों जातां मज बोलवेना कांहीं ॥ आज० ॥ ३ ॥
कृपा केली गुरुनाथें श्रीगोविंदें ।
प्रतिती[1] येतां निरसलीं सर्व द्वंद्वें[2] ।
गुणगण वाणी गातसे प्रेमछंदें ।
देवनाथ नाचतो ब्रह्मानंदें ॥ आज० ॥ ४ ॥

### पद २१३ वें.

झर झर झर झर चाललि नरतनु स्वस्थ बैसलासी ।
पट पट पट पट वय सरलें पुढें कैसें करसी ? ॥ ध्रुवपद. ॥
अमोल काया जाइल वांया उमज पडेना ।
गर गर गर गर दिन आटले सोय सांपडेना ॥
सट्टा बट्टा करिसि गड्या रे! घेपु देपु नाना ।
आणखी तूं चिंता ठेविसी मष्करासि जाणा ॥
चाल ॥ या कारभाराचें व्यसन वाईट ।
मी तुला सांगतों बुडालासि स्पष्ट ।
हा नरक लिहिला कपाळीं शेवट ।
हे यमदूत गांजिती तुला नीट ॥
टीप ॥ कर कर कर कर फांसे घालुनी ओढिती जिवासी ।
हर हर हर हर काय भूलला चुकेना यम जाची[3] ॥ झर० ॥ १ ॥
दो दिवसांची धनसुतदारा यांत नसे कांहीं ।
लटकी काया ममता माया फसला भवडोहीं ॥
आयुष्य सरलें पुण्यहि सरलें संचित····देहीं ।
अहोरात्र तूं खटपट करिसी दिनरजनीं पाहीं ॥
चाल ॥ तूं मार्ग विसरलास सद्गुरुचरणाचा ।
तैं बळकट धरिला प्रपंच दोषाचा ।
'राम' म्हणतां रे! कशि बसली वाचा ।
सर्वपरी तूं कैसा झाला बायलीचा ॥

---

१. अनुभव. २. द्वैत, भेद. ३. त्रास देई.

टीप ॥ धिक धिक धिक धिक जिणें तुझें विन्मुख नामासी ।
वन वन वन वन फिरुनि शिणला आला नरदेहासी ॥ झर० ॥ २ ॥
शास्त्रपुराण गीता भागवत सोडुनियां कामा ।
लुटु लुटु लुटु लुटु सदा धांवसी विसरलासि रामः ॥
कन्यापुत्रसूनकलत्र कोणाचा मामा ।
आणिक तुज हे बंधु सोयरे ना येतिल कामा ॥
चाल ॥ मी तुला सांगतों सावध होय बा मूढा[1]! ।
तूं पटकन मरसिल कां झालासी वेडा ।
यम फांसे घालिती किल्हिकुलुप खोडा ।
................................... ॥
टीप ॥ तूं असें जाणुनि प्रेम मानसीं कुरकुर कां करिसी ।
कुर कुर कुर कुर करुनि तरी ना चुके यातनेसी ॥ झर० ॥ ३ ॥
प्रपंच करुनि होय रे! अलिप्त न लगे त्याचे अंगा ।
करुणा करिल होय रे! झडकरी भज पांडुरंगा ॥
पट पट पट पट विषय सोडुनी धरीं तूं सत्संगा ।
धरि धरि धरि धरि आज पाय तूं, नेतिल भवभंगा ॥
चाल ॥ तूं दे सोडुनि हे अवघी खटपट ।
मग सोपी होइल तुला पायवाट ।
मग रामप्रतापें यमदूत ............ ।
................................... ॥
टीप ॥ देवनाथ म्हणे रे! प्राण्या कुरकुर कां करिसी ।
कुर कुर कुर कुर करुनि तरी ना चुके यातनेसी ॥ झर० ॥ ४ ॥

**पद २१४ वें.**

अपने घटमाहि बे । भटकता क्यंव फिरता भाई । गुरूकू देख ॥ ध्रुवपद. ॥
दृश्य मायासो निसदिन मन लागावे । बाप म्हैतारित्रिया जागा ॥
पूत और भ्राता । हरे हरे पूत और भ्राता ॥
पसुधन चित लागा बे । अंतको छन जावत भागा ॥
बंधन पडा । हरे हरे बंधन पडा ॥
नाहक् प्रितधागा बे । कोवन साथि एक होगा ॥
छांडके जावे घरकू आवे । तोहेकु बनमाहि बे ॥ भटकता० ॥ १ ॥

---

१. वेड्या, मूर्खा.

लाल और सफेत श्यामरंग गहेरा बे । वामो नीलबिंदु तारा ॥
बीच् झगमगे । हरे हरे बीच झगमगे ॥
झल्लालँ प्रीत प्यारा बे । जाको नहि अंत न पारा ॥
सोहं जाप आपहि आप । उन्मनी है सोही बे ॥ भटकता० ॥ २ ॥
भोरगुंफामों निसदिन प्रभु खेले बे । सोही जगनगमों झूले ॥
उस तेजोसे । हर हर उस तेजोसे ॥
कोटि रवि न तूले बे । देखकर आगन चांद भूले ॥
लछन लगा वामो मन डोल बे । बहता इमृत वो पीले ॥
घनन घडियाल बाजता । ताल करबिन जप वोहि बे ॥ भटकता० ॥ ३ ॥
गुरुकिरपासो भवबंधन छूटे बे । सुनतहि जभ छाती फाटे ॥
सज्जन गये । हरे हरे सज्जन गये ॥
जाना उस बाट बे । जननमरनका बंध काटे ।
जिसपर दयाल गुरु नजर उलटे बे । उसे देवनाथ ताठ गाठे बे ॥
पुरन भरपूर, रहो चकचूर, तुजमे लूं तूंहि बे ॥ भटकता० ॥ ४ ॥

---

## कटिबंध[1] ६ वा.

आहारे! रांडलेंका जन्मुनि काय केलें? ॥ ध्रुवपद. ॥

कवडी कवडी करुनी जोडी[2], विप्रालागीं हात न जोडी, वेश्येलागीं शालजोडी, बसावयाला खाशी घोडी, पखाल दाढी शालजोडी, घे आंगावर जरतारी पगडी, घडी घडी दे ताव मुछावर, छडी बरदार पुढें चालती बडेजाव करी, रौप्य काठिया, भालदार चोपदार नकीब, खिजमतगार, भरुनि गुडगुडी, करीं धरुनियां ओढी, मुखांतुन धूर काढितो, लोडीं टेंकुनि सदरीं बसतो, बरवा दिसतो, तृणकाडीसम इतर लेखितो[3], गाढी अभिमानाची पेटी, बेटाबेटी, पोटीं निजसुख दढीकरण करी, प्रौढी उंच घरीं, ओढी काळ हें कसें कळेना, रति पळलव क्षण आयुष्य सर्वही सरलें ॥ आहारे० ॥ १

चोवीस पाठी जामेवार, गांडिस किनखापी बिजार, पायीं बानाती पैजार[4], जडावाचे अलंकार, बहु आंगावरते, शिरीं शिरपेंच, कानिं चौकडा, उंच गळां मोत्यांची कंठी, दंडावर सोन्याची पेटी, नवग्रहाच्या पोंहोच्या मनगटीं,

---

१. यापूर्वींचे पांच कटिबंध पृ० १३-१७ यांत छापले आहेत. २. जमवी, मिळवी. ३. समजतो. ४. जोडे.

हिरकणीच्या मुद्या बोटीं, बहु पोटीं खुशाल मशाल जळती, पालखींत होउनि स्वारी जी, समागमें ते स्वारपायदळ, अती मायंदळ, पुढें चालती, अजब घाट एकथाट मुनिजन, भाट गर्जती, अचाट बिरुदें, रस्त्यामध्यें दाट दाट नीवाट, फुटेना नैश्वर्याच्या ऐश्वर्यामधें, मस्त कसा जी, बेर्स्त जसा उन्मत्त, तसा परि जसा, **काळ** हा उभा लक्षितो, वेळ कसा अल्पमाळ कळेना, वळेनाचि रें-ति चित्त खळाचें, हरिभजनीं बहु मोलाचें, जीवित खोवियलें ॥ आहारे० ॥ २

जिरें हिंग वरी, लसुण फोडणी, कोशिंबिरि खोबरें किसुनी, मुळे कां-कड्या चिरुनी, वरतें लवण, मिऱ्यांचें तीक्ष्ण, त्यावरी दधि लावुनी सुंदर, चटणी हरभऱ्याची, दाळ ठेंचुनी, नारळाचा गर्भ ओला, बहु दाट चारोळ्या, पीठ कस्तुरी केशर घालुनी, आम्ल मिळविलें, तऱ्हेतऱ्हेचीं, बहुत लोणचीं, हारित मिरच्या, तिखट वाटलें, यापरि चटण्या, चिरियल्या वरि, आलें निंबू सुगंधित नीर, सुवर्ण चंबुपात्र तें, तसें त्यांत आचमनीं, तशी ते करीं घेउनी, 'परिषिंचामि' करोनि, चित्रावति घातिल्या, अहंकृतीच्या, प्राणाहुती जी, दुर्मद करी त्या, मुखीं घातल्या, बहु मिळाले, पंक्तिपावन संपत्तीचे, आबा बाबा, तात्या काका, दादा नाना, संकट पडल्या एक दिसेना, विपत्तिकाळीं कोणि पुसेना, हरामखोर ते, कारभारी पहा, पंक्तिस घेउनी, भोजन करितो, ग्रास घेतां, गळीं अडकतो, आचाऱ्यावर बहु कडकडतो, समोर न ज्याच्या बहु फडकतो, बहुत सावजी, क्रोधयुक्त, प्याद्याचा फर्जी, पुजीनाचि कधीं देव-विप्रगुरु विषयगर्जी, अतिशयचि कडक मर्जी, पाहुनियां ते अर्जी करिती, तों रावजी हृदयामार्जी, सौख्य मानिती, इंद्र आपणासमान लेखिती, मीच असा अभिमान समार्जी, पडे अहो जी, **यमा**र्जींची स्वारी येतां, कोण पाजिला सोडवितो मग नुमजे लवही, हरामबुद्धित विरमलें मन, पहा आजि या काम-सर्पें डंखियलें ॥ आहारे० ॥ ३

विषयमदाचा पिउनी प्याला, धुंद सदा झाला मतवाला, मीच म्हणे एक दवलतवाला, परंतु साला, वालासम हेमधर्म करीना, भला बुराजी पर न आपुला, कदा न पाहे, दासीला दे पदार्थ इच्छित, घालि पिल्याला बाहिर

---

१. पुष्कळ. २. बोकड, बकरा. ३. अल्प, थोडा. ४. रति=तिळमात्र. ५. भोजनास आरंभ करण्याच्या वेळी म्हणावयाचा मंत्रविशेष. ६. दंश केला.

ज्याला लाज न वाटे बटकीच्याला, संता देखुनि, पाठी फिरवी, दुश्चित कां जन्मतां न मेला, असा कशाला भूमिं भारला, जगीं असा बाजिंद बावा, आतां हिरवा, गर्वाचा सरडाचि मातला, उदइक परवां सरवा लावुनि, काळें ओढी, सोडवितां मग कोणि दिसेना, संपत्ति गेल्या दैन्यवाद भक्षायाची विपत्ति नाना, परि उमजेना, अंतःकरणामाजि प्रकारा, बुद्धिविचारा, सांगों जातां वसवस कुतरा पाठिं लागतो, वडिलाचें शिकविलें न माने, जवानिचिया तवरामध्यें सैरा जैसा नवरा फिरतो, मनांत लहरा तैसा व्यापाराचे फंदीं छंदें शिरुनी बंदीं पडतो, कुंदी करिल रविपुत्र[१] कसे, अणुमात्र कळेना, नुमजुनि पुत्रकामिनी, मित्र कसे हे, आप्तसखे निजमनांत मानियलें ॥ आहारे० ॥ ४

आप्तांमध्यें घरांत करकर गेली संपत्ति ते भरभर, विपत्तिकाळें केलें जर्जर, दुःखित अंतर, श्रेष्ठत्वा दवडुनि नष्टपण बहु कष्ट भोगवी, अश्वादि गज उटरखाना एक दिसेना विष्णुपत्निची ज्येष्ठ भगीनी[२], बहु सहिष्णुपणें, निजगृहांत शिरली, इष्टमित्र, अपवित्र म्हणुनी, चेष्टा करिती, स्त्रीपुत्र निशिदिनीं, नष्ट मनें कलहासी करुनी, दिनरात्र फिरतसे, मिळेनाति कण मुष्टिभरी, अति कष्टि जीव परि, हाव सोडिना, क्षणेक दो प्रहराची छाया, तद्वत माया, हृदयामध्यें अनुभव येतां, परी फिरेना, बुद्धि खराची[३], सोय हिताची, कदा फिरेना, लाजिरवाणें जिणें मिरवितो, त्रास न ये चित्तास पहाहो, येतां सन्निध काळ दुतांतें, दया न उपजे, नेतो काढुनि प्राण प्रेतरूप शरीर अचेतन, कांतांत आकांत करी बहु यमपार्षद[४] दे उचलुनि नेती चित्रगुप्त ते जमा विलोकुनि वसुला भिडवुनि बाकि काढिती मोठी कैद महा ते वैद्यजी रोग पाहुनी औषध देती, दृढतर लोहस्तंभि बांधिती, कुळासहित त्या नरकिं बुडविती, कुंभीपाकीं[५] नेउनि घालिती, देवनाथ म्हणे हर हर हर हर काय गती, हे मंदमती, तुज देवविप्रगुरुवडिलानें, बहु शिकविलें, परंतु त्यांतें सुधासम वाक्य उपेक्षुनि, आत्मस्वहित बुडविलें ॥ आहारे० ॥ ५

---

१. यम. २. लक्ष्मीची वडिल बहीण=अवदसा, आक्काबाई (दरिद्र). ३. गाढवाची. ४. यमाचे सेवक. ५. कुंभपाक–नरकविशेष. येथें पापी मनुष्याला मडक्यांत घालून शिजवितात.

हिरकणीच्या मुद्या बोटीं, बहु पोटीं खुशाल मशाल जळती, पालखींत होउनि स्वारी जी, समागमें ते स्वारपायदळ, अती मायंदळ, पुढें चालती, अजब घाट एकथाट मुनिजन, भाट गर्जती, अचाट बिरुदें, रस्त्यामध्यें दाटं दाट नीवाट, फुटेना नैश्वर्याच्या ऐश्वर्यामधें, मस्त कसा जी, बेस्तं जसा उन्मत्त, तसा परि जसा, **का**ळ हा उभा लक्षितो, वेळ कसा अल्पमाळ कळेना, वळेनाचि रें-ति चित्त खळाचें, **ह**रिभजनीं बहु मोलाचें, जीवित खोवियलें ॥ आहारे० ॥ २

जिरें हिंग वरी, लसुण फोडणी, कोशिंबिरि खोबरें किसुनी, मुळे कांकड्या चिरुनी, वरतें लवण, मिऱ्यांचें तीक्ष्ण, त्यावरी दधि लावुनी सुंदर, चटणी हरभऱ्याची, दाळ ठेंचुनी, नारळाचा गर्भ ओला, बहु दाट चारोळ्या, पीठ कस्तुरी केशर घालुनी, आम्ल मिळविलें, तऱ्हेतऱ्हेचीं, बहुत लोणचीं, हारित मिरच्या, तिखट वाटलें, यापरि चटण्या, चिरियल्या वरि, आलें निंबू सुगंधित नीर, सुवर्ण चंबुपात्र तें, तसें त्यांत आचमनीं, तशी ते करीं घेउनी, 'परिषिंचामि' करोनि, चित्रावति घातिल्या, अहंकृतीच्या, प्राणाहुती जी, दुर्मद करी त्या, मुखीं घातल्या, बहु मिळाले, पंक्तिपावन संपत्तीचे, आबा बाबा, तात्या काका, दादा नाना, संकट पडल्या एक दिसेना, विपत्तिकाळीं कोणि पुसेना, हरामखोर ते, कारभारी पहा, पंक्तिस घेउनी, भोजन करितो, ग्रास घेतां, गळीं अडकतो, आचाऱ्यावर बहु कडकडतो, समोर न ज्याच्या बहु फडकतो, बहुत सावजी, क्रोधयुक्त, प्याद्याचा फर्जी, पुजीनाचि कधीं देवविप्रगुरु विषयगर्जी, अतिशयचि कडक मर्जी, पाहुनियां ते अर्जी करिती, तों रावजी हृदयामार्जी, सौख्य मानिती, इंद्र आपणासमान लेखिती, मीच असा अभिमान समाजीं, पडे अहो जी, **य**मार्जींची स्वारी येतां, कोण पाजिला सोडवितो मग नुमजे लवही, हरामबुद्धित विरमलें मन, पहा आजि या कामसर्पें डंखियलें ॥ आहारे० ॥ ३

विषयमदाचा पिउनी प्याला, धुंद सदा झाला मतवाला, मीच म्हणे एक दवलतवाला, परंतु साला, वालासम हेमधर्म करीना, भला बुराजी पर न आपुला, कदा न पाहे, दासीला दे पदार्थ इच्छित, घालि पित्याला बाहिर

---

१. पुष्कळ. २. बोकड, बकरा. ३. अल्प, थोडा. ४. रति=तिळमात्र. ५. भोजनास आरंभ करण्याच्या वेळीं म्हणावयाचा मंत्रविशेष. ६. दंश केला.

ज्याला लाज न वाटे बटकीच्याला, संता देखुनि, पाठी फिरवी, दुश्चित कां जन्मतां न मेला, असा कशाला भूमिं भारला, जगीं असा बाजिंद बावा, आतां हिरवा, गर्वाचा सरडाचि मातला, उदइक परवां सरवा लावुनि, काळें ओढी, सोडवितां मग कोणि दिसेना, संपत्ति गेल्या दैन्यवाद भक्षायाची विपत्ति नाना, परि उमजेना, अंतःकरणामाजि प्रकारा, बुद्धिविचारा, सांगों जातां वसवस कुतरा पाठिं लागतो, वडिलाचें शिकविलें न माने, जवानिचिया तवरामध्यें सैरा जैसा नवरा फिरतो, मनांत लहरा तैसा व्यापाराचे फंदीं छंदें शिरुनी बंदीं पडतो, कुंदी करिल [१]रविपुत्र कसे, अणुमात्र कळेना, तुमजुनि पुत्रकामिनी, मित्र कसे हे, आप्तसखे निजमनांत मानियलें ॥ आहारे० ॥ ४

आप्तांमध्यें घरांत करकर गेली संपत्ति ते भरभर, विपत्तिकाळें केलें जर्जर, दुःखित अंतर, श्रेष्ठत्वा दवडुनि नष्टपण वहु कष्ट भोगवी, अश्वादि गज उटरखाना एक दिसेना [२]विष्णुपत्निची ज्येष्ठ भेगीनी, बहु सहिष्णुपणें, निजगृहांत शिरली, इष्टमित्र, अपवित्र म्हणुनी, चेष्टा करिती, स्त्रीपुत्र निशिदिनीं, नष्ट मनें कलहासी करुनी, दिनरात्र फिरतसे, मिळेनाति कण मुष्टिभरी, अति कष्टि जीव परि, हाव सोडिना, क्षणेक दो प्रहराची छाया, तद्वत माया, हृदयामध्यें अनुभव येतां, परी फिरेना, बुद्धि [३]खराची, सोय हिताची, कदा फिरेना, लाजिरवाणें जिणें मिरवितो, त्रास न ये चित्तास पहाहो, येतां सन्निध काळ दुतांतें, दया न उपजे, नेतो काढुनि प्राण प्रेतरूप शरीर अचेतन, कांतांत आकांत करी बहु [४]यमपार्षद दे उचलुनि नेती चित्रगुप्त ते जमा विलोकुनि वसुला भिडवुनि बाकि काढिती मोठी कैद महा ते वैद्यजी रोग पाहुनी औषध देती, दृढतर लोहस्तंभि बांधिती, कुळासहित त्या नरकिं बुडविती, [५]कुंभीपाकीं नेउनि घालिती, देवनाथ म्हणे हर हर हर हर काय गती, हे मंदमती, तुज देवविप्रगुरुवडिलानें, बहु शिकविलें, परंतु त्यांतें सुधासम वाक्य उपेक्षुनि, आत्मस्वहित बुडविलें ॥ आहारे० ॥ ५

---

१. यम. २. लक्ष्मीची वडिल बहीण—अवदसा, आक्कावाई (दरिद्र). ३. गाढवाची. ४. यमाचे सेवक. ५. कुंभपाक—नरकविशेष. येथें पापी मनुष्याला मडक्यांत घालून शिजवितात.

## आरती.[1]

जयदेव जयदेव जय सद्गुरुनाथा ।
अकळा अमळा अढळा अगणित गुणगाथा ॥ ध्रुवपद. ॥
पंचप्राणें आरति तुज सद्गुरुराया ।
ओवाळूं निजभावें अर्पित पदिं काया ॥
निर्गुण निर्वीकारा स्वामी सुखसदया ।
स्मरतां तव नामासी दाविशि निज ठाया ॥ जयदेव० ॥ १ ॥
सद्गुरु दातारा तूं मुक्तिपदीं ठाव ।
देशी म्हणुनी जडला पायीं सद्भाव ॥
भावें उगवीसी गोवें बोलसि निज भाव ।
मी माझा मजमार्जी दाखविला देव ॥ जयदेव० ॥ २ ॥
मन हें समरस स्वरुपी अखंड सुखतर हो ।
कोंदला स्वानंदू अनुपम सुखलाहो ॥
निर्गुण निर्विकारा भरला हा डोहो ।
मावळला आभास गळला संदेहो ॥ जयदेव० ॥ ३ ॥
जयजयाजी सद्गुरुनाथा गोविंदा ।
भेदाभेदातित तूं सच्चित्पदसुखदा ॥
निजसत्तेनें सोडुनि माया अपवादा ।
दिधलें देवनाथा अनाथ स्वानंदा ॥ जयदेव० ॥ ४ ॥

---

१. ही आरती देवनाथांनीं केलेली असून त्यांच्या सांप्रदायांत अद्यापि चालू आहे.